म. ग्रं. सं. ठाणें
पद
. नं.

श्रीलक्ष्मीनारायणप्रेस

# श्रीमंत रावबहादुर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांचें चरित्र.

REFBK-0002249

किंमत एक रुपया.

हात्म्य ,

संग्रहालय
नं.
सा.
२२४८

श्रीमंत रावबहादुर

# अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांचें चरित्र.

निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंचि फळ ॥


लेखक—

सदाशिव नानाभाई हाटे, एल. सी. ई., बी. एस्सी.



प्रकाशक—

रामचंद्र कृष्ण सामंत,

गोरेगांव, पोष्ट मालाड, जिल्हा ठाणें.

शा. शके १८४५. इ. सन १९२३.



( प्रकाशका [illegible] ले आहेत )



मराठी ग्रंथ संग्रहालय

द्वा. क्र. २२४९

REFBK-0002249

मुद्रक—रा. रा. **चिंतामण सखाराम देवळे**, मुंबई वैभव
प्रेस, सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशक—**रामचंद्र कृष्ण सामंत**, मु. गोरेगांव,
पोष्ट मालाड, जि० ठाणें.

# प्रस्तावना.

श्री. रा. ब. अनंत शिवाजी देसाई उर्फ भाऊसाहेब टोपीवाले अगदीं गरीब स्थितींत जन्मले असून, प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांस शिक्षण बिलकुल लाभलें नाहीं. असें असूनहि त्यांनीं आपला कुलाभिमान जागृत ठेऊन व स्वतःची अक्कलहुशारी व हिंमत यांवर विश्वास धरून, सतत दीर्घोद्योगानें रंकाच्या स्थितीचें रावाच्या स्थितींत रूपांतर केलें. तेव्हां असल्या पुरुषाचें चरित्र अनेक दृष्टींनीं मनोरंजक, बोधप्रद व मार्गदर्शक झालेंच पाहिजे.

मनुष्यप्राण्यास उपजतबुद्धि कमीअधिक प्रमाणांत असते, पण त्यास ज्ञान नसतें. तें त्यास आपल्या आयुष्यांत संपादन करावयाचें असतें. ज्ञानसंपादनाचे मार्ग अनेक आहेत. प्राचीन काळीं गुरुगृहीं अथवा शारदापीठांत राहून अध्यापकापासून श्रवणद्वारें ज्ञान प्राप्त करून घेत असत. अर्वाचीन काळीं मुद्रणकलेमुळें ज्ञानप्राप्तीचे मार्ग बरेच सुलभ झाले आहेत.

प्रत्येक मनुष्याचें आयुःक्रमण तीन गोष्टींवर अवलंबून असतें. पूर्वसंचितकर्मानुसारिणी उपजत बुद्धि, परिस्थिति व बुद्धिपुरःसर प्राप्त करून घेतलेलें ज्ञान, ह्या त्या तीन गोष्टी होत.

बाळपणांतील परिस्थिति, जीमध्यें गृहस्थिति, घरांतील वडिलांचा वर्तनक्रम व त्यांनीं लावून दिलेलें वळण, आणि बाहेरची संगत ह्यांचा

समावेश होतो, तिजवर मनुष्याच्या आयुष्यांतील मार्गाची रूपरेखा आरंभीं अवलंबून असते. पुढें तो मनुष्य आपल्या प्राप्त करून घेतलेल्या ज्ञानाच्या जोरावर त्या रूपरेखेस स्वतः वळण लावीत असतो.

संपादिलेलें ज्ञान दोन प्रकारचें असतें. एक तात्वीक व दुसरें व्यावहारिक. केवळ तात्विक ज्ञानाचा उपयोग आयुष्यांत फारसा होत नसतो. त्यास व्यावहारिक ज्ञानाची जोड लागते. केवळ तात्विक ज्ञानाचा संग्रह बैलाचे पाठीवर लादलेल्या गोण्यांप्रमाणें होय.

व्यावहारिक ज्ञान अनुभवापासून उगम पावतें. सृष्टी, समाज अथवा राष्ट्र यांतील होणाऱ्या घडामोडींचें अवलोकन करून मनुष्य क्रिया करीत असतो; व ही त्याची क्रिया जशी सुसंगत अथवा विसंगत असेल, त्याप्रमाणें त्यास यशापयश प्राप्त होत असतें. हा अनुभवसिद्धप्रमाणांचा संग्रह म्हणजेच व्यावहारिक ज्ञान होय. हे अनुभव " पुढच्यास ठेंच मागचा शहाणा " व " त्याचें यश तें आपलें यश " ह्या न्यायानें, त्या दिशेनें काम करण्यास प्रवृत्त झालेल्या मनुष्यास मार्गदर्शक होत असतात.

वर म्हटलेंच आहे कीं, अलीकडे ज्ञानप्राप्तीचे मार्ग ग्रंथप्रकाशनानें सुलभ झाले आहेत. व्यावहारिक ज्ञान देणाऱ्या ग्रंथांत यशस्वी थोर पुरुषांच्या चरित्रांचा समावेश होतो. त्या यशस्वी थोर पुरुषांनीं आपला उद्योगधंदा कोणकोणत्या धोरणांनीं आंखिला, त्यांस कोणत्या अडचणी आल्या व त्यांचें निवारण त्यांनीं कोणत्या उपायांनीं केलें, त्यांच्या यशास त्यांच्या आंगचे कोणते गुण कारणीभूत झाले, वगैरे गोष्टी त्यांच्या चरित्रांत असतात. त्यामुळें असल्या चरित्रांचें अवलोकन त्या किंवा तसल्या धंद्यांत पडणाऱ्या इसमांस बोधप्रद व मार्गदर्शक होतें.

आज हिंदुस्थानांत जी मोठी उणीव भासत आहे ती ही कीं, येथें कच्च्या मालापासून तयार जिनसा बनविण्याचे कारखाने फारच थोडे

आहेत. आमच्या हिंदुस्थानांतून कच्चा माल परदेशांत जाऊन त्याचा बनलेला पक्का माल आम्हीं विकत घ्यावा, व आमचा पैसा परदेशांत पाठवावा, आमचे लोक उपाशी मरावे व इतर राष्ट्रांतील लोकांनीं आमच्या पैशानें पोटावर हात फिरवीत असावें, आमचा देश कंगाल व्हावा व इतर देश सुसंपन्न व्हावेत; अशी स्थिति होण्यास राजकारण हें एक कारण तर खरेंच, परंतु तेंच सर्वस्वीं नव्हे. ही जाणीव अलीकडे पूर्णपणें आमच्या पुढाऱ्यांस होऊं लागली असून, नाना प्रकारचे कलाकुसरीचे धंदे व तत्प्रीत्यर्थ लागणारे कारखाने लहानमोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानांत व्हावे, अशी उत्कट इच्छा अलीकडे प्रगट होऊं लागली आहे. स्वराज्यप्राप्तीसाठीं आज आम्हीं झटत आहों, त्याबरोबरच आमच्या देशाची आर्थिक उन्नति घडवून आणण्याचे जारीनें प्रयत्न झाले पाहिजेत. आमच्या बुद्धिमान व सुशिक्षित तरुणांनीं नोकरपेशांत अल्प श्रमानें अल्पसंतुष्ट राहण्याचें सोडून देऊन, उद्योगधंद्यांत पडलें पाहिजे. पुष्कळ मंडळी अशा तऱ्हेनें उद्योगधंद्यांत पडत आहेत, व पुष्कळ पडतील अशीं चिन्हें दिसत आहेत.

स्वदेशीय अथवा परदेशीय कलाभुवनांतून प्राविण्य मिळविल्यावरहि, कांहीं तरुणांनीं प्रथमच आलेल्या अपयशानें हताश होऊन, कांहींनीं भांडवलाच्या अभावीं, तर इतर कांहींनीं तारतम्य व सारासार विचार नसल्यामुळें व्यवहार न साधल्यावरून, किंवा आपल्या कामांत सुव्यवस्थित रचना घडवून आणण्याच्या सामर्थ्याची जोड न मिळाल्यामुळें आलेल्या अडचणींचें निरसन करण्याची युक्ति न सुचल्यानें हतबल होऊन, व्यापारउद्योगधंदा सोडून दिला असून नोकरपेशा पतकरला आहे. **श्री. भाऊसाहेब टोपीवाले** यांच्या सारख्या एका दारिद्र्यावस्थेंत वाढलेल्या अशिक्षित मुलानें हिय्या करून, केवळ जन्मसिद्ध बुद्धीच्या व इतर विशिष्ट उपजत गुणांच्या बळावर व्यापार व उद्योगधंदा यांत सतत परिश्रमानें

इतकें यश संपादन केलें कीं, बहुरत्ना मुंबापुरीसारख्या शहरीं त्यांची थोर कर्तृत्ववानांत गणना झाली आहे. तेव्हां त्यांचें चरित्र उपरिनिर्दिष्ट तरुणां-सारख्यांस हुरूप आणील ह्यांत शंका नाहीं.

चरित्रें नाना प्रकारचीं असतात. त्यांतील जीं केवळ गुणवर्णनात्मक व ऐतिहासिक असतात, तीं जिज्ञासु वाचकांस इतकीं मनोरंजक व बोधप्रद वाटत नाहींत. चरित्रनायकाच्या कृतींतल्या तत्वांचें निरूपण करून तदनुषंगिक विषयांची मांडणी करण्याच्या दृष्टीनें लिहिलेलें चरित्र जास्त उपयुक्त होत असतें. आम्हीं हें चरित्र ह्याच धोरणानें लिहिलें आहे. कारण आमच्या चरित्रनायकांच्या जीवनचरित्राचा **विशेष** त्यांनीं केलेला धनसंचय हा नसून, केवळ निराश्रित स्थितींत आरंभिलेला उद्योगधंदा वाढवून विनासाहाय्यानें, उपजत चातुर्यानें व एकट्याच्या हिंमतीवर भरभराटीस आणिला, **हा** असल्यामुळें, अशा यशस्वी थोर पुरुषानें यश संपादन करण्यांत स्वीकारलेलें धोरण हेंच अनुभवसिद्ध व्यावहारिक ज्ञान होय.

श्री. भाऊसाहेब देसाई ह्यांच्यासारखें बुद्धिवैभव सर्वांसच असणें संभवनीय नाहीं. “ **शैले शैले न माणिक्यं.** ” तेव्हां त्यांच्या एवढें यश सर्वांसच प्राप्त होणें शक्य नाहीं. तथापि त्यांनीं आपल्या व्यवसायांत घेतलेली खबरदारी व ठेवलेलें धोरण लक्षांत घेऊन चिकाटीनें दृढोद्योग केल्यास, त्यांच्यासारखें राव न होतां आलें तरी, सुखीसाव होण्यास कोणतीच हरकत नाहीं. मात्र व्यापारांत व उद्योगधंद्यांत उतरणाऱ्या इस-मांचा तिकडे ओढा असून, त्या विषयाची त्यांस आवड, ग्रहणशक्ति व त्वरित विकास पावणारी जन्मसिद्ध बुद्धि असावयास पाहिजे. पोटापाण्यासाठीं कांहींतरी करावयाचें म्हणूनच व्यापार व उद्योग-धंद्यांत पडणाऱ्यांस यश आलें तरी तितक्यापुरतेंच. विश्वविद्यालयांतील तीन वृत्त्यांपैकीं केवळ पोटापाण्यासाठीं एखादी पतकरून खितपत पडलेले

वकील, डाक्टर किंवा इंजिनीयर पुष्कळ आहेत. लायक मनुष्यांस ह्या चरित्रांतून पुष्कळ गोष्टी शिकण्यास मिळून, त्यांजपासून त्यांस लाभ होईल.

आमचे चरित्रनायक दैववान होते, व ते अत्युन्नतावस्थेस पोंचण्यास त्यांचें बलवत्तर दैवच कारण झालें, असेंही वाटण्याचा संभव आहे. आमचा हिंदुस्थान इथूनतिथून दैववादी आहे, तरी दैवाचा खरा अर्थ फारच थोडक्यांस कळलेला असतो. आपलेंच स्वतःचें पूर्वजन्मींचें कर्म फलोन्मुख झालें म्हणजे त्यालाच दैव असें नांव दिलें जातें. ह्याच्याशिवाय दैव म्हणून कांहीं निराळें नाहीं. शास्त्रसंमत कर्म सिद्धि प्राप्त करून देतें, तर अशास्त्रिय कर्म अनर्थाला कारण होतें. ह्या जन्मींच्या कर्मास पूर्वजन्मार्जित कर्म पोषक अथवा बाधक होत असतें; हें जसें खरें तसेंच हेंहि खरें आहे कीं, ह्या जन्मींचीं सद्धेतुप्रेरित व उत्साहयुक्त बुद्धीनें केलेलीं सत्कर्में पूर्वजन्मार्जित असत्कर्मांच्या अनिष्ट परिणामांचा पाडाव करूं शकतात. तस्मात् भाऊसाहेबांच्या पुढ्यांत दैवानें ताट वाढून आणिलें-त्यांच्या कर्तबगारीनें आणिलें नाहीं—असें म्हणतां येत नाहीं. आपलें दैव कसें आहे हें मनुष्यास कळत नाहीं. प्रत्येक इसम जन्मास येतो तो मागच्या जन्मींच्या पापपुण्याचें गाठोडें संगतीस घेऊनच येतो. ज्याच्या हातून तन-मन-धनेंकरून अंशतःहि पाप घडलेलें नसतें तो पुनर्जन्मासच येत नसतो. भाऊसाहेबांच्या पूर्वजन्मींच्या खातेवहींत पापाची जमा नसती तर, ते जीवन्मुक्तच झाले असते; व आज हें त्यांचें चरित्र लिहिण्याची पाळीच आली नसती. आरंभींचें दारिद्र्य, शिक्षणप्राप्तीचें दुःसाध्यत्व, बालपणींच आलेला पोरकेपणा व निराश्रितपणा, भांडवलाचा अभाव, फेरीवाल्यांचा मत्सर, खाणींतलें अपयश, भागीदार वडील बंधूचें खेंचलगामी धोरण, स्पर्धा, विलायती व्यापाऱ्यांची माल पुरविण्यांत कुचराई, प्रकृतीचें अस्वास्थ्य वगैरेसारख्या अनेक संकटांनीं अडविलें असतां न

डगमगतां, दैवाशीं झगडून केवळ स्वपराक्रमानें भाऊसाहेबांनीं जय संपादिला. अशा प्रकारचीं संकटें निवारण्यास लागणारे गुण व सदुपाय ह्या संबंधींचे धडे त्यांच्या चरित्रांतून पुष्कळ घेण्यासारखे आहेत.

स्वतःच्या उत्कर्षांत भाऊसाहेब देवधर्मास व आपल्या देशबांधवांस विसरले नाहींत. त्यांनीं देवस्थानांस, अन्य उपयुक्त संस्थांस व दीन-अनाथ लोकांस सढळ हातानें मदत केली आहे. तेव्हां त्या बाबतींतहि त्यांचें चरित्र अनुकरणीय आहे.

प्रस्तुत चरित्रांतील कांहीं माहिती मालवण येथील "अनंत शिवाजी देसाई टोपीवाले हायस्कूल" चे विद्वान हेडमास्तर रा. रा. **रामचंद्र विठ्ठल परुळेकर** एम्. ए., एस्. टी. सी. डी., व प्रसिद्ध महाराष्ट्र-कविचरित्रकर्ते रा. रा. **जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर** यांनीं, व इतिहासाविषयक माहिती रा. रा. **वासुदेव अनंत प्रभु बांबर्डेकर** यांनीं अत्यंत परिश्रमानें मिळवून व ती संगतवार जुळवून आम्हांस दिली, व चरित्रलेखनाचे व प्रकाशनाचे कामीं "गौड–ब्राह्मण–सभे"चे चिटणीस रा. रा. **दामोदर सखाराम सामंत** बी. ए. व "अश्रुमुक्ताञ्जलि" काव्याचे लेखक रा. रा. **बाळकृष्ण अनंत पाटील पाटकर** यांनीं फार आस्थापूर्वक साहाय्य केलें. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं, इतकेंच सांगणें आहे कीं, उपरिनिर्दिष्ट हेतूनें आम्ही हें चरित्र व्यवहारोपयोगी धर्तीवर रचलें आहे. विस्तारभयास्तव, व कांहीं बाबतींत साधार पुरेशी माहिती न मिळाल्यामुळें आटोपतें घ्यावें लागलें म्हणून, कांहीं विषय अपूर्ण दशेंतच सोडलेले दिसतील. तेव्हां चरित्रांत दोष पुष्कळच आहेत, हें आम्ही जाणून आहोंत. भाऊसाहेबांचा आम्हांवर

जडलेला लोभ ध्यानांत धरून, त्यांच्याबद्दल आमच्या मनांत असलेला आदरभाव व्यक्त करण्यासाठीं, अलीकडे वर्षदीडवर्षांत घरगुती संकट-परंपरेनें आलेल्या मनाच्या अस्वस्थ स्थितींतहि हें चरित्र निरपेक्ष बुद्धीनें आम्ही लिहिलें आहे. तरी सुज्ञ वाचक त्याचें हंसक्षीरन्यायाच्या दृष्टीनें सार ग्रहण करितील अशी आशा आहे.

हें चरित्र छापतांना कांहीं चुका राहून गेल्या आहेत. पृष्ठ ४, ओळ २१ मधील " ता. ७ "च्या ऐवजीं " ता. १७ "; पृष्ठ ४४, ओळ २४ मधील " अनुवावरून " च्या ऐवजीं " अनुभवांवरून "; पृष्ठ ५३, ओळ ८ मधील " गुणग्राह्यता " च्या ऐवजीं " गुणग्राहकता "; पृष्ठ १२६, ओळ १ मधील " व " च्या ऐवजीं " वा " असे शब्द शुद्ध करून वाचावे. याशिवाय मुद्रणदोषांमुळें कांहीं अक्षरांच्या मात्रा, अनुस्वार वगैरे मोडले किंवा नीट उठले नाहींत. असल्या चुका मागच्यापुढच्या संदर्भावरून कोणाच्याहि लक्षांत सहज येण्यासारख्या आहेत, तरी वाचकांनीं अशीं अक्षरें आढळतील त्या ठिकाणीं तीं शुद्ध करून वाचावीं अशी विनंति आहे.

मुंबई, स. ना. हाटे.
ता. १२ डिसेंबर १९२३.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १ लें, कुलवृत्त व जन्म. | ... | .... | ... | १ |
| २ रें. बाळपण. | ... | ... | ... | ६ |
| ३ रें. शिक्षण. | ... | ... | ... | १८ |
| ४ थें. मुंबईस गमन. | ... | ... | ... | २९ |
| ५ वें. मुंबईस आल्यावर. | ... | ... | ... | ३४ |
| ६ वें. गिरणींतील नोकरी. | ... | ... | ... | ३६ |
| ७ वें. फेरीवाल्याचा धंदा. | ... | ... | ... | ४१ |
| ८ वें. भांडवल. | ... | ... | ... | ४८ |
| ९ वें. स्वतंत्र व्यापार. | ... | ... | ... | ५२ |
| १० वें. भांड्यांचा कारखाना. | ... | ... | ... | ६३ |
| ११ वें. इतर व्यवहार व स्थावर मिळकत | | ... | ... | ७५ |
| १२ वें. व्यवहारकुशलता व व्यवस्था. | | ... | ... | ८६ |
| १३ वें. दानधर्म. | ... | ... | ... | ९७ |
| १४ वें. गौरव. | ... | ... | ... | ११५ |
| १५ वें. कुटुंबांतील मंडळी. | ... | ... | ... | १२७ |
| १६ वें मृत्यु. | ... | ... | ... | १३३ |
| १७ वें. स्वभाव, वळण वगैरे. | ... | .... | ... | १४४ |
| उपसंहार. | ... | ... | ... | १६४ |

# चित्रांची अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. |
|---|---|
| १. कै. श्री. रा. ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले.... | १ |
| २. कै. श्री. सौ. नर्मदाबाई अनंत शिवाजी देसाई. ... | ४७ |
| ३. श्री. रा. रा. नारायणराव अनंत देसाई. ... ... | ६९ |
| ४. भाऊसाहेबांचा सँढर्स्टरोडवरील बंगला ... ... | ८१ |
| ५. श्रीदेव नारायण वालावल. ... ... | १०२ |
| ६ श्रीमठ संस्थान दाभोली. ... ... | १०६ |
| ७. दाभोलीमठाधीश श्रीमद्विमलानंदस्वामी व त्यांचा परिवार | १०८ |
| ८. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले हायस्कूल मालवण. ... | ११० |



**कै. श्री. रा. ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले.**

जन्म ता १७ अक्टोबर सन १८५३.] [मृत्यु ता. १५ एप्रील सन १९२१.

B. A. P. Works.

स्थळप्रत
दा. क्र. २२४९

# श्रीमंत रावबहादुर
# अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांचें चरित्र.

## प्रकरण १ लें.

## कुलवृत्त व जन्म.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ —तुकाराम.

**श्रीमंत रावबहादुर अनंत शिवाजी ऊर्फ भाऊसाहेब देसाई** यांचा जन्म सध्यांच्या सावंतवाडी संस्थानांत—ज्याला पूर्वी कुडाळ प्रांत म्हणत—तेथील इतिहासप्रसिद्ध देसाई घराण्यांत झाला. हे ऋग्वेदी, शाकलशाखी, जामदग्न्यवत्स गोत्री आद्यगौड ब्राह्मण असून "**कुडाळदेशकर**" या नांवानें त्यांची जात प्रसिद्ध आहे. ह्या घराण्याचे पूर्वज इसवी सनाच्या पंधराव्या शतकाच्या अखेरीस त्या प्रांताचे राज्यकर्ते असून "कुडाळ" हें त्यांच्या राजधानीचें शहर होतें. त्या प्रांतावर त्यांनीं बरींच वर्षे आपली सत्ता चालविली. पुढें सतराव्या शतकाच्या अखेरीस हें वैभवशाली राजघराणें[1] कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून,

१ या घराण्याची त्रोटक हकीकत "रत्नागिरी जिल्हा व सावंतवाडी संस्थान यांचा ग्याझेटियर," "सावंतवाडी मेमॉयर," "कुडाळदेशकर किंवा दक्षिणेंतील आद्यगौड ब्राह्मण" आणि "श्रीमठ दाभोली संस्थानचा संक्षिप्त इतिहास" या ग्रंथांत जिज्ञासूंनीं पाहावी. राजसत्तेचीं स्मृतिचिन्हें कुडाळ प्रांतांत अद्याप दृष्टोत्पत्तीस येतात.

बाह्यशत्रु आणि गृहकलह या दोन कारणांमुळें, राजसत्तेस कायमचें मुकलें. त्या वेळीं झालेल्या धुमश्चक्रींत घराण्यांतील कर्ते पुरुष धारातीर्थीं पतन पावले व उरलेले कांहीं पुरुष मालवण, वालावल, वडांचापाट व कुंभवडें येथें जाऊन राहिले. त्यांपैकीं वालावल गांवीं राहणाऱ्या एका कुटुंबांत **रघुनाथ देसाई** ह्या नांवाचे एक पुरुष होऊन गेले; हे भाऊसाहेब टोपीवाले यांचे पितामह होत. रघुनाथराव यांस दोन पुत्र होते; वडील पुत्राचें नांव **शिवाजी** व धाकट्याचें **जिवाजी.** वडिलांचें निधन झाल्यावर हे दोन्ही बंधु विभक्त झाले. तथापि त्यांचें परस्परांवरील बंधुप्रेम शेवटपर्यंत कायम होतें. त्यांची वडिलोपार्जित थोडीशी शेतीची जमीन होती, तिची लागवड करून ते आपला चरितार्थ गरीबीनें चालवीत असत. परंतु पुढें या जमिनीच्या मालकीबद्दल तंटा उपस्थित होऊन शेवटीं ती मालवण येथील देसायांच्या ताब्यांत गेली. या आकस्मिक आपत्तीमुळें अगोदरच दारिद्र्यानें गांजलेल्या या बंधुद्वयावर फारच मोठा प्रसंग गुदरला. त्या काळीं, कोंकणांतील पांढरपेशा गृहस्थांस नोकरी किंवा शेती याशिवाय चरितार्थाचें अन्य साधन नव्हतें. अशा स्थितींत या बंधुद्वयाचें शेतीचें साधन जी जमीन तीहि त्यांच्या हातांतून गेली व शिक्षणाभावीं नोकरी मिळविणेंहि दुरापास्त झालें.

कनिष्ठ बंधु जिवाजी यांच्या मागें संसाराचा फारसा व्याप नसल्यामुळें या आकस्मिक संकटाचा परिणाम त्यांजवर फारसा झाला नाहीं. आपल्या सासुरवाडीच्या मंडळीचें साहाय्य घेऊन व इतर शक्य ती खटपट करून त्यांनीं कसाबसा आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविला होता. परंतु ज्येष्ठ बंधु शिवाजी यांची स्थिति निराळी होती. त्यांना आपली पत्नी व मुलें यांचें पालनपोषण करावयाचें होतें. अशा बिकट स्थितींत, कुटुंबपोषणाकरितां पुढें काय करावें, अशी विवंचना त्यांस लागून राहिली.

वालावल हा गांव जरी त्या प्रांतांतील इतर गांवांपेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कनिष्ठ प्रतीचा नाहीं तरी तो सोडणें शिवाजीपंतांस भाग पडलें. याला अनेक कारणें होतीं. त्या काळीं खेड्यापाड्यांतील बहुतेक सर्व कुटुंबें आपल्या मालकीच्या किंवा खंडानें घेतलेल्या दुसऱ्याच्या जमीनींची लागवड करून आपला चरितार्थ चालवीत असत. खेड्यांतील लोकांच्या बहुतेक गरजा त्यांनीं स्वतः उत्पन्न केलेल्या वस्तूंवरच भागत असत. हल्लीं बऱ्याच खेड्यांतून वाढत चाललेल्या लोकवस्तीबरोबरच लोकांच्या गरजा व लहानसहान उद्योगधंदे करून त्या गरजा भागविण्याचीं साधनेंहि वाढल्यामुळें, एखाद्या गरीब कुटुंबास आपला योगक्षेम कसा-बसा तरी चालवितां येतो; व आज अशीं बरींच कुटुंबें खेड्यापाड्यांतून गरीबीनें आपला निर्वाह चालवीत आहेत. परंतु पन्नास साठ वर्षांपूर्वींची कोंकणप्रांतांतील स्थिति याहून अगदीं निराळी होती. त्या वेळीं शेती-शिवाय चरितार्थाचें अन्य साधन पांढरपेशा वर्गांतील लोकांस मुळींच नव्हतें असें म्हटल्यास चालेल. अशा स्थितींत, ज्या शिवाजीपंत देसायांनीं एका काळीं स्वतःच्या मालकीच्या जमिनींत लागवड करून आपला चरितार्थ चालविला, त्यांना पुढें ती जमीन हातांतून गेल्यावर त्याच गांवीं दुसऱ्याची जमीन खंडानें घेऊन तींत लागवड करण्याची पाळी आली, ही त्यांना एक मानहानीची गोष्ट वाटूं लागली.

आनुवंशिक गुणशास्त्राची ओळख पाश्चात्यांस अलीकडेच झाली आहे. परंतु त्याचें महत्व आह्मीं पौर्वात्य पूर्वींपासूनच जाणून आहोंत. एवढ्या-करितांच आमच्या पुराणांत एखादी कथा सांगतांना नायकाची पूर्वपीठिका चंद्र, सूर्य किंवा ऋषींपर्यंत पोंचविलेली असते व त्याच्या पूर्वजांच्या पराक्रमाचें त्रोटक वर्णन केलेलें असतें. व्यवहारांतसुद्धां कोण-त्याहि मनुष्याची नीटपणें ओळख करून घेण्याच्या आधीं त्याच्या जातगोतकुलवृत्तांताची चौकशी आह्मीं करीत असतों. मुलामुलीस स्थळ पाहावयाचे वेळीं भावी जामाताची विद्वत्ता व हुशारी पाहण्यापूर्वीं, अथवा

भावी सूनबाइच्या रूपागुणाकडे लक्ष देण्यापूर्वीं त्यांच्या कुलशीलाची चौकशी आधीं करीत असतों. फार काय पण एखादा कारकून किंवा नोकर ठेवावयाचे वेळींसुद्धां त्याच्या आंगच्या गुणांपूर्वीं त्याच्या जाति-कुलाचीच चौकशी साहजिकरीत्या होत असते. एवंच चरित्रांत नायकाचें कुलवृत्त देत असतात. त्यावरून त्याच्या अंगीं जन्मतः कोणते आनुवंशिक गुणधर्म उतरले असावेत ह्याचें अनुमान काढण्यास सुलभ पडतें.

शिवाजीपंतांचे पूर्वज राज्यकर्ते असून त्यांच्या ताब्यांत जमीनजुमला व नोकरचाकर होते. यामुळें कुलाभिमान जागृत असल्याकारणानें, जरी गरीबी आली तरी, इतरांवर हुकमत चालविण्याची वृत्ति सोडून त्यांची ताबेदारी पत्करण्यास शिवाजीपंतांचें मन घेईना. म्हणूनच ज्या गांवीं, निकृष्टावस्थेंत कां होईना पण स्वतंत्रपणें, आपण राहूं शकलों त्याच गांवीं परावलंबी राहण्याचें लौकिकदृष्ट्या त्यांस दुःसह झालें.


सन्निध असलेल्या व आपलें कुलदैवत मानलेल्या **श्रीनारायण-**स्वरूपी परमेश्वराची सेवा मनोभावें ह्या दांपत्यानें चालविलीच होती. त्यांची निःसीम भक्ति पाहूनच, त्यांच्या अशा संकटसमयीं, परमेश्वरानें त्यांचें गतवैभव प्राप्त करून देणारा भाऊसाहेबांसारखा सत्पुत्र त्यांच्या पोटीं जन्मास पाठविला. ईश्वर कांहीं दूर का आहे ? त्याची मनोभावें भक्ति करणाऱ्यास तो कधींहि अंतर देणार नाहीं, हें खास समजावें. जरी भक्ति असे दृढेंसी । त्रिकरणसह मानसीं । तोचि लाधे ईश्वरासी । ईश्वर होय तया वश्य ॥

ता. ७ माहे अक्टोबर सन १८५३, ( मिति आश्विन वद्य प्रतिपदा शके १७७५ ) सोमवार रोजीं, ह्या सत्वशील व कुलीन दांपत्याचे पोटीं भाऊ-साहेब ह्यांचा जन्म, वालावल गांवांतील दारवल नामक वाडींत झाला. गृहस्थिति कितीहि बिकट असली तरी भारतवर्षीयांस पुत्रजन्म म्हणजे एक महोत्सवप्रसंगच होय. मातापित्याच्या संकटावस्थेंत जन्म पावलेल्या

या पुत्राचें भविष्यकालीन अदृश्य भाग्य व कर्तबगारी केवढी मोठी आहे ह्याची त्यांना कल्पना होणें जरी शक्य नव्हतें, तरी पण त्या दांपत्यास हा पुत्रलाभ नैसर्गिक अपत्यप्रेमामुळें, स्वतःच्या दुःस्थितीचा थोडाबहुत विसर पडण्यास कारण झाला असला पाहिजे, यांत संशय नाहीं. मुलाचें नांव '**अनंत**' असें ठेवण्यांत आलें व हेच आपले चरित्रनायक **श्रीमंत रावबहादुर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले** होत.

श्रीमंत मातापितरें आपल्या मुलांचे लाड अनंत प्रकारांनीं करून त्यांचें कोड पुरविण्यास समर्थ असतात; परंतु सकाळसंध्याकाळची ददात मिटविण्याकरितां दिवसभर कष्ट करणाऱ्या ह्या दांपत्यानें, पुढें अनंत गरिबांस अन्नदान करणाऱ्या ह्या आपल्या अनंताच्या बारशाचा सोहळा कोणत्या प्रकारें केला असेल, याची कल्पना करणें कांहीं कठीण नाहीं.

## अनंतरावांची जन्मकुंडली.




अत्यंत दारिद्र्यावस्थेंत जन्मून पुढें कोट्यधीश झालेल्या पुरुषाची ही कुंडली आहे कीं काय हें ज्योतिषशास्त्रज्ञांनीं पाहावें.

शिवाजीपंतांनीं स्थलांतर केल्यावर कुलाभिमान कायम राखून दास्यत्वांत न राहण्याचा आपला बाणा सिद्धीस नेण्यास कोणती योजना केली, व दुर्दैवानें हातून निसटलेली वडिलोपार्जित मिळकत परत मिळविण्यासाठीं कसे भगीरथ प्रयत्न केले; तसेंच त्यांस ह्या अनंतबाळाचें केवळ अज्ञदशेंतच कसें साहाय्य मिळालें, हें पुढच्या प्रकरणांत कळून येईल.

---

# प्रकरण २ रें.

## बाळपण.

अनंताचे जन्माचे वेळीं त्याचे वडील बंधु **रघुनाथ** हे तीन वर्षांचे होते. अनंत एक वर्षांचा होईपर्यंत त्याच्या आईबापांनीं वालावल येथेंच कसेबसे दिवस काढले. परंतु पुढें तेथें राहून योगक्षेम चालविणें दुःसह झाल्यामुळें, शिवाजीपंतांनीं आपले धाकटे बंधु जिवाजी यांच्या सल्ल्यानें, सावंतवाडी संस्थानांतच असलेल्या झारापी गांवीं सहकुटुंब प्रयाण केलें व तेथें **तामडगेकर** नांवाच्या एका नातेवाईकाच्या आश्रयास ते चार महिने राहिले.

ज्या गृहस्थानें परतंत्रपणांत राहणें दुःसह वाटल्यावरून आपला गांव सोडला, त्याच्या मानी स्वभावास परान्नसेवन करून आश्रितांप्रमाणें उपकारबद्ध राहणें कसें रुचेल ? तेव्हां अन्य साधनाच्या अभावीं आरंभीं झारापी गांवींच खंडानें जमीन घेऊन स्वतःच्या कष्टानें उदरनिर्वाहाची सोई करण्याचें त्यांनीं ठरविलें; व सदर गृहस्थाचा आश्रय सोडून त्यांनीं आपलें गरिबीचें वेगळें बिऱ्हाड केलें. जमीनीच्या मालकास खंड देऊन सर्वांच्या निर्वाहास पुरेसें धान्य शिल्लक रहात नसे व त्यामुळें ह्या कुटुंबास कैकवेळां अर्धपोटीं राहावें लागत असे.

शिवाजीपंत कपाळावर हात मारून स्वस्थ बसणारे नव्हते. ते दीर्घोद्योगी होते. आपली स्थिति सुधारण्याचे विचार त्यांचे मनांत सतत घोळत असत. परंतु त्यावेळच्या खेडेगांवच्या परिस्थितींत त्यांचा इलाज चालेना. तथापि उपरिनिर्दिष्ट विपन्नावस्थेंत कांहीं काळ काढल्यावर, ‘ प्रयत्नांतीं परमेश्वर ’ ही दृढ भावना मनांत धरून त्यांनीं सावंतवाडीकडे जाणाऱ्या

मोठ्या रस्त्यावर एक झोंपडी बांधून त्यांत पांथस्थांस विकण्याकरितां चणेकुरमुऱ्यांचें एक लहानसें दुकान मांडलें. ह्या त्यांच्या प्रयत्नास ईश्वर-कृपेनें थोडेंबहुत यश येऊं लागलें. कारण उघड आहे. नशीब म्हणून हवालदिल होऊन न बसणाऱ्या दृढोद्योगी पुरुषास ईश्वर कधीं विसंबत नाहीं. असो.

लोकांचें लक्ष आपल्या दुकानाकडे जाऊन त्याचा जम बसलेला पाहून शिवाजीपंतांनीं त्यांत भर घालण्याचें योजिलें. खेड्यापाड्यांतील लोक बहुतकरून पादचारी असून लांबलांबचे पल्ले झेंपणारे असतात, म्हणून त्यांस वाटेवर सोईस्कर विश्रांतिस्थानाची विशेष अवश्यकता भासते. हें लक्षांत घेऊन शिवाजीपंतांनीं ह्या दुकानाचे समोर एक लहानसा मंडप घालून, पांथस्थांस विश्रांति घेण्यास व पाणी पिऊन श्रमपरिहार करण्यास एक सोईची जागा तयार केली. अर्थात् विश्रांतीस बसल्यावर शिवाजीपंतांच्या कल्पनेप्रमाणें पांथस्थांचें लक्ष सहज समोरील दुकानाकडे जाई व त्यांचे मनांत पाण्याबरोबर तोंडउष्टावळीस कांहींतरी जिन्नस घेण्याचें येई. त्यावेळीं हल्लींप्रमाणें चहा, काफी, बिस्कुट, पाव ह्यांचें बंड माजलें नव्हतें. म्हणून दुकानांत चणेकुरमुऱ्यांबरोबर गुळ, खोबरें, तंबाकु व इतर अल्प फराळाचे जिन्नस ठेवण्यांत येऊं लागले.

दुकानाची व्यवस्था व विक्री शिवाजीपंत स्वतः करीत असत. कधीं कधीं त्यांचे दोघे मुलगे, रघुनाथ व अनंत, हेहि दुकानावर बसत. ह्या लहानशा दुकानाचें ह्या कुटुंबास बरेंच साहाय्य झालें. आमच्या भाऊसाहेबांच्या चरित्रांत तर ह्या दुकानाचें महत्व विशेष होय. कारण त्यांस स्वावलंबी व दृढोद्योगी बनविण्यास व लहान प्रमाणावर व्यापारी शिक्षण देण्यास, तसेंच त्यांच्या अंगीं असलेल्या अनुद्भूत नैसर्गिक गुणांस पालवीप्रमाणें फुटून येण्यास हेंच दुकान कारणीभूत झालें, ह्यांत शंका नाहीं.

ह्या सुमारास अनंताचें वय सुमारें सहा वर्षांचें होतें. अशा अल्पवयांत सुद्धां त्याला आपल्या आईबापांस सर्व प्रकारचें साहाय्य करावें लागत असे व तें तो आनंदानें करीत असे. लहान वयामुळें शेतीच्या कामीं त्याची फारशी मदत होण्यासारखी नसल्यामुळें, त्याचा बहुतेक सर्व वेळ दुकानाचें काम सांभाळण्यांत जात असे. अशा लहान वयांत, अगदीं गरीबांचींहि मुलें अनेक प्रकारचे खेळ खेळून आणि नाचून बागडून आपला काळ आनंदांत घालवितात; व आईबापदेखील, होतां होईल तों, आपल्या लहान मुलांस कुटुंबपोषणाच्या जबाबदारीचीं कामें करावयास लावीत नाहींत. परंतु आमच्या चरित्रनायकाची गोष्ट अगदींच निराळी होती. तो जर ह्या वयांत उद्योग न करितां आपला वेळ खेळांत घालविता तर त्याच्या प्रेमळ पित्यानें त्यास हरकत घेतली असती असें मुळींच नाहीं. परंतु अनंतास या लहान वयांतसुद्धां आपल्या आईबापांच्या परिस्थितीची पूर्ण जाणीव होती. ती जाणीव व्हावयास, त्याला कोणी कुटुंबाच्या दारिद्र्याची करुण कहाणी सांगितली होती असें नव्हे; तर त्याच्या उपजत तीव्र बुद्धीमुळेंच असल्या गोष्टी त्यास सहज समजत होत्या. यामुळें आईबापांनीं न सांगतांहि, त्यांच्या चरितार्थसंपादनाच्या उद्योगांत त्यांस यथाशक्ति हातभार लावण्यास अनंत नेहमीं मोठ्या आनंदानें तयार असे.

ज्यांची बुद्धि उपजतच तीव्र असते अशा मुलांस स्वभावतःच परिस्थितीची जाणीव कशी उत्पन्न होते, याबद्दल अनंताच्या बाल्यावस्थेंतील एका साध्या परंतु महत्वाच्या प्रसंगाचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. अनंताची माता **उमाबाई** ही खरी आर्यस्त्री होती; व ती आपल्या पतीला कुटुंबपोषणाच्या बाबतींत आपल्याकडून होईल तेवढी मदत करण्यांत नेहमीं दक्ष असे. काटकसरीनें खर्च करण्यांत तिनें कधींहि कसूर केली नाहीं. परंतु कितीहि काटकसर केली तरी तेवढ्यानें कार्य-

भाग होत नाहीं असें जेव्हां तिच्या लक्षांत आलें, तेव्हां तिनें, सर्वांचीं जेवणें झाल्यावर, आपण एकटेंच एकीकडे बसून जेवण्याचा क्रम सुरू केला. केव्हां केव्हां घरांत तांदूळ कमी असले म्हणजे तेवढ्यांत सर्वांचा निर्वाह होणें शक्य नाहीं हें लक्षांत घेऊन ती इतरांस पोटभर वाढून स्वत: मागें राही. हेतु येवढाच कीं, मागें आपणास फारच थोडें अन्न शिल्लक राहिलें आहे हें कोणास समजूं नये. वालावल गांव सोडून झारापीस गेल्यावर, पहिल्या पहिल्यानें, असे प्रसंग बहुधा हरहमेश येत असत. आपलें हें कृत्य आपल्या प्रेमळ पतीच्या लक्षांत आल्यास, आपली उपासमार होऊं नये म्हणून तो स्वतःच अर्धपोटीं राहील, या भीतीनें ती साध्वी आपलें जेवण पतीच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून फार सावधगिरी ठेवीत असे. परंतु अनंत हा फारच लहान असल्यामुळें त्याला यांतलें इंगित समजणार नाहीं अशा भरंवशानें, तो जवळ आल्यास त्याबद्दल मात्र ती विशेष संकोच बाळगीत नसे. त्यानें आपल्या आईच्या त्या कृतीचा पुकारा वडिलांकडे केव्हांच केला नाहीं; कारण ह्या चाणाक्ष मुलाचे लक्षांत आपली गरीबी आली असावी. त्यानें पुढें आपल्या आईचेंच अनुकरण केलें व ही गोष्ट त्यामुळें वडिलांस कळून आलीच; व अनंताचा वडिलांस कळल्यावर होणारें दुःख टाळण्याचा प्रयत्न फुकट गेला. तो प्रकार असा. कांहीं दिवसांनीं वडील मुलगा रघुनाथ यास बरोबर घेऊन उमाबाई आपल्या माहेरीं—गोवें प्रांतांतील मयें ह्या गांवीं-राहण्यास गेल्या; व दुकान चालविण्याच्या कामीं वडिलांस मदत करण्यासाठीं अनंतास झारापीसच राहावें लागलें. दुकान चालविण्यांतच नव्हे तर घरांतील इतर कामाकाजांत देखील अनंत लहानपणापासूनच तरबेज होता. वडिलांस कामधंद्यानिमित्त बाहेर जावें लागे, तेव्हां आईच्या गैरहजिरींत अनंतावर अर्थातच स्वयंपाक करण्याची पाळी आली. अनं-

ताचा सैंपाक म्हणजे सकाळीं भात आणि ताक व रात्रीं नुसती पेज, येवढाच होता; व हें काम तो मोठ्या आनंदानें आणि मेहनतीनें करीत असे. पण या बाबतींत एक गोष्ट मात्र तो विसरला नाहीं. ती गोष्ट ही कीं, आईच्या पद्धतीप्रमाणें, वडिलांस वाढल्यावर, आपण एकीकडे बसून थोडेंसें खावयाचें. कामाच्या धांदलींत बरेच दिवसपर्यंत बापाच्या नजरेस ही गोष्ट आली नाहीं. आईनें थोडेंसें कमी वाढलें तर लहान मुलें किती आरडाओरड करितात हें सर्वांस ठाऊकच आहे. अशा स्थितींत लहान वयांत आपण होऊन, वडिलांस यथेच्छ जेऊं घातल्यावर, त्यांना नकळत, आपल्या पोटास अशा रीतीनें चिमटा घेणारीं किती मुलें सांपडतील, याचा अंदाज करणें फारसें कठीण नाहीं. या एकाच क्षुल्लक गोष्टीवरून अनंतास, येवढ्या अल्प वयांतसुद्धां आपल्या परिस्थितीची कशी जाणीव होती व त्याचें आत्मसंयमन किती दांडगें होतें, हें सहज दिसून येईल. असल्या गोष्टी सकृद्दर्शनीं क्षुल्लक दिसतात, परंतु मुलांच्या भावी चारित्र्याचें बीज असल्याच गोष्टींत पाहावयास सांपडतें, हें विसरतां कामा नये. असो.

अनंतानें चालविलेली ही आईची नक्कल एका शेजारीण बाईनें एक दोनदां पाहिली व तिनें धूर्तपणानें अनंताच्या जेवणावर बारीक नजर ठेविली. अनंत हा नेहमींच असें करतो अशी जेव्हां तिची खात्री झाली तेव्हां तिनें ही गोष्ट शिवाजीपंतांच्या कानावर घातली. तेव्हां त्यांनीं अनंतास बोलावून आणून तसें करण्याचें कारण विचारिलें. “ आपण आपल्या आईच्या पद्धतीस अनुसरून वागत आहों; कारण वगैरे आपणांस कांहीं ठाऊक नाहीं ” असें बालस्वभावोचित सरळ उत्तर अनंतानें दिलें. अनंताच्या तोंडचे हे मुग्ध पण अर्थपूर्ण बोल ऐकतांच शिवाजीपंतांच्या डोळ्यांपुढें आपली कष्टप्रद स्थिति उभी राहून, त्यांच्या अंतःकरणास किती वेदना झाल्या असतील व त्याचबरोबर आपणास

परमेश्वरानें अशी सच्छील पत्नी व कर्तव्यदक्ष मुलगा दिल्याबद्दल किती साभिमान आनंद वाटला असेल, याची कल्पना कोणत्याहि सहृदय मनुष्यास सहज करितां येण्यासारखी आहे. ह्या व अशाच कांहीं दुसऱ्या गोष्टींमुळें आपल्या लहान मुलाबद्दल शिवाजीपंतांस मोठी आशा वाटूं लागली व श्रीनारायणाच्या कृपेनें आपणांस लाभलेला हा उद्योगी व कर्तव्यदक्ष मुलगा दारिद्र्यपंकांतून आपल्या कुटुंबाचा उद्धार खचित करील अशी त्यांची खात्री होत चालली.

अनंत जसजसा मोठा होत चालला तसतशी शिवाजीपंतांस दुकान चालविण्याचे कामीं त्याची अधिकाधिक मदत होऊं लागली. पुढें पुढें तर तो एकटाच दुकानाचें काम सांभाळून बापास इतर कामें करण्यास किंवा थोडीशी विश्रांति घेण्यास फुरसत देऊं लागला. ह्या दुकानाचा थाट, आंतील माल व गिऱ्हाइकांची मागणी ह्यांचा विचार केला असतां, आठ नऊ वर्षांच्या अनंताला हें दुकान चालविणें विशेष परिश्रमाचें होतें असें नाहीं. परंतु गिऱ्हाइकाला नुसता माल तोलून देण्याचेंच काम करण्यांत त्याला समाधान वाटत नसे. हातीं घेतलेलें काम क्षुल्लक असो वा महत्वाचें असो, तें ठाकठिकीनें व यशस्वी रीतीनें करण्याकरितां व त्यांत कलेच्या दृष्टीनें पूर्णता आणण्याकरितां सतत धडपड करणाऱ्या थोर पुरुषांच्या अंगांत जी असाधारण बुद्धिमत्ता असावी लागते, ती या अल्प-वयांतच व ह्या लहानशा धंद्यांत देखील अनंताच्या ठायीं दृष्टोत्पत्तीस येऊं लागली. अनंताची गिऱ्हाइकास खूष ठेवण्याची शैली विलक्षण असे. स्थानिक गिऱ्हाइकें बहुतेक सगळीं अनंताच्या पूर्ण परिचयाचीं झालीं होतीं; व एखाद्या कसलेल्या व्यापाऱ्याप्रमाणें प्रत्येक गिऱ्हाइकाचा स्वभाव व त्याची आवडनिवड त्यानें चाणाक्षपणानें केव्हांच ओळखून ठेविलीं होतीं. कोणाशीं कशा रीतीनें बोललें पाहिजे, कोणास काय दिलें पाहिजे वगैरे गोष्टी अनंतास आपोआपच समजत होत्या.

तसेंच माल तोलतांना व मापतांना आपला तोटा न होतां गिऱ्हाइकास जेणेंकरून संतोष होईल अशा खुबीनें तें काम करण्यांत त्याचा अगदीं हातखंडा असे. बहुतेक गिऱ्हाइकें शेतींचें काम आटोपल्यावर दोन प्रहरीं कांहींतरी जरूरीचा जिन्नस विकत घेण्यास येत असत व तीं उन्हां-तून आल्यामुळें त्यांना फार तहान लागत असे. हें लक्षांत घेऊन, अनंतानें त्यांस दुकानांत आल्याबरोबर थंडगार पाणी व केव्हां केव्हां थोडासा गुळ देऊन संतुष्ट करावें. अशा रीतीनें गिऱ्हाईक खुषींत आल्यावर त्याच्याशीं फायदेशीर रीतीनें व्यापार करण्यास किती सोपें जातें याचा अनुभव व्यापारी लोकांस असेलच. कोंकणांतील किंवा दुसऱ्या कोणत्याहि खेडेगांवांतील शेतकरी गिऱ्हाइकांस तंबाकु फार प्रिय असतो. हें जाणून अनंतानें तंबाकूची पेंढी फोडतांना, तींतील फेंकून देण्याच्या लायकीचे मोठमोठे देंठ फुरसतीच्या वेळीं कुटून बारीक करून एका भांड्यांत ठेवावे व माल घेऊन गिऱ्हाईक जाऊं लागलें म्हणजे ही तंबाकूची पूड त्यास बक्षीस म्हणून द्यावी. याचा परिणाम असा झाला कीं, अनंत दुकानांत नसल्यास, गिऱ्हाईकानें माल विकत न घेतां परत जावें, व कांहीं वेळानें पुनः येऊन अनंताच्या हातून माल घ्यावा व वर बक्षिसादाखल तंबाकूची पूड मिळवावी ! माल स्वच्छ ठेवून तो गिऱ्हाइकांच्या नजरेंत भरेल अशा दिखाऊ पद्धतीनें मांडण्यांत देखील अनंताचा हातखंडा असे. ह्यावरून हा 'व्यापारी बाणा' त्याच्या अंगीं उपजतच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या पुढील वयांत परराष्ट्रांशीं फार मोठ्या प्रमाणावर व्यापार करून कोट्यधीश होणारा हा मुलगा व्यापारी शिक्षणाचा ओनामा झारापी गांवीं एका झोंपडींत घातलेल्या चणेकुरमुऱ्यांच्या दुकानांत शिकला ! चार पांच रुपयांच्या घडामोडींत दिसून येणारें कौशल्य पुढें कोट्यवधि रुपयांच्या घडामोडींत पूर्ण विकास पावलें यांत आश्चर्य नाहीं. असो.

प्रत्येक उच्चवर्णाच्या हिंदूच्या पाठीस धार्मिक संस्कार लागलेले असतात. ह्यांपैकीं मुलांच्या मुंजी व मुलामुलींचीं लग्नें हे दोन संस्कार प्रत्येक मातापित्यास विशेष काळजीचे असतात. खरें पाहूं गेलें असतां हे विधि केवळ धार्मिक स्वरूपाचे असल्यामुळें ते शास्त्रोक्त रीतीनें करावयाचे झाल्यास, अतिशय गरीब स्थितींतल्या मनुष्यास देखील आपल्या ऐपती-प्रमाणें कमी खर्चांत उरकून घेतां येण्यासारखे असतात. तथापि त्यांत नकली चालीरीती घुसडल्या गेल्यामुळें ह्या विधींचें धार्मिकांतून सामाजिक स्वरूपांत स्थित्यंतर झालें आहे. ते वाजंत्री, नाच, तमाशे, नजर–नजराणे, बैठका, मिरवणूकी, मानपान, ज्ञातिभोजनें इत्यादि यथासांग झालींच पाहिजेत, मग ऐपत असो वा नसो, तसें न झाल्यास समाजांत आपली बेअब्रू होईल असा समज प्रत्येक हिंदूचा झालेला असतो. त्यामुळें कैक गरीब व मध्यम स्थितींतील हिंदु पिढ्यानपिढ्या कर्जांत रुळत असून, पुष्कळ चांगलीं चांगलीं घराणीं धुळीस मिळालीं आहेत. अलीकडे कांहीं सुशिक्षित समाजांतून असल्या वायफळ खर्चास आळा घालण्याचे प्रयत्न चालले आहेत, पण ते यशस्वी होत नाहींत; कारण उघडच आहे. जोंपर्यंत समारंभांत यजमान बनून व भाडोत्री डौल आणून समाजांतील आपल्या घराण्याचा दर्जा कायम राहतो असा मंडळीचा समज आहे, अथवा ह्या चालीरीती धार्मिक संस्काराचें अंगच आहेत असा पूर्वापार चालत आलेला भ्रम कायम आहे, तोंपर्यंत असल्या प्रयत्नांस यश येणें शक्य नाहीं.

आतां अनंताचें मौंजीबंधनाचें वय झाल्यामुळें शिवाजीपंतांच्या मनांत त्यासंबंधींचे विचार रात्रंदिवस घोळूं लागले. हौस ही श्रीमंतांस गरीबांस सारखीच असते. श्रीमंतांस आपल्या हौशी आपल्या संपत्तीच्या जोरावर वाटतील तशा भागवितां येतात, परंतु गरिबांस मात्र त्या तशा भागवितां येत नाहींत. आपल्या मुलामुलींचीं लग्नमुंजीसारखीं

मंगल कार्यें मोठ्या थाटामाटानें व्हावीं व तो सुखसोहळा आपण आपल्या डोळ्यांनीं पाहावा अशी सर्व आईबापांची साहजिक इच्छा असते. अर्थात् शिवाजीपंतांची इच्छाहि तशीच होती हें सांगावयास नकोच. परंतु आपल्या मनांतील सुखदायक कल्पना व्यवहारांत आणण्यास लागणारें द्रव्यबळ आपल्यापाशीं नाहीं, ह्या गोष्टीची त्यांस पूर्ण जाणीव होती आणि म्हणूनच ते सचिंत असत. परंतु श्रीनारायणाच्या कृपेनें शिवाजीपंतांची हीं इच्छा आकस्मिक रीतीनें मनासारखी सफल झाली. ह्याच सुमारास सावंतवाडीचे एक सधन जमीनदार—रा. **कृष्णाजी यशवंत सामंत**—हे आपला मुलगा **विश्राम** याचा व्रतबंध करण्याच्या तयारींत होते. त्यांचा व शिवाजीपंतांचा पूर्वपरिचय होता. कांहीं कामानिमित्त त्यांनीं शिवाजीपंतांस आपल्या घरीं बोलावल्यावरून ते अनंतासह त्यांजकडे गेले होते. ह्या भेटीच्या प्रसंगीं मुलांच्या मुंजीबद्दलच्या गोष्टी निघाल्या असतां, कृष्णाजीपंतांनीं अनंताचेंहि वय मौंजीबंधनास योग्य झालें आहे असें म्हटलें. यावर नुसता होकार देण्यापलीकडे शिवाजीपंतांस कांहींच बोलतां आलें नाहीं. परंतु त्यांच्या चेहऱ्यावर मात्र चिंतेची छटा उमटलेली कृष्णाजीपंतांस स्पष्ट दिसली. त्यांनीं खरा प्रकार सहज ताडला व आपल्या चिरंजीवाच्या मुंजीबरोबरच अनंताचीहि मुंज होऊं द्या असा मनःपुरस्सर आग्रह धरला. शिवाजीपंतांस असला विचार मनापासून पटण्यासारखा नव्हता; कारण दुसऱ्याच्या कार्यांत आपलें व्रतबंधासारखें मंगलकार्य कसेंबसें उरकून घेण्यांत थोडासा कमीपणा आहे असें सर्वांसच वाटतें. तेव्हां मानी स्वभावाच्या शिवाजीपंतांस असली सूचना एकाएकीं कशी पसंत पडावी? तथापि कृष्णाजीपंतांचा दीर्घकालीन पूर्वपरिचय, अकृत्रिम स्नेह, मनाचा मोठेपणा, स्वतःची प्रतिकूल परिस्थिति व कृष्णाजीपंतांनीं मनापासून केलेला आग्रह या सर्वांचा विचार केल्यावर कृष्णाजीपंतांच्या सूचनेस अनुमति देणें शिवाजीपंतांस योग्य

वाटलें. शिवाजीपंतांचा हा निर्णय शहाणपणा व दूरदृष्टि यांच्याशीं जुळता होता हें सांगणें नलगे. कुलाभिमान त्यांच्यांत पूर्णपणें वसलेला होता. त्यामुळें आपल्या मुलाची मुंज थाटामाटानें न झाल्यास आपल्या घराण्याची अब्रू जाईल हा त्यांचा पूर्वपरंपरेस अनुसरून असलेला समज, व आधींच दुर्दैवानें ओढवलेल्या संकटांशीं झगडून निदान पूर्वपदास येण्यासाठीं त्यांनीं चालविलेल्या दीर्घोद्योगास विघातक होणारें कर्ज काढून जास्त संकटांत पडण्याची भीति, अशा दुहेरी मनःस्थितींत त्यांनीं योक्त विचार केला कीं, कर्ज काढून तरी बेगडी थाट करावयाचा तो प्रेमपुरःसर आग्रह करणाऱ्या मित्राच्या कार्यांतच झालेला काय वाईट ? ह्या प्राप्त झालेल्या संधीचा फायदा घेतल्यानें बाह्यात्कारीं होणारा थाट तर होईलच, आपल्या मित्राच्या शब्दास मान दिल्याचें श्रेय घडेल, व आधींच चिखलांत रुतलेला पाय कर्जापायीं जास्त खोल जाणार नाहीं. हें सर्व लक्षांत घेऊन त्यांनीं आपल्या मित्राच्या कार्यांतच अनंताची मुंज उरकून घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें लवकरच हें कार्य शिवाजीपंतांच्या इच्छेप्रमाणें मोठ्या हौसेनें व थाटामाटानें पार पडलें. वरील सामंत घराण्याशीं असलेला हा स्नेह या प्रसंगानंतर अधिकच दृढमूल होऊन, तो शिवाजीपंतांच्या पश्चात् भाऊसाहेबांनीं देखील अखेरपर्यंत कायम राखिला.

एकंदरींत झारापीस आल्यापासून हळूहळू ह्या कुटुंबास बरे दिवस येऊन जम बसत चालला. परंतु शिवाजीपंतांस आपल्या जन्मभूमीची-वालावल गांवाची-आठवण वरचेवर झाल्याशिवाय राहत नसे, व आपल्या मालकीची जमीन हातून गेल्यामुळें त्यांस चैन पडत नसे. केवळ उदरंभरणासाठीं परगांवीं येऊन राहावें लागल्यामुळें आपणांस आपल्या वडिलोपार्जित घरादारास मुकावें लागलें, आपले आप्तेष्ट व लहानपणचे सोबती वालावलीस सुखानें नांदत आहेत व आपण मात्र पोटासाठीं

परक्या गांवांत येऊन पडलों आहोंत, हा विचार स्वाभिमानी शिवाजी-पंतांच्या मानसिक यातनेस कारणीभूत होऊं लागला. परंतु गेलेली जमीन परत कशी मिळते हा एक मोठा प्रश्नच होता; व जमीन मिळाल्या-शिवाय वालावलीस जाणें इष्ट नाहीं हें ते समजून होते. झारापींत जरी त्यांचा योगक्षेम साधारणपणें बरा चालला होता तरी जवळ शिल्लक कांहींच नव्हती. यामुळें ते केव्हां केव्हां विचारमग्न होत्साते खिन्नवदन होऊन बसत असत व एखादा प्रेमळ आणि समानशील पांथस्थ मंडपांत विश्रांति घेण्यास आला असतां, गोष्टीच्या भरांत ते आपली ही अंतस्थ गोष्ट त्याजपाशीं सहज बोलून जात. आपल्या बोलण्याचा कांहींतरी उपयोग व्हावा ह्या आशेनें ते बोलत नसत, तर मनांतलें दुःख बोलून दाखविल्यानें त्याचें ओझें थोडेंसें कमी होतें, म्हणूनच ते आपल्या हृद-यांतील शल्य सहृदय लोकांसमोर उघड करून दाखविण्यास प्रवृत्त होत असत.

पुढें कर्मधर्मसंयोगानें वालावलीस परत जाण्याचा शिवाजीपंतांचा हा उद्देश सिद्धीस जाण्याचा सुयोग आपोआप जुळून आला. **बाबा-साहेब** या नांवाचे कोणी सावंतवाडीचे सरकारी अधिकारी फिरतीवर निघाले असतां, ते झारापी येथें शिवाजीपंतांच्या दुकानापुढील मंडपांत घटकाभर विश्रांति घेण्याकरितां आपल्या बरोबरच्या मंडळीसह आले. गृहस्थधर्मास अनुसरून पंतांनीं त्यांचें यथायोग्य स्वागत केलें. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर, बोलतां बोलतां, आपण कोण, कोठले, वगैरे प्रश्न बाबासाहेबांनीं शिवाजीपंतांस विचारले; व पंतांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपली साद्यंत हकीकत त्यांस निवे-दन केली. बाबासाहेब मोठे उदार मनाचे गृहस्थ होते व कोणाचेंहि काम आपल्या हातून होण्याजोगें असल्यास तें ते मोठ्या आनंदानें करीत असत. शिवाजीपंतांचा वृत्तांत ऐकून त्यांस त्यांनीं असें आश्वासन

दिलें कीं गेलेल्या मिळकतीच्या दाव्यासंबंधाचे सर्व कागदपत्र स्वतः पाहून व चौकशी करून ती मिळकत परत मिळवून देण्याचा आपण प्रयत्न करूं. हें ऐकून शिवाजीपंतांस फार आनंद झाला व वालावलीस परत जाण्याची त्यांची फार दिवसांची मनीषा सफल होण्याचा रंग दिसूं लागला. बाबसाहेब हे थोर कामदार व आपण एक सामान्य दर्जाचा मनुष्य; अशा स्थितींत बाबासाहेबांनीं जातां जातां वाटेवर सहज दिलेलें आश्वासन लक्षांत ठेवून, तें ते कितपत पुरें करतील याबद्दल शिवाजीपंत अंमळ साशंकच होते. परंतु बाबासाहेब हे करारी स्वभावाचे व बोलल्या-प्रमाणें करून दाखविणारे अधिकारी असल्यामुळें, त्यांनीं सावंतवाडीस गेल्यावर शिवाजीपंतांच्या जमिनीसंबंधाचे सव कागदपत्र लक्षपूर्वक चाळून पाहिले आणि ठरविलें कीं कज्ज्याचे वेळीं कायद्याच्या कांहीं कलमांची योग्य बजावणी न झाल्यामुळें, झालेला निकाल योग्य रीतीनें झालेला नाहीं; आणि तेवढ्या व्यंगाचा आधार घेऊन, त्यांनीं कज्ज्याचें काम शिवाजीपंतांकडून परत चालविलें व त्याचा अनुकूल निकाल होऊन, गेलेल्या मिळकतीचा शिवाजीपंतांचा हिस्सा त्यांस परत मिळाला.

ही हकीकत घडली तेव्हां आपल्या चरित्रनायकाचें वय सुमारें दहा वर्षांचें होतें. शिवाजीपंतांस आपली वडिलार्जित मिळकत परत मिळालेली पाहून किती हर्ष झाला असेल, याची कल्पना करणें कठीण नाहीं. त्यांनीं आपला झारापीचा संसार वालावली गांवीं, मूळच्या आपल्या मालकीच्या घरांत आणून थाटला; व स्वतःचे जमिनींत शेती करून, कुटुंबाचा योग-क्षेम चालवावा व फावल्या वेळीं श्रीनारायणाचें भजनपूजन करावें, अशा रीतीनें ते कालक्षेप करूं लागले.

---

## प्रकरण ३ रें.

# शिक्षण.

आपले दुःखाचे दिवस संपल्याबद्दलच्या सुखमय विचारांबरोबरच, परिस्थितीच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें आजपर्यंत आपणास आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करावें लागलें, याबद्दल शिवाजीपंतांस विषादहि वाटूं लागला. मुलांच्या शिक्षणासाठीं त्यांचें अंतःकरण तळमळूं लागलें. स्वतःस शिक्षण न मिळाल्यामुळें उदरनिर्वाहाकरितां जे शारीरिक कष्ट करावे लागले व ज्या संसारयातना सोसाव्या लागल्या, ते कष्ट व त्या यातना पुढें आपल्या मुलांच्या वांट्यास तरी न याव्या म्हणून, त्यांना शक्य तेवढें शिक्षण देऊन त्यांचा पुढील मार्ग सुगम करावा असें त्यांस वाटूं लागलें.

त्या वेळीं, आपल्या मुलांस नुसतें साधें मराठी शिक्षण देणें हें देखील गरीब स्थितींतील आईबापांच्या आवांक्याबाहेर होतें. हल्लींच्या काळच्या लोकांस हें आमचें विधान कदाचित् खरें वाटणार नाहीं. कारण गेल्या पन्नास साठ वर्षांत देशांतील शिक्षण पुष्कळच वाढलें आहे; व पूर्वीं दहा पांच खेडीं मिळून जेथें धूळपाटीवर मूळाक्षरें शिकविणाऱ्या तात्या पंतोजींची एखादी शाळा असावयाची, तेथें बहुतेक सगळ्या मोठ्या गांवांतून आतां सरकारी शाळा झालेल्या असल्यामुळें, चालू पिढीच्या लोकांस दोन तीन पिढ्यांपूर्वींच्या शिक्षणविषयक अडचणींची चांगलीशी कल्पना होणार नाहीं. हल्लींच्या शाळांतून गरिबांच्या मुलांस फी द्यावी लागत नाहीं, त्यामुळें कितीहि गरीबीची स्थिति असली तरी आतांच्या आई-बापांस आपल्या मुलांस थोडें तरी शिक्षण देणें अगदीं सुसाध्य झालें

आहे. पन्नास साठ वर्षांपूर्वी, वर सांगितल्याप्रमाणें, पांच सहा खेडीं मिळून एखादी शाळा असावयाची व तींत अनेक वर्ग असले तरी शिक्षक एखादाच असावयाचा. पाट्या, पुस्तकें, पेन्सिली वगैरे शिक्षणसाधनें त्या वेळीं बहुतेक मुळींच नव्हतीं. लांकडी फळीवर, कोंकणांतल्या तांबड्या धुळीचा थर घालून हाताच्या बोटानें अक्षरें लिहावयाचीं, हाताचें बोट बरेंच झिजल्यावर, गुरुकृपा झाल्यास बोटाऐवजीं बोरूच्या किंवा बारीक बांबूच्या तुकड्याचा उपयोग करण्यास परवानगी मिळावयाची. याच्या पुढील पायरी म्हणजे प्रत्यक्ष लेखणीनें कागदावर लिहिणें. अर्थात् हें बऱ्याच खर्चाचें काम होतें; कारण त्या वेळीं कागद फार महाग होते. बहुतेक शिक्षण गुरुमुखाचे साहाय्यानें होत असल्यामुळें, गुरुकृपा संपादण्यासाठीं मुलांमध्यें मोठी चढाओढ चालत असे. त्या वेळचें गुरुशिष्यनातेंहि निराळें होतें. त्याचे कायदेकानू हल्लींच्या ग्रँट-इन-कोडाबरहुकूम चालत नसत; तर ते गुरुजीच्या स्वभावधर्मावर अवलंबून असत; व हें अशा प्रकारचें शिक्षणहि बहुतेक सुखवस्तु आईबापांच्या मुलांसच मिळत असे.

शिवाजीपंतांचे बंधु जिवाजी हे झाराप येथेंच आपल्या सासुरवाडीस सहकुटुंब राहत असत. पहिल्यापासून शिरावर खर्चाचा बोजा फारसा नसल्यामुळें व सासुरवाडीच्या मंडळीकडून त्यांना थोडीशी मदतहि होत असल्यामुळें त्यांचे दिवस सुखानें जात होते. त्यांना स्वतःला जरी मुलेंबाळें होतीं, तरी अनंताचा लहानपणचा मेहनती व प्रेमळ स्वभाव पाहून त्यांचें त्याजवर विशेष प्रेम जडलें होतें. तेव्हां, वालावलीहून अनंताला आपल्याकडे आणून ठेवण्यासाठीं त्यांनीं पुष्कळ खटपट केली. शिवाजीपंत अर्थात्च त्या गोष्टीस कबूल नव्हते. आपला हेतु शिवाजीपंतांकडून सिद्धीस जात नाहीं असें पाहून जिवाजींनीं, त्यांस दिलेले आपले दोन बैलहि परत मागितले. बैल म्हणजे शेतकऱ्याचें संसारसर्वस्वच; बैलांवर त्याच्या शेतीची सगळी मदार. कुटुंबांतल्या माणसा-

पेक्षांहि गोठ्यांतल्या मुक्या बैलांवर शेतकऱ्यांचें किती प्रेम असतें, हें त्यांच्या सान्निध्यांत राहिलेल्यांस तरी निदान सांगावयास नको. आपल्या स्वतःच्या मालकीचे नसले म्हणून काय झालें, पण आपल्या गोठ्यांतले बैल आज बाहेर जातात, या विचारानें साहजिकच शिवाजीपंतांचं अंतःकरण चिंताव्यग्र झालें. परंतु अत्यंत निकृष्टावस्थेंत त्यांनीं दिवस काढले होते, त्यामुळें असल्या संकटाची त्यांस फारशी पर्वा नव्हती. आपल्या आवडत्या मुलाच्या निकट सान्निध्यास मुकण्यापेक्षां या संकटास तोंड देण्याचेंच त्यांनीं ठरविलें. आपल्या ह्या युक्तीचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं, असें पाहून जिवाजींनीं अनंतास आपल्याजवळ ठेवण्याचा हट्ट सोडला. मात्र अनंतावरील त्यांचा लोभ रतिमात्रहि कमी न होतां, उलट तो अधिकच वाढला. अनंताच्या शिक्षणासंबंधानें ते आतां उपाय-योजना करूं लागले; व अनंतास शिकण्याकरितां कोठें तरी पाठविण्यास तुम्हीं कबूल असाल, तर आपण यथाशक्ति मदत करण्यास तयार आहों असें त्यांनीं शिवाजीपंतांस कळविलें. अशा रीतीनें, ह्या प्रेमकलहाचें उलट परंतु इष्ट पर्यवसान झालेलें पाहून शिवाजीपंतांस सकौतुक आनंद वाटला; व सदर योजनेस त्यांनीं तावडतोब अनुमति दिली. आसपासच्या पंच-क्रोशींत, कोचरें येथेंच शाळा असल्यामुळें अनंतास त्याच गांवीं पाठ-विण्याचें ठरलें. पण राहण्याची आणि जेवणाखाण्याची व्यवस्था कोठें व कशी करावी हा प्रश्न पुढें उभा राहिला.

कोचरें हा गांव वेंगुर्लें तालुक्यांत समुद्रकांठीं असून, वालावलीपासून तो फार तर दोन तीन मैल असेल. त्या गांवीं, या देसाई घराण्याचे एक जवळचे नातलग **रघुनाथ नारायण सामंत** ऊर्फ **कपिमामा** हे श्रीमारुतीच्या देवळाजवळ राहत असत. त्यांजकडे शिवाजीपंतांनीं मुलास ठेवण्याची गोष्ट काढली व मामा यांनीं तीस आनंदानें कबुली दिल्यावर, सुमुहूर्तावर अनंताची विद्याभ्यासासाठीं कोचरें येथें रवानगी झाली.

अनंताचें वय ह्या वेळीं सुमारें ११ वर्षांचें होतें. शिक्षणास प्रारंभ करितांना भाऊसाहेबांचें वय अकरा वर्षांचें होतें हें वाचून, आमच्या तरुण वाचकांस मोठा अचंबा वाटेल. परंतु सुखवस्तु गृहस्थांच्याहि मुलांच्या शिक्षणास त्या वेळीं साधारण मानानें वयाच्या याच सुमारास सुरवात होत असे; व मराठी शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी बरेचसे तत्कालीन विद्यार्थी संसारांत पडलेले असत. आणि अनंत तर अगदीं प्रतिकूल परिस्थितींत वाढलेला. तेव्हां, शाळेंत जाईपर्यंत त्याच्या वयाचीं दहा वर्षें उलटून गेलीं असलीं तर त्याबद्दल कांहीं आश्चर्य वाटावयास नको.

अनंताच्या स्वभावाची ओळख वाचकांस आतांपर्यंत थोडी फार झालेलीच आहे. तो हुषार आणि मेहनती होताच, पण मनमिळाऊपणा हा त्याचा प्रमुख गुण होय. दारिद्र्याच्या तालमींत कष्टप्रद स्थितीच्या आघातांत वाढलेला हा मुलगा मामाच्या कुटुंबांत लवकरच सर्वांस प्रिय झाला. मामाच्या घरचीं माणसें त्याला आपल्या कुटुंबांतल्या माणसाप्रमाणें वागवूं लागलीं. तेथें असतांना अनंतहि घरचीं किरकोळ कामें करण्यांत केव्हांहि कसूर करीत नसे. पहांटेस उठून स्नान करून घरांतील देवांची पूजा वगैरे करून, फावल्या वेळांत त्यानें पानें आणून पत्रावळी लावाव्या. अशा प्रकारच्या सुजाण, कृतज्ञ व उद्योगी मुलावर कोणाचा लोभ जडणार नाहीं ?

जगांत नांवलौकिक मिळवूं इच्छिणारांस अचाट पराक्रम करावा लागतो. मग तो संपत्तीच्या जोरावर असो, विद्येच्या जोरावर असो, किंवा शौर्याच्या जोरावर असो. परंतु भाऊसाहेबांपाशीं तर यांपैकीं एकहि साधन ह्या वेळीं नव्हतें. विद्यासाधनास त्यांनीं नुकताच प्रारंभ केला होता; परंतु ईश्वरनियोजित मार्ग कल्पनातीत असतात आणि या दृष्टीनें, मामाच्या घरच्या अनंताच्या विद्यार्जनाचा हा काल महत्त्वाचा समजला पाहिजे. पुढील आयुष्यांतील कर्तबगारीची दिशा ठरविणारा हाच काळ होता. अनंताची बुद्धि उपजतच चलाख असल्यामुळें, व तिला दिर्घोद्योग

आणि चिकाटी यांची जोड मिळाल्यामुळें, त्याला विद्याभ्यास करण्यास जर मनमुराद सवड मिळाली असती, तर विद्यार्जनाकडेच त्याची काय- मची प्रवृत्ति वळल्यावर, त्याचा पुढील आयुष्यक्रम कदाचित् अगदीं निराळा झाला असता. परंतु योगायोग तसा नसल्यामुळें, विद्येची पूर्ण अभिरुचि लागण्यापूर्वीच अनंतास शाळा सोडावी लागते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. त्याला फक्त अकराच महिने शिक्षणाचा लाभ घडला होता. पहिले एक दोन महिने धुळाक्षरें वगैरे शिकण्यांत—पहिल्या इयत्तेच्या तयारींत—गेले. तेवढ्या अवधींत आपल्या हुशारीनें त्यानें आपल्या गुरुजींची मर्जी पूर्ण- पणें संपादन केली. त्या वेळीं, रत्नागिरीचे रहिवासी **बापू बहिरजी शितोळे** हे कोचरें येथील शाळेवर शिक्षक होते. अनंत हा गरीब पण हुशार व मेहनती मुलगा आहे व त्यानें लहानपणीं फार कष्ट सोसले आहेत, हें ऐकून गुरूंचें त्याजवर फार प्रेम बसलें. नवीन वर्गास लागणारें एखाद- दुसरें पुस्तकहि अनंताजवळ नव्हतें. गुरूच्या परवानगीनें शाळेच्या सुटीच्या वेळीं सर्व मुलें आपापल्या घरीं जात असत, त्या वेळीं अनंत हा शाळेंतच वाचीत व लिहीत बसलेला असे. ह्या दोन तीन महिन्यांत त्याची पहिल्या इयत्तेच्या पुढें थोडीशी तयारी झाली आणि त्याला शिक्षणाच्या मार्गांतून बाहेर काढण्याची पहिली सूचना भवितव्यतेनें दिली ! अनंताला शिक्षण देण्याची कल्पना व्यवहारांत आणणारे त्याचे चुलते जिवाजी हे याच वेळीं मरण पावले. बाप संकटांत असतां मुलांस जे क्लेश सोसावे लाग- तात ते अप्रत्यक्ष असतात. दैवाचा प्रत्यक्ष आघात सोसण्याचा अनंता- वरील हा पहिलाच प्रसंग. परंतु सामान्य विद्यार्थ्यांची हिंमत खचविणारा हा दुर्दैवाचा फटका, वृक्ष जोरानें विस्तार पावण्यास केलेल्या शस्त्राघाता- प्रमाणें, महत्वाकांक्षी अनंताचा उत्साह द्विगुणित होण्यास कारणीभूत झाला. यापुढें शिक्षणास लागणारें आर्थिक साहाय्य आतां कोणाकडूनहि मिळणें शक्य नव्हतें; कारण वडिलांस घरीं कुटुंबाचा खर्च चालवून बाहेर गांवीं

मुलाच्या शिक्षणाकरितां पैशाची बचत करण्याची ऐपत नव्हती. अशा स्थितींत, स्वतःच्या गुणांनीं प्रसन्न करून घेतलेल्या मामाचें साहाय्य अनंतास झालें नसतें तर, पुढें अंबारींत ( मोटारींत ) बसणाऱ्या या भाग्यवान् अनंताला, खाकेस उलटी अंबारी लावून फिरण्याचा प्रसंग आला असता. कारण या प्रसंगीं विद्यार्जनाच्या मार्गापासून परावृत्त न होण्याकरितां, मधुकरी मागून आपला शिक्षणक्रम चालू ठेवण्याचा निश्चय अनंतानें केला होता. अनंत हा मनाचा इतका खंबीर होता.

वर सांगितल्याप्रमाणें, आयत्या वेळीं मामाची मदत मिळून अनंताचा अभ्यासक्रम पुनः पूर्ववत् सुरू झाला. परंतु पुरें एक वर्ष होण्याचे पूर्वींच, घरीं वडील फार आजारी आहेत अशी वार्ता अनंताच्या कानावर आली. तेव्हां त्यानें, विद्योपार्जनाची लालसा थोडा वेळ बाजूस ठेवून, वडिलांची सेवाशुश्रूषा करण्यासाठीं वालावलीस जाण्याचें ठरविलें. दैव तरी अनंताच्या उत्साहाची कसोटीच पाहत होतें.

आपल्या बुद्धिमत्तेनें व उद्योगशीलतेनें अनंतानें आपले गुरुजी शितोळे यांचें प्रेम संपादन केलें होतें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. अनंताचा अभ्यास अखंड चालू राहिल्यास तो चांगला विद्वान् होईल असें रा. शितोळे म्हणत असत. कोचरें येथील शाळेंत त्या वेळीं फारच थोडा विद्याभ्यास शिकविला जात असे. आपल्या शिष्याचा पुढील शिक्षणक्रम बंद पडूं नये या हेतूनें, शितोळे यांनीं, अनंत जेव्हां वडिलांच्या शुश्रूषेसाठीं वालावलीस जाण्यास निघाला तेव्हां त्यास सांगितलें कीं " मी लवकरच येथून रत्नागिरीस जाणार आहें. तूं मजबरोबर येशील तर मी तुला मजकडे मोठ्या आनंदानें ठेऊन घेईन व विद्याभ्यासास शक्य ती मदत करीन." गुरुजींचें हें प्रेमळ आश्वासन ऐकून अनंतास धीर आला व समाधान वाटलें; व "वडिलांची प्रकृति सुधारली म्हणजे त्यांची परवानगी घेऊन मी आपल्याबरोबर खास येईन" असें गुरुजींस त्यानें सांगितलें. पुढें अनंत

वालावलीस आल्यावर थोड्याच दिवसांनीं शितोळे हे रत्नागिरीस जाण्यास निघाले. जाते वेळीं, आपल्या शिष्याची येण्याची तयारी असल्यास त्यास बरोबर नेतां यावें या हेतूनें त्यांनीं वालावलीवरून रत्नागिरीस जाण्याचें ठरविलें. वालावल येथें आल्यावर त्यांनीं श्रीनारायणाच्या देवळाजवळ मुक्काम केला व तेथील कांहीं लोकांस "अनंत शिवराम या नांवाचा मुलगा येथें कोठें राहतो?" म्हणून विचारलें. अनंताच्या बापास गांवांतले लोक 'शिवाजी' या नांवानें ओळखीत असत. यावरून, अनंताचें नांव शाळेंत दाखल करतांना 'शिवाजी' च्या ऐवजीं 'शिवराम' हें नांव सांगितलें गेलें असावें, किंवा शितोळे यांजकडून विस्मृतीनें चूक झाली असावी असें दिसतें. शितोळे यांस जेव्हां, अनंत शिवराम ह्या नांवाचा मुलगा येथें कोणी नाहीं असें लोकांनीं सांगितलें तेव्हां त्यांस थोडेंसें आश्चर्य वाटलें; परंतु रत्नागिरीस जाण्याची त्यांस घाई असल्यामुळें, विशेष विचारपूस न करितांच ते पुढें चालते झाले. अशा रीतीनें 'नांवाचा घोटाळा' होऊन अनंताच्या शिक्षणाचा शेवटचा आशातंतु तुटला! ह्याला म्हणावें भवितव्यता. नांवाच्या घोटाळ्याचें निमित्त तें काय? तशांतून तें कांहीं वेगळेंच नांव नव्हतें. शिवाजीचा चुकून शिवराम झाला असेल, एवढेंहि कोणास सुचून पत्ता लावून देतां आला नाहीं. गांवहि मुंबई शहरासारखा अफाट नव्हता, कीं कोणास कोणाचा मागमूस नसावा. असल्या गांवांत तर शेजाऱ्यापाजाऱ्यांची एकमेकांस बित्तंबातमी असते. गुरुजींचें बिऱ्हाड देवळाजवळ व अनंताचेंहि जवळपासच. शिवाय अनंतास बरोबर नेण्याची उत्कट इच्छा असूनहि, रत्नागिरीस जाण्याच्या तांतडीमुळें, गुरुजींस संथपणें पूर्ण चौकशी करण्यास अवसर नसावा. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, अनंताची भवितव्यता निराळी होती असेंच म्हणावें लागतें. त्याचें कार्यक्षेत्र पुस्तकी विद्या नसून दुसरेंच होतें. तो पुढें स्वतः जरी उत्तम विद्यार्थी व्हावयाचा नव्हता

तरी तो उत्तम विद्यार्थी निर्माण करणाऱ्या संस्थेचा स्थापनकर्ता होणार होता, व देशोन्नतीचें काम त्याच्या हातून अन्य तऱ्हेनें व्हावयाचें होतें.

वालावल येथें आल्यानंतर अनंत आपल्या आजारी पित्याची सेवा करण्यांत गुंतला. वडिलांचें दुखणें दिवसेंदिवस बळावत चाललें व औषधोपचाराचा कांहीं उपयोग होण्याचें चिन्ह दिसेना. ह्या दुखण्यांतून आपण आतां निभावत नाहीं असें शिवाजीपंतांस वाटूं लागलें. त्यामुळें, आपल्या मागें आपली पत्नी व अज्ञान मुलें यांचें काय होईल, या काळजीनें त्यांच्या मनास सारखी तळमळ लागून राहिली. या मानसिक व्यथेमुळें त्यांचें दुखणें अधिकच वाढलें. आपला मृत्युकाल जवळ आला असें पाहून शिवाजीपंतांनीं आपल्या दोन्ही मुलांस जवळ बोलावलें व म्हटलें "माझ्या मागें आतां तुमचें संरक्षण करणार श्रीनारायण समर्थ आहे. तुम्हीं धैर्यानें, चिकाटीनें आणि प्रामाणिकपणानें आपला संसार चालवा." नंतर दोन्ही मुलांस त्यांनीं शेवटचा आशिर्वाद दिला व अनंतास जवळ घेऊन सांगितलें कीं 'तूं आतां मुंबईसारख्या एखाद्या शहरीं जाऊन कांहींतरी उद्योगधंदा पहा. श्रीनारायण तुझें कल्याण करील.' नंतर शिवाजीपंतानीं लवकरच देह ठेविला.

अनंताचें वय त्या वेळीं अवघें बारा वर्षांचें होतें. शिवाजीपंतांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी व सहा मुलें यांची फारच केविलवाणी स्थिति झाली. वडील मुलगा रघुनाथ त्या वेळीं पंधरा वर्षांचा होता. त्या वेळचें उदरनिर्वाहाचें साधन म्हणजे शेती व ती इतक्या लहान वयाच्या मुलांस झेंपण्यासारखी नव्हती. खेडेगांवांत लायक नोकरी मिळणेंहि अशक्य. तेव्हां संसाराचा बोजा उठविण्याचें काम अवजड होऊन बसलें. स्वस्थ बसून प्राप्तस्थितींत खितपत पडण्यास अनंताचें मन घेईना. चरितार्थास पडणारा तुटवडा वडिलांनीं मागें दुकानदारीचा उद्योग करून भरून काढिला, हें अनंताच्या लक्षांत होतें. तद्वत्

आपणांहि कोणता उद्योग करावा, हा प्रश्न अनंताच्या मनांत घोळूं लागला. अशा स्थितींत त्यास वडिलांनीं मृत्युसमयीं केलेल्या उपदेशाचें स्मरण झालें, व धाडशी व दीर्घोद्योगी अनंतबाळानें मुंबईस जाऊन आपल्या गुणांचें चीज करून पाहण्याचें ठरविलें.

एथपर्यंत आम्हीं आमच्या चरित्रनायकाचें बालपण व शिक्षण ह्यांचें वर्णन दिलें. त्यांत त्याच्या वडिलांसंबंधी उल्लेख विस्तारपूर्वक केला आहे. असें करण्यांत आमचा उद्देश त्याच्या आनुवंशिक पूर्वतयारीची मजल कोठपर्यंत गेली होती हें पाहणें होय. त्याचा जन्म सुप्रसिद्ध देसाई घराण्यांत झाला असून, शिवाजीपंतासारखा बाणेदार व स्वाभिमानी पुरुष त्याचा जन्मदाता. देसाई घराणें एके काळीं राज्यकर्तें असून, त्यांच्याच वंशजांचे पदरीं दोन वेळां जेमतेम पोटाची भरती करण्यापुरतीच जमीन असावी, हें दुर्भाग्यच म्हणावयाचें. वरकांती पाहतां असें वाटूं लागतें कीं, हिंदुकायद्यान्वयें वडिलोपार्जित मिळकतीचे तुकडे तुकडे होऊन ती नामशेष होऊन जाते; म्हणून ही समविभागणीची पद्धत सदोष आहे. उलट पक्षीं, इंग्रजी कायद्यान्वयें सर्व मिळकत ज्येष्ठ पुत्रासच लाभते, म्हणून ती पद्धत मिळकत टिकविण्यास पोषक होऊन, ती त्या घराण्याचें ऐश्वर्य कायम राखते; व कुटुंबांतील इतर पुरुषांस प्राप्तीच्या वांट्याची आशा नसल्यामुळें स्वावलंबी बनविते ही गोष्ट खरी आहे. तथापि असली विभागणी व्यावहारिक दृष्ट्या जरी हितकर दिसली, तरी ती न्याय्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. एकाच आईबापांच्या लेंकरांत असा फरक कां धरिला जावा ? ज्येष्ठ पुत्राच्या मागून जन्मास येणें हा कनिष्ठ पुत्राचा गुन्हा नव्हे. आईबापांस निदान त्यांच्याशीं आदरभावानें वागणारे सुपुत्र समान दर्जाचे होत, व ते त्यांच्या मिळकतीचे समान वांटेकरी होणें न्याय्य होय. जर सर्व पुत्रांनीं चरितार्थ चालविण्यापुरतें आपणांस मिळालें म्हणून तेवढ्यावरच

संतुष्ट राहून आळसांत व चैनींत दिवस घालविले नाहींत, तर उलटपक्षीं आपणास मिळालेला वांटा साधन समजून व आपल्या घराण्याचा अभिमान बाळगून, स्वपराक्रमानें वडिलांचें ऐश्वर्य वाढविण्याची ईर्षा बाळगली तर घराण्याचें ऐश्वर्य नामशेष अथवा नष्ट होण्याचें भय नाहीं. इंग्रजी पद्धतीनें कनिष्ठ पुत्रास संसाराची मांडणी व चरितार्थाची काळजी ह्यांपासून आरंभ करावा लागतो. ती दद्दात आमच्या पद्धतींत कमी प्रमाणानें असल्यामुळें, अथवा मुळींच नसल्यामुळें, कर्तव्यास जागल्यास सर्व पुत्रांस आपल्या नैसर्गिक गुणांचें चीज करून घेण्यास सुलभ पडतें. परंतु आमच्या हिंदुस्थानाचें दुर्दैव कीं, पिढ्यान्-पिढ्या लोकांची कोती नजर बनून गेली आहे. दोन वेळांची गरज भागून थोडी चैन व मिजास करण्यास मिळाली, कीं जन्मास आल्याचें सार्थक झालें. मग विनाकारण कष्ट करण्याचें प्रयोजन काय ? वडिलोपार्जित मिळकतीवर अल्पसंतुष्ट राहण्याची प्रवृत्ति जाऊन, घराण्याची अब्रू कायम राखण्यासच नव्हे, तर तींत भर घालण्यास, वांट्यास आलेल्या मिळकतीच्या साहाय्यानें उद्योग करण्याचें शिक्षण व वळण लागलें पाहिजे.

सारांश, आमच्या नामांकित घराण्यांचें ऐश्वर्य नामशेष किंवा नष्ट होण्यास आमची समविभागणीची पद्धत कारण नसून, आमच्या लोकांचा ऐदीपणा, अल्पसंतुष्टता व कुलाभिमानाचा विसर हींच कारणें खरीं. आमच्यांत अल्पसंतुष्टतेचा दोष इतका दृढमूल झाला आहे कीं, शिवाजीपंतासारखा स्वाभिमानी व बाणेदार गृहस्थहि त्यास अपवाद होऊं शकला नाहीं. कारण त्यांस आपली वडिलोपार्जित मिळकत परत मिळतांच, त्यांनीं अन्य व्यवसायाचे भानगडींत न पडतां अल्पसंतुष्टपणें आपल्या जमिनीच्या उत्पन्नावरच राहण्याचें ठरविलें.

एवढें मात्र खरें कीं, दुसऱ्याच्या दास्यत्वांत न जाण्यापुरता तरी कुलाभिमान शिवाजीपंतांत होता, व ती स्थिति टाळण्याकरितां त्यांनीं यथाशक्ति यथामति प्रयत्न केले व दुकान मांडलें. गतवैभव प्राप्त करून घेण्याच्या उद्योगांत त्यांनीं चिकाटी दाखविली.

हे सर्व गुण आमच्या चरित्रनायकांत उतरले होते. दुकानाच्या व्यवस्थेंत व गिऱ्हाइक सांभाळण्यांत अनंतानें दाखविलेल्या हुशारीमुळें त्याच्या अंगचीं व्यापारी लक्षणें दिसून आलीं होतीं. उन्नतिप्रीत्यर्थ विद्याप्राप्तीस्तव लहान वयांत परकीयांत जाऊन राहण्याची तयारी व प्रसंगविशेषीं अर्धपोटीं दिवस काढण्यांत दाखविलेले बिनदिक्कतपणा, दृढोद्योग, निरलसता वगैरेसारखे गुण अनंतांत अवलोकन केल्यावरून, शिवाजीपंतांनीं ताडलें कीं, आपला हा मुलगा महत्वाकांक्षेनें प्रेरित असून, ती सिद्धीस नेण्याइतकें त्याच्यांत पाणी खेळत आहे. म्हणूनच त्यांनीं त्यास मुंबईस जाण्याचा सदुपदेश केला, व तो पाळण्यास आमच्या चरित्रनायकास उपरिनिर्दिष्ट आनुवंशिक व जन्मसिद्ध गुणांनीं प्रेरित केलें.

---

## प्रकरण ४ थें.

# मुंबईस गमन.

त्यावेळीं म्हणजे इ. स. १८६५ च्या सुमारास दक्षिण कोंकणांतून मुंबईस किंवा दुसऱ्या तितक्याच दूरच्या ठिकाणीं जाणें किती बिकट, त्रासदायक आणि धाडसाचें होतें, याची कल्पना, अठरा वीस तासांच्या अवधींत वेंगुर्ल्याहून मुंबईस येऊन पोंचणाऱ्या हल्लींच्या पिढींतील लोकांस होणार नाहीं. हल्लीं कोंकणांतून मुंबईस येणें ही नित्यपरिचयाची गोष्ट होऊन बसली आहे. रोज कोकणांतून मुंबईस व मुंबईहून कोंकणांत हजारों लोक जात येत असतात. अगदीं नवख्या मनुष्यासहि कोणाच्या तरी ओळखीनें मुंबईंत येऊन, विशेष अडचण न येतां, रोजगारधंदा मिळवितां येतो. लहान मुलासदेखील मुंबईस पाठविणें आईबापांस आतां धोक्याचें वाटत नाहीं. पण त्या वेळची परिस्थिति याच्या अगदीं उलट होती. पहिली गोष्ट ही कीं, मुंबईपर्यंतचा हा प्रवास त्या वेळीं तारवांतून करावा लागे. त्या कालाच्या सुमारास कोंकण लाइनीस आगबोटींची आवजाव जरी प्रयोगादाखल सुरू झाली होती, तरी बोटीच्या प्रवासाच्या सुरक्षिततेविषयीं लोकांची खात्री पटली नव्हती. शिवाय बोटींच्या फेऱ्याहि नियमितपणें होत नसत व तिकिटांचे दरहि भारी होते. त्यामुळें श्रीमंतांशिवाय इतरांस ह्या सोयीचा फायदा घेणें जवळ जवळ अशक्यच होतें. म्हणून, इतर अडचणी व गैरसोयी लक्षांत न घेतां, तारवांतून प्रवास करणेंच लोक अधिक पसंत करीत असत.

तारवांतील प्रवासाची स्थितीहि विशेष स्पृहणीय होती असें नाहीं. अगोदर, तारूं कधीं निघणार हें निश्चित नसे. कित्येक वेळां बंदराच्या

गांवीं, तारवांत मालाची भरताड होईपर्यंत, प्रवाशास बरेच दिवस वाट पाहत बसावें लागे. नंतर तारवांत बसून निघाल्यावरहि, इष्टस्थलीं पोंचण्यास किती कालावधि लागेल, याचाहि कांहीं धरबंध नव्हता. वारा अनुकूल असला तर दोन तीन दिवसांत जहाज मुंबईची मजल गांठतें; परंतु प्रतिकूल असल्यास, कधीं कधीं एक महिनादेखील लागतो. तारवांत खाण्यापिण्याची व निजण्याबसण्याची कांहींच सोय नसते. बहुतेक सर्व वेळ कोठेंतरी कोनाकोपऱ्यांत पडून राहावें लागतें. जवळ कांहीं तरी फळफळावळ किंवा दुसरे खाद्य पदार्थ असले तर ते खाऊन व निघतांना सांठवून ठेवलेलें टांकींतील पाणी पिऊन राहावें लागतें. तारवानें कोठें तरी मधल्याच बंदरांत वरवा केल्यास त्या ठिकाणीं उतरून स्नान व भोजन करण्याची संधि मिळते. ह्या सर्व अडचणींमुळें, अल्पवयी मुलांस मुंबईस पाठविण्यास त्या वेळचे लोक तयार नसत, यांत कांहीं नवल नाहीं. परंतु प्रवासाच्या कामीं इतक्या अडचणी होत्या तरी, शिवाजीपंतांच्या मृत्यूनंतर, कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीला चरितार्थाचा प्रश्न सोडविण्याकरितां आपापल्या परी कांहींतरी प्रयत्न करणें भाग पडल्यामुळें, अनंताला ती एक इष्टापत्तिच होती. शिवाय शिवाजीपंत हे आपल्या वयाच्या २५ व्या वर्षीं कांहीं न्यायाच्या कामाकरितां एका नातलगाबरोबर मुंबईस आले असतां, त्या वेळीं चालू असलेल्या वरलीच्या बांधाचे कामीं लावलेल्या मजुरांवर कांहीं दिवस ते मुकादम होते. मुंबईस असतांना तेथील लहानमोठ्या प्रमाणावर चाललेले उद्योग-धंदे त्यांच्या अवलोकनांत आले होते. त्यावरून त्यांच्या लक्षांत आलें कीं, मुंबईस कोणत्याहि लहान थोर माणसास कांहीं तरी रोजगार-धंदा मिळतो, इतकेंच नव्हे तर, तसाच हुशार इसम असला तर, त्यास आपल्या अंगच्या गुणांचें चीज करून घेण्यास मुंबईतच वाव मिळतो; व म्हणूनच त्यांनीं अंतसमयीं अनंतास मुंबईस जाण्याचा उपदेश केला होता. अनं-

ताच्या आईसहि ही गोष्ट ठाऊक झाली होती; त्यामुळें त्या माउलीनें, आपल्या लाडक्या कुमाराच्या उत्कर्षाच्या प्रयत्नांच्या आड न येतां, आपणास होणारें वियोगदुःख बाजूस सारून, त्यास मुंबईस जाण्यास संमति देण्याचें मनांत ठरविलें. सोबतीची तजवीज केल्यावर मग आईची परवानगी घ्यावी या हेतूनें अनंत सोबतीस कोणी मिळतें कीं काय याविषयीं चौकशी करूं लागला.

मालवणकर देसाई व वालावलकर देसाई यांच्या दरम्यान चालू असलेल्या पूर्वनिर्दिष्ट दाव्याचा निकाल लागल्यावर, मालवणकर देसाई वालावलीस वारंवार जाऊन येऊन राहूं लागले. कधीं कधीं ते आपल्या नोकराचाकरांनिशीं श्रीनारायणाच्या सेवेसाठीं कांहीं दिवस वालावली येथें राहत असत. त्यांचे पदरीं **लाडू शेगाडकर** या नांवाचा एक नोकर होता. तो पुढें मुंबईस माळयाचा धंदा करीत असे. तो याच सुमारास मुंबईहून मालवणास गेला असतां, आपल्या धन्या-बरोबर वालावलीस आला होता. त्या वेळीं अनंतानें त्याला मुंबईची माहिती विचारून, मुंबईस जाण्याची आपली इच्छा व्यक्त केली. त्यानेंहि अनंताचा उत्साह पाहून त्याला मुंबईत रोजगार मिळविण्याच्या बाबतींत शक्य ती मदत करण्याचें आश्वासन दिलें. पुढें तो लवकरच मुंबईस गेला. त्यानंतर **भिकू खवणेकरीण** या नांवाची एक बाई मालवणाहून मुंबईस उद्योगधंद्याकरितां जावयाची होती. ही बाई वालावल येथें राहणारी होती. ती मुंबईस जाणार आहे हें अनतास कळतांच त्यानें तिच्याशीं संधान बांधलें. अनंतास आपल्याबरोबर नेण्याचें तिनें कबूल केलें. मुंब-ईस गेल्यावर, लाडू शेगाडकर हा आपल्या नोकरीची व्यवस्था करणार अशी अनंताची खात्री होती. कोणाची तरी सोबत पाहिजे होती, तीहि मिळाली. तेव्हां अनंतानें निघण्याची तयारी केली व सर्व हकीकत आईच्या कानीं घालून निघण्याबद्दल तिची परवानगी मागितली. वडिलांनीं

मुंबईस जाण्याविषयीं अगोदरच सांगून ठेवलेलें असल्यामुळें, व सोबतीचीहि व्यवस्था झाल्यामुळें, अनताच्या जाण्यास रुकार देण्याची तिची अर्धवट तयारी झालीच होती. परंतु, अनंतानें जेव्हां प्रत्यक्षच जाण्याची गोष्ट काढली तेव्हां तिनें मोठ्या कष्टानें परवानगी दिली. कसें झालें तरी तें मातृहृदय! जन्मापासून प्रेमानें वाढविलेला पोटचा गोळा आपल्या दृष्टीपासून दूर करतांना तिला ब्रम्हांड आठवावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. असो.

आईकडून परवानगी कशी मिळते याबद्दल अनंताला थोडीशी काळजी वाटत होती. यामुळें, विशेष आढेवेढे न घेतां तिनें चटकन् रुकार दिलेला पाहून त्याला मोठें समाधान वाटलें. अशा रीतीनें एक काळजी दूर झाली, पण तिच्या मागोमाग दुसरी एक अडचण येऊन उभी राहिली. ती प्रवासाच्या खर्चाबद्दलची. घरांत तर एक पैसाहि शिल्लक नव्हता; किंवा धान्यहि विकण्याइतकें शिल्लक नव्हतें. पण शेवटीं ही अडचण देखील देवानें दूर केली. सहदेवपंत नामक एक गृहस्थ शेजारीं राहत होते, त्यांनीं अनंताचा उत्साह पाहून, वाटखर्चाकरितां एक रुपया त्याच्या हातावर ठेविला. अशा रीतीनें दोन अडचणी दूर झाल्या. आतां फक्त तारवांतील जेवणाखाणाची व्यवस्था तेवढी व्हावयाची राहिली. जी लक्ष्मी अनंतास पुढें आपलें कृपापात्र करणार होती तिच्या आराधनेस निघतांना त्यानें आपल्याबरोबर चिंचोके व थोडेंसें तांदळाचें पीठ इतकीच सामग्री घेतली होती! आणि मालवण बंदरांत तारवावर चढतांना त्यानें थोडींशीं जळाऊ लाकडेंहि बरोबर घेतलीं.

याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर, अनंत हा, इ. स. १८६५ त, आश्विन कृष्ण अमावास्या या दिवशीं, भिकू खवणेकरीण हिजबरोबर मुंबईस जाण्याकरितां वालावलीहून मालवणास यावयास निघाला. मालवणास आल्यावर, तारवाची तयारी होई-

पर्यंत त्यांना तेथें दोन तीन दिवस राहावें लागलें. निघण्यापूर्वीं एक दिवस मोठें वादळ होऊन बराच पाऊस पडला. अशा स्थितींत, आपल्याबरोबर न येण्याविषयीं, भिकू खवणेकरीण हिनें अनंतास पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु अनंताचा निश्चय ढळला नाहीं. आजची संधि चुकविल्यास पुनः आपणास अशी संधि मिळणार नाहीं, व मग आपणास गांवांत कायमचें मोलमजुरी करून राहावें लागेल अशी खूणगांठ मनाशीं बांधून, बऱ्यावाइटाचा हवाला परमेश्वरावर टाकून, अनंतानें तारवावर पाय ठेवला. तारवाचा नोर म्हणून जवळ असलेल्या एक रुपयांतून आठ आणे त्यानें तांडेलास दिले व उरलेले आठ आणे मुंबईतील खर्चासाठीं गांठीस बांधून ठेविले. मुंबईस पोंहोंचण्यास फतेमारीसि तेरा दिवस लागले. वाटेंत तारूं फार हालल्यामुळें अनंताचे बरेच हाल झाले; उपासमारहि सोसावी लागली. शेवटीं तेराव्या दिवशीं सकाळीं सात आठ वाजण्याच्या सुमारास, आमचा छोटा पण धाडसी प्रवासी मुंबईच्या बंदरावर सुखरूपपणें येऊन उतरला.

# प्रकरण ५ वें.

## मुंबईस आल्यावर.

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १ ॥—श्रीसमर्थ.

ह्याप्रमाणें हा बारा वर्षांचा अनंतबाळ एखादद्दुसरें वस्त्र व रिकामा खिसा संगतीं घेऊन, मुंबईसारख्या अफाट शहरीं आपलें नशीब काढण्याचा दृढनिश्चय करून आला तर खरा. मुंबईस नात्या-गोत्याचें किंवा ओळखीचें असें कोणी नव्हतें. येऊन जाऊन सर्व भिस्त काय ती एका अल्प ओळखीच्या माळयाच्या शब्दावर. अननुभवी पोरवयांतील धाडशी-पणाच तो. भिकूबाईच्या मदतीनें लाडू शेगाडकराचा खेतवाडींत पत्ता लागला. ह्या माळ्याच्या मदतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कार्यव्या-पृतत्वामुळें म्हणा, अथवा कोंकणांत असतांना देशबंधुत्वाच्या प्रेमभरां-तील सहानुभूतिपर दिलेल्या आश्वासनाच्या वरकरणीपणामुळें म्हणा, माळीदादास नोकरी धुंडून काढतां आली नाहीं. दिवसांवर दिवस लोटूं लागले व खाण्यापिण्याची पंचाईत पडूं लागली. संगतीं आणलेली आठ आण्याची शिल्लक रकम किती दिवस पुरी पडणार ? अशा स्थितींत ह्या लहान मुलानें काय करावें? एखादा जाणता पुरुषसुद्धां अशा बिकट परिस्थितींत डगमगून आल्या वाटेनें परत जाण्याच्या खटपटीस लागला असता. परंतु हा विचार अनंताच्या मनास शिवला सुद्धां नाहीं. त्याचा आत्मविश्वास व साहस हीं इतकीं दांडगीं होतीं कीं केवळ फकिरी बाण्यानें बोटीचा प्रवास करून एका तुटपुंज्या ओळखीवरून त्यानें मुंबई गांठलीं. तेव्हां कोणाच्याहि साहाय्याची अपेक्षा न धरतां पोटासाठीं आरंभीं मजुरी करावी लागली तरी बेहेत्तर, पण अपयश घेऊन परत

जावयाचें नाहीं, असा मनाचा निर्धार करून त्याप्रमाणें वागण्याचा त्यानें संकल्प केला. सत्य संकल्पाचा दाता भगवान. ह्याच वेळीं रा. **हरि पुंडलीक सामंत** ह्या नांवाचे गृहस्थ त्यास अकल्पित भेटले. त्यांनीं विचारपूस करून अनंताची संकटावस्था लक्षांत आणली, व त्यास चिखलवाडींत आपल्या घरीं राहण्यास नेलें.

अनंत हा सामान्य प्रकारचा मुलगा असता तर, अशी पोटापाण्याची सोय लागल्यावर नोकरी मिळे तों स्वस्थ पडून राहिला असता. परंतु ह्या मानी व करारी वडिलांच्या 'बापसे बेटा सवाई' पुत्रास परान्न गोड कसें लागावें ? दुसऱ्याच्या कमाईची तूपसाखर खाण्यापेक्षां स्वतःच्या कष्टाची मीठभाकर खाण्यांत अधिक भूषण मानणारा अनंत होता. थोडे दिवस वाट पाहून नोकरीचें जमत नाहीं असें लक्षांत आल्यावर, ह्यानें मजुरी करण्यास कंबर बांधली. ग्रँटरोडचें स्टेशन नवीन बांधण्याचें काम चालू होतें, तेथें हे राव खांद्यावर पिकावपावडें घेऊन मजुरांत दाखल झाले. धन्य त्याची ! मी गृहस्थाचा मुलगा असून मजुरी कशी करूं, हा विचार त्याच्या मनांतसुद्धां आला नाहीं. परान्नावर संतुष्ट न राहतां स्वकष्टानेंच टीचभर पोटाची खांच भरण्यांत खरा पुरुषार्थ आहे, हें हा अल्पवयी बाळ जाणून होता. जो प्रथम नोकर होण्यास तयार असतो तोच पुढें धनी होण्यास लायक होतो. कोणत्याहि प्रामाणिक कामांत स्वाभिमानी व स्वावलंबी मनुष्यास उच्च-नीचपणा दिसून येत नसतो. अमुक धंदा कमीपणाचा, अमुकधंदा उच्च-वर्णीय लोकांनीं करूं नये, वगैरे ज्या समजुती आपल्या लोकांच्या हाडींमासीं आज शेंकडों वर्षें खिळून राहिल्या आहेत, त्यांचें पूर्णपणें उच्चाटन झाल्याशिवाय आमची व्हावी तशी प्रगति कधींहि होणार नाहीं. असो.

दैव अनंताची सत्वपरीक्षा घेण्यासच तयार होतें; व त्याच्या स्वावलंबी वृत्तीनें तो परीक्षेंत उतरला म्हणून त्यास ताबडतोब एका गिरणींत नोकरी मिळाली.

---

## प्रकरण ६ वें.

# गिरणींतील नोकरी.

ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें ।
चित्तीं असों द्यावें समाधान ॥ १ ॥

तुकाराम.

शेंकडा नव्वद लोक वरील साधुवाणीचा विपरीत अर्थ करितात. सहजासहजीं विशेष आयासाविण प्राप्त झालेल्या स्थितींत मनुष्यानें संतुष्ट राहावें, असा समज बहुतेकांचा असतो. त्यामुळें पुष्कळ लोक आपल्या गुणांचा स्थिति सुधारण्याकडे उपयोग करीत नाहींत. वारा वाहील तसे वाहत राहतात. म्हणून पदरीं बुद्धिवैभव असूनहि आरंभीं नोकर ते शेवटपर्यंत, ओघानें प्राप्त झालेल्या चढत्या पगारावर, नोकरच राहतात. स्वतःच्या अक्कलहुशारीनें, दीर्घोद्योगानें व ज्ञानवृद्धीनें चढत्या पायरीवर जाण्याची हांव फारच थोडे धरतात. घरच्या अडचणींमुळें अभ्यासक्रम तुटल्यावरून कारकून बनलेल्या होतकरू तरुणांपैकीं किती जण ज्ञानांत भर घालून आपली स्थिति सुधारून घेण्याची महत्वाकांक्षा बाळगितात? प्रत्येक धंद्यांत, प्रत्येक कामांत, अशीं किती माणसें सांपडतील? वरील साधुवाणी मनुष्यास हतवीर्य होण्यास सांगत नाहीं. मनुष्यानें आपलें नशीब आपल्या हातांत घेतलें पाहिजे व अचाटबुद्धि खर्चून दीर्घोद्योगानें आपली बढती करून घेतली पाहिजे. प्रारब्धावर हवाला देऊन स्वस्थ राहणाऱ्याबद्दल कविवर्य मुक्तेश्वर म्हणतातः—

पुढें ओढवूनि प्रारब्धा । जो टाकी प्रयत्न धंदा ॥
तया पुरुषा बुद्धिमंदा-माजी गणती ज्ञाते ॥ १ ॥

आतां एवढें खरें कीं प्रयत्न करूनहि यश सर्वांच्या वांट्यास येईलच असें नाहीं. तथापि मनुष्यानें यशापयशाकडे लक्ष न देतां उद्योग सतत चालू ठेविला पाहिजे. यश आलें तर शेंफारून जाऊं नये व दुर्दैवेंकरून अपयश आल्यास निरुत्साह होऊं नये. उद्योग सतत चालू ठेऊन व प्राप्त स्थितींत ईश्वरावर भरंवसा ठेऊन समाधान वृत्तीनें राहत असावें; हेंच या प्रकरणाच्या आरंभीं दिलेल्या साधुवाणींत सांगितलें आहे.

आमचा चरित्रनायक अल्पसंतुष्ट नव्हता. जातीनें हुशार व दीर्घोद्योगी असून महत्वाकांक्षेनें प्रेरित असल्यामुळें गिरणींत जरी आरंभीं तो सात रुपायांच्या पगारावर रुजू झाला, तरी तो लवकरच आपल्या अक्कलहुशारीनें काम शिकून स्पिनर ( सूत कातणार ) बनला; त्यानें नोकरी ताडदेवावरील **कावसजी दावर स्पिनिंग मिल**मध्यें धरली होती. आपणास आतां नोकरी लागली, तेव्हां क्रमाक्रमानें मिळणाऱ्या बढतींतच त्याची ईर्षा त्यास संतुष्ट राहूं देईना. त्याच्यांत निरलसता व उद्योगप्रियता हे गुण पूर्णपणें बाणलेले होते. तथापि आपणास आपली बढती करून घेणें असल्यास आपल्या ज्ञानांत भर घातली पाहिजे, हें त्यास ठाऊक होतें. म्हणून इतर कामगारांप्रमाणें मधल्या सुटीचा अथवा फावला वेळ झोंप काढण्यांत किंवा गप्पा मारण्यांत न घालवितां, तो शेजारील “ माणेकजी पेटिट मिल ” मध्यें जाऊन विणकाम शिकला; व अशा प्रकारें प्राप्त करून घेतलेल्या ज्ञानाच्या जोरावर तो “ न्यू मिल ” नांवाच्या वीव्हिंग मिलमध्यें विणकराच्या नोकरीवर राहिला. येथेंहि त्यानें नेमक्या पगारावर नेमकें काम करण्याचें सोडून देऊन, अंगावर काम घेऊं लागला. त्यामुळें त्यास महिना ५०-६० रुपये पडूं लगाले. पुढें ह्या गिरणींत कामगारांचा संप सन १८७१ सालीं झाला, त्यांत सामील होऊन त्यानें कामावर जाण्याचें बंद केलें.

अनंत आरंभीं सात रुपये पगार असतांना हरि पुंडलीक सामंत यांज-

कडेच राहत असे. आपल्या खर्चाबद्दल तो त्यांस दरमहा पांच रुपये देत असे. पण जेवणखर्च, जागेचें भाडें वगैरेबद्दल आपण देत असलेला हा पांच रुपये मोबदला कमी आहे असें जाणून व आपल्या नेहमींच्या वहिवाटीस अनुसरून, त्यांच्या घरकामास तो यथाशक्ति हातभार लावीत असे. पहिली गिरणी सोडतांना त्याचा पगार सुमारें ३५ रुपयेपर्यंत वाढला होता व न्यू मिलमध्यें नोकरीस लागल्यानंतर, आतां आपणास स्वतःच्या पायांवर उभें राहतां येईल अशी खात्री वाटतांच, हरिभाऊंचा निरोप घेऊन ताडदेव येथें त्यानें आपलें स्वतंत्र बिऱ्हाड केलें. तेथें स्वतःच स्वयंपाक करून एकटाच राहत असे. काटकसर आणि दीर्घोद्योग यांच्या जोरावर त्यानें थोडीशी शिल्लकहि टाकली.

हरिभाऊ सामंत यांजकडे असतांनाच **भाऊसाहेब फोंडेकर** नामक गृहस्थांशीं अनंताची ओळख झाली होती. पुढें पुढें त्यांचा परिचय वाढत गेला. भाऊसाहेब फोंडेकर यांनीं, अनंताच्या अंगीं खऱ्या व्यापाऱ्यामध्यें दिसून येणारे गुण वसत असलेले पाहून, पगारी काम करण्याचें सोडून स्वतंत्र धंदा उभारण्याचा सल्ला त्यास दिला. अनंतासहि ती गोष्ट जरी पसंत होती तरी भरपूर भांडवलाच्या अभावीं, असलेली नोकरी सोडून, एकदम व्यापाराचें धाडस करणें त्यास योग्य वाटलें नाहीं. व्यापाराचे विचार मात्र त्याच्या मनांत सारखे घोळत होते. इतक्यांत संपांत सामील झाल्यामुळें अनंताची नोकरी गेली. झालें. त्याच्यांत दास्यत्वांत न राहण्याचें आनुवंशिक बीज होतेंच, त्यास अंकुर फुटण्यास एवढेंच कारण बस झालें. व्यापाराची आवड झारापीच्या दुकानामुळें त्यांत उद्भुत झालीच होती, व लहान प्रमाणांत यशस्वीपणानें तो चालविण्याची नैसर्गिक बुद्धि त्याच्यांत वास करीत असून, त्यास सदर दुकानांत तालीम मिळालीच होती. आतां भांडवलाची तेवढी अडचण होती, तीस अनंताचें धाडस जुमानणारें नव्हतें. शिवाय, मुंबईंत

काढलेल्या तीन चार वर्षांच्या अवधींत त्याच्या पाहण्यांत आलेंच होतें कीं, मुंबईसारख्या शहरी अंगमेहनत व प्रामाणिकपणा ह्यांचीं जोड मिळाल्यास लहान प्रमाणावर तरी व्यापार चालण्यास गिऱ्हाईकांचा तोटा नसतो. म्हणून त्यानें इतःपर नोकरीच्या भरीस न पडतां, स्वतंत्रपणें व्यापार करण्याचा संकल्प केला.

दरम्यानच्या अवधींत अनंतास शिलकेंतून मधून मधून घरखर्चास कांहींतरी पाठवावें लागे, त्यामुळें शिलकेची रकम फारशी सांठली नव्हती. घरून मुंबईस येऊन बरेच दिवस झाल्याकारणानें, आईकडूनहि, एकदां भेटून जाण्याबद्दल, निरोपावर निरोप येत असत. धाकटीं तीन्ही भावंडें, वडिलांचे मृत्यूनंतर लवकरच मरण पावलीं होतीं व म्हणून अनंत पूर्वींच घरीं जावयाचा; परंतु हातांत पैसा नसल्यामुळें तो त्या वेळीं गेला नाहीं. परदेशीं आल्यावर, कांहींतरी मिळविल्याशिवाय, परत गांवीं जाऊन आपल्या जवळच्या नातेवाईकांची भेट घेण्यास पाणीदार मनुष्यास थोडासा कमीपणा आणि संकोच वाटतो. असो. आपल्या नवीन धंद्यास जोरानें सुरुवात करण्यापूर्वीं अनंतानें एकदां वालावलीस जाऊन येण्याचें ठरविलें.

मनांत विचार येऊन तो कृतींत उतरविण्याचा अनंताचा एकदां निश्चय झाला कीं तसें करण्यास तो बिलकुल विलंब लावीत नसे. आतां जरी आगबोटी सुरू झाल्या होत्या तरी एकंदर परिस्थितीचा विचार करून अनंतानें आगबोटीपेक्षां तारवांतलाच प्रवास सोईस्कर ठरविला व कोंकणांत जाण्यास निघालेल्या एका तारवांत बसून तो आपल्या मातृभूमीस जाण्यास निघाला. ह्या प्रवासांत अनंतावर एक जीवावरचा प्रसंग गुदरला. मुंबईहून निघाल्यावर तारवांतील उतारूंस विसांवा मिळावा म्हणून, तारवानें केळशी बंदरांत वरवा केला. सर्व मंडळी जेवण करण्याकरितां जमिनीवर उतरली. परंतु अनंत तारवावरच राहिला

होता. पुढें, उतरलेल्या मंडळीनें त्याला जेवणास येण्याचा फार आग्रह केल्यावरून सुमारें बारा वाजतां तो खालीं उतरला. त्या दिवशीं हवा जरा बदलली होती व दोन वाजतां जेव्हां सर्व मंडळी जेवणखाण उरकून होडींतून तारवावर जाण्यास निघाली तेव्हां तर एकदम वादळी हवा सुटली. किनाऱ्यापासून होडी थोड्या अंतरावर गेल्यावर, तुफानी वाऱ्याबरोबर एक मोठी लाट येऊन होडी उलटली. ताबडतोब खलाशी लोकांनीं चलाखी करून सर्व माणसांचे जीव वांचविले, पण त्यांचें बहुतेक सामान पाण्यांत बुडालें. अनंतानें आपल्याबरोबर घेतलेले ३५० रुपये कमरपट्ट्यास बांधून ठेवले होते व तारवावरून उतरतांना, पाणी पिण्यासाठीं एक लहानशी लोटी बरोबर घेतली होती. होडी उलटली त्यावेळीं अनंताच्या हातांतील लोटी पाण्यांत गेली, पण कमरपट्ट्यांतली रकम शाबूद राहिली. नंतर सर्व मंडळी तारवावर चढली. परंतु हवा लवकर बदलण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां पुनः सर्व उतारू, तांडेलाचा निरोप घेऊन, शिल्लक राहिलेल्या आपापल्या सामानासह किनाऱ्यावर उतरले; व पायवाटेनेंच घरचा रस्ता सुधारणें त्यांना अधिक सुरक्षितपणाचें वाटल्यावरून, त्यांनीं त्या मार्गाचें अवलंबन केलें. परंतु एकटा अनंत मात्र तारवांतून खालीं उतला नव्हता. त्याचा धाडसी आणि निश्चयी स्वभाव असल्या वादळानें बदलण्याइतका कच्चा नव्हता. तो तारवांतूनच मालवणास उतरला, व तेथून वालावलीस जाऊन, मातुश्रीस भेटून व श्रीनारायणाचा प्रसाद घेऊन थोड्याच दिवसांनीं मुंबईस परत आला.

## प्रकरण ७ वें.

# फेरीवाल्याचा धंदा.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें अनंतानें सन १८७२ च्या सुमारास स्वतंत्रपणें धंदा करण्याचें ठरविलें तर खरें. परंतु नगदी भांडवलाच्या अभावीं एकदम दुकान थाटण्याच्या भरीस न पडतां, त्यास व्यापाराची पहिली पायरी म्हणून फेरीवाल्याचा धंदा सयुक्तिक वाटला; व त्यास ह्या बाबतींत उत्तेजन देणारे रा. भाऊसाहेब फोंडेकर यांनीं हातरुमाल, लेस वगैरे विकणाऱ्या एका गुजराथी फेरीवाल्याची व अनंताची ओळख करून देऊन, त्या फेरीवाल्यास अनंतास आपल्या धंद्यांत घेण्याची शिफारस केली. त्यावरून त्या फेरीवाल्यानें अनंतास, त्याचा भाग ठरवून, आपल्या धंद्यांत भागीदार म्हणून घेतलें. व त्याचे संगतीं अनंत मुंबईच्या रस्त्यांतून "घ्या हो लेस!" असें ओरडत फिरूं लागला. फेरींत बिगारी हेलकरी करण्याच्या फुकट डौलांत न पडतां, अनंत मालाची टोपली स्वतःच्या डोकीवरच घेऊन फिरत असे. अंगमेहनत व कष्टाळूपणा त्याच्या अंगवळणींच पडले होते. तशांतून चरितार्थाकरितां उचललेल्या कोणत्याहि प्रामाणिक धंद्यास लागणारें काम करण्यांत, मग तें मजुरीचें किंवा अन्य तऱ्हेच्या अंगमेहनतीचें कां असेना, अनंतास कमीपणा वाटत नसे. **फ्रांकलिन**सारखा थोर पुरुष आपल्या छापखान्यास लागणारे कागद, टाइप वगैरे सामान पुष्कळ वेळां हातगाडींत घालून ती स्वत: रस्त्यांतून लोटींत नेत असे. त्यामुळें त्याच्या महत्कीर्तीस कांहीं कमीपणा आला नाहीं.

ह्या फेरीवाल्याच्या धंद्यांत गिऱ्हाइकांस खुष करण्यांत व त्यामुळें माल सहज जास्त खपविण्यांत अनंताचा तरबेजपणा व हुशारी विशेष दिसून आली; व त्यामुळें माल जास्त खपून फायदाहि अधिक होऊं लागला. तेव्हां त्या गुजराथी भागीदाराच्या मनांत वैषम्य आलें. विशेष फायद्याची रकम त्याचे डोळ्यांत भरूं लागून, त्यास लोभ सुटला. आपण इतके जुने व वाकबगार फेरीवाले असतां, ह्या आजकालचे पोरास अर्ध्या भागाची एवढी मोठी रकम काय म्हणून द्यावी ? वास्तविक पाहतां त्या दोघांत तसा ठराव झाला होता, व विशेष फायदा होण्यास अनंताची हुशारीच कारण झाली होती, हें त्याच्या प्रत्ययासहि आलें होतें. तरी पुढें तो त्याचा ठरलेला भाग देण्यास कचरूं लागला. हें त्याचें गैरवर्तन पाहून कांहीं दिवसांनीं त्यास दोन गोष्टी सांगून, त्याचें मन न दुखवितां, अनंत त्याजपासून वेगळा झाला. मात्र ह्या धंद्यांत आपला प्रवेश व तत्संबंधी ओळख व माहिती त्या गुजराथ्यामुळें झाली, सबब त्याचे आपणावर उपकार झाले आहेत, व तो आपणास गुरुसमान आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन अनंतानें त्याच्याशीं विरोध व स्पर्धारूपानें गुरुद्रोह होऊं नये म्हणून, मालांत बदल करून टोप्या विकण्याची फेरी करण्याचें ठरविलें. ह्याला म्हणावें कृतज्ञता. आजकाल हा गुण किती लोकांत दिसून येतो? बहुतेक खाल्ल्या घरचे वांसे मोजणारेच असतात. उपकार-कर्त्यांवर प्रत्युपकार करणारे पुण्यवान् प्राणी तर राहोत, पण नुसते उपकार स्मरणारेहि थोडकेच सांपडतील. बाकीचे बहुतेक काम झाल्यावर ओशाळपणा काढून टाकण्यासाठीं, उपकारकर्त्यांचा वेळोवेळीं पाणउतारा करूं पाहणारे व तत्प्रीत्यर्थ त्यास उपद्रव पोंचविणारे हरीचे लालच सांपडतील. असो.

आमच्या चरित्रनायकाचें निरीक्षण सूक्ष्म असून त्याची निसर्गसिद्ध अनुमानशक्ति दांडगी होती. आमच्या लोकांची भागीनें कोणतेंहि काम

चालविण्याची लायकी नाहीं, असें त्याच्या निदर्शनास आलें. आपसांतील व्यवहारांत सरळपणा ठेवण्यापुरत्या नीतिमत्तेचा प्रादुर्भाव भागीदारांत झालेला नाहीं. आडमार्गानें आपलेंच उखळ, व तेंहि ताबडतोब, पांढरें करून घेण्याकडे बहुतेकांची प्रवृत्ति असते. पतकरलेल्या उद्योगाचा आपल्या अक्कलहुशारीनें व मेहनतीनें उत्कर्ष करून, त्यामुळें आपणा सर्वांचा कायमचा फायदा करून घेण्याकडे लक्ष नसतें. आरंभलेला उद्योग रसातळास पोंचला तरी हरकत नाहीं, पण तात्पुरता हात मारून गब्बर व्हावें, पुढचें कोणी पाहिलें आहे ? अशा प्रकारची अदूरदृष्टि बहुतेकांची असते. शिवाय एकमेकांच्या मतानें काम चालविण्याचें वळणच नसल्यानें जो तो भागीदार व्यवस्थेंत व व्यवहारांत आपल्या मताप्रमाणें ढवळाढवळ व अफरातफर करीत असतो. इत्यादि कारणांवरून भागीदारांत लढा उत्पन्न होऊन, कितीतरी भागीनें उभारलेल्या संस्था अल्पायु झाल्या आहेत. हे प्रकार चाणाक्ष अनंताचे पाहण्यांत आले असून, आतां तर ह्या गुजराथी भागीदार फेरीवाल्याचा प्रत्यक्ष अनुभवच त्यास आला. ह्याचा परिणाम त्याच्या मनावर इतका कायमचा झाला कीं, तो पुढें कधींहि त्रयस्थाशीं भागीनें काम करण्यास तयार झाला नाहीं.

पुढें अनंतानें टोप्या विकण्यास सुरुवात केली. ह्या टोप्या दोन आण्यांपासून एक रुपयापर्यंत किंमतीच्या असत व मुंबईतील गुजराथी व पारशी लोकांमध्यें त्यांचा विशेष खप होत असे. ह्या टोप्या पुष्कळ प्रकारच्या व निरनिराळ्या किंमतीच्या असल्यामुळें, विकणाराच्या कुशलतेमुळें त्यांत चांगली किफायत होत असे. अनंताच्या मिठास भाषणानें गिऱ्हाईक तेव्हांच वश होई व त्यामुळें त्याला ह्या लहानशा धंद्यांत लवकरच चांगला फायदा होऊं लागला. पुढें पुढें तर कधीं कधीं दहा वीस रुपयांपर्यंत नित्य फायदा होत असे. अनंत मूळचाच निर्व्यसनी व काटकसरी असल्यामुळें

हळूहळू त्याजपाशीं बराच पैसा शिल्लक पडूं लागला; व त्यामुळें त्याला आतां असें वाटूं लागलें कीं, टोप्या तयार करण्याचें काम जर आपणास आलें तर याहिपेक्षां अधिक फायदा आपल्या पदरांत पडेल. विचार मनांत आल्याबरोबर तो अमलांत आणण्याची तयारी त्यानें चालविली. फेरी सांभाळून स्वतः टोप्या तयार करण्याचें काम शिकण्यास त्यानें प्रारंभ केला, व फार दिवस न लावतां ती कला त्यानें अवगत करून घेतली.

अनंतास यावेळीं एक मोठी ठोकर बसली. टोप्या बनवून विकावयाचा व्यापार करण्याचें त्यानें ठरविलें व व्यापार लवकर भरभराटीस येण्यास भांडवलाची अवश्यकता असते, ही गोष्ट त्याच्या नजरेस आली. मुंबईस आल्यापासून त्यास निरंतर सारखें यश येऊं लागल्यामुळें त्याची उमेद वाढूं लागली व आपल्या घराण्याचें गतवैभव प्राप्त करून घेण्याची महत्वाकांक्षा बळावत चालली. धाडस व साहस तर त्याच्या हाडींमासीं खिळलेलींच होतीं. ह्या सर्व गोष्टींचा मिलाफ झाल्यामुळें त्याचें ज्वानींतलें रक्त उसळलें, व त्यानें एखादें मक्त्याचें काम पतकरून लवकर धनसंचय करण्याचा बेत केला; व जवळ जी थोडीबहुत शिल्लक जमली होती ती गुंतवून, शिवडीस खाणींतून दगड काढून पुरविण्याचें सरकारी कंत्राट ( मक्ता ) त्यानें एका ओळखीच्या गृहस्थाच्या वशिल्यानें मिळविलें. या कामाचा आपणास अनुभव नाहीं, त्यांत आपणास सर्वस्वी परस्वाधीन राहावें लागेल, वगैरे सारख्या त्याच्या नेहमींच्या सावधगिरीस सुचणाऱ्या गोष्टी, उपरिनिर्दिष्ट कारणांनीं त्याच्या मनानें उचल घेतल्यावरून, त्याचे लक्षांत न आल्यामुळें त्यानें ही उडी मारली व त्यास त्यांत चांगलीच ठोकर बसली. पण आम्हांस वाटतें कीं झालें हें बरें झालें. कारण अनंतास आलेल्या अनुवावरून धडा घेण्याची सवई असल्यामुळें सर्वस्वी परस्वाधीन, अज्ञात व अनुभव नसलेल्या धंद्यांत, अथवा

केवळ संभवावर अवलंबून असणाऱ्या सट्ट्यांत न उतरण्याबद्दल त्यानें कानास खडा लावून घेतला; व तो आपला निश्चय पुढें कोट्यधीश झाल्या-वरसुद्धां पूर्णपणें पाळला. ह्यासंबंधींचा एक दाखला पुढें पाहण्यांत आला तो असा. सन १९१९ सालीं सोन्याचा भाव फार उतरत चालला होता. त्यावेळीं भाऊसाहेबांजवळ रोकड शिल्लक कित्येक लाख होती. हा उतरलेला भाव टिकणार नाहीं व वाढेल तेव्हां फारच वाढेल अशी त्यांची पक्की खात्री होती. आपण बऱ्याचशा रक-मेचें सोनें घेऊन ठेवावें असें त्यांच्या मनांत येऊन, ते त्याप्रमाणें व्यवस्था करण्याच्या बेतांत होते. इतक्यांत त्यांना खाणीच्या बाबतींत घडलेल्या अद्दलीची व त्यावेळीं असल्या सट्ट्यांत कधीं न पडण्याच्या आपण केलेल्या प्रतिज्ञेची आठवण होऊन व मोह आवरून धरून, त्यांनीं सोनें खरेदी कर-ण्याचा बेत रद्द केला व निश्चय कायम राखिला. असो.


खाणीचें काम नियमित वेळांत आटोपलें पाहिजे, व खाणीवर काम करणारे बेलदार, धोंडफोडे, मजूर वगैरे लोक कधींहि आगाऊ पैसे घेतल्याशिवाय कामास लागत नाहींत. यामुळें पुढील नफ्याच्या आशे-वर अनंतानें जवळ असलेला बहुतेक पैसा मजूर लोकांस आरंभीं कांहीं दिवस वांटून टाकिला. मजूरांनीं कांहीं दिवस उल्हासानें काम केल्या-सारखें दाखवून, पुढील कामाचा पैसा हातीं आल्याबरोबर एक दिवस यःपलायन केलें. हातीं घेतलेलें काम अपुरें राहून कंत्राट अनंताच्या अंगावर आलें. जास्त पैसा जवळ नसल्यामुळें नवीन कामगार लोक लावून मुदतींत काम संपवून देणें अशक्य झालें. मालकाकडून काम संपवून देण्याचा तगादा लागला. अशा वेळीं कोणाचेंहि साहाय्य मिळेना. एकूण प्रसंग आणीबाणीचा होता. नवीन भांडवल उभारे तों अनंताला कांहीं दिवस अज्ञातवासांत काढावे लागले. पुढें लवकरच त्याचे एक आप्त रा० **बाबासाहेब वायंगणकर** या नांवाचे गृहस्थ त्यास भेटल, त्यांनीं सरकारांत चौकशी करून,

थोडासा वशिला लावून व अनंताच्या वतीनें तोट्याची रकम भरून त्याची या त्रासापासून सुटका केली.

येथें आमच्या चरित्रनायकाच्या सूक्ष्म निरीक्षणाचा व जिज्ञासेचा एक दाखला देण्यासारखा आहे. कोणतीहि नजरेखालून जाणारी गोष्ट चौकस बुद्धीनें पाहण्याची त्यास सवई होती; मग त्यापासून त्यास तुर्त फायदा असो व नसो. तेणेंकरून ज्ञानांत भर पडे व तें ज्ञान कधींकाळीं उपयोगीं पडत असे. मक्तेदार या नात्यानें खाणीचे दगड पुरविण्याचें काम जरी त्यानें तात्पुरतें घेतलें होतें, तरी दगड फोडावयाचा कसा, घडावयाचा कसा, व इमारतींत बसवावयाचा कसा, तसेंच दगडांतील व्यंगें अव्यगें या संबंधींची त्यानें तपशीलवार माहिती करून घेतली होती. तिचा उपयोग त्यानें पुढें कैक वर्षांनंतर स्वतःच्या इमारती बांधते वेळीं केला, व कारागिरांच्या कामांतील चुका एखाद्या अनुभवी इंजिनीयराप्रमाणें दाखविल्या. असो.

कंत्राटाच्या भानगडींतून मुक्त झाल्यावर अनंतानें पुनः फेरीवाल्याचा धंदा सुरू केला व लवकरच, गेलेल्या भांडवलाइतकी रकम पुनः जमा केली. अनंतास मुंबईंत पुष्कळ पैसे मिळत आहेत असें ऐकून, गांवकी हक्काबद्दल उपस्थित झालेल्या तंट्याच्या खर्चाकरितां, गांवांतील कांहीं लोकांनीं, त्याजकडे पैशाची मागणी केली. परंतु आजपर्यंत हाल सोसून स्वकष्टानें जे थोडेसे पैसे मिळविले त्यांचा उपयोग, उद्योगधंदा पुढें वाढविण्याचे कामीं न करितां गांवकीसारख्या रिकाम्या उठाठेवींत ते खर्चं करणें योग्य नाहीं असें वाटून, अनंतानें या कामीं मदत करण्याचें नाकारिलें व आपलें तनमनधन आपल्या धंद्यांतच घातलें. अशा रीतीनें अनंताची सांपत्तिक स्थिति सुधारत चालली असतां, त्याच्या आप्तेष्ट मंडळींत त्याच्या लग्नाविषयींचीं बोलणीं सुरू झालीं.

मागें सांगितल्याप्रमाणें, कंत्राटाच्या अडचणींत अनंतास मदत करणारे



कै. श्री. सौ. नर्मदाबाई अनंत शिवाजी देसाई.

जन्म ता १९ नवंबर सन १८६२.] [मृत्यु ता. २२ फेब्रुवारी सन १९२०.

B. A. P. Works.

बाबासाहेब वायंगणकर यांच्याशीं अनंताचा पुढें दृढ परिचय झाला व अनंताच्या अंगांतील व्यापारी कौशल्य ओळखून त्यांनीं आपल्या वळणांतील एखादी मुलगी त्याला पाहून देण्याचा विचार केला. देवगड तालुक्यांतील मुणगें गांवचे रहिवासी **यशवंत सखाराम महाजन**[1] यांची मुलगी **चिमाबाई** हिच्याशीं लवकरच त्यांनीं अनंताचा विवाह जुळवून आणला. लग्नांत चिमाबाईचें घरचें नांव सौ० **नर्मदाबाई** असें ठेवण्यांत आलें. लग्नांत तिचें वय सुमारें १२ वर्षांचें होतें. पुढें लवकरच अनंतानें मुंबईस बिऱ्हाड थाटलें; व गृहस्थाश्रमास प्रारंभ केला. आतां अनंत गृहस्थाश्रमी होऊन स्वतंत्र धंद्याचा मालक बनत चालल्यामुळें त्यास पुढील प्रकरणापासून अनंतराव या नांवानें संबोधूं.

१ हें मुणगेकर महाजनांचें घराणेंहि, या ब्राम्हणांची वसाहत तत्प्रांतीं झाल्यानंतर " देसाई कदीम अनादासिध जवीद चार पिढी " या अधिकाराचें होतें असें जुन्या कागदांवरून दिसून येतें. दोन्ही घराण्यांचा हा स्वइच्छेनें घडून आलेला योग शेंकडों वर्षांनीं जुळवून आणण्यांत कालाचें कौशल्य चिंतनीय आहे.

# प्रकरण ८ वें.

# भांडवल.

मागील दोन प्रकरणांत, आमचे चारित्रनायक अनंतराव यांनीं निराश्रित स्थितींत मुंबईस येऊन पोटापाण्यासाठीं आरंभिलेल्या उद्योगाचें वर्णन दिलें. त्यांत यश आल्यावरून त्यांनीं पुढें पाऊल टाकण्याचा बेत करून टोप्या बनवून त्या विकण्याचा व्यापार सुरू केला. याउपर त्यांची खरी कर्तबगारी, कीं जिच्यामुळें त्यांचें नांव मुंबईतील थोर व्यापाऱ्यांत गणलें गेलें आहे ती, दिसून येणार आहे. ह्याचें वर्णन देण्याच्या मार्गाला लागण्यापूर्वीं अनंतरावांची या बाबतींत पूर्वतयारी किती व कशी होती, याचा थोडा विचार केल्यास अप्रस्तुत होणार नाहीं.

अनंतरावांनीं पुढें जो व्यापार व उद्योगधंदा करून लाखों रुपयांच्या उलाढाली केल्या, त्यास निदान सुरुवातीस लागणारें नगदी भांडवल त्यांचेजवळ नव्हतें. त्यांची सर्व भिस्त केवळ आपल्या बुद्धिसामर्थ्यावर होती. गिरणींत नोकरी पतकरल्यानंतर त्यांनीं आपल्या उद्योगानें स्वतःची बढती करून घेतली होती. इतर साधारण मनुष्याप्रमाणेंच जर अनंतरावांची वृत्ति असती तर, दोन वेळ पोटाची भरती करण्याचा भरंवसा नाहीं असे दिवस त्यांनीं काढले असल्यामुळें, त्यांच्या हुशारीनें व उद्योगप्रियतेनें त्यांस गिरणींत वाढत्या प्रमाणावर खात्रीनें मिळणाऱ्या बढतींतच त्यांनीं ऐश्वर्य मानलें असतें; व इतर अल्पसंतुष्टांप्रमाणें अन्य खटपटींच्या भानगडींत न पडतां त्यांनीं आयुष्य कंठलें असतें. परंतु त्यांची महत्वाकांक्षा व तत्सिद्ध्यर्थ कायावाचामनें करून झटण्याचे त्यांच्या अंगीं असणारे गुण हीं त्यांस स्वस्थ बसूं देईनात.

मनुष्याची कर्तबगारी कांहीं अंशीं त्याच्या नैसर्गिक मानसिक गुणांवर व कांहीं अंशीं शिक्षणावर अवलंबून असते. मानसशास्त्री मानसिक गुण व बल यांत भेद मानतात. मानसिक बलांत स्मरणशक्तिविषयक ज्ञान व सवई यांचा समावेश होतो, व ह्या बलाचा संचय मनुष्य आपल्या नैसर्गिक मानसिक गुणांच्या मदतीनें करीत असतो. हें मानसिक बल नैसर्गिक किंवा आनुवंशिक नसतें, तर तें शिक्षण, सराव व अनुभव यांनीं प्राप्त करून घ्यावयाचें असतें.

अनंतरावांस पुस्तकी विद्येचा अथवा सन्मित्रांच्या सदुपदेशाचा लाभ झाला नाहीं. तेव्हां त्यांची सर्व मदार आपल्या मानसिक गुणांवरच होती; व त्यांच्याच मदतीनें त्यांनीं मानसिक बल कमाविलें होतें. बाळपणीं झारापीच्या दुकानांत असतांना व पुढें गिरणींत काम करीत व फेरी करीत असतां, प्रत्येक लहानमोठ्या कामांतील तपशीलाकडे बारकाईनें नजर ठेऊन, आपल्या स्मरणशक्तीस ते चांगलीच कसरत देत असत; व हाच क्रम पुढें चालू ठेविल्यामुळें त्यांची स्मरणशक्ति इतकी दांडगी झाली होती कीं, आपल्या व्यवसायांतील अगदीं बारीकसारीक गोष्टी देखील वर्षानुवर्षें त्यांच्या स्मरणांत असत. त्यांनीं स्वतःच्या नजरेखालीं कैक वर्षांपूर्वीं बांधलेल्या इमारतींतील लांकूडकामाचें माप ते हल्लीं बिनचूक सांगत असत. त्यांच्या तीव्र जिज्ञासेमुळें, कितीहि क्षुल्लक का बाबत असेना, तत्संबंधी ते खडान्खडा माहिती करून घेत असत. कारण, त्यांचें म्हणणें असे कीं, जरी या माहितीचा उपयोग आज न झाला तरी न जाणों पुढें केव्हां तरी तिचा उपयोग होईल. कालिदासानें हेंच तत्व आपल्या शाकुंतल नाटकाच्या सहाव्या अंकांत कंचुकीच्या तोंडून वदविलें आहे. तें असें कीं, ही जी काठी तरुणपणीं आपल्या अधिकाराचें चिन्ह म्हणून मी घेऊन फिरत होतों, तीच काठी आतां वृद्धपणीं चालण्याच्या कामांत मला उपयुक्त झाली आहे. आमच्या ओळखीच्या एका गृहस्थानें लहानपणीं श्रीमंतींत

असतां छायाचित्रकलेचें ज्ञान सहज करमणूकीखातर अवगत करून घेतलें होतें. पुढें मोठेपणीं एकाएकीं श्रीमंती जाऊन वाईट दिवस आल्यावर, त्यानें त्याच कलेच्या ज्ञानावर, एक मोठा कारखाना उभारला आहे. ज्ञान ही शक्ति आहे अशी इंग्रजींत एक म्हण आहे.

गिरणींत काम करीत असतां इतर कामगारांप्रमाणें केवळ आपल्या कामाचीच माहिती करून घेऊन अनंतराव तृप्त न राहतां, त्यावेळीं यंत्रांची माहिती करून घेऊन, त्यांच्या भागांची जुळवाजुळव व त्यामुळें त्यांस मिळणारें विशिष्ट प्रकारचें चलन या सर्व गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन करून तें ज्ञान ते आपल्या स्मरणशक्तीच्या बटव्यांत सांठवून ठेवीत. वास्तविक ह्या वेळेस त्यांस त्यांच्या भावी कारखान्याचें स्वप्नसुद्धां पडलें नव्हतें. तथापि ही केवळ जिज्ञासाबुद्धीनें त्या वेळीं मिळविलेली माहिती त्यांनीं पुढें आपल्या कारखान्यांत परिणामकारक रीतीनें उपयोगांत आणिली, हें ओघानें पुढें दिसून येईलच.

दीर्घोद्योगाची सवई त्यांनीं बाळपणापासूनच लावून घेतली होती. सतत कांहीं ना कांहीं उपयुक्त कामांत अथवा विचारांत ते नेहमीं मग्न असत. चार मंडळींत चकाट्या पिटीत बसणें अथवा पत्ते झोडणें त्यांस पसंत नसे. अंगमेहनतीचीं कामें करीत राहून त्यांनीं स्वतःचें शरीर काटक बनविलें होतें.

ह्या सर्व कमाविलेल्या मानसिक बलास त्यांच्या नैसर्गिक गुणांची जोड मिळाली होती. धाडशीपणा, करारी बाणा व हातीं घेतलेलें काम कोणत्याहि अडचणीस न जुमानतां शेवटास नेण्याची चिकाटी, हे गुण त्यांच्यांत ओतप्रोत भरलेले होते. ते चतुर व धोरणी होते. व्यापाराची सर्व भिस्त गिऱ्हाईकांचें चित्त आकर्षण करण्यावर असते, ही गोष्ट त्यांनीं बाळपणींच ताडली होती. स्वयंस्फूर्तीनेंच दुकानाची मांडणी चित्ताकर्षक करून, मालाची सफाई ठेऊन व गिऱ्हाइकांशीं देवघेव प्रामाणिकपणें करून,

गोड भाषणानें व तंबाकूच्या पुडीच्या आमिषानें त्यांनीं [redacted] मनें आपल्याकडे ओढून घेतलीं होतीं.

तेव्हां एकंदरींत अनंतरावांचें भांडवल नगदी नसून, मानसिक गुण व बल ह्यांचें बनलें होतें, असें म्हणावें लागतें. एवढें मात्र खरें कीं, अपुऱ्या नगदी भांडवलामुळें अडचण येऊं नये म्हणून त्यांनीं रोकड्या व्यवहाराचा उद्योग व व्यापार पतकरला होता, व आपल्या नेहमींच्या सावध वृत्तीस अनुसरून आरंभ फारच लहान प्रमाणावर केला होता. शिडीच्या एका पायरीवर पाय नीट ठरल्यावर वरची पायरी गांठावयाची, असें त्यांचें नेहमीचें धोरण असे. ह्याशिवाय उद्योगांत व्यत्यय येऊं नये म्हणून ते स्वतःची राहणी अगदीं साधी ठेऊन, घरखर्चांत शक्य ती काटकसर करीत असत.

ग्रं. क्र. २२७८

## प्रकरण ९ वें.

# स्वतंत्र व्यापार.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें अनंतरावांनीं दोन पैसे शिलकेस टाकिले व लग्न करून ते गृहिणीसह मुंबईत राहूं लागले. निरालस्य पूर्णपणें अंगीं बाणलें असल्यामुळें, फेरी करीत असतां फावल्या वेळेचा सदुपयोग करून टोप्या बनविण्याची कला त्यांनीं अवगत करून घेतली, हेंहि मागें सांगितलेंच आहे. स्वतःस टोप्या बनवितां येऊं लागल्यावर त्यांनीं विचार केला कीं, दुसऱ्यानें बनविलेल्या टोप्या आपण फक्त विकण्यापेक्षां त्या स्वतः बनवून विकल्यानें घडणावळीचा फायदा पदरांत पडेल, व कारखानदार व दुकानदार म्हणून आपला दर्जा वाढून चार माणसांचें पोट भरल्याचें श्रेय आपणास घडेल. त्यांच्याजवळ असलेली शिल्लक जरी विशेष नव्हती तरी मागल्या प्रकरणांत वर्णिलेले मानसिक गुण व बल यांच्या जोरावर त्यांचा आत्मविश्वास दृढ झाला होता. तेव्हां त्यांनीं सन १८७५ सालीं जवेरी बाजारांत खाराकुव्यानजीक एक लहानसें दुकान भाड्यानें घेऊन, तेथें टोप्या बनविण्याचा कारखाना काढला व विकण्याचें दुकान घातलें. एथून त्यांच्या व्यापारास व उद्योगधंद्यास खरी सुरवात झाली.

व्यापारांत अगर धंद्यांत यश संपादण्यास चार गोष्टींची अवश्यकता असते. ( १ ) पक्का सारासार विचार, ( २ ) व्यवहारज्ञान व व्यवहारनीतिमत्ता, ( ३ ) भांडवल व ( ४ ) व्यापारी करामत, शिक्षण व वळण, ह्या त्या चार गोष्टी होत.

सारासार विचार करण्याची शक्ति सर्वांस सारखी नसते. पुष्कळ उच्च दर्जाचे व्यापारी व कलाविषयक शिक्षण संपादन केलेले लोक यांत सुद्धां सारासार विचारशक्तीचा अभाव दिसून येतो. व्यापारांत अथवा उद्योगधंद्यांत पडणाऱ्या गृहस्थांत चातुर्य व आत्मविश्वास कायम राखून सावधगिरी, मनुष्याची पारख, संबंध येणाऱ्या मनुष्याच्या मनांतील इंगित ताडण्याचें सामर्थ्य, प्रसंगावधान, स्वीकारलेलें धोरण अथवा कल्पना चुकीच्या ठरल्यास बिनहट्टानें ताबडतोब त्या सोडून देण्याची तयारी, औदार्य, गुणग्राह्यता वगैरे गुण असावे लागतात.

व्यापाऱ्यानें काय अथवा कारखानदारानें काय, नीतिमत्ता फार सांभाळली पाहिजे. त्याची अब्रू व पत यांवर त्याचें यश सर्वस्वी अवलंबून असतें. कोत्या नजरेनें मालांत अथवा सौद्यांत दगलबाजी केल्यानें तात्पुरता कदाचित् जास्त फायदा होईल. पण एकदा का त्याची लबाडी उघडकीस आली—व असें होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं—तर त्याची अब्रू जाऊन त्यास पुनः डोकें वर करतां यावयाचें नाहीं. व्यापाऱ्यानें देवघेवींत आपली पत तळहातावरील फोडाप्रमाणें सांभाळली पाहिजे. लोकांचें देणें वेळेवर त्यांस पोंचलें नाहीं तर त्या व्यापाऱ्याची पत राहणार नाहीं. त्याचप्रमाणें उग्राणी वेळच्या वेळीं झाली पाहिजे. तसें न झाल्यास कुबेराचें भांडवलसुद्धां व्यापार-उद्योग-धंद्यांत पुरें पडणार नाहीं.

ज्या धंद्यांत अथवा व्यापारांत उतरावयाचें त्याची खडान्खडा माहिती अगोदर करून घेतली पाहिजे. ही माहिती मिळविण्याचे दोन मार्ग आहेत. एक पुस्तकी ज्ञान व दुसरा अनुभव. ह्या दोन्ही मार्गांनीं जे जातील ते सदर कामास जास्त लायक ठरतील. धंदे व व्यापारी शिक्षण यांचा उत्तम गुरु म्हटला तर अनुभव हा होय. उमेदवारीनें अथवा अन्य तऱ्हेनें आधीं अनुभव घ्यावा व मग त्यांत स्वतंत्रपणें पडावें हा सर्वोत्तम मार्ग.

वर वर्णन केलेल्या चार गोष्टी व्यापार अथवा उद्योगधंद्यांत पडणाऱ्या

होतकरूंस अवश्य लागतात, असें ह्या विषयांतील तज्ज्ञांचें मत आहे. या चारांपैकीं शेवटली—म्हणजे उच्च प्रतीचें व्यापारी व कलाविषयक शिक्षण—प्राप्त करून घेण्यास दुर्दैवानें अनंतरावांस संधि मिळाली नाहीं. तसेंच उमेद्वारीनें प्रत्यक्ष अनुभव मिळविण्याचें त्यांस बनलें नाहीं. सूक्ष्म निरीक्षणाच्या सवईनें फेरींत अथवा अन्य स्थळीं अवलोकनांत आलेल्या बाबींचें आपल्या मनाशीं गुणदोषविवेचन करून, उपजत सारासार विचारशक्तीनें बिनचूक काढलेले निष्कर्ष, यांवर त्यांचा सर्व आधार होता. भांडवल मात्र अपुरें होतें, परंतु त्याची जागा त्यांच्या धाडशी स्वभावानें व आत्मविश्वासानें भरून काढली होती. खाणीच्या प्रकरणांत ठेंच लागल्यावरून त्यांची साहसी वृत्ति मावळून तिचें पर्यवसान मर्यादित धाडसांत झालें होतें. म्हणूनच त्यांनीं उद्योगास सुरुवात अगदीं लहान प्रमाणावर केली होती. त्यांच्या आयुष्यक्रमाचें धोरणच असें होतें. दूरदृष्टि पोंचवून सर्व बाजूंनीं विचार केल्यावर एका पायरीवर पाय ठेवावयाचा व तेथें तो स्थिरावल्यावर वरची पायरी गांठावयाची. देवघेवीचा व्यवहार चोख ठेवण्यांत त्यांनीं विशेष सावधगिरी बाळगली होती. तो पुरा करण्यास ते कोणत्या योजना करीत गेले याचा उल्लेख पुढें यथाप्रसंगीं देण्यांत येईलच. सारांश, तज्ज्ञांच्या मताप्रमाणें जरूर असणाऱ्या भांडवल व उच्चप्रतीचें शिक्षण या दोन गोष्टींखेरीज इतर सर्व गुण अनंतरावांत होते.

टोप्या बनविण्याचा कारखाना व विकण्याचें दुकान त्यांनीं अल्प प्रमाणावर थाटलें. कारखान्यांत त्यांनीं माणसें ठेवतांना बरीच बुद्धि वापरली, व असल्या व्यवसायांत प्रामुख्यानें लागणारा ‘ मनुष्यपारखीचा गुण ’ निदर्शनास आणिला. सुरुवातीचा उद्योग असल्यामुळें कामास लागणारीं माणसें विश्वासांतील असून अंगचोर नसावींत, म्हणून त्यांनीं कोंकणांतीलच आपल्या परिचयाचे चार पांच इसम आणले. मालवणी लोकांची काटकपणाबद्दल ख्याति असून, अंगमेहनतीस ते कचरणारे

नव्हत. उद्योगधंद्यांत पडणाऱ्या गृहस्थास आपली कला अवगत असावयास पाहिजे. अनंतरावांचीहि तयारी तशीच होती. टोप्या बनविण्याचें काम ते स्वतः शिकले होते. मालकास आपला उद्योगधंदा स्वतः करितां येणें किती जरुरीचें आहे, हें एका लहानशा दाखल्यावरून उघड दिसून येईल. पुष्कळ तरुण मंडळींनीं अलीकडे दरजीखाने ( टेलरिंग एस्टॅब्लिशमेंट्स् ) काढले आहेत, पण स्वतः तें काम हातानें करण्यास शिकण्याची पर्वा त्यांनीं केली नाहीं. त्यामुळें त्यांस बेतणारा मिस्त्री याचेवर अवलंबून राहणें भाग पडतें, व या मिस्त्र्याच्या गैरहजिरीच्या अथवा रुसव्याफुगव्याच्या ओढाताणीनें त्यांचें पावलोपावलीं नडतें. आपल्या नूतन कारखान्यासाठीं निवडलेल्या इसमांस अनंतरावांनीं स्वतः शिकविलें; व ते इसमहि चलाख व कुशल असल्यामुळें लवकर शिकून तरबेज झाले. अनंतरावांची ही निवड योग्य होती हें अनुभवानें सिद्ध झालें आहे.

हाताखालीं माणसें वावरत होतीं, तथापि अनंतराव स्वतः शेट बनून लोडाशीं टेकून स्वस्थ बसले नाहींत. तेहि स्वतः कारखान्यांत टोप्या शिवीत बसत; मतलब हा कीं, त्यामुळें एक तर तयार टोप्यांत भर पडावी व दुसरें असें कीं, त्यामुळें कारागीरांस टंगळमंगळ करतां न येऊन ईर्षेनें काम भराभर करण्यास हुरूप यावा.

आपणाजवळ भांडवल कमती आहे ही गोष्ट रात्रंदिवस डोळ्यांसमोर ठेऊन मालांत गुंतलेल्या पैशाचें, हरतऱ्हेनें लवकर विक्री करून, रोकडींत रूपांतर करण्यांत ते सदा तत्पर असत. ह्यासाठीं फावल्या वेळीं एका नोकराच्या डोकीवर टोप्यांची पाटी देऊन ते फेरी करण्यास निघत. वृथाभिमान त्यांस कधीं शिवला नाहीं, त्यामुळें कारखानदार व दुकानदार झाल्यावरहि फेरी करण्यांत त्यांस कमीपणा वाटत नसे. रिकामें बसून वेळ फुकट दवडण्यास त्यांचें मन कधींहि घेत नसे, व वाटेल तितकी मेहनत करण्यास त्यांची नेहमीं तयारी असे. अशा प्रकारें त्यांनीं दुकानाचा जम चांगला बसाविला.

असा क्रम सुमारें दोन वर्षें चालल्यावर दुकानाचा व कारखान्याचा पसारा वाढला. त्यामुळें अनंतरावांस सर्व ठिकाणीं सारखें पोंचण्यास अवघड पडूं लागलें. कामानिमित्त वरचेवर दुकान सोडून बाहेर जावें लागे, तेव्हां आपल्या गैरहजिरींत कारखान्यावर नजर ठेवणारा व गिऱ्हाईक सांभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा जबाबदार मनुष्य ठेवण्याची जरूरी त्यांस भासूं लागली. एखादा पगारी कारभारी ठेवावा तर त्याची आस्था विशेष असण्याचा संभव नाहीं. मागील गुजराथी फेरीवाल्याच्या कटु अनुभवावरून पूर्वग्रहांकित झाल्यामुळें, भांडवल वाढविण्याच्या दृष्टीनेंहि एखादा तिऱ्हाईत भांडवलवाला भागीदार त्यांस नको होता. तेव्हां एखाद्या हुशार, लायक व ओळखीच्या मनुष्यास पगार देऊन, त्याच्यांत आपलेपणा येण्यास प्राप्तीपैकीं कांहीं ठराविक भाग, कमिशन अथवा बोनस (मोबदला अथवा बक्षीस) यांच्या रूपानें देण्याचा ठराव करून नोकरीस ठेवावा, असें त्यांस वाटूं लागलें. तशांतूनहि तो इसम जवळचा व जिव्हाळ्याचा नातलग मिळाल्यास सर्वोत्तम. असा आपल्या मनांत निर्णय करीत असतां त्यांची नजर आपले वडील बंधु **रघुनाथराव** ह्यांच्याकडे सहज वळली.

रघुनाथराव वालावलीहून सुमारें सन १८६४ सालीं, अनंतरावांच्या मागून तीन वर्षांनीं, मुंबईस नोकरीकरितां आले होते. मुंबईत आल्यावर अनंतरावांप्रमाणें त्यांनींहि परळ येथील नरसी केशवजीच्या गिरणींत नोकरी धरली होती. तेथें त्यांनीं कांहीं वर्षें नोकरी केली व स्वतःचा खर्च चालवून कांहीं पैसे शिल्लक टाकले. नंतर त्यांनीं गिरणींतील नोकरी सोडून भुलेश्वराजवळ कुंभारतुकड्यांत स्वतःचें टोप्यांचें दुकान उघडलें. पुढें सन १८७६ च्या अखेरीस ते अनंतरावांस येऊन मिळाले. ह्या उभयबंधूंचें भागीचें दुकान सुरू झालें त्या वेळीं, माल व सामानसुमान मिळून रघुनाथरावांचे सुमारें ५०० रुपये व अनंतरावांचे सुमारें १०००, मिळून दीड हजार रुपयांच्या भांडवलावर ही भागी स्थापन करण्यांत

आली होती. भागीदार न घेण्याचा झालेला निश्चय अनंतरावांस रघुनाथरावांच्या बाबतींत मोडावा लागला. त्यांस जरूर होती ती आपल्याप्रमाणें आपल्या कामांत आपलेपणा मनांत धरून हित बघणाऱ्या मनुष्याची. व असा मनुष्य सहोदर बंधूपेक्षां जास्त श्रेष्ठ कोठून मिळणार ? शिवाय रघुनाथरावहि त्याच धंद्यांतले वाकबगार होते. ह्या सर्व विचारांनीं अनंतरावांस आपल्या बंधूस बरोबरीच्या नात्यानें भागींत घेण्यास उद्युक्त केलें. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें असतां रघुनाथरावांचें भांडवल निमें होतें, परंतु तिकडे लक्ष न देतां अनंतरावांनीं बंधुत्वाचें नातें स्मरून दिलदारपणानें आपसांत सारखी म्हणजे निमेनिम भागी ठरविली.

मालाची खरेदी व विक्री करण्यांत अनंतरावांची कुशलता असे, तर टोप्या बनविण्याचे कामीं रघुनाथरावांचा हातखंडा असे. एकाची उणीव दुसऱ्यानें भरून काढल्यामुळें त्यांचें दुकान लवकरच भरभराटीस आलें. दुकानांत जरी आठ दहा नोकर वावरत होते, तरी हे दोघेहि बंधु जातीनें मेहनत करीत व योग्य देखरेख ठेवीत असत. त्यामुळें दुकानाचें काम फार चांगल्या रीतीनें चालूं लागलें.

रघुनाथरावांस भागींत घेतलें खरें, पण ही भागी चार वर्षांवर टिकली नाहीं. एखाद्या तिऱ्हाईत हस्तकाच्या हलगर्जीपणामुळें किंवा अप्रामाणिकपणामुळें नूतन धंद्यास कदाचित् धोका येईल तो टाळण्याकरितां भागींत न जाण्याचा निश्चय पूर्वीं केलेला असूनहि, केवळ श्रमविभागणीच्या तत्वावर अनंतरावांनीं रघुनाथरावांस बरोबरीच्या नात्यानें भागींत घेतलें व त्यामुळें त्यांस बाहेरचें काम उरकण्यास येत असलेली अडचण दूर झाली. रघुनाथराव आपल्या हस्तकौशल्यामुळें व कळकळीनें सर्व कारभारावर प्रामाणिकपणें नजर ठेवीत असल्यामुळें पुष्कळच उपयोगीं पडत होते. अनंतरावांनीं बंधुत्वाचें नातें स्मरून रघुनाथरावांस सारखा भाग दिल्यामुळें दुकानाच्या कारभारांत रघुनाथरावांस बरोबरीचा अधिकार प्राप्त झाला

होता. परंतु दोघां बंधूंच्या स्वभावांत व धोरणांत फार फरक असल्यामुळें सारें बिघडलें. रघुनाथराव बिचारे अल्पसंतुष्ट व घिम्मे असल्यामुळें धाडस करण्यास अगदीं माघार घेत, तर अनंतराव महत्वाकांक्षी असल्यामुळें, धंद्याच्या प्रगतीकरितां व्यापारी धोरणास इष्ट असें आटोक्यांतील धाडस करण्यास कचरत नसत. मालाचा उठाव झपाट्यानें होऊं लागल्यामुळें त्यांस मालाची व सामानाची खरेदीहि जास्त प्रमाणावर करावी लागली, व ही खरेदी घाऊक व मोठ्या प्रमाणावर केल्यास जास्त फायदा होतो म्हणून अनंतराव कधीं कधीं खरेदी ऐपतीबाहेर करीत असत. असली जोखीम रघुनाथरावांस नको होती. त्यामुळें दोघां भावांत मतभेद पडून त्यांचें दुकानांत पटेनासें झालें. आपण आंखून ठेवलेला उन्नतीचा मार्ग साध्य गतीनें क्रमण करण्यास ही रघुनाथरावांची व्यापारी धोरणाविरुद्ध, भ्याड स्वभावाची खेंचलगाम अनंतरावांस दुःसह होऊं लागली. उगाच तंटा माजून होणारा गृहकलह टाळावा अशा पोक्त समजुतीनें या दोघां बंधूंनीं सन १८८० च्या मे महिन्यांत आपल्या भागीच्या व्यवहाराचा हिशेब करून ती मोडली. त्यावेळेस रघुनाथरावांचे वांट्यास रुपये ३२६२ आले व अनंतरावांचे वांट्यास रुपये ४१५६ आले. रघुनाथरावांस देण्याची रकम जर एकदम देऊन टाकली तर अनंतरावांस भांडवलाची अडचण पडणार होती. म्हणून ती रकम अनंतरावांनीं हप्त्यानें देण्याचें ठरविलें. त्यास रघुनाथरावहि आपल्या भावाच्या उत्कर्षांत आडकाठी न आणतां कबूल झाले. हप्ता थकल्यास अनंतरावांनीं दरसाल दर शेंकडा ५ टक्क्यांच्या दरानें व्याज देण्याचें ठरवून रकमेची भरपाई करण्याचा करार केला.

याप्रमाणें दोघां भावांत आपखुषीनें व समजुतीनें कराररमदार होऊन, दुकानाच्या भागींतून रघुनाथरावांनीं आपलें अंग काढलें; परंतु पुनः वेगळें दुकान काढण्याचे भरीस न पडतां याच दुकानांत ते ठराविक वेतनावर

नोकरीस राहिले. रघुनाथरावांनीं सुमारें चार वर्षें नोकरी करून व झालेलें प्राप्ति घेऊन आपल्या गांवीं प्रयाण केलें व तेथें मग ते कायमचेच राहिले.

भागीदारीचा व्यवहार बंद झाल्यावर कारभाराचा सर्व बोजा एकट्या अनंतरावांच्या शिरावर आला. जसजसें काम जास्त पडूं लागलें, तसतशी त्यांची काम करण्याची शक्ति दुणावून हुरूप वाढत गेला. जोखीम वाढत्या प्रमाणावर अंगावर घेऊन ती पार पाडण्यास त्यांचें धैर्य दुणावत चाललें. आधींच तजवीज करीत राहून, देवघेवीचा व्यवहार वेळेवर चोख सांभाळून त्यांनीं बाजारांत आपली पत वाढविली. व्यापारी धोरण व सारासारविचारशक्ति पूर्णपणें त्यांच्या अंगीं असल्यामुळें त्यांचा व्यापार फार झपाट्यानें तेजीस येऊं लागला. कामाचा पसारा वाढल्यामुळें कारागीर, कारकून, नोकरचाकर वगैरे बरेच ठेवावे लागले. अनंतराव मनुष्याची लायकी पाहून त्याप्रमाणें त्यास काम सांगत. विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, कामास लागणाऱ्या माणसांत ते खोटी काटकसर कधींहि करीत नसत. त्यांचें नेहमीं म्हणणें असे कीं, जास्त माणसें लागणारें काम कमी माणसांकडून करवून घेण्याची अपेक्षा कधींहि करूं नये. तसेंच भिन्न तऱ्हेचीं जबाबदारीचीं कामें एकाच माणसावर सोंपवूं नयेत. कारण त्यामुळें घोंटाळा होऊन काम बिघडतें. बाहेरच्या फिरत्या कामाकरितां वेगळीं माणसें व आंतल्या कामाकरितां खातेवारी वेगळीं माणसें त्यांनीं नेमलेलीं असत, व त्यांवर देखरेख ठेवण्यास हुशार व खात्रीचे अंमलदार असत. अशा रीतीनें आपल्या दुकानाची व कारखान्याची व्यवस्था लावून ते प्रत्येक खात्यावर नेहमीं स्वतःची करडी नजर ठेवीत असत व त्यामुळें काम सारखें सुसंगत चाले.

आतां अनंतरावांची मुंबईच्या प्रमुख व्यापाऱ्यांत गणना होऊं लागली. सर्व लहानथोर लोक त्यांना '**भाऊसाहेब**' या नांवानें संबोधूं

लागले; व आपणहि आतां यापुढें त्यांचा उल्लेख भाऊसाहेब या नांवानेंच करूं. मुंबई शहरांतील भाऊसाहेबांच्या बरोबरीचे जे पारशी, गुजराथी मुसलमान, वगैरे धनाढ्य व्यापारी होते ते त्यांना, एखाद्यानें कोणताहि नवीन धंदा हातीं घेऊन त्यांत यश मिळविलें ह्मणजे त्या धंद्याच्या पुढें ' वाला ' हा शब्द लावून त्याचें नांव घेण्याच्या आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून, आदरपूर्वक " **टोपीवाले** " असें ह्मणूं लागले व ह्या अभिधानाचा भाऊसाहेबांसहि मोठा अभिमान वाटत असे.

व्यापारी व कारखानदार यांच्यांत कल्पकता नसली तर त्यांचा व्यापार–उद्दीम ऊर्जितावस्थेस येणें अवघड होतें. आपल्या कल्पकतेच्या जोरावर मालांत नवीन नवीन तऱ्हा घुसवून त्यांचा पगडा जनरुचीवर बसविण्यांतच उद्‌मी व्यापाऱ्याचें खरें चातुर्य असतें. या बाबतींत आमचा हिंदुस्थान फार मागें आहे. एखादा माल दोनशें वर्षांपूर्वीं निघत होता तोच माल तसाच आमचे कारागीर करीत राहतील. विलायतेंतील वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. आज शिवण्याचें यंत्र काढलें, तर पुढच्या वर्षीं त्यांत कांहींतरी सुधारणा करून तें बाजारांत पाठवावयाचें. आज कपड्याची एक तऱ्हा ( फॅशन ) तर उद्यां दुसरीच दिसून यावयाची.

वरील धोरण भाऊसाहेबांनीं आपल्या कारखान्यांत अंमलांत आणलें होतें, व तदनुरूप ते टोप्यांत फेरफार करीत असत. शिवाय बाजारांत कोणत्या प्रकारच्या मालाचा खप जास्त होईल यावर त्यांचें लक्ष असे. जरीच्या टोप्या दक्षिणी व गुजराथी लोकांत वापरण्यांत येत असत व मुसलमानांत तर त्यांचा खप विशेष असे. परंतु या टोप्या भारी किंमतीच्या असल्यामुळें त्या विकत घेणें साधारण लोकांच्या आटोक्याबाहेर होई, व हौस असूनहि त्यांस त्या घेतां येत नसत. तेव्हां त्यांची हौस तर पुरी व्हावी व आपल्या मालाच्या खपाचें क्षेत्रहि गोरगरीबापर्यंत जाऊन

पोंचावें या हेतूनें भाऊसाहेबांनीं एक नवीनच शक्कल काढली. विलायतेंतून मुद्दाम आपल्यासाठीं त्यांनीं असल्या टोप्यांचें भरतकाम करण्याकरितां लागणारी तार, टिकल्या वगैरे सामान दिसण्यांत हुबेहुब खऱ्या जरीच्या प्रमाणें बनवून मागविलें, व असल्या सामानाचें—ज्यास कोरा माल ( झीग, कंगणी, टिकल्या इत्यादि ) म्हणतात त्याचें—भरतकाम करून, स्वस्त टोप्या बनविल्या व त्या मालाचा खप भाऊसाहेबांच्या अंदाजाप्रमाणें गोरगरीब लोकांत जारीनें झाला. या प्रकारचा माल आज जो बाजारांत दिसतो त्याचे कल्पक व उत्पादक भाऊसाहेब होत, हें सांगण्यास आम्हांस मोठा अभिमान वाटतो.

वर सांगितल्याप्रमाणें सन १८८० सालीं भाऊसाहेबांनीं मोतीबाजारांत टोप्यांचें स्वतंत्र दुकान काढून, तें लवकरच आपल्या दीर्घोद्योगानें, व्यवहारचातुर्यानें व कल्पनाकौशल्यानें फारच चांगल्या स्वरूपास आणिलें; व टोप्यांच्या वापराचा व व्यापाराचा विस्तार महाराष्ट्रांत जसजसा होऊं लागला, तसतसें यांच्या टोप्यांच्या विक्रीचें प्रमाण वाढत चाललें. चार वर्षांत टोप्यांच्या व्यापाराला स्थैर्य आल्यावर, सन १८८४ सालीं भाऊसाहेबांनीं जर्मन सिल्व्हरच्या व्यापाराकडे आपली दृष्टि वळविली. आरंभीं त्यांनीं जुन्या दुकानासमोर हल्लीं त्यांचें मालकीचें दुकान आहे त्यांतील जागा भाड्यानें घेऊन, जर्मन सिल्व्हरचा पत्रा व तार विकण्यास आरंभ केला.

तार विकतां विकतां त्यांनीं आपल्या प्रगमनशील धोरणास अनुसरून आपल्या सुपीक मेंदूंतून एक नवीनच कल्पना काढली. गरीब लोकांच्या बायकांस दागिन्यांची आवड व हौस असतेच. परंतु ती, सोन्याच्या तर नाहींच पण, चांदीच्या दागिन्यांनींहि पुरविण्यास बापड्यांस सामर्थ्य नसतें. तेव्हां आपण विकीत असलेल्या जर्मन सिल्व्हरच्या तारेच्या बांगड्या, गोट, मासोळ्या, वगैरे दागिने भाऊसाहेबांनीं बाजारांतील सोनाराजवळून प्रथम घडवून घेऊन विकण्यास ठेविले; व ते या गरीब बायकांस

फार पसंत पडून त्यांचा खप मोठ्या प्रमाणावर होऊं लागला. पुढें बांगड्या व गोट भाऊसाहेब आपल्या कारखान्यांत बनवूं लागले.

त्यानंतर भाऊसाहेबांनीं पाऊल पुढें टाकून, जर्मन सिल्व्हरचीं भांडीं विकण्याचें ठरविलें; व त्यासाठीं त्यांनीं विलायतेंतून भांडीं मागवून तीं आपल्या दुकानांत विक्रीस ठेविलीं. परंतु ज्याप्रमाणें टोप्या स्वतः बनवून विकावयाच्या, त्याचप्रमाणें जर्मन सिल्व्हरचीं भांडींहि घडवून विकण्याचें त्यांच्या मनांत आलें. तथापि त्यांच्या नेहमींच्या सावध वृत्तीमुळें, त्यांनीं ह्या मालाचा खप आपल्या देशांत कसा काय होतो हें अगोदर अजमाविण्याचें ठरविलें. सरकारी व व्यापारी रिपोर्टांवरून त्यांस ही माहिती मिळवितां आली असती, परंतु तसें करण्याच्या नादीं न लागतां त्यांनीं आपला मुख्य गुरु जो प्रत्यक्ष अनुभव त्याचीच कास धरली. एकदां अनुभवांतीं मालाच्या खपासंबंधीं खात्री झाली, कीं मग धाडस करून कारखाना काढण्यास भाऊसाहेब कचरणारे नव्हते. शिवाय आपल्या देशांत लहानमोठे यंत्रसामुग्रीनें चालणारे कारखाने निघून आपल्या लोकांची पोटापाण्याची सोई व्हावी अशी त्यांची नेहमीं इच्छा असे, व त्या इच्छेनुरूप त्यांचे यथामति यथाशक्ति प्रयत्न चालू असत; व ते दुसऱ्यांसहि त्याप्रमाणें करण्यास उपदेश करीत असत. असो.

या भांड्यांचा खप जारीनें होऊं लागून लांबलांबच्या ठिकाणाहून मागण्या येऊं लागल्या, परंतु मालाचा पुरवठा व्हावा तसा होत नसे. खऱ्या व्यापारी बाण्याच्या पुरुषाचें लक्ष मालाची मागणी पुरी पाडण्याकडे विशेष असतें. माल पुरवतां आला नाहीं तर व्यापाऱ्याचा बाजारांत बोज राहत नाहीं. मालाच्या उठावासंबंधीं खात्रीचा प्रत्यक्ष अनुभव मिळवावयाचा होता तो त्यांस मिळाला. तेव्हां असा वरचेवर मालाचा तुटवडा पडूं लागला तर आपल्या व्यापारास धोका येईल, हें जाणून भाऊसाहेबांनीं परदेशांतून पत्रा मागवून भांडीं येथेंच बनविण्याचा कारखाना सुरू केला.

---

## प्रकरण १० वें.

# भांड्यांचा कारखाना.

टोप्या बनविण्याचा कारखाना काढतेवेळीं भाऊसाहेबांची असलेली आर्थिक ओढगस्त स्थिति आतां राहिली नव्हती. आतां त्यांच्या जवळ पत, पैसा व इस्टेट ( स्थावर मिळकत ) असून शिवाय चालू व्यापारापासून बरीच आवक होत होती. त्यामुळें त्यांना भांड्यांचा कारखाना मोठ्या प्रमाणावर उघडतां आला असता. शिवाय आतां व्यापारी वर्गांत त्यांच्या पुष्कळ ओळखी झाल्या होत्या, त्यांतून एखादा खात्रीचा इसम निवडून भागीदार घेतला असता तर भांडवलांत भर पडून स्वतःस पडणारे श्रमहि कांहीं प्रमाणानें वांचले असते; व जबाबदारीचा बोजाहि थोडासा हलका झाला असता. परंतु भाऊसाहेबांनीं तसें कांहीं करण्याचें मनांतसुद्धां आणलें नाहीं. मागल्या कटु अनुभवावरून भागीदारीच्या संबंधांत त्यांचें मन बिघडलें होतें, तें कायमचें तसेंच राहिलें. आपल्या व्यापारी वर्गांत नीतिमत्ता फार खालच्या दर्जाची आहे, हें त्यांनीं पूर्वीं बांधलेलें अनुमान फिरविण्यास पुढें हजारों लोकांशीं झालेल्या व्यवहारांत त्यांस सबळ कारण मिळालें नाहीं.

भागीदारीचें तत्व असें आहे कीं, एकानें केलेल्या व्यवहारास दुसरा जबाबदार असतो. करितां भागीदार एकमेकांच्या संमतीनें चालले तर ठीक. पण आपल्या लोकांस खरें व्यापारी शिक्षण न मिळाल्यामुळें अथवा त्यांस तें वळण न लागल्यामुळें, सहसा तसें होत नाहीं. जो तो आपणाकडे पूर्ण मालकीचे हक्क ओढून घेऊन व्यवहार करतो, व तो व्यवहार

दुसऱ्यांस जाचतो. एकाची वृत्ति शर्यतीच्या घोड्याप्रमाणें चलाख असते, तर दुसऱ्याची मुंगीच्या पावलालाहि लाजविते. एक मेहनती व कष्टाळू असतो, तर दुसरा ऐदी व फुकटखाऊ निघतो. याशिवाय नैतिक दोष असतात ते वेगळेच. सारांश, एकदिलानें व संमतीनें वागणारे भरंवशाचे भागीदार मिळणें कठिण असल्यामुळें, भाऊसाहेब भागीदार पाहण्याचे भानगडींत पडले नाहींत. कष्टांस ते डरणारे नव्हते. पाहिजे तेवढी मेहनत करण्यास त्यांची तयारी असे. आत्मविश्वास दांडगा असल्यामुळें, स्वतःच्या अक्कलहुशारीनें सर्व कांहीं करावयाचें हा त्यांचा कायम स्वभाव बनला होता. मात्र त्यांनीं आपली नेहमींची सावध वृत्ति येथेंहि अंमलांत आणली होती. अनुभवाची कांस सोडावयाची नाहीं व आरंभ लहान प्रमाणावर करून पुढें अनुभवांतीं जसजसें यश मिळत जाईल तसतसें वाढवीत जावयाचें हें धोरण त्यांनीं यावेळीं सोडलें नाहीं. टोप्यांचा कारखाना व तत्संबंधी क्रयविक्रयपद्धति त्यांनीं भक्कम पायावर बसविली असल्यामुळें त्या शाखेकडे आतां त्यांस इतकें बारकाईनें लक्ष देण्याचें कारण नव्हतें. म्हणून त्यांस या नव्या उद्योगांत मन घालण्यास पुष्कळ अवसर मिळाला.

उपरिनिर्दिष्ट कारणांवरून भाऊसाहेबांनीं आपल्या स्वतःच्या मालकीचा भांड्यांचा कारखाना ल्यामिंग्टन रोडवर असलेल्या आपल्याच एका चाळींत अल्प प्रमाणावर सन १९०१ सालीं उभारिला. त्याची उभारणी व रचना करण्यांत त्यांनीं कोणत्याहि तज्ज्ञाची सल्ला घेतली नाहीं. पूर्वी गिरणींत नोकरी करीत असतां, आपल्या जिज्ञासु व चिकित्सक स्वभावास अनुसरून यंत्रांची जोडणी, मांडणी व त्यांचें चलन-वलन ह्यांचें सूक्ष्म अवलोकन त्यांनीं करून ठेविलें होतेंच. पुढें भांड्यांचा व्यापार करीत असतां त्यांस भायखळ्यावरील एका पितळेच्या कारखान्यांत कामासंबंधानें जावें यावें लागत असे. तेथेंहि यंत्रसामग्री, तिची जुळवाजुळव, उपकरणें वगैरेची

माहिती तपशीलवार करून घेऊन ती आपल्या स्मरणवहींत त्यांनीं टिपून ठेविली होती. यामुळें त्या नव्या उद्योगास ते अगदीं नवखे नसून त्यांची तज्ज्ञाप्रमाणेंच जवळजवळ तयारी होती.

अथपासून इतीपर्यंत सर्व यंत्रसामुग्री, साहित्य वगैरेची यादी त्यांनीं तयार करून आपल्या ओळखीच्या आफिसामार्फत ती मागविली, व तिची जुळवाजुळव स्वतःच्या नजरेखालीं करून घेतली. प्रथम सर्व यंत्रें हातानें चालविण्याचीं होतीं, परंतु लवकरच त्यांनीं आपल्या कारखान्यास तेलाचें इंजिन जोडून त्यास यांत्रिक शक्तीचें साहाय्य दिलें. यंत्रांची मांडणी त्यांनीं एखाद्या अनुभवी इंजिनीयराप्रमाणें केली. पत्रा कापण्यापासून तों भांडें पालिस ( जिल्हई ) करून निघण्यापर्यंतच्या क्रियांस लागणारीं यंत्रें त्यांनीं क्रमवार रचलीं व इंजिनाची शक्ति फुकट न जाईल अशा बेतानें दांडे, पट्टे व कण्प्या यांची योजना केली. पुढें तेलाच्या इंजिनाऐवजीं त्यांनीं कारखान्यास विद्युत् शक्ति जोडली व आज मितीस तो कारखाना विद्युत् शक्तीनेंच चालला आहे.

कारखाना आरंभीं एका चाळींत स्थापिला होता. पुढें काम वाढत गेल्यामुळें, त्यांनीं त्याच चाळीसमोर आपल्या मालकीच्या खुल्या जागेंत कारखान्याकरितां स्वतंत्र बैठी इमारत बांधली, व त्यांत लेटाचे व पालिशच्या कामाचे संचे मांडून नवीन मोठमोठालीं यंत्रें उभारलीं. चाळींतील यंत्रें व या कारखान्यांतील यंत्रें यांच्या शाफ्टिंगची ( चलन देणारे दांडे, पट्टे व कण्प्या यांची ) जुळवाजुळव, इंजिनावर फाजील ताण पडूं नये अशा बेतानें, अगदीं तज्ज्ञाप्रमाणे भाऊसाहेबांनीं केली. संचे व शाफ्टिंगच्या कण्प्या, दांडे वगैरे हालूं नयेत म्हणून संचे खडीच्या पायांत गाडून भक्कम केले आहेत व त्यांचे भाग व शाफ्टिंग बरोबर सपाटींत बसविण्याची खबरदारी घेण्यांत आली आहे. कित्येक मोठ्या गिरण्यांतहि याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें, पट्ट्यांस व कण्प्यांस हिसके बसल्यानें

इंजिनाच्या शक्तीस अवरोध होतो व यंत्रें लवकर बिघडतात, हें आम्ही स्वतः पाहिलें आहे.

भाऊसाहेब कोठें यंत्रकला शिकण्यास गेले नव्हते. तथापि त्यांची नैसर्गिक चाणाक्ष बुद्धि, त्यांस एखाद्या गोष्टींतलें न्यून ओळखून काढण्याच्या कामीं कशी पोषक होत असे, ह्याचें एक उदाहरण त्यांच्याच कारखान्यांत घडलें. त्यांनीं पत्रा दाबून काढण्याचें एक मोठें यंत्र आणलें. तें त्यांच्या सांगण्याप्रमाणें बसविण्यांत आलें. परंतु पत्रा काढतांना तो फाटूं लागला. त्याचें कारण त्यांच्या कारखान्यांतील इंजिनीयर मिस्त्री यांच्या लक्षांत येईना. पुढें भाऊसाहेब कारखान्यांत तपासणीला आले, त्या वेळेस त्यांचे कानावर ही गोष्ट घालण्यांत आली. त्यांनीं आपल्या समक्ष तें यंत्र चालविण्यास सांगितलें व तें चालत असतां त्याच्या प्रत्येक भागाकडे लक्षपूर्वक पाहिल्यावर, त्यांतील एक भाग नीट सपाटींत बसला नव्हता व त्यामुळें पत्र्यावर सारखा दाब पडत नव्हता हें त्यांच्या लक्षांत आलें; व तो भाग सारखा करून घेतल्यावर तें यंत्र नीट काम देऊं लागलें. त्यांचे मदतनीस तें यंत्र रद्द ठरविण्याचे बेतांत होते. तपशीलाकडे बारकाईनें लक्ष देण्याच्या सवाईचा हा परिणाम होय. असो.

कामास लागणाऱ्या उपकरणांचा पुरवठा त्यांनीं यथास्थित केला होता. हातोड्याचें काम दांड्यानें करणें व पातळीचें काम चाकूनें भागविणें असला प्रकार भाऊसाहेबांस पसंत नसे. अशानें कांहीं काटकसर न होतां कामास विलंब लागून तें बिघडण्याचा संभव असतो; शिवाय माल व मजुरी फुकट जाते ती वेगळीच. तेव्हां प्रत्येक कामास लागणाऱ्या सर्व वस्तु—हत्यारें, संचे, उपकरणीं वगैरे—कामगारास हव्या तशा व तितक्या पुरविण्यांत येत असत.

कारखान्यांत आरंभीं जर्मन सिल्व्हरचीं ठराविक भांडीं तयार करण्यांत येऊं लागलीं. पत्रा विलायतेंतून मागवून त्याचीं येथें यंत्रसाहा-

त्यानें भांडीं बनविण्यांत येऊं लागलीं. ठराविक आकार व आकृति यांचीं भांडीं बनवून भाऊसाहेब स्वस्थ राहिले नाहींत. तर त्यांनीं कारखान्यांत लहान मोठे तऱ्हेतऱ्हेचे सांचे आपल्या हुशार मेस्त्र्याजवळून करवून घेऊन हिंदु रिवाजांप्रमाणें स्वयंपाक, पाणी वगैरेंस लागणारीं व इतर सर्व प्रकारचीं भांडीं आस्ते आस्ते बाहेर आणलीं. त्यामुळें बाजारांत यांच्या कारखान्यांतून वेळोवेळीं कांहींतरी नवीन धर्तीचा माल दिसूं लागे.

भाऊसाहेबांनीं हा कारखाना काढला त्यावेळेस तसल्या प्रकारचा मुंबईत तो नवाच होता. तथापि एकानें एक उद्योग आरंभिला कीं, त्याची नक्कल करून त्याच मार्गानें जाणारे मग पुष्कळ भराभर बाहेर येतात. परंतु आपल्या कामांत कल्पकतेच्या जोरावर कांहीं नाविन्य आणणारे फारच थोडे असतात. त्यामुळें स्पर्धेत त्यांचा टिकाव न लागून ते भरभराटीस येत नाहींत. भाऊसाहेबांनीं टोप्यांचा कारखाना काढला त्या वेळेस तो जरी नवीन नव्हता, तरी हल्लींच्यासारखा सार्वत्रिक झाला नव्हता. पण पुढें एकापाठीमागून एक टोप्यांचे कारखाने निघाले, तरी ते भाऊसाहेबांशीं स्पर्धा करूं शकले नाहींत. कारण एक तर भाऊसाहेबांचें मोठ्या प्रमाणावर व बाजाराची नाडी पाहून माल खरेदी करून ठेवण्याचें व्यापारी धोरण व कारखान्यांतील शिस्तवार व टापटिपीची व्यवस्था, व दुसरें मालाच्या निपजेंत प्रागतिक धोरणावर केलेल्या नवीन नवीन तऱ्हा. तोच प्रकार ह्या भांड्यांच्या कारखान्यांतहि झाला.

भाऊसाहेबांचें मन कामांत प्रगतीपर सुधारणा घडवून आणण्याच्या विचारांत सतत गढलेलें असे. जर्मन सिल्व्हरच्या भांड्यांस सफाईदार गिलिट करण्याची कृति त्यांस माहीत नव्हती. सबंध मुंबई शहरांत त्या वेळीं ती फक्त एका मुसलमानासच माहीत होती. त्याला वळविण्याचा भाऊसाहेबांनीं पुष्कळ प्रयत्न केला, पण आपली खुबी तो त्यांचे स्वाधीन करण्यास कांहीं केल्या कबूल होईना. आतां काय करावें हा भाऊ-

साहेबांस मोठा प्रश्न पडला. बाबत तर आपल्या धंद्यास अत्यवश्यक व तो मनुष्य तर सरळ बक्षिस वगैरेच्या मार्गानें वळत नाहीं. परंतु एवढ्यावरच भाऊसाहेब हताश होऊन स्वस्थ बसणारे नव्हते. हरप्रयत्नांनीं ती कृति साध्य करून घेण्याचा त्यांनीं निश्चय केला, व तत्प्रीत्यर्थ निराळीच युक्ति त्यांनीं काढिली. धंद्यांतील गुपित समजून घेण्याचे जे अनेक उपाय आहेत, त्यांतलाच तो एक असल्यामुळें त्याविषयीं येथें विशेष विस्तारपूर्वक लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. मात्र, भाऊसाहेबांनीं शेवटीं जो उपाय योजला तो एखाद्या अट्टल गुप्त पोलिसास देखील शोभण्यासारखा असून, त्या उपायानें त्या मुसलमानाची ती " गुप्तविद्या " त्यांनीं शेवटीं हस्तगत केली, येवढें सांगणें जरूर आहे.

कारखान्यांत प्रारंभीं जर्मन सिल्व्हरचीं भांडीं निघूं लागलीं व नंतर तांबें व पितळ यांचीं भांडीं तयार करण्यांत येऊं लागलीं. मोठ्या आकाराचीं भांडीं काढण्याकरितां भाऊसाहेबांनीं आपणासाठीं खास एक प्रेस तयार करवून मागविला, व त्यावर हंडे, तपेल्या यांसारखीं मोठीं भांडीं बनवूं लागले.

आपल्या हिंदी समाजांत स्वयंपाक-पाण्याला तांब्यापितळेचीं भांडीं वापरण्यांत येतात. परंतु या भांड्यांला विषारी कीट येतो म्हणून कल्हईची दगदग वरचेवर करावी लागते. शिवाय तीं भांडीं जाड असल्यामुळें लवकर तापत नाहींत व वजनालाहि भारी होतात. या अडचणी आल्युमिनीमच्या भांड्यानें दूर होतात; व तीं भांडीं अगदीं हलकीं असल्यामुळें प्रवासाचे कामाला तर फारच उपयोगी पडतात. गुणांत ॲल्युमिनीमचें व कांचेचें अथवा एनॅमेलचें भांडें सारखेंच असतें. त्यामुळें कोणतेंहि पेय ठेवण्यास ॲल्युमिनिमचे प्याले, वाट्या, कळश्या, लोटे, बरण्या वगैरे, टिकाऊपणाच्या दृष्टीनें, कांच अथवा एनॅमेल यांच्यापेक्षां जास्त फायदेशीर ठरतात. तांब्यापितळेचीं भांडीं भंगल्यास जवळजवळ अर्धी किंमत येते म्हणून फायदेशीर वाटण्याचा संभव आहे. परंतु कल्हईचा, व तो



श्रीमंत रा. रा. नारायणराव अनंत देसाई.

B. A. P. Works.

सुद्धां अलीकडील चलाखीच्या सफाईदार कल्हईचा, खर्च लक्षांत घेतला तर भंगल्यावर येणारी किंमत कोठच्या कोठेंच निघून जाते. असो.

सदरहू गोष्टी लक्षांत आणून भाऊसाहेबांनीं आपल्या कारखान्यांत ॲल्युमिनीमचीं भांडीं करण्यास सुरवात केली; व त्या भांड्यांचा फैलाव त्यांच्या अनुमानाप्रमाणें मोठ्या प्रमाणावर झाला. चांदी-सोन्याचासुद्धां माल व पत्रा या कारखान्यांत तयार होऊन बाजारांत पुरविला जाऊं लागला. भाऊसाहेबांच्या ह्या कारखान्याचें वैशिष्ट्य त्यांनीं काढलेले हातांतले गोट व बांगड्या यांत होतें. यासाठीं त्यांनीं यंत्राची जुळवाजुळव स्वतः आपल्या साहाय्यकांच्या मदतीनें योजिली होती. त्यांच्या कारखान्याचें अनुकरण करून पाठीमागून इतरांनीं त्या प्रकारचे कारखाने काढिले, तथापि या कारखान्याचा विशेष जो गोट व बांगड्या बनविणें तो कोणास साधला नाहीं. भाऊसाहेबांच्या या व पूर्वोल्लेखित प्रघातान्वयें मालाच्या निपजींत वेळोवेळीं घडवून आणलेल्या नव्या तऱ्हांमुळें ह्या कारखान्याचें अग्रस्थान कायम राहिलें.

कामाची पद्धत श्रमविभागणीच्या तत्वावर करण्यांत आली होती. आपल्या येथील जुन्या पद्धतींत पत्रा कापण्यापासून तों नग घडवून तयार करण्यापर्यंतचें काम एकच इसम करीत असतो. त्यामुळें पुष्कळ वेळ फुकट मोडून मालाची पैदास कमी होत असते. शिवाय एकाच विशिष्ट कामांत सावलेला मनुष्य त्या कामांत निष्णात होऊन तें तो जितकें जलद व सफाईदार करूं शकतो, तितकें हरकाम्याच्या हातून होणें शक्य नाहीं. म्हणून भाऊसाहेबांनीं प्रेस, चरक, पॉलिश वगैरे निरनिराळ्या खात्यांत निरनिराळीं माणसें लावून दिलीं होतीं. प्रत्येक खात्यावर एकेक हुशार अनुभवी व जबाबदार अंमलदार ठेविला होता. कच्च्या मालासाठीं वेगळी वखार असून तयार मालासाठीं वेगळी वखार असे व त्यांत सर्व माल वर्गवारीनें लावलेला असे.

ह्या कारखान्यावर भाऊसाहेबांनीं आपले चिरंजीव श्री. **नारायणराव** यांस प्रमुख नेमून त्यांस यंत्रसामुग्रीवर विशेष लक्ष देण्याची ताकीद

दिली होती. हें काम श्री. नारायणरावांकडे सोंपविण्याकरितां त्यांस तसें शिक्षण प्रथम देण्यांत आलें होतें. भाऊसाहेबांच्या वडिलांनीं त्यांच्या अंगच्या गुणांची परीक्षा करूनच आपल्या मुलांतून भाऊसाहेबांस निवडून काढून, मुंबईस जाऊन उद्योग करण्यास मृत्युशय्येवरून आज्ञा केली होती. त्याप्रमाणेंच भाऊसाहेबांनीं श्री. नारायणराव यांचें लक्षण ओळखून, ते यांत्रिक कलां शिकून कारखान्यावर देखरेख ठेवण्याच्या कामास पात्र होतील असें ठरविलें व त्यांचें दुय्यम प्रतीचें इंग्रजी शिक्षण झाल्यावर त्यांस केवळ या शिक्षणाकरितां पोर्ट ट्रस्ट खात्यांत फिटरचे कामांत घातलें. कोणत्याहि कामाची इत्थंभूत सक्रीय माहिती होण्यास त्या कामांतील अगदीं खालच्या पायरीपासून आरंभ करणें इष्ट असतें. **व्हिक्टोरिया महाराणीनीं** आपल्या मुलांससुद्धां क्षात्रविद्येंतील कोणत्या तरी एका शाखेंत अगदीं खालच्या पायरीपासून सुरुवात करावयास लाविलें होतें. **एडवर्ड बादशहा** आरंभीं लढाऊ जहाजावर खलाशाचे कामावर रुजू झाले, तर **ड्यूक ऑफ कनाट** सामान्य सोल्जराप्रमाणें खांद्यावर बंदुक घेऊन परेड करूं लागले. तद्वत्च भाऊसाहेबांच्या आज्ञेवरून श्री. नारायणराव हातांत कानस घेऊन लोखंडी खिळे, स्क्रू, वगैरे घांसूं लागले. अशा प्रकारें यंत्रकलेची चांगली सक्रीय माहिती करून घेऊन व नोकरींतील शिस्तीचें वळण लावून घेऊन, श्री. नारायणराव वडिलांच्या कारखान्यांत पगारदार नोकर या नात्याचें रुजू झाले. कारखान्यांत असतांना भाऊसाहेब घरचें नातें बाजूस ठेऊन केवळ शिस्त सांभाळण्याकरितां श्री. नारायणराव यांस नोकर या नात्यानेंच वागवीत, व कांहीं बिघडलें तर इतर नोकरांप्रमाणेंच श्री. नारायणराव यांची संभावना होत असे. श्री. नारायणरावहि भाऊसाहेबांशीं आज्ञाधारक सेवक याच नात्यानें वागून व आपल्या कामांत तरबेज व तत्पर राहून इतरांस धडा घालून देत व वडिलांनीं आपल्यावर ठेविलेल्या भरंवशास आपण पात्र आहोंत हें आपल्या वर्तनानें दर्शवीत, हें येथें नमूद

करणें जरूर आहे. मुलाच्या मनाचा कल पाहून त्याप्रमाणें त्यास पद्धतशीर शिक्षण देण्याचें हें भाऊसाहेबांचें धोरण व नंतर शिस्त सांभाळण्याकरितां भाऊसाहेबांनीं त्यांच्याशीं ठेवलेली वर्तणूक अनुकरणीय आहे खास. असो.

शिस्त, नेमस्तपणा व टापटीप यांकडे भाऊसाहेबांची करडी नजर असे, हें मागें सांगण्यांत आलें आहेच. त्यामुळें त्यांच्या कारखान्यांत सर्व कांहीं जेथल्या तेथें असावयाचें. कोणत्याहि बाबतींत अव्यवस्था किंवा गोंधळ दिसून यावयाचा नाहीं. कारखाना स्वच्छ ठेवण्याविषयीं त्यांची सक्त ताकीद असे. कच्च्या व पक्क्या मालाचा हिशेब व मोजदाद रोजच्या रोज ठेवण्यांत येत असे.

कारखान्याचें यश भांडवल, अंतर्बाह्य व्यवस्था व कामगार वर्ग ह्यांवर अवलंबून असतें. कारखानदार व कामगारवर्ग यांच्या हितसंबंधाचा लढा आज सर्व जगभर चालू आहे, त्यावरून या बाबतीचा समाधानकारक निकाल अजून लागला नाहीं असें म्हणणें प्राप्त होतें. एवढें मात्र खरें कीं, या प्रश्नावर युरोपांत व अमेरिकेंत बऱ्याच वर्षांपासून उहापोह चालू आहे; व तेथें यासंबंधांत अनेक प्रयोग व योजना करून पाहण्यांत आल्या असल्यामुळें, या बाबतींत तिकडचें पाऊल हिंदुस्थानच्या बरेंच पुढें पडलें आहे.

हिंदी कामगार वर्गाचें श्री. सरकार यांनीं वर्णन केलें आहे, तें असें:— हिंदी कामगार लोक स्वभावतः हुशार असतात व त्यांस कोणत्याहि कला शिकविल्यास त्या ते लवकर ग्रहण करूं शकतात. परंतु त्यांच्यांत कामासंबंधी अनास्था, ऐदीपणा, सफाईदार काम काढण्यांत निष्काळजीपणा, अल्पसंतुष्टतेमुळें ज्ञानांत भर घालून वरची पायरी गांठण्यांत बेपर्वाई वगैरे सारखे दुर्गुण वास करीत असतात. त्यामुळें त्यांच्यावर विशेष देखरेख ठेवावी लागते, याची जाणीव भाऊसाहेबांस होती, म्हणूनच त्याप्रमाणें त्यांनीं व्यवस्था आपल्या कारखान्यांत ठेविली होती. कामगार-

वर्गाची भरती त्यांनीं कोंकणांतील व विशेषेंकरून आपल्या प्रांतांतल्याच मंडळीची केली होती, कारण हा वर्ग मेहनती व काटक असून हुशार असतो हें मागेंच सांगितलें आहे.

वर उल्लेखिलेल्या विलायत व अमेरिका येथील तज्ज्ञांनीं कारखाना यशस्वी होण्यासाठीं कामगार वर्गासंबंधीं उहापोह करून काढलेले निष्कर्ष ठोकळ मानानें पाहूं गेलें असतां तीन दिसतातः– ( १ ) कामगार आपल्या कामांत निष्णात असावा, (२)तो तत्पर व उद्योगी असून आपलें काम आस्थापूर्वक करीत असावा, (३) तो संतुष्ट राहून कारखान्यासंबंधीं त्याचे मनांत आपलेपणा असावा. तज्ज्ञांनीं कामगार निष्णात न होण्याचा व त्याची कामाबद्दल आस्था नसण्याचा दोष मालकांच्या माथ्यावर लादला आहे. ते म्हणतात कीं, बहुतेक मालक कामगार वर्गापासून अलिप्त राहून त्यांच्या कामावरील देखरेख सर्वस्वी पगारदार नोकरांवर सोंपवितात; व हे लोक बहुतकरून अधिकारमदाच्या धुंदींत कामगारांस वाईट रीतीनें वागवितात. त्यांस त्यांच्या कामांतील दोष सहानुभूतिपूर्वक दाखवून ते सुधारण्याचे मार्ग त्यांस न शिकवितां, केवळ परीक्षक बनून रिपोर्ट करण्यांतच गुंग असतात. याचा परिणाम असा होतो कीं, कामगार पगाराच्या तारखेकडे डोळे लावून आपलें काम कसेंबसें उरकीत असतात. वास्तविक पाहतां प्रत्येक कामगारास नोकरीवर रुजू होतांना आशा उत्पन्न झाली पाहिजे कीं, कामांत अक्कलहुशारी व सफाई दाखविल्यास आपली चहा होऊन वरच्या दर्जावर आपली बढती त्याच कारखान्यांत होईल; व असें होण्यास खद्द मालकाची नजर त्यांच्यावर असून मालकांत व कामगारांत प्रत्यक्ष संघटण असलें पाहिजे.

भाऊसाहेबांच्या लक्षांत या सर्व गोष्टी आल्या होत्या, हें त्यांच्या वर्तनावरून दिसून येईल. कारखान्यावर त्यांची रोज फेरी होत असे, त्या वेळीं ते फक्त आफिसांत जाऊन कामावर देखरेख ठेवणाऱ्या वरिष्ठ नोकरांस "प्रधानजी, राज्याचा बंदोबस्त कसा काय आहे ?" असा प्रश्न करून व

इकडच्या तिकडच्या हिशोबी तक्त्यांवर व रिपोर्टांवर सह्या ठोकून, व फार झालें तर एखाद्या खात्यांत वर वर पाहत भरकन् फेरी मारून परत फिरत नसत. तर प्रत्येक खात्यांत फिरून एकेक कामगाराचें काम बारकाईनें पाहत असत व त्याच्याजवळ कांहीं वेळ सलगी दाखवून पुसतपास करीत असत. एखादा कारागीर तसाच हुशार दिसला तर त्यास आपल्या कामांत सुधारणेचे कांहीं मार्ग सुचत असल्यास तेहि विचारीत. कारण स्वतः तपशीलावरच मदार ठेवणारे असल्यामुळें त्यांचें म्हणणें असे कीं, हातानें काम करणाऱ्यास कामांतील खाडाखोड्या जितक्या अवगत असतात, तितक्या त्या वरकांती नजर ठेवणाऱ्यास असत नाहींत. हातानें काम करणाऱ्याचीहि सल्ला व विचार न घेण्यासारखा वृथाभिमान भाऊसाहेबांनीं कधींहि बाळगला नाहीं. कामगाराची सल्ला ग्राह्य वाटल्यास ती ते अंमलांत आणीत असत व त्या कामगारास बढतीच्या अथवा अन्य रूपानें प्रोत्साहन देत. उलटपक्षीं एखादा कामगार सतत कामांत कसर करीत राहिला तर त्यास सुधारण्याची संधि देत, परंतु तो तसाच निर्ढावलेला राहिला तर त्यास कामावरून कमी करीत. या वर्तनक्रमाचा परिणाम कामगार वर्गावर व कारखान्यावर हितकर होत असे. कामगारांच्या नपुण्यांत प्रगति होत राहून कारखान्यांत सुधारणा झपाट्यानें होत असे, व संघटणामुळें धन्याशीं नोकरांची अदबीची सलगी उत्पन्न होऊन नोकरांस आपलें काम आस्थेनें करण्यास उमेद वाटे व ते कामांत तत्पर व उद्युक्त होत असत.

वर उल्लेखिलेल्या तज्ज्ञांचा तिसरा निष्कर्ष म्हणजे मजूरवर्गाचा संतुष्टपणा व त्यांस कारखान्यासंबंधीं वाटण्यास हवा असलेला आपलेपणा. या प्रश्नावर विलायतेंतसुद्धां वाद अद्याप चालू आहे. भांडवलवाले व मजूरपक्ष यांची आपापल्या हितसंबंधांत एकवाक्यता झालेली नाहीं. सबब या प्रश्नांत खोल जाण्याची एथें अवश्यकता नाहीं. तथापि या गोष्टीकडे भाऊसाहेबांचें अगदींच दुर्लक्ष होतें असें नाहीं. कामगारांच्या आरोग्याची ते

काळजी वाहत असत. कारखान्यांत हवा, उजेड चांगलीं असावीं यासाठीं त्यांनीं कारखान्यांत तशी तजवीज केली आहे, व आजूबाजूस पुष्कळशी खुली जागा सोडली आहे. भर वस्तींतल्या भारी किंमतीच्या जागेंत उभारलेल्या इतर कारखान्यांत याच कारणासाठीं याप्रमाणें खुली सोडलेली ऐसपैस जागा क्वचित्च दृष्टीस पडेल. पूर्वी कारखान्यांतील भट्टयांचा शेक तेथील कामगारांस फार लागत असे. हें भाऊसाहेबांच्या लक्षांत येतांच त्यांनीं अवश्य तो फेरफार कारखान्याच्या त्या भागांत व भट्टींत करून कामगारांस जाचणारा शेक कमती करविला.

त्यांनीं नेमलेल्या कामगारांपैकीं बहुसंख्या पगारी पद्धतीवर काम करणारांची आहे व अगदीं अल्पसंख्या अंगावर काम घेऊन करणारांची आहे. तथापि कमाईच्या आशेनें कामगार मानवी सहनशक्तीच्या पलीकडे काम करून आपली प्रकृति बिघडवून घेण्याचा संभव असतो, म्हणून भाऊसाहेब दुसऱ्या पद्धतीस आपल्या कारखान्यांत फारसें उत्तेजन देत नसत. मात्र मालाच्या विशेष मागणीच्या वेळीं जास्त वेळ काम करावेंच लागलें तर, कामगार लोकांस जास्त वेळेच्या प्रमाणानें पगारहि जास्त देत असत.

टोप्यांचा कारखाना त्यांनीं प्रथम लहान प्रमाणावर व अत्यल्प भांडवलावर काढला व तो पुढें वाढवीत मुंबईंत अग्रस्थानाप्रत पोंचविला, हें कृत्य प्रशंसनीय झालेंच. परंतु भाऊसाहेबांसारख्या अनभ्यस्त गृहस्थानें भांड्यांच्या कारखान्यासारखा, व तोहि यांत्रिक साहाय्यानें चालणारा, कारखाना स्वयंस्फूर्तीनें उभारणें, स्वयंप्रेरणेनें त्यांतील शिस्त, पद्धत व व्यवस्था तज्ज्ञांच्या कसोटीस उतरेल अशा प्रकारें लावणें, कारखान्यांत वरचेवर, परिस्थितीकडे लक्ष देऊन, सुधारणा घडवून आणणें, त्यांत नाविन्याची भर करीत राहून तो टिकविणें व त्या उद्योगधंद्यांत अग्रेसरत्व मिळविणें, या सर्व गोष्टी करणाऱ्या मनुष्यास असाधारण बुद्धिसामर्थ्याचा ठरविण्यांत अतिशयोक्ति होईल असें आम्हांस तरी वाटत नाहीं.

---

## प्रकरण ११ वें.

# इतर व्यवहार व स्थावर मिळकत.

भाऊसाहेबांनीं आरंभीं टोप्या बनविण्याचा कारखाना केवळ आत्मविश्वासाच्या बळावर काढला, त्या वेळेस त्या उद्योगास लागणारें नगदी भांडवल त्यांच्यापाशीं अगदीं अपुरें होतें; किंबहुना भांडवल या नांवास शोभेल असें द्रव्य नव्हतेंच म्हटलें तरी चालेल. तथापि कसें झालें तरी उद्योगधंद्यास द्रव्याचा पुरवठा हा केलाच पाहिजे; कारण तो नुसत्या गुणांवर चालणारा नाहीं. गरज पडतांच द्रव्य पुरविण्याची तरतूद करण्यांत दाखविलेल्या अक्कलहुशारीवरूनच तो धंदा करणाऱ्याची परीक्षा होत असते.

पैशाचा पुरवठा करण्यास प्रथमदर्शनीं सुचणारा इलाज म्हणजे कर्ज. कर्ज तरी सहज कोठें मिळत असतें ? तें मिळविण्यास धनकोच्या विश्वासास पात्र करून घ्यावें लागतें; व ही पात्रता वक्तशीर कर्जाची परत-फेड, धंद्यांत मिळवीत गेलेलें यश, स्थावर मिळकत, बाजारांतील पत, नेकीचा कारभार, धंद्यांतलि मालाचा ऐवज, व ऋणकोच्या एकंदरींत मगदुराच्या आंतबाहेर असलेला कर्जाचा बोजा, यांवर अवलंबून असते. कनिष्ठ अथवा श्रेष्ठ व्यापारधंद्यांत पडणाऱ्यांस वेळींप्रसंगीं कर्ज काढण्याची जरूरी लागतेच. त्यांसाठीं त्यांनीं सावध राहून, उपरिनिर्दिष्ट बाबींवर लक्ष ठेऊन, अब्रूची वाढ करीत राहिलें पाहिजे. याचप्रमाणें भाऊसाहेबांनीं पुढें आपला कारभार ठेविला होता.

धंद्याच्या सुरवातीस मात्र वरील गोष्टी भाऊसाहेबांस साध्य नव्हत्या. मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळण्यासारखी त्यांची स्थितिहि नव्हती व आटोक्याबाहेर जाऊन जोखमांत पडण्यास त्यांचें मन घेत नव्हतें. तेव्हां त्यांनीं प्रथम ही अडचण दूर करण्यास मालाच्या झटपट विक्रीवरच भिस्त ठेविली होती, व विक्रीचा व्यवहार बहुतेक रोकडीचा ठेवून उग्राणीवर विशेष दक्षता ठेविली होती. शिवाय स्वतः फेरीवर निघून माल जारीनें खपवित होतेच. चार पांच वर्षांत साधारण पत कमाविल्यामुळें ते कर्जाच्या रूपानें थोडेंबहुत धाडस करूं लागले व त्यांस कर्जाऊ रकम अथवा उधार माल मिळूंहि लागला. तरी वडील बंधूंची भागी सन १८८० सालीं तुटली त्या वेळच्या हिशेबाच्या आंकड्यावरून पाहतां, येथपर्यंतचा त्यांचा कारभार लहान प्रमाणावरच होता, असें ह्मणावें लागतें.

भागी तुटल्यावर मात्र त्यांच्या व्यवहाराचें मान वाढत गेलें; व त्यांस लागणारा पैसा अंशतः पुरा पडण्यास, त्यांनीं सन १८८१ सालीं एक योजना करून ती अंमलांत आणिली. त्यावेळीं शिळा छापावर रंगीत सफाईदार चित्रें नव्या धर्तीवर पुणें येथील चित्रशाळेंत छापून निघूं लागलीं होतीं. हीं चित्रें बहुतेक देवादिकांचीं असून त्यांची तऱ्हा नवीनच होती, त्यामुळें त्यांचा खप मोठ्या प्रमाणावर होऊं लागला होता. शिवाय तो माल टिकाऊ असून दोन दिवस पडून राहिला तरी बिघडण्यासारखा नव्हता. वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन व आपल्याजवळ दुकानांत शिल्लक जागा आहे हें पाहून, भाऊसाहेबांनीं आपल्या टोप्यांच्या धंद्यास तीं चित्रें आणून विकण्याच्या धंद्याची जोड दिली. चित्रांचा खप होऊन दोन पैसे पदरांत पडतात असें पाहून, त्यांनीं आपल्या प्रागतिक स्वभावास अनुसरून चित्रांच्या फ्रेमी बनविण्याचीहि तजवीज केली; त्यामुळें गिऱ्हाइकानें यांच्या दुकानांतच चित्रें घेऊन तीं फ्रेमींत बसवून घेऊन घरीं न्यावीं,

अशी सोई झाली. काम वेळेवर व माफक किंमतीला मिळत असल्यामुळे बाहेरचीं चित्रेंहि यांचेकडे फ्रेमींत बसविण्यास येऊं लागलीं व हाहि धंदा टोप्यांच्या धंद्याप्रमाणें वाढत गेला. पुढें युरोपांतील देवादिकांचीं चित्रें सुद्धां तिकडील व्यापाऱ्यांकडून परस्पर मागवून विकूं लागले. अशा प्रकारें विशेष दगदग न पडतां किफायतशीर आहे असें पाहून आपल्या इतर व्यवसायांस केवळ पोषक म्हणून सुरू केलला चित्रें विकण्याचा हा व्यापार भाऊसाहेबांनीं आपल्या व्यवहारचातुर्यानें वाढवीत नेला.

सुप्रसिद्ध चित्रकार **राजा रविवर्मा** यांनीं मुंबईंत चित्रें छापण्याचा कारखाना काढला होता, व त्यांत त्यांस पैशाची अडचण येऊन पडली. त्यांच्या पदरीं बराच मालाचा सांठा पडून राहिला होता; अशा वेळीं भाऊसाहेबांनीं हिंमत करून तो सर्व माल व्यापारी सवडीनें घेण्याचें ठरविलें. त्यामुळें राजा रविवर्मा हे अडचणींतून मुक्त झाले व भाऊसाहेबांचाहि त्यांत फायदा झाला. हें एकंदर प्रकरण भाऊसाहेबांनीं उभयतांच्या फायद्याच्या दृष्टीनें मिटाविल्यावरून त्या दोघांचा एकमेकांवर लोभ जडला. या पुढील व्यवहारांत कांहीं अडथळे आले होते, ते भाऊसाहेबांनीं बाजूस सारून त्यांच्या जवळून त्यांच्या चित्रांची सोल एजन्सी सन १८९६ सालीं मिळविली.

रविवर्मा प्रेसचे मालक बदलले तेव्हां नव्या मालकाजवळून फिरून १९०५ सालीं कांहीं देवघेवीचा व्यापार करून भाऊसाहेबांनीं ही सोल एजन्सी कायम केली. हीं चित्रें विकत घेणारे लोक सामान्यच असल्यामुळें, चित्रांकडे चित्रकलाभिज्ञांच्या चौकस दृष्टीनें पाहून सरस निरस ठरवून विकत घेणारे फारच थोडे. चित्र साधारण उठावदार व मोहक असून स्वस्त पडलें म्हणजे तें विकत घेणाऱ्याचे मनांत चटकन् भरतें. याप्रमाणें साधारण जनरुची व विकत घेण्याचें सामर्थ्य यांचा बरोबर अंदाज करून, बाजारांत कोणत्या प्रकारच्या मालाचा खप मोठ्या प्रमा-

णावर होईल हें भाऊसाहेबांनीं व्यापारी दृष्टीनें ताडलें; व त्याप्रमाणें प्रेसच्या नव्या मालकास तशा प्रकारचीं चित्रें काढण्याची सल्ला दिली; व ती त्यास पटल्यावरून आपल्या छापखान्यांत तशीं चित्रें तो काढूं लागला. हीं चित्रें विलायतेहून येणाऱ्या चित्रांच्या धरतीवर असून किंमतींत त्यांच्याशीं स्पर्धा करूं शकलीं. त्यामुळें त्यांचा खप जारीनें होऊन भाऊसाहेबांच्या या व्यापारी धोरणामुळें दोघांसहि फायदा होत गेला.

याप्रमाणें हा व्यवहारहि भाऊसाहेबांनीं मोठ्या प्रमाणावर नेऊन, आपल्या मालकीच्या दुकानांत चित्रें विकण्याचें, फ्रेमी बनविण्याचें व फ्रेमी बनविण्यास लागणारें कांच, पट्ट्या वगैरे सामानहि विकण्याचें एक स्वतंत्र खातें निर्माण केलें, व त्याच्या व्यवस्थेस वेगळीं माणसें व त्यावर एक अंमलदार नेमून सर्व व्यवस्था यथायोग्य केली. येथें एक विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्या दुकानांतील चौकटींस लागणारें सामान चित्रांप्रमाणेंच शक्य तितकें देशी बनावटीचें वापरण्यांत येतें.

या चित्रांचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर होत असल्यानें चित्रांवर छापलेल्या भाऊसाहेबांच्या नांवामुळें त्यांच्या प्रसिद्धींत भर पडली. वास्तविक पाहतां, भाऊसाहेबांची मजल या बाबतींत याहिपुढें जावयाची व त्यांनीं चित्रें छापण्याचा छापखानाच काढावयाचा. तसें झालें नाहीं, याबद्दल आश्चर्य वाटतें; किंवा त्यांच्या चारित्र्याचें सूक्ष्म अवलोकन केलें तर, त्यांनीं छापखाना काढला नाहीं हें साहजिकच झालें, असेंहि वाटूं लागतें. कारण असा छापखाना निष्णात अशा चित्रकलापटूवर सर्वस्वी अवलंबून असणार, व हे असले इसम लहरी असतात हें जगप्रसिद्ध आहे. तेव्हां अशा प्रकारें परस्वाधीन राहणें हें भाऊसाहेबांना खाणीच्या अनुभवानंतर केव्हांहि पसंत होण्यासारखें नव्हतें. शिवाय हें विशेष दगदगीचें काम असल्यामुळें तितका त्यांस अवसरहि नव्हता, व शेवटल्या ५–६ वर्षांत तर दम्याच्या व्याधीमुळें त्यांच्यांत पूर्वीप्रमाणें श्रम करण्याची ताकदहि राहिली नव्हती.

आपल्या चालू व्यवहारास पोषक म्हणून भाऊसाहेबांनीं आणखी एक उद्योग सुरू केला. स्वतःस टोप्या बनविण्यास मखमाल व साटिन लागत असे व ती फायद्याकरितां मोठ्या प्रमाणावर ते खरेदी करीत असत. पुढें ते मखमाल, साटिन वगैरे घाऊक विकूं लागले. आस्ते आस्ते नव्या तऱ्हेचे ( फ्याशनचे ) लहान मुलांचे साटिनीचे व मखमालीचे कपडे, लेस वगैरे लावून तयार करून, ते आपल्या दुकानांत विकूं लागले. ह्या खात्यांतूनहि त्यांस चांगली किफायत होऊं लागली.


अशा रीतीनें भाऊसाहेबांनीं मुख्य धंद्यास पोषक पण किफायतशीर अशीं हीं दोन खातीं जोडलीं. कांहीं केलें तरी व्यापाऱ्याच्या अब्रूस मातबरी स्थावर मिळकतीनेंच येते. म्हणूनच मुंबईंत तरी शेंकडा नव्वद जमीनजुमले व्यापारी वर्गाच्या मालकीचे आहेत. मुंबई हें हिंदुस्थानांतील व्यापार व उद्योगधंद्याचें केंद्रस्थान असून येथील व्यवहार वाढत्या मानावर आहेत. सबब मुंबईंतील स्थावर मिळकतीची गणना सुरक्षित भांडवलांत केली जाते; व तिची किंमत उत्तम तारणांत जमा होते. या प्रकरणाच्या आरंभीं म्हटलेंच आहे कीं, व्यापाऱ्यास कधीं कधीं कर्ज काढण्याचा प्रसंग येतोच, व कर्ज देते वेळीं धनकोची दृष्टि ऋणकोच्या स्थावर मिळकतीवरच जास्त भरंवशानें बसते. शिवाय उद्योगधंद्याच्या अनिश्चित स्वरूपाकडे लक्ष जातां, कांहीं रकम अशा सुरक्षित स्वरूपांत गुंतलेली बरी, असेंहि व्यापाऱ्यांस वाटत असतें.

वरील सर्व धोरणांस अनुसरून, भाऊसाहेब सवड होतांच स्थावर मिळकतीच्या मागें लागले. त्यांनीं सन १८८८ च्या सुमारास गिरगांवांत हल्लीं त्यांचा बंगला आहे, त्या जागेवरील स्वतःस राहण्यास एक घर व बाजूची कांहीं जमीन विकत घेतली. त्याच सुमारास त्यांनीं हल्लीं शेख मेमन स्ट्रीटमध्यें त्यांचें दुकान आहे ती इमारत घेतली व पुढें त्याला लागूनच दुसऱ्या दोन जागा घेऊन या मूळच्या जागेस जोडल्या. मागाहून घेत-

लेल्या एका जागेचा दर्शनी भाग बाजूच्या गल्लींत आला असल्यामुळें हा भाग माल चढविण्याउतरविण्यास फारच सोईवार झाला आहे. या तीनाहि जागा एकत्र करून व इमारतींत आपल्या सोईप्रमाणें सुधारणा व फेरफार करून, त्या वाढविल्या. अशा प्रकारें दुकानाची जागा स्वतःच्या मालकीची केल्यानें भाऊसाहेबांची पत वाढली व पुढें मागें त्रयस्थ घरधन्याच्या लहरी स्वभावामुळें, भर बाजारांतील आपलें बस्तान ठीक बसलेली जागा सोडावयास लागून धंद्यांत येणारें नुकसान व ' नवी विटी नवा डाव ' मांडण्याची दगदग यांच्या संभवांतून ते मुक्त झाले. आरंभीं भाड्यानें घेतलेल्या मुख्य दुकानाच्या समोरची जागा अद्याप भाऊसाहेबांनीं आपल्या ताब्यांत भाड्यानें ठेविली आहेच.

एकदां एखाद्या बाबतींत लक्ष घातलें कीं मग भाऊसाहेबांचा " आगे बढो " हा जप चालू राहावयाचा. ते एकीकडून उद्योगधंद्याची वाढ करीत गेले व दुसरीकडून स्थावर मिळकतींत भर घालूं लागले. त्यांनीं बंगल्याच्या बाजूच्या मोकळ्या जागेंत चाळी बांधल्या, लॅमिंगटन रोडवर जागेचे दोन तुकडे ( प्लॉटस ) घेऊन त्यांवर चाळी बांधल्या व कारखाना उभारला व फणसवाडींत लहानशी जागा घेऊन तेथें भांड्यांच्या कारखान्यापैकीं एक लहानसें खातें ठेविलें. हें खातें असें एका बाजूस ठेवण्यास कारण झालें. त्या खात्यांत होणाऱ्या प्रयोगास म्युनिसिपालिटीचें लायसेन्स ( परवाना ) लागतें, व तें लायसेन्स चांगल्या वस्तींत मिळत नाहीं. सबब भाऊसाहेबांस ही एका बाजूस वेगळी जागा घेणें भाग पडलें.

गिरगांव व लॅमिंगटन रोड येथील इमारती भाऊसाहेबांनीं स्वतःच्या देखरेखीखालीं सुतार, गवंडी वगैरे ठेऊन खातेवारी काम करून बांधल्या. या कामांत इंजिनीयरची मदत फक्त म्युनिसीपालिटींतून मंजूरी मिळविण्यापुरतीच घेतली होती. इमारतींस लागणारें सर्व सामान व रकम यांची



भाऊसाहेब टोपीवाले यांचा सँढर्स्ट रोडवरील बंगला.

B. A. P. Works.

तजवीज त्यांनीं कामास सुरुवात करण्यापूर्वींच करून ठेविल्यामुळें, या इमारती झपाट्यानें व अंदाजानें ठरविलेल्या रकमेंत तयार झाल्या.

या इमारती बांधल्या त्या वेळेस मुंबईच्या म्युनिसीपालिटीचे हवाउजेडासंबंधींचे नियम हल्लींप्रमाणें कडक नव्हते. साठ साठ फुटींच्या इमारतीस हवाउजेडासाठीं दोन फुटींची गल्ली पुरी समजली जात असे. त्यामुळें दहा वर्षांपूर्वींच्या मुंबईतील इमारतींत दिवसाढवळ्या दिवे लावून कारभार करावा लागतो; व असल्या घरांतील वस्तीचें आरोग्य बिघडविण्याबद्दल जर कोणास जबाबदार धरावयाचें असेल तर तें ह्या म्युनिसीपालिटीसच. अशी त्या वेळेस घराच्या मालकाच्या दृष्टीनें सवड होती, व त्या सवडीचा लाभ भाऊसाहेबांनीं इतर मालकांप्रमाणें घेतला असता तर तेवढ्याच जागेंत दोन इमारती जास्त झाल्या असत्या. पण त्यांचें पहिल्यापासून हवाउजेडाकडे लक्ष असे, म्हणून त्यांनीं प्रत्येक इमारतीच्या भोंवतीं, मुबलक हवा व उजेड मिळून भाडोत्र्यांस सुख व्हावें म्हणून, आपखुषीनें मोकळ्या जागा सोडल्या आहेत. त्यांच्या सर्व इमारतींत भाडोत्र्यांच्या सोईच्या इतर गोष्टीहि लक्षपूर्वक केलेल्या आहेत.

यानंतर भाऊसाहेबांनीं आपला पहिला राहता बंगला मोडून व त्या जागेंत नव्या घेतलेल्या सँढर्स्ट रोडवरील एका जमिनीच्या तुकड्याची भर घालून, हल्लीं असलेली या रस्त्यावरील मोठी इमारत बांधली, व बाजूची व समोरील इंप्रुव्हमेंट ट्रस्टची जागा घेऊन त्यावर आणखी दुसऱ्या इमारती बांधल्या. पुढें गिरगांव बॅक रोडवरील बदामवाडी नांवाची वाडी आंतील इमारतींसह विकत घेऊन, त्या वाडींतील मोकळ्या जागेंत हवाशीर अशा दोन इमारती बांधण्यास सुरवात केली होती. परंतु दुर्दैवानें त्या पूर्ण झालेल्या त्यांनीं पाहिल्या नाहींत.

इमारतींचे मालक एकदां इमारत बांधून झाली व भाडोत्री येऊन त्यांत राहिले, कीं मग ती स्वच्छ राखून तिच्यांत वेळोवेळीं दुरुस्ती व साफस-

६

फाई करण्याकडे फारसें लक्ष देत नाहींत. परंतु भाऊसाहेबांनीं आपल्या सर्व इमारती झाडलोट करून साफ ठेवण्यास नोकर ठेवले होते व दुरुस्ती-साठीं पगारदार मेस्त्रीहि कायमचा ठेविला होता. सारांश भाडोत्र्यांच्या सुखसोईकडे भाऊसाहेब पूर्ण लक्ष देत असत, त्यामुळें, व या इमारतींत आरोग्यदायक हवा व उजेड मुबलक असल्यामुळेंहि, त्यांच्या जागेकरितां भाडोत्र्यांच्या उड्या पडत.

प्लेगच्या सुरवातीपासून मुंबापुरस्थांचें लक्ष जवळपासच्या खेड्यापाड्यां-कडे ओढले गेलें, व ज्यांस म्हणून सवड होती त्यांनीं तेथील जागा विकत घेऊन, निदान प्लेगच्या दिवसांत तरी राहण्यासाठीं लहानमोठे बंगले बांधले. भाऊसाहेबांनींहि गोरेगांवांत आरंभीं एक जागा घेतली, व पुढें त्या जागेंत शेंकडों एकर जागेची भरती केली. मुंबईच्या जागा व इमारती उत्पन्नाचें कलम होत, परंतु या बाहेरच्या जागेंतून तशा उत्प-न्नाची अपेक्षा करणें शक्य नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां, भाऊसाहेबां-सारख्या व्यापारी धोरणाच्या गृहस्थानें इतक्या मोठ्या प्रमाणावर गोरे-गांवांतील जागेंत पैसा कां अडकविला, हा एक प्रश्न येतो.

पांचसहा वर्षांपूर्वीं भाऊसाहेबांनीं गोरेगांवच्या पूर्वेस एका बाजूस असलेली सुमारें ७०–७५ एकर पडीत जमीन घेण्याचा विचार केला. त्या वेळेस त्यांनीं आमचें मत घेतलें होतें. वीसपंचवीस वर्षांतहि वस-विण्याच्या कामीं ती जागा निरुपयोगी असल्यामुळें, किंवा त्यांत चांगली शेतीवाडीहि होण्यासारखी नसल्यामुळें, आम्हीं विरुद्ध मत दिलें, व भाऊसाहेबांस त्यांचें लक्ष असल्या जागेकडे कां गेलें म्हणून आश्चर्यानें विचारलें; तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, " अलीकडे माझ्या मनांत जमि-नीची आवड उत्पन्न झाली आहे, मग नफा असो वा नसो, व माझ्या-जवळील गुरांची संख्या फार वाढली आहे. गुरें कमी करण्यास माझें मन घेत नाहीं, तेव्हां या जमिनीचें दुसरें कांहीं न झालें तरी, त्या बिचाऱ्या

गुरांस चरण्यास कुरण तर होईल ?" असें उत्तर देऊन त्यांनीं ती जागा विकत घेतलीच. वरील उत्तरावरून दोन गोष्टी उघड होतात. एकतर, भाऊसाहेबांचे पूर्वज राज्यकर्ते व जमीनीच्या विस्तीर्ण प्रदेशाचे मालक होते, यामुळें आनुवंशिकतेनें उतरलेली जमीनदारीची हौस व दुसरी अगदीं जवळची, म्हणजे वडील शेती करीत होते, यामुळें त्यांच्या मनांत असलेली शेतीभातीची आवड, या दोहोंचीं सूक्ष्म बीजें पूर्वीच्या व्यापार-उद्योगधंद्याच्या धांदलींत अनुद्भूत राहिलीं होतीं त्यांस, आतां समृद्धावस्था प्राप्त झाल्यावर, अंकुर फुटूं लागले; व त्यामुळें त्यांचें मन जमीनी घेणें व शेतीवाडी करणें या दोन्ही गोष्टींकडे ओढ घेऊं लागलें.

गोरेगांवाप्रमाणेंच कोंकणांत वालावलीसहि भाऊसाहेबांनीं बरीच जमीन खरेदी केली होती. ते खरीद जमीन तशीच पडीत ठेवित नसत. त्यांत पाण्याचा पुरवठा करून आंब्याचीं कलमें, इतर झाडें, किंवा सुवासिक फुलांचे व भाजीपाल्याचे मळे लावून ती जमीन लागवडीस आणीत असत. ते हें काम नुसतें नोकराचाकरांवर सोंपवीत नसत, तर स्वतः नजर ठेवून नोकरांकडून मशागत करवून घेत; व हंगामाच्या वेळीं त्यांस स्वतःच्या नजरेखालीं चांगलें कुंपण घालून घेत. शेतांतून व वाड्यांतून हिंडून फिरून व्यवस्था लावून घेणें, हा एक त्यांचा करमणूकीचा विषयच बनला होता. याप्रमाणें सतत उद्योग करून, नोकर—चाकर, सारा—धारा, खत—पाणी वगैरेंचा खर्च ते उत्पन्नांतून परभारें भागवीत.

गोरेगांवांत राहत असतां ठराविक आराम घेण्याची व मुंबईस कामासाठीं येऊन जाण्याची या दोन वेळां खेरीज करून बाकीच्या वेळीं, त्यांची कामानिमित्त भेट घेण्यास कोणी गेले असतां, भाऊसाहेब एका हातांत छत्री व दुसऱ्या हातांत काठी घेऊन कोठेंतरी देखरेख करीत उभे असलेले त्यांस आढळत. त्यांच्या वयाकडे पाहतां ह्या वयांतसुद्धां त्यांची इतकी उद्योगप्रियता पाहून मोठें कौतुक वाटे. या आमच्या अनु-

भवाप्रमाणेंच, ह्या चरित्रांतली बरीचशी माहिती पुरविणारे आमचे मित्र श्री. रामभाऊ परुळेकर यांनीं आपणास भाऊसाहेबांसंबंधी या बाबतींत आलेल्या अनुभवाचें वर्णन दिलें आहे, तें असेंः—

"कोंकणांत वालावलीस भाऊसाहेब उन्हाळ्यांत विश्रांति घेण्याकरितां व हवापालट करण्याकरितां जात, त्या वेळेसहि आपला वेळ रिकामपणीं घालविण्यांत त्यांस चैन पडत नसे; तर विकत घेतलेल्या जमिनींत कोठें झाडें लाव, धरण बांध, कोठें जमीन साफ कर, असला एक ना एक कारखाना त्यांचा चालूच असे. मुंबईस लाखों रुपयांच्या नफ्यातोट्याचा व्यवहार हांकणाऱ्या मुनीमांवर देखरेख करणारे भाऊसाहेब, वालावलीस दोन बैलांचें आऊत हांकणाऱ्या कामकऱ्यावर देखरेख करीत असतां, त्यांना उन्हाची अथवा जेवणाखाणाची पर्वा नसे. कोंकणांतील जमिनींत नवीन करावयाचीं कामें आपण येईपर्यंत ते मुद्दाम राखून ठेवावयास लावीत व स्वतःच्या नजरेखालीं तीं करून घेत. अशाच एका प्रसंगाची हकीकत या ठिकाणीं सांगावीशी वाटते. सुमारें ५।६ वर्षांपूर्वी वालावल मुक्कामीं कांहीं कामानिमित्त भेटण्यास जाण्याचा योग आम्हांस आला. गांवीं असतांना भाऊसाहेब हे आपला सकाळसंध्याकाळचा फुरसतीचा वेळ बागायतींत व शेतीभातींत देखरेख करण्यांत घालवितात हें पूर्ण माहीत असल्यामुळें, त्यांना भेटण्याची उत्तम वेळ म्हणजे अगदीं सकाळींच—सुमारें ७ वाजतां—होय असें ठरवून आम्ही विशेष सावधगिरीनें सकाळीं उपाहार न करतां, आपल्या समजुतीप्रमाणें अगदीं लौकर जाऊन पोंचलों. भाऊसाहेब लौकरच मुंबईस जावयाचे होते, म्हणून शेतांत आरंभिलेलें काम तांतडीनें पार पाडण्यासाठीं मोठ्या पहांटेस उठून दूरवर गेले आहेत व कॉफी तिकडेच मागविली आहे, असें समजलें. या वेळीं भाऊसाहेबांची साठी उलटून गेली होती ही गोष्ट लक्षांत घेतां, या क्षुल्लक दिसणाऱ्या प्रसंगाचा उल्लेख कां केला हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. यावरून धन्य

आहे त्यांच्या उद्योगप्रियतेची, असें म्हणणें प्राप्त होतें. असो." श्री. रामभाऊ यांचा हा अनुभव आमच्या अनुभवाशीं जुळतो.

शेवटल्या दोनतीन वर्षांत दम्याचा विकार फार जोरावल्यामुळें डॉक्टरापासून फार दूर राहणें अशक्य झालें व त्यानंतर भाऊसाहेबांचें कोंकणांत जाणें झालें नाहीं. डॉक्टराच्या सल्ल्यावरून गोरेगांवांतच मोकळ्या हवेंत इतःपर राहण्याचें ठरवून, त्यांनीं स्वतःसाठीं एक मोठा बंगला बांधण्याचें काम हातीं घेतलें, परंतु तो बंगला त्यांच्या हयातींत बांधून पुरा झाला नाहीं. असो.

भरभराटीच्या मोठ्या प्रमाणावरील व्यापारांत व उद्योगधंद्यांत लाखों रुपयांच्या इमारती व जमीनजुमले यांची भर पडल्यामुळें, केवळ कुशल व्यापाऱ्यांतच भाऊसाहेबांची गणना न होतां ती धनाढ्य व्यापाऱ्यांत झाली.

## प्रकरण १२ वें.

# व्यवहारकुशलता व व्यवस्था.

भाऊसाहेबांनीं प्रामुख्यानें चालविलेला टोप्यांचा कारखाना व भांडीं, गोट, बांगड्या वगैरे बनविणाचा यांत्रिक कारखाना असे दोन प्रमुख धंदे, टोप्यांच्या कारखान्यासच मागाहून जोडलेलें कपडे शिवून तयार करण्याचें खातें व तसबिरांच्या चौकटी बनविण्याचें खातें अशीं दोन पोषक खातीं, व वरील कारखान्यांतून व खात्यांतून स्वतः बनविलेला माल, रविवर्मा प्रेसचीं चित्रें व मखमाल, साटिन वगैरे यांचा व्यापार, यांचें वर्णन मागील तीन प्रकरणांत आलें आहे.

साधारणपणें मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांतून निघालेला माल विक्रीकरितां एजन्सीच्या रूपानें एखाद्या व्यापाऱ्याकडे अथवा व्यापारी मंडळाकडे सोंपविण्यांत येत असतो. परंतु भाऊसाहेबांनीं आपल्या मालाचा व्यापार आपल्याच हातांत ठेविला होता. पाउणशें–शंभर वर्षीपूर्वीं आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें वगैरे त्वरित दळणवळण व संदेश-वाहन यांचीं साधनें उपलब्ध नव्हतीं. त्या वेळीं व्यापाराचें क्षेत्र आकुंचित असल्यामुळें, व्यापार चालविणें विशेष अवघड जात नसे. त्या वेळचें व्यापाराचें मान अलीकडच्या मानाच्या तुलनेंत फिकें पडतें. अलीकडचा व्यापार सर्व जगाशीं संबन्द्ध असल्यामुळें, त्यास जगाचा संसार ही संज्ञा दिल्यास ती अनुचित होणार नाहीं. देशोदेशींच्या चलनी नाण्याच्या किंमतींत वरचेवर होणाऱ्या फेरबदलामुळें हुंडणावळीची अस्थिरता, आयात व निर्गत मालावरील जकात, मालाचा पुरवठा व मागणी, शिवाय अलीकडे उपस्थित झालेला मजूरवर्गाच्या हितसंबंधाचा प्रश्न,

राजकारण, वगैरेसारख्या प्रश्नांची गुंतागुंत त्यांत झालेली आहे. म्हणून **कार्ल, पियरसन, दावर, वोहोल** इत्यादि तज्ज्ञानीं म्हटलें आहे कीं, आजकाल मोठ्या प्रमाणावरील कारखाना व व्यापार यांत यश येण्यास केवळ स्वाभाविक मानसिक गुणांवरच विसंबतां कामा नये, तर त्यांतील सर्व अंगोपांगांबद्दलचें पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेऊन मानसिक बल कमाविलें पाहिजे; व कुशल व्यापाऱ्यानें आपली दृष्टि संकुचित क्षेत्रांत मर्यादित न करतां, ती दूरवर फेंकून देशादेशांतील व्यापाराच्या व राजकारणाच्या घडामोडींचा रागरंग नेहमीं अवलोकनांत ठेविला पाहिजे.

कारखानदार व व्यापारी यांच्यामध्यें नफ्याच्या दृष्टीनें हितविरोध येण्याचा संभव असतो. अलीकडचे पुष्कळ वरच्या प्रतीचे व्यापारी नव्या धरतीच्या व्यापारी तत्त्वज्ञानांत तरबेज असतात; म्हणूनच कीं काय भाऊसाहेबांनीं स्वतः कारखाने काढून त्यांत बनविलेल्या मालाचा व्यापाराहि आपल्याच ताब्यांत ठेविला. ते अनभ्यस्त असून कोणत्याहि व्यापारी विद्यापिठांत दाखल होऊन, अथवा एखाद्या मोठ्या व्यापारी मंडळांत उमेदवारी किंवा नोकरी करून, वरील गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यास शिकले नाहींत. करारीपणा व कर्तेपणा हे गुण त्यांच्या अंगीं पूर्णपणें वसत होते, अव्याहत परिश्रम करण्यास त्यांची सदोदित तयारी असे, बुद्धिसामर्थ्याचा कृपाप्रसाद भरपूर असल्यामुळें त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता, वगैरे सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरीहि, वर उल्लेखिलेल्या नव्या धरतीच्या व्यापारी शिक्षणाच्या अभावीं आपल्या पदरीं असलेल्या उणेपणाविषयीं भाऊसाहेब अज्ञानी नव्हते, असें आम्हापाशीं त्यांनीं वेळोवेळीं काढलेल्या उद्गारांवरून आम्ही खात्रीपूर्वक म्हणूं शकतों. म्हणूनच आपली शेंडी एखाद्या व्यापाऱ्याच्या हातीं देऊन, त्यास आपणास अगम्य अशा एखाद्या विलायती तत्त्वाच्या सबबीखालीं अडविण्याची संधि दिल्यावर, मग त्याच्याशीं हुजत घालीत बसण्यापेक्षां,

आपल्या मालाचा व्यापार आपल्याच अक्कलहुशारीनें आपण करावा, हें भाऊसाहेबांस सयुक्तिक वाटलें असावें.

आम्ही जरी वर म्हटलें आहे कीं, भाऊसाहेबांनीं नव्या व्यापारी तत्त्वांचा अभ्यास केला नव्हता, तरी त्यांचा एकंदर कारभार व व्यवहार तपासून पाहिला तर असें दिसून येईल कीं, त्यांच्या व्यवहाराचें धोरण तज्ज्ञांच्या परीक्षेस उत्तरण्यासारखें होतें; किंबहुना त्यांच्या कारभारांत नव्या धरतीची छटा दिसत होती. त्यांनीं केलेल्या सुधारणा स्वबुद्धिप्रेरित होत्या; कारण आपल्या पेढीवर त्यांनीं एखादा व्यापारविषयक पदवीधर पगारदार साहाय्यक म्हणून ठेविला नव्हता. त्यांचे सर्व साहाय्यक त्यांच्याच तालमींत तरबेज झालेले होते. इतर मोठ्या आफिसांशीं चालू असलेल्या व्यवहारांतील तत्त्वांचें निरीक्षण करून, तीं तत्त्वें आपणास पटल्यास आपल्या कारभारांत दाखल करून त्याची सुधारणा करण्यास भाऊसाहेब कांकूं करीत नसत. असो.

कोणत्याहि व्यापारी पेढीचें यश तिच्या अंतस्थ व बाह्य व्यवस्थेवर अवलंबून असतें. अंतस्थ व्यवस्थेचें मुख्य अंग—त्यास व्यापाराची नाडी म्हटलें तरी चालेल—म्हटलें म्हणजे हिशेबी खातें. ज्या पेढीवर ह्या खात्याची रचना पद्धतशीर नसते, किंवा तशी असून त्याची सक्तीनें अंमलबजावणी होत नसते, त्या पेढीच्या शाश्वतीबद्दल शंका घेण्यास जागा राहते. भाऊसाहेबांनीं या खात्याची रचना देशी पद्धतीवरच केली होती, व त्याचें काम नियमबद्ध व नियमितपणें होण्याबद्दल ते फार काळजी वाहत असत. हुकमी खातें व सराफी खातें हीं त्यांनीं अगदीं अलग ठेविलेलीं असत. दोन्हीकडचे अंमलदार वेगळे असून त्यांच्या हाताखालीं लागणारे कारकून अवश्य तितके ठेविलेले असत. दोन माणसांचें काम एकाकडून निभावून घेणें, तसेंच भिन्न जबाबदाऱ्यांचीं कामें एकाच अंमलदाराच्या हातांत ठेविणें या गोष्टी भाऊसाहेबांस पसंत नसत.

हुकमी खात्यांतून हुकूम सुटेल तेव्हांच सराफी खात्यांत देवघेव व्हावयाची. नित्य वहिवाटीची देवघेव खेरीज करून इतर विशेष व्यवहार स्वतः भाऊसाहेबांच्या हुकमाखेरीज होत नसत. ह्या व्यवस्थेमुळें देशी कारभारावर विलायती वळणाच्या तज्ज्ञांनीं लाविलेला दोष भाऊसाहेबांच्या कारभारास लागू पडला नाहीं. एकट्या सराफानें अथवा मेथाजीनें सर्व देवघेवींचा व्यवहार करीत राहिल्यानें त्याच्यावर कामाचा बोजा विशेष पडतो, व त्यामुळें खातेवारी मेळ वेळच्या वेळेवर होत नसतो. भाऊसाहेबांनीं वर सांगितल्याप्रमाणें वेगळीं खातीं करून ही उणीव भरून काढिली होती.

हिशेबाच्या सर्व वह्या देशी पद्धतीनें ठेवण्यांत येत असत. ह्या वह्या ठेवण्याच्या देशी व विलायती पद्धतींचा तुलनात्मक खल करण्याचें हें स्थळ नव्हे. शिवाय आम्ही सदर बाबींत विशारद नसल्यामुळें, तो खल करण्याची पात्रता आमच्या अंगीं नाहीं, हेंहि आम्ही कबूल करितों. तथापि इंडियन स्पेशी बँकेचे व्यवस्थापक कै. **चुनीलाल सरय्या** यांचें म्हणणें असे कीं, देशी पद्धतीमुळें काम आटपशीर होतें व त्यांत त्यांनीं सुचविलेल्या सुधारणा केल्यास, देशी पद्धत उपयुक्तपणांत व व्यवहाराच्या चोखपणांत विलायती पद्धतीची बरोबरी करूं शकेल. त्यांनीं सुचविलेल्यांपैकीं एक मुख्य सुधारणा ही होती कीं, चालू ठराविक खातेवहीखेरीज एक वेगळी वही ठेवलेली असावी व तींत फक्त खातेदारांची जमा व उधारीची बेरीज मितिवार ठेवलेली असावी; म्हणजे पाहतांक्षणींच आजमितीस खातेदारांचें येणें किंवा देणें किती आहे हें कळतें. भाऊसाहेबांनीं ही व्यवस्था वेगळी वही न ठेवितां खतावणींतच नेहमीं चालणारीं खातीं घालून ठेविली होती; शिवाय रोजचे रोज नियमितपणें ह्या संख्या दाखविण्याची तजवीज केली होती व उग्राणी व भरपाई करण्यास नेमलेल्या कारकुनाजवळ त्यांचें मितिवार

टांचण केलेलें तयार असे. त्यामुळें सर्व देवघेवी वेळच्या वेळेवर होत असून गफलतीनें खातेदारांच्या रकमांची भरपाई मर्यादेच्या बाहेर जाऊन त्या रकमा बुडीत खात्यांत ढकलण्याची पाळी येत नसे, किंवा वेळेवर देण्याची रकम न पोंचल्यामुळें पत बिघडत नसे.

भाऊसाहेबांनीं व्यापारास आरंभ केला त्यावेळेस त्यांचेजवळ पुरेसें भांडवल नव्हतें, हें मागेंच सांगण्यांत आलें आहे. त्या स्थितींत त्यांस कसून रोकडीचाच व्यवहार करावा लागला. या वेळीं रोकडीच्या व्यवहाराची जी पद्धत सुरू झाली, तीच त्यांनीं पुढें कायम ठेविली. होतां होईल तों माल विकण्यास अन्य व्यापाऱ्यांकडे ते सोंपवीत नसत, किंवा मालाचा खप जास्त प्रमाणावर व्हावा म्हणून तो इतर दुकानांवर विक्रीकरितां ठेवीत नसत, अगर त्यांचे पगारदार विक्रेते अथवा दलाल माल खपविण्यासाठीं बाजारांत फिरत नसत. असें करण्याची त्यांस जरूरच पडली नाहीं. कारण टोप्यांचा कारखाना व भांड्यांचा कारखाना हे दोन भाऊसाहेबांचे मुख्य उद्योगधंदे असून, असल्या उद्योगधंद्यांचे, निदान या प्रांतांत तरी, ते उत्पादकच होते म्हटलें तरी चालेल. शिवाय त्यांच्या मालाच्या सरसपणाबद्दल सर्वत्र ख्याति झाली होती, व मालांत ते नव्या नव्या तऱ्हांची भर करीतच असत. या सर्व कारणांमुळें त्यांच्या मालास पुरस्थ व प्रांतस्थ व्यापाऱ्यांकडून व गिऱ्हाइकांकडून मागण्या येण्याचा कधीं तुटवडा पडलाच नाहीं; व म्हणूनच भाऊसाहेबांस माल खपविण्यासाठीं इतर व्यापाऱ्यांप्रमाणें वरील प्रकार करावे लागले नाहींत. कांहीं थोड्या अनुभवांतीं खात्रीलायक ठरलेल्या व्यापाऱ्यांशिवाय इतर सर्व व्यवहार रोकडीच्या मागणीवरच त्यांनीं केला. ज्या थोड्या व्यापाऱ्यांशीं उधारीचा व्यवहार त्यांनीं चालू ठेविला, त्यांच्या संबंधींची कर्तव्यदक्ष व्यापाऱ्यांस अवश्य अशी माहिती ते बारकाईनें करून घेत असत. त्या व्यापाऱ्यांचा मगदूर, त्यांची पत, व्यापाराचें मान वगैरे सर्व

गोष्टींची माहिती त्यांचे जवळ असे, व ह्या माहितीवरून त्या व्यापाऱ्याची लायकी ओळखून त्या प्रमाणावर ते त्यास माल पुरवीत असत.

भाऊसाहेबांच्या व्यापारी पेढीवर विकण्यांत येत असलेल्या मालाचीं स्थूल मानानें पांच खातीं केलेलीं होतीं. टोप्या विकण्याचें खातें, शिवलेल्या चित्ताकर्षक कपड्यांचें खातें, रेशमी कापड विकण्याचें खातें, भांड्यांचें खातें व चित्रांचें खातें; अशीं हीं खातीं जणूं काय वेगळीं दुकानेंच होत अशा तऱ्हेनें रचलेलीं होतीं. प्रत्येक खात्यावर एक जबाबदार अंमलदार असून, त्याच्या हाताखालीं गिऱ्हाइकांस माल दाखविण्यास अवश्य तितके विक्रेते असत. एका खात्याच्या माणसांचा दुसऱ्या खात्याशीं संबंध नसे. खात्यावरील अंमलदार स्वतःच्या खात्यांतील माल, विक्री, पुरवठा, या सर्वांबद्दल हुकमी खात्यास जबाबदार असे. मालाच्या तुटवड्याची अगाऊ खबर व कोणत्या मालाचा कोणत्या वेळीं जास्त उठाव होतो वगैरे गोष्टींचे अहवाल वेळच्या वेळीं हुकमी खात्यास दर खात्यावरील अंमलदारानें द्यावयाचे असत; व विक्रीनें आलेल्या रकमेची भरपाई सराफी खात्याकडे केली जात असे. तसेंच मागणीच्या मालाची पाठवणी बंदोबस्तानें करविण्याचें कामहि त्याचेचकडे असे. या योजनेमुळें दुकानच्या सर्व खात्यांतील व हुकमी व सराफी खात्यांतील ताळेबंद जमविण्यास सुलभ पडत असे. भाऊसाहेबांनीं केलेली ही रचना नव्या व्यापारी धोरणाशीं सुसंगत अशीच होती.

वीस बावीस वर्षांपूर्वीं एतद्देशीय व्यापाऱ्यांस जाहिरातींचें महत्व कळलें नव्हतें. नाहीं म्हणावयाला तें फक्त रामबाण शक्तिवर्धक औषधें तयार करून विकणाऱ्यांसच कळलें होतें. त्यांच्याच जाहिराती तत्कालीन वर्तमानपत्रांतून मुख्यत्वेंकरून झळकत असत व बाकीच्या सर्व जाहिराती विलायती व्यापाऱ्यांच्याच असत. एतद्देशीय व्यापारी आपल्या ठराविक ओळखीच्या गिऱ्हाइकांवरच अवलंबून असत. जाहिरातींत पैसा खर्च

करणें त्यांस अपव्यय वाटत असे. उलट पक्षीं जाहिरातींच्या द्वारें आपला माल व त्याचा व्यापार लोकांच्या नजरेसमोर सतत ठेवणें हें व्यापाराचें एक मुख्यांग आहे, म्हणून विलायती धोरणाचे व्यापारी जाहिरातींप्रीत्यर्थ कांहीं रकम खर्चण्यास काढून ठेवीत असतात; व म्हणूनच पीयर्स सोपासारख्या जगविख्यात साबूच्या जाहिरातीहि अनेक प्रकारांनीं मनोवेधक रूपांत सतत लोकांपुढें ठेवण्यांत येत असतात. जनतेचें लक्ष आपल्या मालाकडे नित्य ओढलेलें असावें, हें व्यापारी करामतीचें एक अंग आहे, हें जाणूनच भाऊसाहेबांनीं नित्य प्रमुख पत्रांत जाहिराती देण्याचा क्रम चालू ठेविला होता. तसेंच गिऱ्हाईक दुकानांत आल्यावर त्याचा खोळंबा न होतां त्यास पाहिजे तो माल ताबडतोब दिसावा व मिळावा म्हणून मालाची टापटीपीची मांडणी व विक्रेत्याची आपल्या कामांतील तत्परता यांबद्दल भाऊसाहेबांनीं आपल्या दुकानांतील सर्व खात्यांत जरबीनें व्यवस्था ठेविली होती.

भाऊसाहेबांच्या मालाच्या सरसपणाबद्दल झालेली ख्याति त्यांनीं शेवटपर्यंत कायम राखली होती. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल एक दाखला देण्यासारखा आहे. मागें स्वदेशी कपडा वापरण्याच्या चळवळीच्या सुरवातीस देशी बनातीच्या बिनसांध्याच्या टोप्या वापरण्याची एक लाट आली होती. त्या वेळीं तशा टोप्या बनविण्यासाठीं भाऊसाहेबांनीं आपल्या भांड्यांच्या कारखान्यांतील यंत्रावर प्रयोग करून पाहिला व तो यशस्वीहि झाला. परंतु त्या कामास पाहिजे तशी कडक देशी बनात त्यांस अख्या हिंदुस्थानांत तपास करितां मिळाली नाहीं, म्हणून त्यांनीं तसल्या टोप्या बनविल्या नाहींत; किंवा विलायती बनातीच्या बनवून त्यावर देशी छाप मारून विकल्या नाहींत. लोभास बळी न पडतां त्यांनीं आपल्या अब्रूची चाड राखिली. नाहीं तर विलायतेंतून कपड्यावर आपल्या नांवाचा छाप मारवून तो इकडे मागवून आणून स्वदेशी

म्हणून विकणारे व अगदीं अलीकडचीच गोष्ट म्हणजे शुद्ध खादीच्या नांवाखालीं जपानी किंवा गिरणींतील माल विकणारे बडे बडे व प्रतिष्ठित आणि सच्चे म्हणून मिरवणारे हिंदी व्यापारी थोडके का आहेत ? असो.

कारखान्यास लागणारा विलायती माल भाऊसाहेब स्थानिक इंडेंट आफिसां–( अडतीच्या पेढ्यां–) मार्फतच मागवीत असत. मालाची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें व बाजारांत भाऊसाहेबांचा मगदूर व त्यांची पत चांगली प्रस्थापित झालेली असल्यामुळें, त्यांस परभारें विलायतेंतून माल मागवितां आला असता, व त्यामुळें त्यांचा जास्त फायदाहि झाला असता. परंतु असें करण्यांत जोखीम असते. एकतर माल वेळेवर व लवकर येण्याचा संभव नसतो व दुसरें मालाच्या सुरक्षितपणाबद्दलची जोखीम स्वतःवर येऊन पडते, आणि मालाच्या चांगुलपणाबद्दल खात्री नसते. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच भाऊसाहेबांनीं आपणास लागणारा माल आफिसामार्फत मागविण्याचें ठरविलें असावें. या आफिसांचा कारभार ठराविक दलालीवर चाललेला असतो. परंतु केव्हां केव्हां मालावर कारखानदाराचें नांव नसून नुसता व्यापारी शिक्का असतो, त्यामुळें माल मागविणाऱ्या व्यापाऱ्यास कारखानदाराच्या भावाच्या छापील यादीच्या अभावीं आफिसानें पुढें केलेल्या भावाच्या यादीवरच अवलंबून राहावें लागतें. अशा वेळीं आपण तयार केलेल्या यादींत कारखानदाराच्या भावावर टक्के घुसडण्याची संधि आफिसास मिळते, व तिचा लाभ घेण्यास आफिसें सोडीत नाहींत. म्हणूनच स्वातंत्र्यप्रिय भाऊसाहेबांनीं कोणा एकाच आफिसाशीं स्वतःस बांधून घेतलें नाहीं. दर वर्षीं ते पावसाळ्याचे पूर्वीं दहा पांच आफिसांत मालाची मागणी नोंदून ठेवीत व तो माल हंगामाचे पूर्वींच मिळाल्यावर पावसाळ्यानंतर हंगामाच्या मागणीची नोंद, ज्या आफिसांचा माल उत्तम असून किफाय-

तशीर असेल, त्या आफिसांत करीत. हिंदुस्थानची प्रजा रुपयाच्या चौदा आणे हिश्श्यानें शेतकरी वर्गांतील असल्यामुळें तिची स्थिति बऱ्यावाईट पावसावर अवलंबून असते. म्हणून मालाच्या खपाचें मान दरवर्षी त्या सालच्या पावसाळ्यावरून व्यापारी ताडीत असतात. सदर धोरणास अनुसरून भाऊसाहेब पावसाळ्यानंतर कमीजास्त प्रमाणानें वर्षाच्या सांठ्याचा माल मागवीत असत. फिरतीच्या कामावरील त्यांचे गुमास्ते कच्च्या व पक्क्या मालाचे चालू बाजारभाव, हुंडणावळीचें मान वगैरे प्रकारची अवश्य माहिती काढीत राहून, तिची वर्दी भाऊसाहेबांस देत असत. हुंड्यांची भरपाई वेळेवर होत असे. त्यांची नोंद सदर गुमास्त्याजवळ असे, व माल मागवितेवेळींच पैशाची तजवीज भाऊसाहेब करून ठेवीत. भाऊसाहेबांनीं तजविजीची योजना केल्याप्रमाणें वेळेवर रकम तयार करून घेऊन,ती योग्य ठिकाणीं पोंचविण्याची जबाबदारी गुमास्त्यावर असे. अशी खबरदारी ठेविल्यामुळें भाऊसाहेबांची पत पहिल्या प्रतीची ठरली होती, व त्यांच्याशीं व्यवहार ठेवण्यास आफिसवाल्यांच्या उड्या पडत असत. आपल्या व्यवहाराची आर्थिक बाजू भाऊसाहेबांनीं, पोषक खात्यांतील व्यापार व स्थावर मिळकत यांच्या उत्पन्नाच्या साहाय्यावर इतकी मजबूत करून ठेविली होती कीं, मंदीच्या वेळीं जास्त वेळ टिकाव धरण्यास त्यांस अवघड जात नसे.

देशी कारखानदार तयार केलेल्या मालाची किंमत ठरवितांना रकमेचें व्याज, खर्च व नफ्याचे टक्के इतकेंच हिशेबांत घेतात. यंत्रसामुग्री व हत्यारें यांच्या झीजेबद्दल सूट, त्याचप्रमाणें कारखान्याची इमारत मालकीची असल्यास तिच्या वार्षिक दुरुस्तीचा खर्च व तिचें आयुष्य लक्षांत घेऊन ती फिरून बांधण्यास लागणाऱ्या खर्चासाठीं बाजूस काढून ठेवण्याची वार्षिक गंगाजळीची रकम, वगैरे बाबींची त्यांस कल्पना नसते. परंतु भाऊसाहेबांस याची कल्पना होती, व या बाबी ते हिशेबांत घेत-

असत, हें एका प्रसंगीं आमच्या नजरेस आलें. एक स्थावर मिळकत त्यांस विकत घ्यावयाची होती. तिची आम्हांस त्यांनीं किंमत करण्यास सांगितली. आमची किंमत त्यांनीं ठरविलेल्या किंमतीपेक्षां जास्त झाली. तेव्हां त्यांनीं आम्हांस निवळ उत्पन्न काढतांना वरील रकमा वजा केल्या आहेत काय, म्हणून प्रश्न केला व म्हटलें कीं, आपण आपल्या व्यवहारांत किंमती ठरवितांना सदर रकमा जमेस धरतों. आम्ही सदर रकमा चक्रवाढ व्याजाच्या हिशेबानें काढतों म्हणून आमच्या वजा करण्याच्या रकमा कमी होतात व त्यामुळें किंमत जास्त होते. त्यांचें गणित ठोकळ मानाचें जरी असलें तरी, त्यांस हें तत्व माहित होतें, हें यावरून उघड होतें. असो. या नव्या पद्धतीनें हिशेब करून भाऊसाहेब, तसल्याच विलायती पक्क्या मालाचा बाजारभाव लक्षांत घेऊन, त्यांत योग्य फेरफार करून, आपल्या किंमती बसवीत असत.

दरवर्षी हंगामाच्या पूर्वीं भाऊसाहेबांच्या एकंदर कारखान्यांतील व दुकानांतील शिल्लक मालाची मोजदाद करण्यांत येत असे.

भाऊसाहेबांचे कारखाने सुरू झाल्यानंतर तसलेच कारखाने लहानमोठ्या प्रमाणावर इतर पुष्कळांनीं काढले. ॲल्युमिनीमच्या भांड्यांच्या कारखान्यांत विशेष स्पर्धा होऊं लागली, व किंमतीच्या चढाओढीमुळें सर्वांचेंच नुकसान होऊं लागलें. सर्वांशीं टक्कर खेळण्यास भाऊसाहेब समर्थ होते हें खरें, तथापि सदर प्रकारांतील आत्मघातकीपणा ओळखून या व्यापारास स्थिरता आणण्यास भाऊसाहेबांनीं सुधारणेच्या नव्या धरतीवर एक व्यापारी संघ स्थापण्याचें योजिलें, व सर्व व्यापाऱ्यांस आपल्या पेढीवर बोलावून आपलें मत प्रदर्शित केलें. भाऊसाहेबांची योजना त्या सर्वांस पसंत पडून, त्यानंतर सर्व व्यापारी जमून व विचारविनिमय करून भाऊसाहेबांच्या सल्ल्याप्रमाणें बाजार पाहून भाव ठरवीत गेले.

भाऊसाहेब कारभारी, कारकून व इतर नोकरचाकर यांजवर क़रडा अंमल गाजवीत होते हें खरें. स्वतः उद्योगप्रिय व मेहनती असल्यामुळें त्यांस आळशी, चुकारू, मंदबुद्धीचा किंवा अप्रामाणिक मनुष्य बिलकूल खपत नसे. उलटपक्षीं जे एकनिष्ठेनें व हुशारीनें त्यांची सेवा करीत गेले त्यांचा परामर्ष घेण्यास त्यांनीं कधींहि मागें घेतलें नाहीं. इंग्रजी व्यापारी पद्धतींत, पेढीस नफा झाल्यास कारभाऱ्यांस सालअखेर बक्षिसाखातर कांहीं रकम 'बोनस' या संज्ञेनें देण्यांत येत असते. परंतु ही रकम बहुशः एक महिन्याचा पगार अथवा त्याच्या आंतच अशी असते. ही बोनसची रकम पेढीच्या नफ्यातोट्यावर अवलंबून न ठेवितां कारभाऱ्यांच्या कामावर लक्ष देऊन ती भाऊसाहेब बहाल करीत असत; व या रकमेस कांहीं प्रमाणच नसे. एखाद्यानें तशीच लायकी दाखविल्यास त्यास पगाराच्या दुप्पट तिप्पट रकमहि बक्षिस देत. त्यामुळें कारभारी संतुष्ट राहून आपआपल्या कामांत दक्षता व तत्परता बाळगीत.

भाऊसाहेबांचा उपरिनिर्दिष्ट व्यापारी व्यवहार दिसण्यांत जुन्या पद्धतीचा होता, तरी नव्या पद्धतीच्या तत्वांनीं तो ओतप्रोत भरलेला होता. या तीन प्रकरणांत आमच्या चरित्रनायकांच्या कर्तबगारीचें रहस्य आम्हीं दिलें आहे. यांतच त्यांचें जीवनचरित्र आहे, व हें चरित्र एका अज्ञान व निराश्रित मुलानें कनवटीला शाण्णव पयांची दौलत खोंचून कोंकणांतून मुंबईस येऊन, स्वतःच्या हिंमतीवर रंगविलें आहे; तेव्हां तें मनोरंजक तर झालेंच आहे, पण त्याशिवाय तें असाधारण व अलौकिकहि खास आहे. तसेंच हें चारित्र बोधप्रदहि आहे, कारण प्राप्त यशाच्या अनुभवासारखें यशप्राप्ति करून देणारें अन्य साधन नाहीं.

---

## प्रकरण १३ वें.

# दानधर्म.

आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थविवेका॥
येथें आळस करूं नका। विवेकी हो ! ॥ १ ॥

श्रीसमर्थ.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या वरील उपदेशाप्रमाणें भाऊसाहेबांनीं आपल्या आयुष्यांतील बराचसा काळ प्रपंच नीटनेटका करण्यांत घालविला, आणि प्रपंच पूर्णपणें साधल्यावर उत्तरवयांत त्यांचें धर्मपरायण मन परमार्थविवेकाकडे वळलें. लहानपणांत काढलेल्या उपासमारांची व हालांची त्यांना नित्य आठवण असे व कोणी विशेष जिव्हाळयाचा स्नेही भेटला असतां, किंवा तरुण पिढींतल्या एखाद्यास हितसाधनाची गोष्ट सांगण्याची संधि आली असतां, ते आपल्या लहानपणींच्या हालांची कहाणी सर्वांस सांगत असत. आईबापांनीं काढलेल्या उपासमारांची हकीकत सांगतांना उतारवयांतदेखील त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागत, कंठ भरून येई आणि शब्द सद्गदित उमटत. ते म्हणत :—“ मी आतां वाटेल तें केलें तरी, आईबापांनीं अन्नाकरितां काढलेले हाल कसे भरून येणार ? माझ्या या संपत्तीचा त्यांना कांहीं उपयोग झाला नाही. स्वतः अर्धपोटीं राहून जो माझा हा देहपिंड त्यांनीं पोसला, त्याच्याकडून त्यांची व्हावी तशी सेवा जाहली नाहीं; आणि माझी आजची स्थिति पाहून त्यांची झालेली आनंदी मुद्रा पाहण्यांत मला जें सुख आणि जी कृतकृत्यता वाटली असती, ती आतां त्यांच्या पश्चात् होणें अशक्य आहे. ” भाऊसाहेबांचे हे शब्द योग्य व

कोणाहि सहृदय मनुष्यास पटण्यासारखेच आहेत. भाऊसाहेब कांहींहि म्हणोत, आम्हांला तर असें वाटतें कीं, मूळच्या आपल्या गरीब स्थितीची आठवण होऊन, श्रीमंतीच्या ऐन अमदानींत दीनअनाथांचा त्यांनीं जो परामर्ष घेतला आणि शिक्षणासारख्या पवित्र कार्यास वाहिलेल्या संस्थांस व धार्मिक संस्थांस उचलून धरून त्यांना नांवारूपास आणण्याकरितां संपत्तीच्या बराचशा भागाचा जो सद्विनियोग केला, त्याच्या योगानें त्यांच्या स्वर्गस्थ मातापितरांस खरोखरच धन्यता वाटत असेल. कारण अशा आपल्या उदार कृत्यांनीं भाऊसाहेब आपल्या पितृऋणांतून मुक्त झाले, एवढेंच नव्हे तर, त्यांनीं आपल्या कुळाचा उद्धार करून त्याचें नांव अजरामर करून ठेवलें आहे.

संसाराच्या चक्रांत मनुष्य एकवार सांपडला म्हणजे त्याच्या गरजा वाढत जाऊन, द्रव्य मिळत जाईल तसतसें तें त्यास अपुरें पडत जातें. गरजा तर वाढत असतातच; आणि त्यांच्या बरोबर त्या भागविण्यास त्याचे अव्याहत श्रम चालू असतात. तथापि गरजांचें क्षेत्र उपार्जनाच्या क्षेत्राला व्यापून शेवटीं शिल्लक राहतें तें राहतेंच ! याचसाठीं कोणीहि शंभरांचे हजार, हजारांचे लक्ष, लक्षांचे कोटि करण्याकडे लक्ष लावून विलक्षण प्रयास करीत असतो. परंतु लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, महत्वाकांक्षाच मनुष्यास कार्यतत्पर करून प्रगमनशील बनविते. ही नसती तर वैभव, ज्ञान, विज्ञान वगैरे निरनिराळ्या कारणांकरितां प्रसिद्धि पावलेल्या प्रख्यात पुरुषांचीं नांवें ऐकूं आलींच नसतीं. परंतु महत्वाकांक्षेचा जितका अंश साध्य होतो त्याहून अधिक असाध्य राहतो, व तो साध्य करण्याकरितां माणूस अधिकाधिक खटपट करूं लागतो. म्हणून महत्वाकांक्षा जरी सर्व बाजूंनीं पूर्ण झाली नाहीं, तरी तिचा बराचसा भाग पूर्ण जाहल्यानंतर, निदान द्रव्याच्या बाबतींत तरी, त्यानें आपलें लक्ष परोपकाराकडे वळवावें हें मनुष्यास उचित आहे.

भाऊसाहेबांपेक्षांहि श्रीमंत लोक पुष्कळ असतील, व त्यांच्यापेक्षां दानशूर लोकहि कमी असतील असें नाहीं. तथापि धनमत्ता व दातृत्व यांचें प्रमाण व्यस्तच दिसतें. श्रीमंतांच्या संख्येकडे लक्ष दिलें असतां त्यांच्यामध्यें उदार दाते फारच थोडे आढळून येतात, आणि म्हणूनच भाऊसाहेबांच्या दातृत्वाचें कौतुक करावयाचें.

पहिल्यापासूनच भाऊसाहेबांची अढळ भक्ति त्यांचें कुलदैवत वालावल येथील **श्रीनारायण** याचे चरणीं होती, व ती त्यांच्या उत्कर्षाबरोबरच वृद्धिंगत होत गेली. आपणास प्राप्त झालेलें वैभव ही श्रीनारायणाची कृपा आहे असें ते वारंवार म्हणत. पहिल्यापासून-आरंभींच्या साधारण स्थितींत सुद्धां–ते श्रीनारायणाची सेवा करीत होतेच. गांवीं गेल्या मुदतींत देवालयांत धर्मकृत्यें करून ब्राह्मणभोजन व गोरगरीबांस अन्नदान करणें हें चालूच असे. शिवाय दर खेपेस श्रीनारायणाच्या मूर्तीकरितां कांहीं अलंकार व देवाच्या स्वारीकरितां कांहीं सरंजाम ते देत असत. कोणी अतिथिअभ्यागत त्यांचेकडे आला असतां त्याला आपल्या ऐपतीला साजेल अशा रीतीनें ते सढळ हातानें मदत करीत असत. परंतु अशा तऱ्हेचे कितीहि किरकोळ दानधर्म झाले तरी त्यांचा चिरकाल उपयोग होत नसतो. दाता हजर व हयात आहे तोंपर्यंत त्याच्या हातून दान होईल, परंतु त्याच्या गैरहजिरींत व त्याच्या मागून तें दान चालू राहीलच याचा नेम नाहीं. ह्यास्तव खऱ्या दातृत्ववानांस कायमची कांहीं व्यवस्था करावी व तेणेंकरून आपल्या पश्चात् आपल्या दानाचा लाभ घेत राहून लोकांस आपली आठवण राहावी, व त्यांचे आपणास आशिर्वाद मिळावे, असें वाटूं लागतें.

सन १९१० च्या सुमारास भाऊसाहेबांची सांपत्तिक स्थिति बऱ्याच उत्कर्षास पोंचली होती, व त्यांचे उद्योग सुव्यवस्थेस लागले होते. तेव्हां

त्यांस इतर गोष्टींकडे लक्ष पुरविण्यास अवसर मिळूं लागला. त्यांच्या हातून झालेल्या मोठ्या प्रमाणावरील दानधर्मास एथूनच सुरवात झाली. आपण पाहतों हे दिवस केवळ त्या परमेश्वराच्या कृपाप्रसादाचें फळ होय, व त्यानें दिलेल्या ऐश्वर्याचा अंश त्याच्या चरणीं अर्पण करून परमार्थ साधला पाहिजे, या हेतूनें चिरकाल टिकणारे दानधर्म सढळ हातानें करण्यास त्यांनीं सुरवात केली. भाऊसाहेबांचा ओढा पहिल्यापासूनच धार्मिक बाबतींकडे असल्यामुळें त्यांच्या दातृत्वाचा ओघ पहिल्यानें त्या बाजूकडे वळला; व सन १९१०।११ चे सुमारास त्यांनीं वालवल गांव व श्रीमठ संस्थान दाभोली या दोन ठिकाणीं बऱ्याच रकमा खर्च केल्या. आतां या दोन ठिकाणीं भाऊसाहेबांनीं केलेल्या दानधर्माची माहिती देण्यापूर्वी, या दोन्ही स्थळांचा वाचकांना थोडासा परिचय करून दिल्यास वावगें होणार नाहीं.

वालावल[1] हा गांव सावंतवाडी संस्थानांतील कुडाळ पेट्यापैकीं असून, तो ब्रिटिश मुलखांतील मालवण तालुक्यापैकीं काळसें—धामापूर या गांवांच्या लगत आहे. हे दोन गांव व वालावल यांचे मधून कर्ली नदी वाहत जाऊन पश्चिमेस अरबी समुद्रास मिळते. सावंत-

१. वालावल अथवा वालावली या गांवाचा जुन्यांत जुना उल्लेख बदामी येथील चालुक्य सम्राट् विजयादित्य याच्या शा. शके ६२२ ( इ. स. ७००–१ ) च्या ताम्रपटांत मिळतो. या ताम्रपटांत वालावल गांवास लागूनच असलेला नेरूर गांव दान दिल्याचा उल्लेख असून, “ नदीतटस्थः बल्लावल्लिग्राम-सहम्यपूरग्रामयोर्मध्यस्थः नेरूरनाम्ना ग्रामः ” म्हणजे नेरूर हा गांव नदीच्या कांठीं असून, “ बल्लावल्लि ” व “सहम्यपूर” या गांवांच्यामध्यें आहे, असें नेरूर गांवाचें वर्णन दिलें आहे. डॉ. फ्लीट साहेबांनीं वरील दोन गांवांपैकीं पहिला “ वालावल ” हा गांव असून दुसरा नकाशांत सांपडत नसल्याचें लिहिलें आहे. वालावल व नेरूर यांच्या सीमांस लागूनच सध्यांचा “ धामापूर ” हा गांव आहे, तोच ताम्रपटांतील दुसरा गांव होय.

( Indian Antiquary Vol. IX pages 126–28 )

वाडीहून मालवणाकडे जाणाऱ्या रस्त्याचा एक फांटा नेरूरवरून वालो-वलींत श्रीनारायणाच्या देवालयासमीप येऊन 'वालावलीस' येणाऱ्या डोणी, पडाव वगैरे ज्या ठिकाणीं वरवा करतात तेथेंच, म्हणजे देवालयापासून सुमारें दोन फर्लांग अंतरावर जाऊन भिडला आहे. देवालयाच्या एका बाजूस पाण्यानें तुडुंब भरलेल्या व शुभ्र व रक्त कमलांनीं प्रफुल्लित दिसणाऱ्या तलावांत सभोंवारच्या नारळी, पोफळी व त्यांच्या पलीकडील डोंगरांतील वृक्षांची गर्द झाडी यांचें मनोहर प्रतिबिंब, देवळाच्या उजव्या-बाजूकडील घाटावरून पाहणाऱ्यास केव्हांहि तल्लीन करतें; व दुसऱ्या-बाजूस भक्तियुक्त अन्तःकरणानें ईश्वरभजन करीत असतां प्रेमानें डुलणाऱ्या साधुजनांप्रमाणें नारळीचीं झाडें जिच्या दोन्हीं कांठांवर रांगेनें लागून राहिलीं आहेत, व खालून वर व वरून खालीं जाणाऱ्या नौकांवरील कर्णधारांच्या कर्णकटु शब्दांनीं जिचें पात्र गजबजून गेलें आहे, अशी नदी संथपणानें वाहत जाते. देवालयाच्या समोर समाधि ( कल्याण पुरुषाची ) व दीपस्तंभ असून त्याच्यापुढें सुंदर, कमानदार व भव्य असा दगडी दरवाजा आहे व त्याच्यावर नगारखाना आहे. या ठिकाणीं सकाळसंध्याकाळ नौबत झडत असते. या दरवाज्याच्या पलीकडे व्यापाऱ्यांचीं दुतर्फा दुकानें लागलेलीं असल्यामुळें, ती एक लहानशी पेठच वसल्यासारखी दिसते. उजवीकडून एक फरसबंदी रस्ता बांधून तो डोंगरांतून घांटीच्या माथ्यापर्यंत नेला असून, तेथून दोन रस्ते करून एक श्रीमाऊलीच्या देवालयापर्यंत व दुसरा " उंबरमळा " येथील श्रीरामेश्वराच्या देवालयापर्यंत नेला आहे. हा फरसबंदी रस्ता फार जुन्या काळीं बांधलेला दिसतो. देवालयाच्या सभोंवार नेहमीं, व विशेषतः जत्रेच्या वेळीं, येणाऱ्या व्यापाऱ्यांच्या व यात्रेकरूंच्या सोईसाठीं धर्मशाळा बांधल्या असून, त्यांचा स्वाभाविकच तट बनला आहे; व म्हणूनच, डावीकडचे बाजूस बाहेर जाण्याकरतां दुसरा कमा-

नक्कार दरवाजा उभारला आहे. या तटाच्या पलीकडे देवसेवकांचीं घरें आहेत. देऊळ फार विस्तीर्ण असून या प्रांतांत त्याच्याइतकें भव्य व सुशोभित देवालय एखाददुसरेंच असेल. या ठिकाणीं रामनवमीचा उत्सव फारच मोठ्या प्रमाणावर होत असून, त्याला दूरदूरच्या गांवांतून हजारों लोक येतात. येथील देवस्थानचा सरंजाम, स्थलाची रमणीयता, उत्सवाच्या वेळीं प्राप्त होणारी विशेष प्रकारची भव्यता, भिन्न रुचीच्या विविध जनसमाजास आवडण्याजोगा उत्सवाचा विविध कार्यक्रम व आसमंतात् भागांतील पंचक्रोशींतल्या लोकांच्या वाहतुकीस अनुकूल अशी भौगोलिक स्थिति, ह्या साधनसमुच्चयामुळें ह्या पवित्र स्थळाला एक प्रकारचें विशिष्टत्व आलें आहे. उत्सावाच्या वेळीं अशा अलोट जनसमुदायाचा समावेश होण्यासारखा प्रशस्त सभामंडप या देवालयास असून, आंतील भागहि सभामंडपास शोभण्यासारखाच आहे. देवालयाचा गाभारा व त्याचे दरवाजे फारच सुशोभित आहेत. दरवाज्याच्या दोन्ही अंगांस उभे असलेल्या द्वारपालांच्या दोन भव्य मूर्तींचें दर्शन होत असतांच, गाभाऱ्यांतील नंदादीपांच्या लखलखाटांत चमकणारी श्रीनारायणाची रम्य व पुरातन मूर्ति, प्रेक्षकांचें मन आकर्षण करून त्यांना तल्लीन करून सोडते.

श्रीक्षेत्र द्वारावतीला केशव—नारायणादिक ज्या श्रीविष्णूच्या चोवीस मूर्ति फार पुरातन काळापासून होत्या, त्यांपैकीं आनिरुद्धाची मूर्ति तेथून कांहीं कालानंतर नाहींशी होऊन तेथें तेवीसच शिल्लक राहिल्या, व तीच ही अनिरुद्धाची मूर्ति इकडे आली-अगर आणिली गेली-अशी लोकवार्ता आहे. प्रचलित दंतकथेवरून असें समजतें कीं, सुमारें सात-आठशें वर्षांपूर्वीं ही मूर्ति कोणी "**कल्याण**" नांवाच्या पुरुषानें कोंकणांत आणिली-कोणी म्हणतात त्यास सांपडली-व सध्यांच्या गोंवें प्रांतांत मोडणाऱ्या पेडणें महालांतील "हरिमल" ( हरमल ) गांवीं त्यानें तिची स्थापना केली. त्यावेळीं हा प्रदेश कुडाळ प्रांताचाच



श्रीदेव नारायण, वालावल.

B. A. P. Works.

एक भाग असून, तो कुडाळदेशकर देसाई किंवा सरदेसाई या राज्यकर्त्यांपूर्वीच्या त्याच ब्राम्हण ज्ञातीच्या स्वतंत्र राज्यांत मोडत


---

१ प्रभुघराण्याचा अंमल इ. स. च्या १५ व्या शतकाच्या मध्यानंतर वहामनी राजांच्या कारकीर्दीत सुरू झाला. तत्पूर्वी याच ब्राम्हण जातीच्या "**सामंत**" उपनांवाच्या घराण्याची मांडलिक व स्वतंत्र राजसत्ता, इ. स. च्या १२ व्या किंवा १३ व्या शतकापासून तों १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंत अव्याहत चालू असल्याचें दिसून येतें. या सामंत घराण्यानें श्रीनारायणाची स्थापना करून त्याला अग्रहारहि करून दिले.

श्रीनारायणाचा शिक्का.



श्रीनागसामंत यांचा शिक्का.



प्रसिद्ध "कृत्यदिवाकर" पुस्तकाचे कर्ते कै. दिवाकर महादेव भट्ट साधले यांनीं लिहिलेल्या श्रीनारायणाच्या वृत्तांतांत पुढीलप्रमाणें उपरोक्त सामंत राजांचा उल्लेख आढळतो. "श्रीमत्सामंतवर्यक्षितिपतय इमं ग्राममेवाग्रहारं । दद्युर्नारायणस्य प्रतिदिनमभिषेकादिकृद्भ्यो द्विजेभ्यः ॥

श्रीनारायणाचा शिक्का व या सामंत घराण्यांतील शेवटचा राजा **नागदेव** किंवा **नागसामंत** याचा उपलब्ध असलेला एक शिक्का व एक मोर्तब हीं बाजूला दिलीं आहेत.

मोर्तब.



प्रभु घराण्यांतील शेवटचा पुरुष नारायण प्रभु याला प्रस्तुतच्या सावंतवाडीकर सरदेसायांच्या एका पूर्वजानें जिंकून त्याचा मुलूख काबीज केल्यावर (इ. स. १६९६) नारायण प्रभूनें आपल्याकडचे परंपरागत जुने शिक्के व मोर्तबें वालावलीच्या

होता. "कुडाळ" (कुडुवलपत्तन*) हें त्या राजघराण्यानें राज्याचें मुख्य ठिकाण केल्यानंतर, तेथून जवळच असलेल्या निसर्गरमणीय अशा वालावल गांवीं या मूर्तीची स्थापना करण्यांत आली; व हा "श्रीनारायणदेव" त्या घराण्यानें आपला कुलदेव केला. गेल्या ३००-४०० वर्षांच्या जुन्या शिक्क्यांतसुद्धां श्रीनारायणाच्या नांवाखालीं राज्यकर्त्या पुरुषांचीं

श्रीनारायणाच्या स्वाधीन केलें; त्यांपैकीं हीं दोन व आणखी तीन मिळून पांच श्रीनारायणावरून काढून सावंतवाडी दरबारनें नेलीं, तीं इ. स. १८८८ मध्यें तेथील वेस्ट्रॉपम्यूझिअम नांवाच्या पदार्थसंग्रहालयांत ठेविलेलीं अद्याप तिथेंच आहेत. म्यूझिअमच्या पुस्तकांत हे शिक्के ( seals and signets ) सूर्यभान व चंद्रभान बंधूंचे असल्याचें लिहिलें आहे तें खरें नसून ते सामंत कुळातील शेवटच्या नागदेवाचे होत. प्रभु घराण्याचा उदय याच घराण्यांतून झाल्यामुळें ते त्या घराण्याकडे येणें, व त्याच्या विलयानंतर श्रीनारायणाकडे राहणें ( राहिले नाहींत हा भाग अलाहिदा ), इतिहासाला धरून होतें.

वर दिलेल्या श्रीनारायणाच्या अष्टकोणी शिक्क्यांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं श्रीविष्णूचीं चार आयुधें दिसत असून, ही मूर्ति जैनांची म्हणणाऱ्या वावदूकांना तें एक चोख उत्तर आहे. या सर्व शिक्क्यांतील लिपीचें वळण इ. स. च्या १२ व्या शतकांतील लिपीच्या वळणाशीं जुळतें आहे.

श्रीनारायणाच्या व श्रीनागसामंताच्या शिक्क्यांचा परस्परपोषक संबंध दाखविणारें त्यांतील अक्षर विशेषतः "श्री" हें होय. पहिल्या शिक्क्यांतील श्रीकारावर जशी एक लहानशी तिरवी रेघ दिसते, तशीच नागसामंताच्या शिक्क्यांतील दोन्ही श्रीकारांवर दिसून येते, व या दोन्ही शिक्क्यांतील अक्षरें एकाच वळणाचीं आहेत; त्यावरून हे सर्व शिक्के सामंत घराण्याशीं स्वलक्षण असल्याचे दिसून येतात.

प्रभु घराण्याच्या अमदानींतील ज्या देसायांचें कुलदैवत नारायण होतें, असे देसाई आपल्या शिक्क्यांत श्रीनारायणाच्या नांवाला अग्रस्थान देऊन ते आपल्या नांवाचा उल्लेख करीत असल्याचें ३०० वर्षांपूर्वीच्या जुन्या कागदांवरून दिसून येतें.

* कुडाळाचें हें प्राचीन नांव शके ११८५ ( इ. स. १२६३ ) च्या एका ताम्रपटांत आलें आहे.

नांवें आढळतात. तसेंच जुन्या कागदांत श्रीकाराच्या जागीं 'श्रीनारायण' हें नांव घातलेलें आढळतें, व त्यावरून वरील विधानास बळकटी येते. हरमलांतून ही मूर्ति वालावलीस आणिल्यावर तिची प्रस्तुत स्थलीं स्थापना होण्यापूर्वी, त्या गांवांतील " तुवांची राई " या ठिकाणीं कांहीं काल ठेवण्यांत आली होती. नंतर कुडालाधिपति **चंद्रभान** व **सूर्यभान** या बंधुद्वयापैकीं सूर्यभान प्रभु या राजपुरुषानें तेथील देवस्थानची व्यवस्था अव्याहत चालू राहावी म्हणून राज्यांतील उत्पन्न लावून दिलें, तें निरनिराळ्या राज्यक्रांत्यांतून थोड्याशा फरकानें अद्यापपर्यंत चालू आहे. सूर्यभान प्रभूच्या या उदार कृतीबद्दल वे. शा. सं. रेडेशास्त्री यांनीं **"साधो, तूं धन्य लोकीं कृति करुनि कुडाळेश्वरा धन्य ! राया ॥"** असे धन्यवाद गाईले आहेत. मागें लिहिलेल्या कल्याण पुरुषाची समाधि देवलयाच्या समोर दीपमाळेच्या बाजूस बांधलेली आहे.

विविधज्ञानविस्तार पुस्तक १८ अंक ४ यांत ही मूर्ति व पंढरीच्या विठोबाची मूर्ति या दोन्ही " जैनमूर्ति असल्याचा समज आहे " असें लेखकानें तर्कटी विधान केलें आहे. विठोबाच्या उजव्या हातांत शंख व डाव्या हातांत पद्म आहे, छातीवर भृगुलांच्छन आहे, गळ्यांत कौस्तुभमणी आहे व कानांत मत्स्याकृति कुंडलें आहेत. शिवाय जैनांच्या मूर्तीप्रमाणें ती मूर्ति नग्न नाहीं. नारायणाच्या मूर्तीलाहि वरच्यासारखींच चिन्हें असून, तीहि नग्न नाहीं. यावरून वरील आधुनिक लेखकाच्या तर्काला यत्किंचित्‌हि जागा राहत नाहीं. शिल्पकलेच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास श्रीनारायणाची ही मूर्ति द्वारकेच्या बाजूची नसून ती उत्तरेकडील, व विशेषतः गौड ( बंगाल ) देशांतील असली पाहिजे, असें कांहीं जणांचें मत आहे. प्राचीन गौडीयन् साम्राज्यांतील शिल्पकलेचे जे अवशेष सध्यां उपलब्ध आहेत, त्यांत या नमुन्याच्या मूर्ति आजमितीसाहि आढळतात.

देवस्थानचीं रोजचीं व उत्सवाचे वेळचीं सर्व लहानथोर कृत्यें अबाधित चालू राहावीं यासाठीं केलेली व्यवस्था फार नमुनेदार आहे. या

ठिकाणीं चैत्र शुद्ध नवमीस मोठा उत्सव होतो. त्या वेळीं पुष्कळ गोर-गरीब, अतिथि, अभ्यागत वगैरे लोकांची जेवणाची फार गैरसोय होते हें पाहून, व नेहमीं या जागृत दैवताच्या सेवेला येऊन राहणाऱ्या लोकांची अडचणहि कायमची दूर व्हावी म्हणून, भाऊसाहेबांनीं सन १९१० चे सुमारास वालावल मुक्कामीं श्रीनारायणाचे देवालयानजीक एक कायमचें अन्नसत्र सुरू केलें, व तत्प्रीत्यर्थ दरसाल १२०० रुपये खर्च करण्याची व्यवस्था केली. कोंकणांत अशा प्रकारचें अन्नसत्र इतरत्र बहुतेक नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. या अन्नसत्राची व्यवस्था गांवांतील व इतर प्रतिष्ठित गृहस्थांच्या एका मंडळाकडे नेमून दिली असून, त्यामार्फत त्याचा खर्च चालू असतो. परंतु पुढें महागाईमुळें ही रकम अपुरी पडेल असें दिसून आल्यामुळें, या अन्नसत्राच्या वार्षिक खर्चाकरितां दरसाल १८०० रुपये येतील इतकी रकम भाऊसाहेबांनीं काढून ठेविली आहे. हें अन्नसत्र सुरू केल्यापासून देवास येणाऱ्या पुष्कळ लोकांची सोय झालेली आहे, व दरवर्षीं हजारों लोक भाऊसाहेबांच्या या दातृत्वाचा फायदा घेत असतात. याशिवाय श्रीनारायणास नित्य रुद्राभिषेक करण्यासाठीं व रामनवमीच्या उत्सवाकरितां म्हणून अनुक्रमें ६०० रुपये व २०० रुपये वार्षिक खर्च करण्याची त्यांनीं व्यवस्था करून ठेविली आहे.

ज्या दुसऱ्या धार्मिक संस्थेला भाऊसाहेबांनीं मदत करून उर्जितावस्थेस आणलें, ती वेंगुर्लें तालुक्यांतील **श्रीमठ संस्थान दाभोली** ही होय. हा मठ दाभोली गांवीं दोन डोंगरांच्या मध्यें स्थापन केलेला असल्यामुळें

१ वालावल गांवचा असा रिवाज आहे कीं, त्या गांवांतील लोकांनीं सेवेसाठीं नृसिंहवाडी येथें किंवा यात्रेसाठीं पंढरपुरास न जातां वालावलीसच श्रीनारायणाची सेवा करावी. नृसिंहवाडीस गेलेल्या व्याधिग्रस्त लोकांना ' श्रीनारायणाची सेवा करून व्याधिमुक्त व्हावें ' म्हणून दृष्टांत झाले आहेत. प्रतिवर्षीं श्रीनारायणाकडची तुळसीची माळ श्रीपांडुरंगाला पाठविली जाते, व श्रीपांडुरंगाकडची माळ आणून श्रीनारायणास घातली जाते. ही माळेची नेआण करणाऱ्याला इनाम जमीन सुटलेली आहे.



श्रीमठ संस्थान दाभोली.

B. A. P. Works.

आसमंतात् गर्द झाडी आहे. मठाच्या पश्चिम बाजूस जिवंत डोंगरी झरा असलेली प्रशस्त अशी पुष्करणी आहे. वसंत व ग्रीष्म ऋतूंतसुद्धां ही पुष्करणी पाण्यानें तुडुंब भरून वाहत असते. हा मठ चरित्रनायकांच्या ज्ञातीचें गुरुपीठ असून त्याची स्थापना इ. सन १७४५ च्या सुमारास करण्यांत आली. यापूर्वींच्या मठांपैकीं **स्वर्णवट** व **चिंदर मठ** व नंतरचा **नृसिंहवाडी मठ** हे सामाजिक व राजकीय क्रांतीमुळें परस्वाधीन झाले. जुन्या मठांपैकीं **गोळवण** येथील एकच मठ आतां या ज्ञातीच्या ताब्यांत आहे. राज्यक्रांतीमुळें प्राप्त झालेल्या ज्ञातीच्या अवनत काळांत दाभोली मठाची स्थापना झाल्यामुळें, मठाच्या दर्ज्यास साजण्यासारखें मठाला उत्पन्न नव्हतें. हा मठ गुरुपरंपरेनें **श्रीमदाद्यशंकराचार्यान्वयी** असून, त्यावेळीं **श्रीविद्यापूर्णानंद** या नांवाचे फार तेजस्वी मठाधीश या मठांत होऊन गेले. त्यांची पुढील शिष्यप्रशिष्यपरंपरा मठाच्या लहानशा उत्पन्नावर आपला योगक्षेम चालवून आपलें धर्मसंरक्षणाचें व प्रसाराचें कार्य यथायोग्य करीत असत. भाऊसाहेबांच्या मनांत परमेश्वर कृपेनें आपल्याला लाभलेल्या संपत्तीचा कांहीं भाग आपल्या ज्ञातीच्या गुरुस्थानीं असलेल्या या मठाचे खर्चाकरितां अर्पण करावा असें वाटून, त्यांनीं सन १९१० सालच्या सुमारास वार्षिक खर्चासाठीं व मठाच्या इतमामाकरितां दरसाल १२०० रुपये व वार्षिक गुरुदक्षिणेप्रीत्यर्थ १०० रुपये मिळून एकंदर १३०० रुपये व्याजाचे येतील इतकी रकम देऊन ठेविली आहे.


शिवाय त्यांनीं याच मठास जोडून वैदिक शिक्षण देण्यासाठीं **वेदशाळा** स्थापन करावयास लावून, तिच्या खर्चाकरितां दरसाल ६०० रुपये खर्च करण्याची तजवीज केली आहे. याप्रमाणें मठाप्रीत्यर्थ दरसाल १९०० रुपये भाऊसाहेबांमार्फत खर्च केले जातात. या मठाचे गादीवर सांप्रत **श्रीविद्याविमलानंदस्वामी** ह्यांच्यासारख्या तेजस्वी पुरुषाची स्थापना झाल्यापासून, व संस्थेला भाऊसाहेबांसारख्या दानशूर शिष्याचें सांपत्तिक साहाय्य मिळाल्यामुळें, मठाची व्यवस्था सुधारून त्याचीं

कामेंहि समाधानकारक चाललीं आहेत. अलीकडे वार्धक्यामुळें श्रींनीं परंपरेला **श्रीविद्यापूर्णानंद** नांवाचे शिष्य करून ठेविले आहेत.

इ. स. १९१५ सालीं **श्रीमत्मपरमहंस परिव्राजकाचार्य श्रीविद्याविमलानंदस्वामींची** स्वारी संस्थानच्या लव्याजम्यासहित, संचारार्थ मुंबई, वसई या प्रांतीं आल्यावेळीं त्यांचा मुंबईतील मुक्काम भाऊसाहेबांच्या बंगल्यावर झाला होता. त्या वेळीं श्रींचें झालेलें थाटाचें स्वागत, अन्नसंतर्पण, ब्राम्हणभोजन व गुरुदक्षिणा यांप्रीत्यर्थ भाऊसाहेबांनीं हजारों रुपये खर्च केला. श्रींची स्वारी आल्यापासून परत जाईपर्यंत मंत्रजागर, पाद्यपूजा, हरिकीर्तनें, प्रवचनें, व्याख्यानें, गायन वगैरे विविध प्रकारचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडलेला पाहून, श्रींनीं आपला संतोष व्यक्त केला.

ईश्वरसेवेप्रीत्यर्थ भाऊसाहेबांनीं ज्या ठिकाणीं मोठी रकम खर्चिली असें आणखी ठिकाण म्हटलें म्हणजे मुंबईजवळील **गोरेगांव** हें होय. त्यांच्या गोरेगांवांतील मिळकतींत “ **श्रीदेवी अंबाबाई** ” या नांवाचें देवस्थान आहे. हें देवालय लहानच असून त्या वेळेस जीर्णावस्थेस पोंचलें होतें. भाऊसाहेबांनीं सुमारें ९००० रुपये खर्चून देवालयाची दुरुस्ती करून त्याचा सभामंडप, घुमट वगैरे पोरबंदरी दगडांनीं नवा बांधिला. शिवाय रोजच्या महाभिषेकादिक पूजेअर्चेसाठीं व इतर देवळासंबंधी खर्चासाठीं रुपये ३९००० काढून ठेवले आहेत.

भाऊसाहेबांचें शिक्षण फारसें झालें नसल्यामुळें त्यांस फार खेद होत असे. त्यांच्या व्यवसायांत शिक्षणाभावाची अडचण त्यांस वरचेवर वाटत असे; व त्यावरून त्यांस शिक्षणाच्या महत्वाची तीव्र जाणीव असल्यामुळें, ते गरीब व हुशार मुलांच्या जेवणाखाण्याची सोई लावून त्यांस शिष्यवृत्त्याहि देत असत. धार्मिक प्रवृत्तीमुळें आरंभीं त्यांच्या दानधर्माचा ओघ जरी त्या दिशेनें वाहिला, तरी पुढें शिक्षणप्रसारार्थ



**दाभोली मठाधीश श्रीमत् विमलानंदस्वामी व त्यांचा परिवार.**

(सन १९१५ सालीं मुंबई येथें भाऊसाहेबांच्या बंगल्यावर घेतलेला फोटो)

आपण कांहींतरी करावें असें त्यांच्या मनांत येऊं लागलें, व त्यास मूर्त स्वरूप येण्याचा योगायोगहि लवकरच जुळून आला, तो असा.

सन १९११ चे आरंभीं मालवण येथील कांहीं पुढाऱ्यांनीं मालवण येथें एक नमुनेदार हायस्कूल चालविण्याचा विचार केला. मालवण हें रत्नागिरी जिल्ह्यांतील एक मुख्य शहर असून, शिक्षणाचे बाबतींत या तालुक्यांतील मंडळी बरीच पुढें गेली आहे. हायस्कूलाच्या स्वरूपाची नमुनेदार संस्था चालविण्याला पैशाचें विपुल साहाय्य लागतें. तेव्हां अशा प्रकारच्या विवंचनेंत पुढारी मंडळी असतां, त्यांची व कै. **रा. ब. अच्युत भास्कर ऊर्फ बापूसाहेब देसाई** यांची गांठ पडली. मंडळींनीं हायस्कूलाबद्दलचे आपले विचार त्यांचेपुढें मांडले. बापूसाहेब हे स्वतः शिक्षणाचे प्रसारार्थ खटपट करणारे एक वजनदार गृहस्थ होते. इतक्याच सुमारास गोरेगांव येथील कै. **लक्ष्मण कृष्ण सामंत** हे विद्याप्रसारार्थ बरीच मोठी रकम खर्च करणार आहेत, अशी बातमी या मालवणच्या मंडळीस समजली; व त्यांनीं सामंतांकडे जातांना आपल्याबरोबर येण्यास बापूसाहेब देसाई यांना विनंति केली. ही सर्व मंडळी मुंबईस गेल्यावर भाऊसाहेब यांचे घरीं उतरली. भाऊसाहेब व बापूसाहेब यांचा बऱ्याच वर्षांचा दृढ परिचय होता व चांगला स्नेहहि होता. एके दिवशीं बोलतां बोलतां मालवणची मंडळी कोणत्या कामाकरितां आली आहे हें भाऊसाहेबांना समजलें. कै. सामंतांनीं आपल्या रकमेची निराळी व्यवस्था करण्याचें ठरविलें असल्यावरून या मंडळीचा कार्यभाग होण्यासारखा नव्हता, व ती मंडळी निराश होऊन परत जाण्याच्या बेतांत होती, असेंहि भाऊसाहेबांना ह्याच समयीं कळलें. भाऊसाहेब व्यापारउद्योगांत गढलेले व त्यांतूनहि अशिक्षित, तेव्हां त्यांला विद्येची महति माहीत नसावी, असा या मंडळीचा पूर्वग्रह बनला होता; म्हणून त्यांचेकडे इतके दिवस राहिले असूनहि आपल्या कामासंबंधी माहिती त्यांनीं

भाऊसाहेबांना दिली नव्हती, ती ओघानें संभाषणांत बाहेर पडली. भाऊसाहेबांस शिक्षणाचे बाबतींत कांहीं योजना करावयाचीच होती; मात्र तिची दिशा त्यांनीं अद्याप ठरविली नव्हती. आपल्याकडे आलेल्या मंडळींनीं स्वयंस्फूर्तीनें व सद्धेतुमूलक उदार भावनेनें प्रेरित होऊन शिक्षणप्रसाराचें काम हातीं घेतलें आहे व त्यांस निराश होऊन परत जाऊं न देतां मदत केल्यानें शिक्षणासारख्या उच्च प्रतीच्या दानाचें श्रेय घडेल, अशी भाऊसाहेबांचे परम मित्र बापूसाहेब यांनीं त्यांची शिफारसवजा खात्री करून दिली. तेव्हां भाऊसाहेबांनीं शाळेकरितां १०००० रु. देण्याचें आश्वासन दिल्यावर मालवणची मंडळी प्रसन्न मनानें परत गेली; व त्यांनीं लगेच ता. १० एप्रिल सन १९११ रोजीं मालवण येथें **अनंत शिवाजी देसाई टोपीवाले हायस्कूल** या नांवानें शाळा सुरू केली. रा. ब. बापूसाहेब देसाई यानींहि इतर ठिकाणीं फिरून मदत मिळवून देण्याचें कबूल केलें. या कामीं पुढाकार घेणारे मालवणचे गृहस्थ म्हटले म्हणजे रा. रा. **कृष्णराव सीताराम देसाई**, रा. रा. **बाबुराव गोपाळ वराडकर** बी. ए., रा. रा. **विनायक वासुदेव आजगांवकर** बी. ए., व डॉ. **राजाराम वासुदेव आजगांवकर** एल. एम्. ॲण्ड एस्. हे होत.

या मंडळींनें दहा हजार रुपयांच्या देणगीच्या आधारावर हायस्कूल उघडलें व हुरुपानें कामास सुरवात तर केलीच; परंतु पुढें निरनिराळ्या कारणांमुळें एवढ्या लहान रकमेवर शाळा चांगल्या प्रकारें चालेल असें दिसेना. पुढें यासंबंधाच्या अडचणी भाऊसाहेब यांच्या नजरेस आल्यावरून, त्यांनीं प्रारंभींची आपली १०००० रुपयांची देणगी हळूहळू सवा लक्षावर नेली. त्यांनीं शाळेकरितां व पुढें होणाऱ्या बोर्डिंगाकरितां म्हणून एकंदर १५ एकर जमीन घेऊन शाळेस एक भव्य इमारत बांधून दिली; व शाळेच्या खर्चास तूट पडूं नये आणि होतकरू व गरीब विद्यार्थ्यांस



अनंत शिवाजी देसाई टोपीवाले हायस्कूल, मालवण.

B. A. P. Works.

शिष्यवृत्त्या देतां याव्या म्हणून दरसाल ३००० रु. व्याज येईल इतकी रकम चरिटेबल एंडाउमेंट ट्रस्टकडे कायमची देऊन ठेविली आहे. ही शाळा चांगल्या रीतीनें चालली असून त्या प्रांतांतील सर्व ज्ञातींच्या विद्यार्थ्यांना तिचा उपयोग होत आहे.

या शाळेकरितां इतका पैसा खर्च करूनहि भाऊसाहेब यांनीं संस्थेच्या अंतर्व्यवस्थेंत कोणत्याहि प्रकारें आपला प्रत्यक्ष हात ठेवलेला नाहीं. त्यांनीं सर्वदा सार्वजनिक तत्वावर या हायस्कूलाची व्यवस्था चालावी अशा धोरणानें '**मालवण एज्युकेशन सोसायटी**' च्या स्वाधीन ही संस्था करून ठेविली आहे.

या हायस्कूलाचें काम पुरें झाल्यावर त्या संस्थेची उपयुक्तता पाहून व आपण खर्चिलेली रकम योग्य कार्यास लागली असें मनांत येऊन, भाऊसाहेबांना एक प्रकारची धन्यता वाटे; व तेव्हांपासून त्यांचें शिक्षणप्रसाराकडे लक्ष वेधलें. यापुढें सार्वजनिक शिक्षणसंस्थांस मदत मागण्यासाठीं जे जे कोणी आले त्या बहुतेकांना आपल्या सवडीनुसार देणग्या द्यावयास त्यांनीं हात आंखडता घेतला नाहीं. धार्मिक संस्थांस मदत करून त्यांनीं आपल्या दानधर्मास प्रारंभ केला खरा, पण त्यांनीं केलेल्या दानधर्मांपैकीं ठळक बाबींची यादी या प्रकरणाच्या शेवटीं दिली आहे, तीवरून खर्चिलेल्या द्रव्याचा बराचसा भाग शिक्षणविषयक संस्थांला वाहिलेला आहे, असें दिसून येईल. शाळा, वाचनालयें व शिष्यवृत्त्या यांनींच त्यांच्या औदार्याचें क्षेत्र व्यापिलें आहे. धार्मिक बाबी हा त्यांच्या औदार्याचा आत्मा असला तरी, विद्याप्रसार हेंच शेवटीं त्यांचें मूर्धस्थान बनलें; आणि भाऊसाहेब यांस परमेश्वरकृपेनें दीर्घायुष्य प्राप्त झालें असतें तर, त्यांचे हातून झाला ह्याच्याहून कितीतरी पट अधिक लाभ सार्वजनिक लोकोपयोगी संस्थांस झाला असता, असें अखेरी-अखेरीस अशा सत्कृत्यांकडे त्यांच्या मनाचा जो ओढा लागला होता त्यावरून आम्हांस खात्रीपूर्वक वाटतें.

वालावल गांवीं मराठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून बऱ्याच वर्षीं-पूर्वीं भाऊसाहेबांनीं कांहीं रकम देऊन तेथील शाळागृह बांधून दिलें होतें, व त्या शाळेंत इतर गांवांप्रमाणें सात इयत्तांपर्यंत शिक्षण दिलें जात असे. परंतु इंग्रजी शिक्षणाकरितां तेथील मुलांना जवळच असलेल्या कुडाळ अथवा मालवण शहरीं जावें लागत असे. या आपल्या गांवीं इंग्रजी शिक्षणाची कांहींतरी सोय करावी, असे विचार त्यांच्या मनांत बरेच दिवस येऊं लागले होते. परंतु विचार कृतींत उतरण्याची संधि अद्याप आली नव्हती. सन १९२० च्या फेब्रुआरी महिन्यांत त्यांची पत्नी सौभाग्यवती नर्मदाबाई या स्वर्गवासी झाल्या, व बरींच वर्षे जिच्या प्रेमळ सहवासांत आपण घालविलीं व जिनें संसार चालविण्यास आपणास मदत केली त्या प्रियपत्नीच्या चिरवियोगामुळें भाऊसाहेबांस फार दुःख झालें. त्या वेळीं आपल्या पत्नीच्या नांवानें कांहींतरी दानधर्म करावा असें त्यांच्या मनांत आलें. यासंबंधीं विचार करून त्यांनीं मृतपत्नीच्या स्मरणार्थ वालावल मुक्कामीं तिच्या नांवाची पांच इयत्तांपर्यंत इंग्रजी शिक्षण देणारी एक शाळा स्थापन करावी असें ठरविलें. आपल्या हातानें जीं कांहीं दानकृत्यें होतील तीं आपल्या मागें सुरळीत अखंड चालावीं म्हणून, त्या त्या कृत्याकरितां निरनिराळ्या रकमा त्यांनीं काढून ठेविलेल्या आहेत. या आपल्या निश्चयाप्रमाणें व्यवस्था करतांना वालावल हा गांव सावंतवाडी संस्थानांत असल्यामुळें, अर्थात्च त्यांस सावंतवाडी सरकाराशीं बोलणें लावावें लागलें. सावंतवाडी संस्थानचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर **रावसाहेब आप्पासाहेब सबनीस** यांच्याकडे हें प्रकरण येतांच त्यांनीं या कामीं भाऊसाहेब यांस स्वतः भेटून, शाळा निरंतर चालू ठेवण्याबद्दल व अगदीं अल्प फी घेऊन शिक्षण देण्याबद्दल ठराव केल्यावर, भाऊसाहे-बांनीं शाळेच्या इमारतीकरितां ४००० रु. व शाळेच्या वार्षिक खर्चा-साठीं १२०० रु. निरंतर येतील इतकी रकम म्हणजे ३०,००० रु.

दिले व शाळेस '**नर्मदाबाई अनंत शिवाजी देसाई इंग्लिश स्कूल**' असें नांव दिलें. याप्रमाणें त्यांनीं आपल्या गत पत्नीच्या स्मारकरूपानें आपल्या गांवांतील सर्व मुलांच्या इंग्रजी शिक्षणाची सोय करून ठेविली आहे.

ज्या रकमांचें वार्षिक व्याज सुमारें २२,२०० रुपये येईल येवढ्या मोठ्या रकमा, निरनिराळ्या कार्यांसाठीं भाऊसाहेबांनीं निराळ्या काढून ठेवल्या आहेत. यांशिवाय प्रसंगविशेषीं ज्या त्यांनीं रकमा दिल्या त्या निराळ्या. आम्हांस मिळालेल्या यादींतील ठळक रकमांचें सामान्य दिग्दर्शन येथें करितों:—

## विद्यावृद्धि.

| | | |
|---|---|---|
| रु. | ३,००,००० | फॉरिन एज्युकेशन स्कॉलरशिप फंड; बाँड व रोख मिळून. |
| ,, | १,२५,००० | अनंत शिवाजी देसाई हायस्कूल, मालवण. |
| | | ८०,००० शाळेच्या खर्चासाठीं. |
| | | ४५,००० इमारतीसाठीं खर्च. |
| ,, | ३४,००० | सौ० नर्मदाबाई अनंत शिवाजी देसाई इंग्लिश स्कूल, वालावल. |
| ,, | १,००० | कुडाळदेशस्थ गौडब्राह्मण विद्यावृद्धि समाज. |
| ,, | १,००० | गिब हायस्कूल, कुमठें. |
| ,, | ५०० | वालावल मराठी शाळा. |
| ,, | ५०० | परुळें येथील न्यू इंग्लिश स्कूल. |
| ,, | १,८०० | मुणगें येथील शाळा. |
| ,, | ५०० | जॉर्ज इंग्लिश स्कूल, वेंगुर्लें. |
| ,, | २०० | मालाड येथील शाळा. |
| ,, | १०१ | पार्डी स्कूल. |
| ,, | ५०० | मराठी शाळा, गोवें. |
| ,, | १,१०१ | सारस्वत विद्यार्थी साहाय्यकारी संस्था. |

## धार्मिक संस्था.

| | | |
|---|---|---|
| रु. | ४७,५०० | श्रीमठ संस्थान दाभोली व वेदशाळा. |

रु. १६,००० श्रीनारायण देवस्थान, वालावल; रोज सात रुद्राभिषेकां-प्रीत्यर्थ कायम भांडवल.

„ ४५,००० अन्नछत्र व श्रीरामजयंत्युत्सव, वालावल.

„ १०,५०० श्रीदेव नारायणास सुवर्णमुकुट,इस्ताद,इत्यादि वस्तु दिल्या त्यांची किंमत व धर्मशाळा वगैरेच्या दुरुस्तीसाठीं खर्च.

„ ३९,००० श्रीदेवी अंबाबाई, गोरेगांव, कायमचे खर्चासाठीं भांडवल.

„ ९,००० श्रीदेवी अंबाबाई, गोरेगांव, देवळाची दुरुस्ती व इमारत यांसाठीं खर्च.

„ १,५०० झारापी येथील श्रीभावईचे देवळाची दुरुस्ती व श्रीदेवीची अर्चा.

„ ६३० गुरुचरित्रशतपदावलि ग्रंथाचा छपाईखर्च—नृसिंहवाडी येथील पुजारी यांस दिले.

„ २०१ गुजराथी मंदीरदुरुस्ती खर्च.

„ १५० लोहगड येथील श्रीमहादेवाच्या देवळासाठीं.

„ १०१ बागलांची राई येथील समाधीची दुरुस्ती.

„ १०० मालवण येथील श्रीमुरलीधराच्या देवळासाठीं.

„ १०० मालवण येथील श्रीमारुतीच्या देवळाच्या दुरुस्तीसाठीं.

## इतर किरकोळ देणग्या.

रु. १०,००० वालावल गांवांतील रस्त्याची दुरुस्ती.

„ १,०८३ वालावल येथील पुजाऱ्याचे घरासाठीं.

„ १,००० सॅनिटरी ( आरोग्यरक्षण ) खात्याकडे.

„ ७५० वॅार रिलीफ फंड.

„ १,३५० अनंत शिवाजी देसाई लायब्ररी कुडाळ.

„ ६,००० संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण परिषदेला मदत.

„ १०० डॉ. सांबारे स्मारक फंड.

„ १,००० मालवण हॉस्पिटल मिडवाईफ फंड.

## प्रकरण १४ वें.

# गौरव.

सामन्य समाजाचें लक्ष भाऊसाहेबांकडे त्यांच्या धार्मिक देणग्या सुटूं लागल्यापासून ओढलें गेलें. त्यापूर्वीं ते एक प्रागतिक व्यापारी असून त्यांच्या घरीं लक्ष्मीदेवी प्रसन्न चित्तानें वास्तव्य करून राहिली आहे, एवढीच त्यांच्यासंबंधानें लोकांस माहिती होती. द्रव्यार्जना-पलीकडे भाऊसाहेबांच्या अंगीं कांहीं गुण आहेत, अशी कोणास कल्पनाहि नव्हती. याच कारणामुळें, मालवणाहून शाळेस मदत मिळविण्यासाठीं आलेली मंडळी प्रत्यक्ष त्यांच्या घरीं राहिली असूनहि, भाऊसाहेबांजवळ शाळेसंबंधीं गोष्ट काढण्याचें कोणास सुचलें नाहीं. जगाची रीतच अशी आहे. प्रत्यक्ष सूर्यनारायण आपल्या किरणद्वारें उजेड व उष्णता पोंचवितो, तेव्हांच कोठें जनतेचें लक्ष वेधलें जाऊन त्यास नमस्काराची प्राप्ति होते. तद्वत्‌च मनुष्यानें आपले गुण व कृति लोकांच्या निदर्शनास प्रत्यक्ष आणिल्याशिवाय त्याची खरी ओळख पटणें शक्य नाहीं.

भाऊसाहेबांचें समाजहिताचें किंवा देशहिताचें कार्य दोन प्रकारचें होतें. एकतर त्यांनीं देणग्यांच्या द्वारें शैक्षणिक व धार्मिक बाबतींत समाजकल्याण केलें, व दुसरें त्यांनीं नवीन प्रकारच्या उद्योगधंद्यांत भर घालून देशहित साधलें. पैकीं पहिल्या प्रकाराची ओळख समाजास पटली, व प्रत्यक्ष लाभ होत गेल्यामुळें समाजांनीं त्यांचा अभिनंदनपर व आभार-प्रदर्शक सभा भरवून मानपत्रांच्या द्वारें गौरव केला; व त्यांच्याविषयीं आपल्या मनांत उत्पन्न झालेला आदरभाव व्यक्त केला. दुसरा प्रकार मात्र,

त्यांचा ॲल्युमिनीमचा नव्या धरतीचा कारखाना डोळ्यांसमोर असूनहि, त्याचें राष्ट्रहितपोषक स्वरूप समाजाचे लक्षांत न आल्यामुळें, मान्यता पावल्याशिवाय तसाच राहिला; व त्याचें कारणहि उघड आहे.

ब्रिटिश अमदानीच्या पूर्वी, वारंवार होणाऱ्या राज्यक्रांत्यांनीं सर्व हिंदी समाज जर्जर झाला होता. ती स्थिति ब्रिटिश राज्यांत पालटल्यामुळें लोकांस स्वास्थ्य अनुभवावयास मिळालें. या स्वास्थ्याचा परिणाम लोकांवर इतका झाला कीं, लोक आपल्या देशास विसरून पोटभरू व स्वार्थसाधु बनले. स्वदेशांतील कच्चा माल परदेशीं जाऊन तिकडे त्याचा पक्का माल बनून इकडे येऊं लागल्यामुळें, स्वदेशांतील उद्योगधंदे बुडून देशाचें आर्थिक दृष्ट्या किती अनहित होत आहे, याची कोणास कल्पना झाली नाहीं; अथवा झाली तरी, पिढ्यान्‌पिढ्या आपस्वार्थीपणा अंगांत मुरल्यामुळें, अल्पश्रमानें स्वतःची तुंबडी भरण्याचें सोडून, उद्योगधंद्यासारख्या कष्टप्रद कार्यांत पडण्याकडे लोकांची प्रवृत्ति सहसा होत नसे. अलीकडे तीसचाळीस वर्षांत मात्र हा देशाच्या संपत्तीचा होत असलेला ऱ्हास विद्वान् पुढाऱ्यांच्या लक्षांत आला, व देशी उद्योगधंद्यांची वाढ हें एक राजकारणांतील प्रकरण आहे, याची जाणीव त्यांस होऊं लागली. **कै. रानडे, दत्त, टिळक** व इतर देशभक्त यांनीं समाजास खडबडून जागें करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नानें समाज जागा झाला तरी अजून पूर्णपणें जागा न होतां, एखाद्या गाढ निद्रेंतल्या मनुष्यास हालविलें असतां तो जसा जांभया देत अर्धवट जागृत व अर्धवट निद्रिस्त अशा स्थितींत असतो, तशाच स्थितींत आहे, असें म्हणणें प्राप्त होतें. समाजाची आजकाल अशी स्थिति असल्यामुळें, भाऊसाहेबांनीं नवीन उद्योगधंदे काढून देशहिताचें कार्य अंशतः केलें, हें त्यांचे लक्षांत आलें नाहीं. विश्वकर्म्याच्या कालापासून तों थेट स्वतंत्र हिंदु-मुसलमानी राज्यें होतीं तोंपर्यंत, एखादा कुशल कारागीर, योजक

कल्पक, अगर हुन्नरी पुरुष राजदरबारीं व लोकसमूहांत मानमान्यता पावत असे. विलायतेंत व अमेरिकेंत तर आजमितीससुद्धां हा प्रकार चालू आहे. त्या देशांत कल्पकतेच्या व नव्या क्लृप्तींच्या जोरावर उद्योगधंद्यांत भर घालून देशहित केल्यामुळें लॉर्ड झालेले, अथवा औद्योगिक संघांमार्फत प्रोत्साहनाप्रीत्यर्थ सार्वजनिक आदरसत्कार पावलेले लोक थोडेथोडके नाहींत. परंतु त्यांच्या इतक्या विशाल दृष्टीनें पाहण्याची सवई आह्मांस अद्याप लागली नसल्यामुळें त्या बाबतींत समाजाकडून भाऊसाहेबांचा गौरव झाला नाहीं. असो.

भाऊसाहेब कांहीं दिवस थारेपालट करण्यासाठीं नियमितपणें कोंकणांत जात असत. सन १९१३ सालीं ते असेच गेले असतां, त्यांनीं मालवण येथील हायस्कूलासाठीं सवा लक्ष रुपयांची देणगी दिली त्याबद्दल आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठीं, मालवण येथील नागरिकांनीं अभिनंदनपर व आभारप्रदर्शक सभा भरवून भाऊसाहेबांस पुढील मानपत्र अर्पण केलें:—

**श्रीलक्ष्मीनारायण प्रसन्न.**

श्रीमंत राजमान्य राजश्री **अनंत शिवाजी देसाई टोपीवाले** यांसी:—मालवण येथील नागरिकांकडून हें मानपत्र अत्यंत नम्रतापूर्वक व कृतज्ञतापूर्वक अर्पण करण्यांत येत आहे.

आपण आपल्या उद्योगशीलतेनें आणि व्यवहारनैपुण्यानें जी स्पृहणीय सांपत्तिक स्थिति प्राप्त करून घेतली आहे व अशा रीतीनें नवीन पिढीच्या लोकांस आत्मोद्धाराचें जें एक उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे, त्याबद्दल आम्ही आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करितों.

आमच्या मालवण शहरांत इंग्रजी शिक्षणाची कायमची व्यवस्था करण्यासाठीं सवा लक्ष रुपये देऊन '**अनंत शिवाजी देसाई टोपीवालें हायस्कूल**' च्या रूपानें आपल्या थोर औदार्याचें जें अखंड स्मारक

आपण उभारून ठेविलें आहे, त्याचा उपयोग कोंकणपट्टींतील लोकांस पुष्कळच होत आहे; व त्याबद्दल आपले आभार व्यक्त करण्याची संधि आम्ही साधून घेत आहोंत.

ज्ञानासारखी पवित्र वस्तु दुसरी नाहीं; '**नहि ज्ञानेन सदृशं पवित्र-मिह विद्यते**' असें खुद्द भगवंताचें वचन आहे. आणि त्या ज्ञानाचा लाभ आपण आपल्या देशबांधवांस करून दिला आहे. आयुष्याची—मानवजन्माची—ही कृतार्थता संपादन करण्याचें भाग्य फारच थोड्या लोकांच्या नशिबीं असतें. ईश्वरकृपेनें तें भाग्य आपल्या वांट्यास आलें आहे, याबद्दल आम्हांस मोठा अभिमान वाटत आहे; आणि हें मानपत्र त्याचेंच निदर्शक होय.

आपल्या देशबंधूंनीं सप्रेम अर्पण केलेल्या या मानपत्राचा स्वीकार आपण प्रेमानें करावा अशी आपणास आमची नम्र विनंति आहे; व त्या सच्चिदानंद दयाघन प्रभूनें आपणास पूर्ण आयुरारोग्य द्यावें अशी त्याजपाशीं आम्ही अंतःकरणपूर्वक प्रार्थना करितों.

मालवण.
ता. ३१ मार्च १९१३ } आपले.
**माधवराव सोमजी मोरे, व इतर.**

तसेंच सन १९१५ सालीं मुंबईस श्रीसंस्थान दाभोली मठाधीश **श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्विमलानंदस्वामीमहाराज** यांची स्वारी आली असतां, भाऊसाहेबांनीं श्रींची व त्यांच्या परिवाराची बरदास्त श्रींच्या उच्चपदास साजेल अशा प्रकारें ठेविली व शिष्यमंडळीसहि श्रींची दर्शन—पूजनादिसेवा यथायोग्य घडेल अशी व्यवस्था ठेविली होती. या समयाची संधि साधून स्थानिक **गौड ब्राम्हण सभेनें,** भाऊसाहेबांनीं अनेक दिशांनीं देणग्या देऊन ज्ञातीच्या उत्कर्षास हातभार लाविल्यामुळें, त्यांच्याविषयीं मनांतील आदरभाव व्यक्त करण्यासाठीं आपल्या सभागृहांत ज्ञातीची सभा भरविली, व त्या सभेंत मुंबई, वांद्रें,

वसई, अर्नाळा वगैरे ठिकाणची ज्ञातींतील सर्व दर्जांची शेकडों मंडळी जमली होती. सदरहू सभेंत भाऊसाहेबांच्या गुणवर्णनपर भाषणें होऊन भाऊसाहेबांस एक मानपत्र अर्पण करण्यांत आलें. सदरहू मानपत्र खालीं दिलें आहे.

ॐ

॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

# मानपत्र.

श्रीमंत राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **अनंत शिवाजी** ऊर्फ **भाऊसाहेब देसाई टोपीवाले,** मुक्काम मुंबई, यांसीं:—

गौड ब्राह्मण सभेचे अध्यक्ष व सभासद यांचे सप्रेम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.

ज्या अखिल विश्वनायकाच्या कृपाप्रसादानें आजचा हा सुदिन प्राप्त झाला आहे, त्या दयासागराचें आरंभीं चिंतन करून आज आह्मी आपला सन्मान करीत आहों.

गेल्या कार्तिक महिन्यांत श्रीसंस्थान दाभोली मठाधीश **श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्विमलानंदस्वामीमहाराज** यांनीं आपल्या चिरकांक्षित आगमनाचा अलभ्य लाभ इकडील शिष्यवृंदांस दिला. त्यावेळीं आपण अनेक द्वारांनीं श्रीस्वामींची व श्रींच्या परिवाराची उत्तम बरदास्त ठेविली, त्यामुळें आमची, तसेंच वसई, अर्नाळा येथील स्वज्ञातिमंडळीची श्रीचरणीं सेवा उत्कृष्ट घडली. त्या प्रसंगीं आपण दाखविलेली गुरुनिष्ठा, औदार्य, स्वज्ञातीविषयीं प्रेम, कळकळ व आपलेपणा इत्यादि गुणांबद्दल आह्मांस वाटत असलेला आपणांविषयींचा आदर व्यक्त करण्यासाठीं आजचा हा सुयोग आह्मी जुळवून आणिला आहे.

यापूर्वी आपणाकडून स्वज्ञातीची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशी जी सेवा घडली, ती आमचे अंतःकरणांत सदैव जागृत आहे. अनेक कुटुंबांस व्यवसाय लावून वरच्या दरज्यास नेऊन ठेविलें; विद्यावृद्धिफंडास आरंभींच बरीचशी मोठी रकम देऊन मार्ग दाखविला; मालवणास हायस्कूल स्थापून तिकडील जनतेला पाश्चात्य शिक्षणाचा मार्ग सुलभ करून दिला; श्रीमठ दाभोली येथील गुरुस्थानाचा महिमा वाढविला; अशा अनेक तऱ्हांनीं व दिशांनीं स्वसमाजास उन्नतीचे पंथास नेऊन खरें हित साधून दिलें; या दृष्टीनें पाहतां आपली स्वसमाजसेवा इतकी विविध व विपुल झाली आहे कीं, ती शब्दांनीं व्यक्त करणेंच शक्य नाहीं. तथापि ही कृतज्ञतेची अल्पशी जाणीव आज आह्मी अत्यंत प्रेमपूर्वक सादर करीत आहोंत.

जगदीशानें आपणास व आपले कुटुंबीयांस दीर्घ आयुरारोग्य व ऐश्वर्य देऊन आपले हातून स्वसमाजसेवा उत्तरोत्तर अधिकाधिक घडवावी; व आह्मां सर्वांस आपलें नेतृत्व दीर्घकाल लाभवावें, अशी अनन्यभावें श्रीचरणीं प्रार्थना करून हें मानपत्र प्रेमाचें, आदराचें, व कृतज्ञतेचें केवळ दर्शक म्हणून आपणास अर्पित आहों; तें आपण स्वीकाराल अशी आम्हांस पूर्ण आशा व उमेद आहे.

**जगन्नाथ बाजी गाळवणकर**
सभाध्यक्ष.
गौडब्राह्मण सभागृह
ठाकुरद्वार, मुंबई.
रविवार, ता. १९ डिसेंबर १९१५

आपले नम्र ज्ञातिबंधु,
**अनंत गणेश देसाई,**
गौडब्राह्मण सभेचे अध्यक्ष
व
इतर सभासद.

पुढें भाऊसाहेबांनीं मालवण हायस्कूलाची इमारत बांधण्यासाठीं खर्चलेल्या व त्यापूर्वी शाळेच्या चालू खर्चासाठीं दिलेल्या मोठ्या रकमांमुळें सदर तालुक्यांत दुय्यम प्रतीच्या सार्वजनिक शिक्षणप्रसाराचें काम सुलभ

झालें, या गोष्टीकडे सन १९१७ सालीं इंग्रज सरकारचें लक्ष जाऊन, त्यांनीं भाऊसाहेबांस “ **रावबहादुर** ” ही पदवी अर्पण करून त्यांचा सन्मान केला. रावबहादुर भाऊसाहेबांस दिलेली सनद येणें प्रमाणें:–

**SANAD.**

*To*

Anant Shivaji Desai, Topiwalla,
Bombay.

I hereby confer upon you the title of Rao Bahadur as a personal distinction.

**Chelmsford,**
Viceroy and Governor General of India.

Simla,
the 4th June 1917.

**सनद.**

**अनंत शिवाजी देसाई, टोपीवाले,** मुंबई, यांस—

मी या ( सनदीच्या ) द्वारें तुम्हांस वैयक्तिक मानमान्यतेचें द्योतक म्हणून ‘ रावबहादुर ’ ही पदवी बहाल करितों.

सिमला,
४ जून १९१७

**चेम्सफर्ड.**
हिंदुस्थानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल.

भाऊसाहेबांस “ रावबहादुर ” ही पदवी मिळाल्याचें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतांच मुंबईच्या नेक नामदार गव्हनरसाहेबांचें पत्र त्यांच्या सेक्रेटरीमार्फत आलें, त्याचा आशय असा होता:—

“ नेक नामदार व्हाईसरॉय लाटसाहेब ह्यांनीं खुष होऊन तुम्हांस रावबहादुरीची पदवी देऊन तुमचा गौरव केला, हें पाहून आम्हांस

आनंद होतो. तुमचें अभीष्ट चिंतून, या मिळालेल्या मानाचा दीर्घकाल उपभोग घेण्यासाठीं, व तुमच्या हातून जास्त जनसेवा व्हावी म्हणून, तुम्हांस दीर्घायुष्य प्राप्त व्हावें, अशी इच्छा करितों."

याशिवाय सावंतवाडीचे ॲडमिनीस्ट्रेटर व एज्युकेशनल इन्स्पेक्टर, रत्नागिरीचे कलेक्टर व असिस्टंट कलेक्टर, मालवणच्या टोपीवाला हायस्कूलच्या मॅनेजिंग बोर्डाचे चेअरमन व हेडमास्तर, व मुंबई, वसई, सावंतवाडी, मालवण, रत्नागिरी, कोल्हापूर, पुणें, कराची, कलकत्ता, मद्रास व इतर ठिकाणचे भाऊसाहेबांचे चहाते, मित्र व ज्ञातिबंधु यांजकडून त्यांच्या अभिनंदनपर, दीर्घायुरारोग्यचिंतक व प्रेमानंद-प्रदर्शक अशीं आणखी पुष्कळच तारा व पत्रें भाऊसाहेबांस आलीं.

याशिवाय रावबहादुर भाऊसाहेबांवर प्रेम करणाऱ्या झारापीच्या रहिवाश्यांनीं त्वरित सभा भरवून, भाऊसाहेबांचें औदार्य सरकारदरबारीं रुजू झाल्याबद्दल जाहीररीत्या आनंद प्रदर्शित केला, व त्या सभेंत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करून भाऊसाहेबांस सभेच्या नांवानें पुढीलप्रमाणें पत्र धाडलें:—

ॐ

॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

**श्रीमंत रावबहादुर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले,**

मुक्काम मुंबई, यांसी—

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेषः ईश्वरानें आपणांस विपुलैश्वर्य देऊन स्वपरसमाजहिताबरोबर राजहितहि आपणांकडून करविलें, त्यामुळें खूष होऊन आमच्या सार्वभौम सरकारनें आपणांस '**रावबहादुर**' या बहुमानाच्या पदवीनें भूषविलें, याबद्दल आनंदानें आपलें अभिनंदन करण्याकरितां झाराप गांवांतील आबालवृद्ध, आपल्या

मदतीनें बांधून झालेल्या '**श्रीदेवी भावई**' च्या देवालयीं जमून आपलें अभीष्ट चिंतीत आहेत.

सुमारें साठ वर्षांपूर्वीं झाराप गांवांतून आपण मुंबईस गेलां, व श्रीनारायणावर अचल निष्ठा ठेवून स्वतःच्या कर्तबगारीनें अगणित संपत्ति मिळविलीत, पण संपत्तिमदाचे आधीन न होतां मिळविलेल्या धनाचा सर्वांसाठीं योग्य सदुपयोग केलात.

श्रीक्षेत्र वालावल येथील आपले कुलदेव '**श्रीनारायण**' या देवाकडे आपल्या उज्ज्वल भक्तीस साजेल अशा प्रकारची सर्वांगसुंदर व्यवस्था करून धीरोदात्त अशा राजपुरुषालाच शक्य असें त्या ठिकाणीं आपण ठेविलेलें '**सदावर्त**,' दाभोली येथील आपलें स्वामीपीठ ऊर्जितावस्थेला आणण्याकरितां केलेला अलोट खर्च व त्या ठिकाणीं स्थापिलेली '**वेदशाळा**,' स्वतःच्या तसेंच इतर ज्ञातींच्या विद्यार्थ्यांस राजमान्य विद्या शिकविण्यासाठीं लाखों रुपये खर्च करून मालवण येथें स्थापिलेलें '**देसाई हायस्कूल**,' हीं व इतर लोकहिताचीं आपण केलेलीं अनेक महनीय सत्कृत्यें, यांमुळें आपली कीर्ति अजरामर झालीच आहे.

बाळपणीं विपन्नावस्थेमुळें आपणांस निरुपायानें सोडणें प्राप्त झालेल्या या झाराप गांवाकडे वैभवारूढ झाल्यावरहि आपण प्रेमानेंच पाहिलें, व या ग्रामदेवतेच्या मंदीराच्या उभारणीस एक हजार रुपयांची उदार देणगी देऊन या आपल्या जन्मभूमीची[1] आठवण कायम ठेविलीत, याबद्दल आपले धन्यवाद गावे तेवढे थोडेच आहेत. आपल्या या उदार मदतीबद्दल झाराप गांवचे रहिवासी आपले अत्यंत आभारी असून आपणांस लाभलेल्या या बहुमानाबद्दल ते कृतज्ञतेनें आपलें प्रेमादरपूर्वक अभिनंदन करीत आहेत.

ईश्वरकृपेनें आपला जन्म आमच्या झाराप गांवीं होऊन मोठमोठ्या

१ एक वर्षाचे बालक असल्यापासून भाऊसाहेबांचें बाळपण झारापी गांवीं गेल्यामुळें, त्यांचा जन्महि त्याच गांवीं झाला अशी तेथील लोकांची समजूत होऊन हें विधान त्यांजकडून करण्यांत आलें असावें.

देवशाली पुरुषांसहि अशक्य अशा प्रकारचीं देवकार्य, गुरुकार्य, पितृकार्य, ज्ञातिकार्य व इतर जनहितकार्यें आपल्या हातून घडल्याबद्दल सर्वत्रांस फारच अभिमान वाटत आहे; व आपणहि या गांवाकडे प्रेमानें पाहावें अशी विनंति आहे.

आपणांवर अनेक आपत्ति आल्या असतांहि त्या जगन्नियंत्यानें आपणांस बहुजनसमाजाच्या कल्याणासाठीं राखिलें, हे त्याचे सर्वांवर अनंत उपकार आहेत. त्याच्याच कृपेनें आपणांस चिरायुरारोग्य लाभो व आपल्या हातून समाजसेवा व राजसेवा हीं अधिकाधिक घडून, आपलें नांव विशेष विभूषित होऊन आपली कीर्ति दिगंत होवो, अशी अनन्य प्रार्थना आहे.

मु. झाराप सं० सावंतवाडी
रविवार ता. १० जून १९१७
ज्येष्ठ कृष्ण ५ शके १८३९

आपला नम्र,
**जगन्नाथ रघुनाथ**
अभिनंदनपर सभेचे अध्यक्ष.

यानंतरची अभिनंदनपर सभा मुंबईंत माधवबागेंत ता० ४ आगष्ट सन १९१७ रोजीं भरविण्यांत आली. ही सभा मुख्यत्वें मुंबईतील मोठमोठे गुजराथी, दक्षिणी, युरोपियन व मुसलमान व्यापारी आणि कांहीं प्रमुख नागरिक यांनीं बोलाविली होती. सभेस सर्व धंद्यांतील व जातींची मंडळी हजर होती. कांहीं मंडळींचीं गौरवपूर्ण व अभिनंदनपर भाषणें झाल्यावर रावबहादुर भाऊसाहेबांस, अध्यक्षस्थानापन्न झालेले येथील पिढीजाद श्रीमंत व्यापारी व मुंबई बँकेचे डॉयरेक्टर कै. **श्री. त्रिभुवनदास वरजीवनदास माधवबागवाले** यांच्या हस्तें इंग्रजी भाषेंत मुद्रित केलेलें मानपत्र रौप्यकरंड्यांतून अर्पण करण्यांत आलें. त्या मानपत्राचें भाषांतर येणेंप्रमाणें:—

## रावबहादुर अनंत शिवाजी देसाई

मुंबई.

प्रिय महाराज,

आम्हीं खालीं सह्या करणारे व आपणाशीं मागल्या कैक वर्षांत दळणवळण ठेवणारे आपले मित्र व या शहरांतील व्यापारी, आपल्या कृपाळु सरकारानें, आपण केलेली जनसेवा व दिलेल्या उदार धार्मिक देणग्या यांच्या मान्यतेप्रीत्यर्थ आपणांस **रावबहादुर** ही पदवी बहाल केली, याबद्दल आम्हांस अंतःकरणपूर्वक वाटत असलेला आनंद व्यक्त करण्यास व आपलें मनोभावेंकरून अभिनंदन करण्यास आपली रजा मागून घेतों.

आपल्याशीं प्रत्यक्ष संबंधांत आलेले आपले मित्र व व्यापारी, त्याच प्रमाणें आपल्या पेढीवरील आपले साहाय्यक व नोकरचाकर, तसेंच आपल्या कारखान्यांत काम करणारे कामगार या सर्वांस आपल्या कृपाळु स्वभावामुळें व प्रेमळ वागणुकीनें आपण प्रिय झालां आहांत, व आपणांत असाच स्नेहभाव याउपरांत चालू राहावा अशी आम्ही उत्कट इच्छा करितों.

आपली धीरोदात्तता व चिकाटी यांच्या जोरावर दीनावस्थेंतून आपल्या जीवनक्रमांत आपण केलेली प्रगति, व यांस आपल्या व्यवहारांतील सरळपणाची मिळालेली जोड, यांमुळें आम्हांस आपल्याविषयीं वाटत असलेलें कौतुक द्विगुणित होतें. **रावबहादुरीचा** किताब बहाल करून सरकारानें आपण मालवणास चालू खर्चाप्रीत्यर्थ मोठाल्या देणग्यांसह स्थापिलेल्या विद्यार्थीवसतिगृहाविषयीं मान्यता दर्शविली, याबद्दल आम्हांस आनंद होतो; व ही पदवी आपणासाठीं संग्रहीं ठेविलेल्या आणखी दुसऱ्या मानमरातबाची प्रथमदर्शिका आहे, अशी आह्मी आशा करितों.

आपल्या भिडस्त व उदार स्वभावामुळें, ज्या गोरगरीबांस वेळोवेळीं द्रव्याचें अथवा अन्य तऱ्हेचें साहाय्य लागतें, तें त्यांस पुरविण्यास आपण नेहमीं तत्पर व प्रसन्न असतां हें पाहून सुद्धां आम्हांस आनंद होतो.

आह्मी सर्वजण आपणांस दीर्घायुष्य व उत्कर्ष चिंतितों, आणि आपण स्वीकारण्याची मेहरबानी कराल अशा आशेनें हें मानपत्र आपल्याविषयीं आमची चहा व आदरभाव यांची खूणगांठ ह्मणून आपणांस अर्पण करण्याची रजा मागतों.

मनोभावेंकरून आपले

**त्रिभुवनदास वरजीवनदास.**
**भालचंद्र कृष्ण.**
**खिमजी आसर विरजी.**
**व्ही. एन. भाजेकर.**
इ० इ० इ०

**प्रेमजी गोकुळदास.**
**ॲलेक्स. एम्. टॉड.**
**केशवजी नथु सेलर.**
**फ्रिटज स्क्रीचर.**
इ० इ० इ०

मुंबई, ४ ऑगष्ट १९१७.

आपली जन्मभूमि वालावल येथें भाऊसाहेबांनीं मोठाल्या रकमा देऊन तिकडील मुलांच्या मराठी सात इयत्तांच्या व इंग्रजी पांच इयत्तांच्या शिक्षणाची सोई केली, याबद्दल त्या गांवांतील व आसमंतांतील लोकांची जाहीर सभा रा. रा. **कृष्णाजी सखाराम प्रभु गांवकर** यांच्या अध्यक्षतेखालीं भरून, भाऊसाहेबांचे आभार मानण्यांत आले; व निरनिराळ्या ज्ञातींतील लोकांच्या ६७ सह्या असलेलें आभारप्रदर्शक पत्र त्यांस पाठविण्यांत आलें.

भाऊसाहेब रावबहादुर झाले तरी त्यामुळें त्यांच्या वर्तनांतील साधेपणांत बिलकूल फरक पडला नाहीं. त्यांस **रावबहादुर** या नव्या संज्ञेपेक्षां, त्यांच्या कर्तबगारीनें त्यांस मिळवून दिलेल्या **टोपीवाले** या अभिधानाचेंच जास्त भूषण वाटत असे. ते जे साधेपणा व बाळबोध वळण यांचे मूर्तिमंत पुतळे होते, तसेच ते अखेरपर्यंत राहिले.

## प्रकरण १५ वें.

# कुटुंबातील मंडळी.

भार्या सकल श्रमांतें हर्ती । भार्या सकल सुखातें कर्ती ॥
भार्या पवित्र वंश धर्ती । यश कीर्ति स्त्रीसंगें ॥ १ ॥ मुक्तेश्वर.

भाऊसाहेबांच्या आयुष्याला एक विशिष्ट दिशा लागून त्यांच्या चरित्राला जें एक प्रकारचें स्वरूप प्राप्त झालें, त्याला त्यांच्या स्वतःच्या वर्तनाइतकेंच जिचें वर्तन साधनीभूत झालें, त्या **सौ. नर्मदाबाईसंबंधी** चार शब्द लिहून नंतर भाऊसाहेबांच्या कुटुंबांतील इतर मंडळीविषयीं त्रोटक माहिती देण्याचा विचार आहे.

भाऊसाहेबांचा विवाह इ. स. १८७२ चे सुमारास झाला, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. नर्मदाबाई देखील गरीब आईबापांच्या पोटीं जन्मास आल्या होत्या, म्हणून भाऊसाहेबांप्रमाणेंच त्यांनाहि लहानपणापासून गरिबीची चांगलीच ओळख होती; त्यामुळें पुष्कळ गोष्टींत या दोघांनाहि आरंभींच्या काळांत सारखेच अनुभव आले असले पाहिजेत. संसाराची घडी नीट बसावयास समानशील पत्नीची फारच मदत होते. पुरुषानें अविश्रांत श्रम करून चार पैसे मिळवून आणून घरांत टाकल्यानंतर, त्यांचा मितव्ययानें उपयोग करून त्यांतून दोन पैसे शिल्लक टाकणें, हें सुगृहिणी स्त्रीचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य सौ. नर्मदाबाईच्या अंगांत पूर्णपणें बाणलें होतें. लग्न झाल्यानंतर त्या लौकरच मुंबईस पतीबरोबर राहावयास आल्या; व त्या घरांत आल्यापासून भाऊसाहेबांच्या भरभराटीस अखंड सुरवात झाली. कोणी कोणी हा सौ. नर्मदाबाईचा पायगुण समजतात. हा त्यांचा पायगुण

असो व नसो, परंतु सौ. नर्मदाबाईच्या गृहप्रवेशापासून भाऊसाहेबांच्या वैभवाची चढती कळा होत चालली, ही गोष्ट हें चरित्र वरवर वाचणाऱ्यांच्याहि लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. आतां या ' पायगुणा ' चें रहस्य शोधून काढण्याचें जर मनुष्याच्या ज्ञानशक्तीच्या आवांक्यांत असेल, तर तें त्यांच्या थोड्याशा परिचयाच्या माणसांससुद्धां काढतां येणें शक्य आहे. तें हेंच कीं, दीर्घोद्योग व मितव्यय. भाऊसाहेबांच्या ठिकाणीं तर हे दोन्ही गुण उत्कटत्वानें वास करीत होते. आतां विलक्षण योगायोग तो हाच कीं, हे दोन्ही गुण या उभयतांमध्यें सारखेच प्रामुख्यानें वास करीत होते. आपण जर सभोंवार नजर फेंकली तर असें आढळून येतें कीं, नवऱ्यामध्यें जर एकगुण असला, तर त्याला प्रतिकूल असा दुसरा कांहींतरी गुण बायकोमध्यें हटकून असावयाचाच. आणखी बायको सद्गुणी असली, तर बहुशः नवरा दुर्गुणी असतो. कदाचित् नवरा बायकोंत समान गुण ठेऊन मौज पाहावयाची ब्रह्मदेवाची लहर लागलीच, तर तो सद्गुणांपेक्षां दुर्गुणांचेंच साम्य दोघांहिमध्यें ठेऊन देतो, असें दिसतें. परंतु ह्या दांपत्यांत दोन्हींहि सद्गुण समप्रमाणांत उत्पन्न करून ' समानयंस्तुल्यगुणं वधूवरं चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः ' या कालिदासोक्तीप्रमाणें ब्रह्मदेवानें विजोड दांपत्यें निर्माण करण्याचा आपला दोष पुष्कळ वर्षांनीं धुवून टाकला असावा.

सौ. नर्मदाबाई ह्या प्रथम मुंबईस आल्यावर, भाऊसाहेबांच्या मदतीनें त्या टोप्या शिवावयास शिकल्या. कालाचा बिलकूल अपव्यय न करितां सतत उद्योग करून, शक्य त्या रीतीनें आपल्या सांपत्तिक उद्धारास हातभार लावणाऱ्या स्त्रिया फारच विरळा असतात. उद्योगी स्वभावाच्या माणसास, मग तो पुरुष असो वा स्त्री असो, उद्योगाशिवाय चैनच पडावयाचें नाहीं. या दांपत्याची सांपत्तिक स्थिति जसजशी वाढत चालली, तसतसें सौ. नर्मदाबाईचें स्वतः टोप्या शिवण्याचें किंवा तसाबिरांना

टिकल्या टिचण्याचें काम बंद झालें काय ? नाहीं. मुलें बाळें झालीं म्हणजे स्त्रियांस फुरसत कमी असते हें खरें; परंतु ती अगदींच नसते असें मात्र नाहीं. उद्योग करावयाची संवय एकदां लागली म्हणजे ती बहुतेक आजन्म टिकते. गरीबीचा अथवा श्रीमंतीचा या बाबतींत कांहीं संबंध पोंचत नाहीं. भाऊसाहेब बंगला घेऊन गाडीघोडा ठेऊन शेट बनले तरी, नर्मदाबाईंनीं घरांतील गृहिणीनें करावयाचें तें काम करून, फावल्या वेळांत हौशीच्या उद्योगाचा मोबदला व्यावहारिक रीतीनें मिळविला.

इतकेंच करून त्या थांबल्या नाहींत. तर आपला उद्योगप्रियतेचा धडा त्यांनीं इतर ओळखीच्या स्त्रियांस घालून दिला. आपल्या ज्ञानाचा लाभ दुसऱ्यास दिला नाहीं तर त्या ज्ञानाचा व्हावा तसा उपयोग होत नसतो, व जरूर ती नियमित विश्रांति खेरीज करून बाकी राहिलेला वेळ सतत उद्योगांत घालविल्यानें मनुष्याचें मन ताब्यांत राहत असतें. ह्या दोन तत्वांची त्यांस पूर्णपणें जाणीव होती, व तीं तत्वें त्यांनीं कृतींत आणलीं होतीं. सभांत जाऊन व्याख्यानें न झोडतां आल्यागेल्या बायांस उपदेश करून त्यांनीं त्यांस उद्योग करण्यास लाविलें. त्यांस टोप्या शिवण्याची व तसबिरा सजविण्याची कला स्वतः त्यांनीं शिकविली. क्षेम-कुशल विचारून गप्पागोष्टींत दोन तास घालवून करमणूक करून घेण्याच्या उद्देशानें आलेल्या स्त्रियांस त्यांनीं अशा प्रकारें उद्योगप्रियतेचें वळण लाविलें. आपल्या दुकानावरून माल मागवून त्या स्त्रियांस देत व त्यांच्याकडून आलेलें काम घेऊन दुकानावर पाठवून देत, आणि त्या कामाचे पैसे त्यांच्या स्वाधीन करीत. ह्या त्यांच्या उद्योगामुळें कितीतरी स्त्रियांस चांगलें वळण लागून, त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यास सौ. नर्मदाबाई कारण झाल्या. स्वार्थ साधून परमार्थाचा लाभ घ्यावयाचा सौ. नर्मदाबाईंनीं घालून दिलेला हा मार्ग

अनुकरणीय नाहीं काय ? पुढें पुढें गोरेगांव येथील मिळकतीं-तून स्वतःच्या मालकीची फळफळावळ, भाजी वगैरे येऊं लागली तेव्हांसुद्धां, तिची आपल्या हातानें निवड करून जुड्या बांधून त्या किरकोळ विकावयास पाठवीत असत; व असें करण्यांत त्यांना कधींहि कमीपणा वाटला नाहीं. आपण आतां श्रीमंत झालों, आपणाला मध्यम साध्या स्थितींतल्या स्त्रीला शोभणारें असलें काम करणें उचित नाहीं, वगैरेसारख्या भावना व लोकांच्या टीकेची भीति हीं त्यांला शेवटपर्यंत शिवलीं नाहींत. इतकेंच नव्हे तर त्यांची घरांतील उद्योगतत्पर वागणूक ज्यांच्या पाहण्यांत आली असेल त्यांना, सौ. नर्मदाबाईला स्वतःच्या श्रीमंतीचा मुळींच अभिमान नव्हता असें कबूल करावें लागेल. अखेर-पर्यंत गृहकृत्यांत त्या सदासर्वदा चूर असत. त्यांच्यांत जुन्या चालीच्या खऱ्या आर्यस्त्रीचे गुण वसत असल्यामुळें मोटर उडविणें, गाडी घोड्यांतून सहल करणें, किंवा संपत्तीच्या साधनानें धनहरण व कालव्यय करणारीं सुखें भोगणें हे विकार त्यांच्या गांवीं नव्हते. काळसर वर्णाच्या व किंचित् ठेंगण्या बांध्याच्या या सुगृहिणीची प्रत्येक कृति खरोखर उज्ज्वल व उच्च प्रतीची होती यांत शंका नाहीं. निगर्वी पोक्तपणास साजेल अशी स्थूल प्रकृति, स्थूल प्रकृतीला साधा पेहराव, आणि साध्या पेहरावाला साधी वर्तणूक यांचें औचित्य यांच्या ठिकाणीं सहज शोभत होतें. त्यांचा परिचय मुंबई शहरांत वावरणाऱ्या समाजमहिलांस फारसा नव्हता. आपलें घरकाम व उद्योग बरा कीं आपण बऱ्या, अशा वृत्तीच्या त्या होत्या.

सौ. नर्मदाबाईच्या दीर्घोद्योगाची जी प्रशंसा केली आहे, तीवरून कोणीहि आपला असा गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं कीं, प्रस्तुत लेखकास, स्त्रियांनीं सामाजिक किंवा इतर लोकोपयोगी कृत्यें न करतां घरांतलेंच काम करीत बसणें, किंवा गजांत लक्ष्मी आली असतांहि चूलच फुंकीत बसणें इष्ट वाटतें. पहिल्यानें हें लक्षांत ठेविलें

पाहिजे कीं, गरीब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित स्त्रीपुरुषांनीं—प्रत्येकानें—आपल्या कालाचा बराचसा भाग कांहींतरी उपयुक्त उद्योगांत घालविण्याचा सराव करावा. सामाजिक कार्यांची नुसती बतावणी करून केवळ गप्पा मारीत बसण्यापेक्षां, स्त्रियांनीं कृतीनें कांहींतरी उद्योग करीत असावें; व साधल्यास आपल्या यजमानावरचा संसाराचा बोजा आर्थिक प्राप्तीनें हलका करावा. हें तत्त्व आतां **महात्मा गांधीजींच्या** शिकवणुकीनें आर्यमहिलांस पटत चाललें आहे, हें पुढील भाग्याचें पूर्वचिन्हच होय. श्रीमंतीचीं जीं कांहीं ठरींव लक्षणें आज मानिलीं जातात त्यांनाच जर आमचे श्रीमंत चिकटून बसले, तर त्यांची श्रीमंती कितीसे दिवस टिकणार ? काम, मग तें कोणत्याहि दर्जाचें असो, तें पवित्र आहे, ही भावना प्रत्येक कुटुंबांतील तरुण पिढीवर बिंबली पाहिजे. वडील मंडळी तक्क्यास टेकून रिकाम्या गप्पा मारीत बसलेली पाहिली तर मुलेंसुद्धां श्रेष्ठांचेंच अनुकरण करून पाहणार. वडिलांची वागणूक ही अप्रत्यक्षपणें शिशुजनांची शिकवणूक. नर्मदाबाईच्या शिस्तीचा परिणाम त्यांच्या मुलीसुनावर कायमचा झाला आहे. घरकाम करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे, असेंच त्यांना वाटतें; आणि कर्तव्याचें महत्व एकवार पटल्यानंतर त्याबद्दल कमीपणाचा विचारदेखील मनांत उत्पन्न व्हावयाचा नाहीं. पातिव्रत्यांत सीता-सावित्रींचा, तसाच ‘ श्रीमंती आली असतां मूळ न विसरणारी ’ म्हणून सौ. नर्मदाबाईचा, त्यांच्या प्रांतांतील बहुतेक घरंदाज घराण्यांत वडील माणसांकडून, लेंकीसुनांस बोध करीत असतां, नामनिर्देश केला जातो. असो. सौ. नर्मदाबाई ह्या सन १९२० च्या फेब्रुआरीच्या २२ व्या तारखेस ( भाऊसाहेबांच्या पूर्वीं सुमारें एक वर्ष ) स्वर्गवासी झाल्या. त्यांचें नांव चिरस्मरणीय व्हावें म्हणून भाऊसाहेबांनीं वालावल मुक्कामीं ३४००० रुपये खर्चून एक इंग्रजी शाळा स्थापन केली आहे

हें योग्यच झालें असें त्यांचें वरील स्वभाववर्णन वाचल्यावर कोणासहि वाटेल. भाऊसाहेब मुंबईस आल्यानंतर त्यांच्या व्यवहाराच्या पूर्वअमदानींतल्या उलाढालींत ज्यांनीं भाग घेतला, ते त्यांचे ज्येष्ठ बंधु रा. रा. **रघुनाथराव तात्या** ह्यांचा वृद्धापकाळ झाला असून, ते सध्यां वालावलीसच राहतात.

भाऊसाहेबांना चार मुली व तीन मुलगे मिळून एकंदर सात अपत्यें झालीं, व त्यांपैकीं आजमितीस ईश्वरकृपेनें पांच हयात आहेत. पहिलें अपत्य कन्या **येसूबाई** हिचा, वयाच्या नवव्या वर्षी, सन १८८६ सालीं, मालवण येथील व्यापारी रा. रा. **वासुदेव परशुराम वाघ** यांच्याशीं विवाह झाला. दुसरी कन्या **कृष्णाबाई** हिचें लग्न सन १८८९ सालीं रा. रा. **यशवंत विठ्ठल परुळेकर** यांच्याशीं झालें; पण सन १८९६ सालीं तिला अकालीं मृत्यु आला. तिसरें अपत्य **हिराबाई** हिला सावंतवाडी येथील रा. रा. **दत्ताराम वासुदेव आजगांवकर** यांना दिली होती. परंतु त्यांच्यावर काळाची झडप पडून तिच्यावर दुर्धर प्रसंग ओढवला. चौथें अपत्य **शिवाजी** ऊर्फ **सुंदरराव** यांचा जन्म सन १८८३ सालीं झाला. हल्लीं ते मुंबई शहरांत स्वतंत्र धंदा करितात. पंचमापत्य **नारायणराव** हे सन १८८५ सालीं जन्मले व ते हल्लीं भाऊसाहेबांमागें त्यांचा व्यवहार पाहतात. सहावी कन्या **विठाबाई** हिचें लग्न रा. रा. **बापूजी आत्माराम सामंत चिंदरकर** यांच्याशीं झालें. शेवटचें अपत्य मुलगा **रामचंद्र** याचा जन्म सन १९०२ सालीं झाला. त्याच्यावर भाऊसाहेबांचें फारच प्रेम होतें, पण तो त्यांना लाभला नाहीं. सन १९०८ सालीं आईबापांस दुःखांत सोडून तो परलोकीं गेला. हयात असलेल्या अपत्यांत हिराबाई ही दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें असलेल्या स्थितींत समाधान मानून दिवस काढिते; व बाकीचीं चौघें आपआपल्या मुलांबाळांनिशीं सुखानें संसार करीत आहेत.

---

## प्रकरण १६ वें.

# मृत्यु.

मृत्यु न ह्मणे हा बलाढ्य । मृत्यु न ह्मणे हा धनाढ्य ॥
मृत्यु न ह्मणे हा आढ्य । सर्व गुणें ॥ १ ॥
मृत्यु न ह्मणे हा विख्यात । मृत्यु न ह्मणे हा श्रीमंत ॥
मृत्यु न ह्मणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ २ ॥ —श्रीसमर्थ.

भाऊसाहेबांनीं वालावलीची शाळा आपल्या दिवंगत पत्नीच्या स्मरणार्थ बांधली, असें पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. या सुमारास त्यांचें वय ६७ वर्षांचें असावें. इतक्या वयांत पत्नीनिधनाचा धक्का बसल्यामुळें त्याचा परिणाम त्यांच्या मनावर आणि शरीरावर होऊं लागला; आणि तेव्हांपासून ते एकांतप्रिय बनले. एरवीं भाऊसाहेबांची प्रकृति मूळची निरोगी होती. त्यांचे लहानपणचे दिवस दारिद्र्याच्या कष्टमय स्थितींत गेल्यामुळें, त्यांना आपल्या वडीलांस मदत करण्यासाठीं साहजिकच कांहीं ना कांहीं श्रम करावे लागत; आणि म्हणून त्यांच्या अंगांत श्रीमंती नाजूकपणाचा शिरकाव झाला नव्हता. दारिद्र्यसुलभ जाड्याभरड्या मिताहाराचें मिष्टान्न मिळाल्यामुळें, त्यांचें शरीर मजबूत बनलें होतें. पुढें मुंबईस कांहीं वर्षें गिरणींत असतांना व गिरणींतून सुटल्यावर त्यांच्यावर कोणत्याहि व्यसनाची पकड न बसल्यामुळें, ते आपल्या समवयस्क व समानशील सोबत्यांबरोबर सायंकाळचा वेळ कुस्त्या, बैठकी वगैरे मर्दानी खेळ खेळण्यांत घालवीत असत. पुढें श्रीमंती आल्यावरसुद्धां त्यांचें खाणें-पिणें, आहार-विहार वगैरे नियमित असल्यामुळें, त्यांची प्रकृति बरींच वर्षें बहुतेक निरोगी राहिली. कांहीं वर्षांपूर्वी त्यांच्या एका डोळ्यांत कस-

लासा विकार होऊन त्यावर त्यांना शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली व तो डोळा शेवटपर्यंत साधारण अधूच राहिला. उतारवयांत कांहीं वर्षे त्यांना दम्याचा विकार झाला होता. त्यापासून त्यांना वारंवार त्रास होई. ते सर्व व्यसनांपासून अलिप्त होते; तथापि दम्याच्या शमनार्थ अलीकडे ते एका प्रकारच्या औषधी धूम्रपानाचें सेवन करीत असत. सतत सुमारें पन्नास वर्षें एकसारखीं कामधंद्यांत गेल्यामुळें, त्यांच्यानें रिकामें म्हणून बसवत नसे. अलीकडे वृद्धापकालींसुद्धां त्यांस कामधंद्यांत थोडेंबहुत लक्ष घातल्याशिवाय चैन पडत नसे. एक दोन वर्षांआड विश्रांतीसाठीं ते कोंकणांत आपली जन्मभूमि वालवल येथें उन्हाळ्याचे दिवसांत दोनतीन महिने जाऊन राहत असत; परंतु अलीकडे चार वर्षें प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें डॉक्टरच्या सान्निध्यांत मुंबईच्या आजूबाजूसच राहावें लागल्याकारणानें त्यांस कोंकणांत जातां आलें नाहीं. हवा पालटण्याकरितां ते मुंबईजवळील गोरेगांव येथील आपल्या बंगल्यांत राहण्यास जात असत. त्या ठिकाणीं वर्षांतून बरेच दिवस राहावें लागतें म्हणून त्यांनीं तेथें एक भव्य बंगला बांधून ठेवावा या विचारानें फार मोठ्या प्रमाणावर टोलेजंग इमारत उठविण्यास आरंभाहि केला होता. परंतु त्यांनीं स्वतःचे देखरेखीखालीं तो पूर्ण जाहलेला पाहण्याचा योग आला नाहीं ! हल्लीं हल्लीं त्यांच्या हृदयांत कांहीं विकार झाला होता; व डाक्टर लोकांनीं त्यांस इशाराहि देऊन ठेवला होता कीं, तुम्ही शरीरास व मेंदूस बिलकूल त्रास न देतां राहाल तर आणखीहि बरेच दिवस जाण्यास हरकत नाहीं. वर सांगितलेला गोरेगांवचा बंगला बांधून झाल्यावर त्या ठिकाणींच आपले राहिलेले दिवस स्वस्थ चित्तानें घालविण्याचा त्यांचा इरादा होता. कारण मुंबईस राहिलें असतां दुकानांत किंवा कारखान्यांत जाऊन येण्याची साहाजिकच इच्छा व्हावयाची. वर्षांचीं वर्षें दीर्घोद्योगांत व निरलसतेंत घालविलेल्या भाऊसाहेबांसारख्या माणसास नितांत कर्मसंन्यास म्हणजे अशक्यच;

व शक्य केल्यास तो तुरुंगवासच ठरावयाचा. ही उक्ति कोणालाहि अतिशयोक्तीची वाटेल; परंतु भाऊसाहेबांचा परिचय ज्यांना असेल, त्यांना आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल.

सौ. नर्मदाबाई परलोकवासी झाल्यापासून तर भाऊसाहेबांची मनःस्थिति अधिक सचिंत होत चालली. घरांत कितीहि संपत्ति, दासदासी, मुलगे-मुली, सुना वगैरे असल्या तरी, वृद्धापकाळीं बरोबरची पत्नी नसली तर तो वियोग साहजिकच असह्य होतो.

पत्नीच्या निधनानंतर घरांतला बहुतेक वेळ भाऊसाहेब आपल्या बसावयाच्या दिवाणखान्यांत घालवीत असत. पूर्वी घरांतील सर्व पुरुष मंडळी भाऊसाहेबांबरोबर जेवावयास बसे; पण आतां भाऊसाहेब आपलें जेवणखाण एकटेच करीत असत. अशा रीतीनें त्यांची प्रकृति अलीकडे–विशेषतः पत्नीच्या निधनानंतर–जरी असावी तितकी चांगली नव्हती, तरी अंतकाळ इतका समीप आला आहे असें त्यांना किंवा त्यांच्या जवळच्या मंडळीलाहि वाटलें नव्हतें.

अलीकडे सावंतवाडी संस्थानचे तरूण राजेसाहेब **हिज् हायनेस राजेबहादुर सरदेसाई बापूसाहेब भोंसले** यांचा व भाऊसाहेबांचा–भाऊसाहेब त्या संस्थानचे एक प्रमुख प्रजाजन असल्यामुळें–बराचसा परिचय झाला होता. राजेसाहेब मुंबईस अल्प मुदतीकरितां राहावयास आल्यास आपल्या संस्थानच्या या वयोवृद्ध व श्रेष्ठ नागरिकाच्या आग्रहास मान देऊन, सँढर्स्ट रोडवरील त्यांच्या बंगल्यावर मुक्काम करीत असत. मरणाच्या पूर्वी दोन दिवस प्रकृति विशेष विघडल्यामुळें आपल्या पुत्राच्या आग्रहावरून भाऊसाहेब गोरेगांवाहून मुंबईस राहावयास आले होते. भाऊसाहेबांच्या मृत्यूच्या दिवशीं श्रीमंत राजेसाहेब दोन प्रहरच्या पूना मेलनें मुंबईस यावयाचे असून, ते भाऊसाहेबांकडेच उतरावयाचे होते. त्या दिवशीं सकाळपासूनच आपली तब्यत रोजच्याहून जास्त बिघ-

डलेली जाणून भाऊसाहेबांना साहजिकच वाटलें कीं, आपणाकडे येणाऱ्या थोर पाहुण्यांस आपल्या या आजाराच्या घोटाळ्यांत जाणूनबुजून घालणें चांगलें नाहीं; व सुमारें १०॥ वाजतां नेहमींप्रमाणें त्यांचे चिरंजीव त्यांना भेटावयास आले त्यावेळीं त्यांना त्यांनीं स्टेशनावर जाऊन, राजेसाहेबांच्या कानावर आपल्या आजाराची हकीकत घालून, त्यांच्या मर्जीप्रमाणें स्वारीची व्यवस्था करण्यास सांगितलें. इतकें झालें तरी आजार विकोपास गेला असल्याचें कोणाच्याहि बिलकूल ध्यानांत आलें नाहीं. वडीलांच्या आज्ञेप्रमाणें त्यांचे चिरंजीव **नारायणराव** हे निघून गेले; व इकडे भाऊसाहेब तारीख १५ एप्रील सन १९२१ रोजीं दिवसा सुमारें १२ वाजतां हृदयाची क्रिया अकस्मात् बंद पडून इहलोक सोडून गेले !

वृद्धापकाळीं विशेष खितपत न पडतां, शरीराचे व्यापार अबाधित चालू असतां मरण येणें हें मोठें भाग्याचें समजलें जातें; व ही समजूत जर योग्य मानली तर, भाऊसाहेबांचें भाग्य मोठेंच मानलें पाहिजे. अशा तऱ्हेच्या आकस्मिक मृत्यूमुळें जवळच्या जिव्हाळ्याच्या नातलगांस फार वाईट वाटतें हें खरें; तथापि कधीं कोणालाहि टाळतां न येणारा मृत्यु जर यावयाचाच आहे, तर तो, गरीब असो वा श्रीमंत असो, परावलंबी स्थिति होण्याचे पूर्वी, व आपणास किंवा इतरांस त्रास न होतां आल्यास तो चांगला म्हणून कां गणला जाऊं नये ?

भाऊसाहेबांचा आत्मा इहलोक सोडून गेला, परंतु त्यांच्या कधींहि न कोमेजणाऱ्या उद्योगप्रिय चरित्र व दानधर्म यांच्या दिव्य सुमनांनीं आपल्या कीर्तिगंधानें हा प्रांत कायमचा सुगंधित करून ठेविला आहे. मोठमोठ्या महात्म्यांस तरी याच्याहून दुसऱ्या कोणत्या गोष्टींची अपेक्षा असते ? श्रीसमर्थ रामदासस्वामी '**मरावें परी कीर्तिरूपें उरावें**' असेंच म्हणतात. आपल्या मागें आपली सत्कीर्ति ठेवणें हेंच जर जीविताचें अंतिम ध्येय असेल, तर भाऊसाहेबांस तें साध्य झालें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें त्यांच्या कुटुंबांतील मंडळीस अत्यंत दुःख झालें, हें येथें लिहिण्याची अवश्यकताच नाहीं. पुत्रस्नुषादिकांस कांहीं-एक शेवटचा शब्द न बोलतां भाऊसाहेब एकाएकीं चिरस्तब्ध झाले. परंतु कालाच्या गतीविरुद्ध कोणाचें काय चालणार ? तथापि त्यांच्या कुटुंबीयांना, अथवा इतर आप्तेष्टांना त्यांच्या तोंडचा शेवटचा बोल ऐकण्याची संधि न मिळाल्याबद्दल जरी वाईट वाटत असलें—आणि तसें वाटणें अस्वाभाविक नाहींच—तरी त्यांना आपल्या मनाची समजूत घाल-ण्यास बरींच जागा आहे. भाऊसाहेबांना आपल्या परिवारास जें काय सांगावयाचें होतें, तें क्षणविनाशी शब्दांनीं सांगण्यापेक्षां आपल्या चिर-काळ टिकणाऱ्या सत्कृतींनीं त्यांनीं सांगून ठेविलें आहे. त्यांनीं आजवर अव्याहत श्रमानें रचलेला कारभार व केलेलीं औदार्याचीं दानकृत्यें हेच त्यांचे शेवटचे बोल होत. आपण घालून दिलेला सत्पंथ आणि आपल्या सदिच्छा आपल्या पश्चात् पुत्रपौत्रादिकांनीं चालू ठेवल्या म्हणजे मृताच्या जीवात्म्यास धन्यता वाटते, हें शास्त्रसिद्धच आहे. तेव्हां त्यांच्या सत्कृत्यांचे आपल्या चर्मचक्षूंनाहि दिसण्याजोगे मूर्तिमंत बोल समोर असतां, भाऊसाहेबांच्या अंतकालाच्या हितगुजास आपण मुकलों असें कोणालाहि वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. असो.

त्यांच्या मृत्यूची दुःखद वार्ता शहरभर पसरण्याच्या पूर्वी स्टेशनावर श्रीमंत राजेबहादुर बापूसाहेब यांस कळण्याबरोबर, लगेच त्यांनीं सावंत-वाडीस ॲड्मिनिस्ट्रेटरसाहेबांस तार देऊन संस्थानांतील सर्व आफिसें हातांत तार पोंचतांच तत्क्षणींच बंद करण्याचे हुकूम सोडावे असें कळविलें. मुंबई शहरांत त्यांचीं दुकानें व कारखाने व मोतीबाजारांतील व इतर ठिकाणचीं टोप्यांचीं बहुतेक दुकानें '**टोपीवाल्यांच्या**' निधना-निमित्त बंद ठेवण्यांत आलीं. त्यांचे उभय चिरंजीव—सुंदरराव व नारा-यणराव—नोकर, स्नेही, ज्ञातिगृहस्थ व चाहाती मंडळी यांसह भाऊसाहेबांची

स्मशानयात्रा निघाली व हल्लींच्या रिवाजास अनुसरून कांहीं मंडळींचीं समयोचित भाषणें झाल्यावर, चंदनकर्पुरयुक्त चितेवर त्यांच्या प्रेतास अग्निसंस्कार देण्यांत आला !

रावबहादुर भाऊसाहेबांच्या आकस्मिक निधनामुळें त्यांचे इष्ट–मित्र, सोयरे–धायरे व ज्ञातिबंधु यांचा मोठा समुदाय फारच हळहळला व त्यांच्याकडून भाऊसाहेबांच्या चिरंजीवांस दुखवट्याचीं व सहानुभूतिपर पत्रें आलीं. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील ठळक ठळक वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून त्यांच्यासंबंधीं मृत्युलेख आले, त्यांतून कांहींचा सारांश पुढें देतोः—

**केसरी**—कै. रा. ब. अनंत शिवाजी देसाई यांचा जन्म गरीबींत झाला असून ते लहानपणींच पोटाचे पाठीमागें लागून कोंकणांतून मुंबईस आले. तेथें गिरणी कामगार, फेरीवाला, वगैरे धंदे करून स्वतःचे चिकाटीनें व दीर्घोद्योगानें त्यांनीं लक्षाधीशाची पायरी गांठली. गरीबीचे हाल त्यांना पूर्ण ठाऊक असल्यानें त्यांच्या दातृत्वास सीमाच नव्हती. त्यांचा स्वभाव उदार व परोपकारी असून राहणी अगदीं साधी होती. त्यांनीं लाखों रुपयांची मदत शिक्षणविषयक व धार्मिक संस्थांना केली आहे. त्यांतील श्रेष्ठ प्रतीची देणगी म्हणजे त्यांनीं मालवण हायस्कूलास सवा लाख रुपये दिले ही होय. त्यांच्या मृत्यूमुळें मुंबईंतील एक प्रमुख, दीर्घोद्योगी व दानशूर व्यापारी नाहींसा झाला आहे.

**इंदुप्रकाश**—त्यांच्या व्यापाराचा विस्तार आज किती वाढला आहे तें मुंबापुरस्थांस माहीत आहे. त्यांनीं ॲल्युमिनीमचा कारखाना काढून आपल्या व्यापारांत चांगलीच भर घातली व पुष्कळ धन संपादन केलें. त्यांचा स्वभाव उदार, धर्मनिष्ठ व परोपकारी असून राहणी साधी असे. दानधर्माकडे त्यांची विशेष प्रवृत्ति असे. यांच्या मृत्यूमुळें मुंबईंतील एक प्रमुख व दीर्घोद्योगी व्यापारी नाहींसा झाला आहे, यांत संशय नाहीं.

[stamp]

**राजकारण**—मुंबईतील धनाढ्य व्यापारी व लक्षाधीश रा. ब. अनंत शिवाजी देसाई ऊर्फ टोपीवाले यांच्या मृत्यूमुळें मुंबईतील दक्षिणी व्यापारी मंडळांतील एक मोठा कर्ता पुरुष हरपला यांत शंका नाहीं. उच्च शिक्षण ऊर्फ नेभळटपणाचें, टाकाऊ, खर्डेघांशीचें शिक्षण न मिळाल्यामुळेंच नोकरीच्या दावणीमध्यें हे बांधले गेले नाहींत, व त्यांची कर्तृत्वशक्ति कायम राहिली. पांच सात लक्ष रुपये त्यांनीं धर्मार्थ दिले. त्यांना रा. ब. पदवी सत्ताधाऱ्यांनीं दिली होती. बी. ए. झालों नाहीं तर उपाशी मरेन कीं काय, अशी धास्ती ज्या तरुणांना वाटत असेल, त्यांनीं टोपीवाल्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवावें व स्वतंत्र धंदा करावा.

**संदेश**—टोपीवाले यांचें निधनवृत्त वाचून पुष्कळांना हळहळ वाटल्याशिवाय राहणार नाहीं; कारण कै. अनंत शिवाजी देसाई हे निरनिराळ्या व्यापारधंद्यांत चौरस होते, त्याचप्रमाणें दानधर्माच्या बाबतींत दक्षिणी लोकांमध्यें त्यांचाच पुढाकार नेहमीं असे. उत्तम व्यवहार व शक्य तेवढें जास्तींत जास्त धन संपादन करून त्याचा सढळ हातानें दानधर्म करण्यांत त्यांचा नेहमींच हातखंडा असे. यामुळें त्यांच्या नांवाची ओळख नाहीं असा मनुष्य सांपडणें विरळा. शिक्षणाची जोड बेताबाताचीच असतांना ज्यानें लक्षाधीश, कोट्यधीश होईपर्यंत आपलें नशीब केवळ दीर्घप्रयत्नांच्या व उद्योगाच्या बळावर वर काढिलें, त्या थोर पुरुषाचें चरित्र कोणाला अनुकरणीय वाटणार नाहीं ? दीर्घप्रयत्न व सततोद्योग या गुणांची जगांत जोंपर्यंत चहा होत राहील, तोंपर्यंत **टोपीवाले** या टोपण नांवाची कोणालाहि विस्मृति होणार नाहीं. शिक्षण नसलें तरी उद्योगप्रियतेच्या बळावर मनुष्याला किती थोर योग्यतेला चढतां येतें, याचें रहस्य "टोपीवाले" या एका शब्दांत समावून राहिलें आहे. ते अनेक व्यवसायी होते. प्रत्येक धंद्यांत त्यांना उत्तरोत्तर यशच मिळत गेलें. उद्योगी व धोरणी मनुष्यापासून यश हें केव्हांहि दूर नसतें. व्यापा-

रांत पडणाऱ्या माणसाच्या अंगीं जे गुण अवश्य असतात, त्या सर्व गुण-समुदायानें त्यांच्या ठायीं गर्दी केली होती. यामुळेंच ज्या धडाडीनें व उत्साहानें ते व्यापारधंद्यांत आपल्या बाल्यावस्थेंतच पडले, त्यांची ती धडाडी व तो उत्साह अखेरपर्यंत कायम होता. त्यांचा थोरपणा त्यांच्या औदार्यांतहि गुरफटून राहिला आहे. आपल्या मिळकतींतून त्यांनीं लाखों रुपयांची निरनिराळ्या शिक्षणविषयक, सामाजिक व धार्मिक संस्थांना जी मदत करून ठेविली आहे, त्यामुळें त्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. हे आपल्या जुन्या व बाळबोध वळणाला चिकटून चालणारे होते. त्यांची धर्मश्रद्धा व ईश्वरभक्ति प्रशंसनीय होती.

**सयाजीविजय**—त्यांनीं कारखाने वगैरे काढून आपल्या व्यापारांत चांगलीच भर घातली, व पुष्कळ धन संपादन केलें. त्यांचा स्वभाव उदार, धर्मनिष्ठ व परोपकारी असून राहणी साधी असे. दानधर्माकडे त्यांची विशेष प्रवृत्ति असे. त्यांनीं शिक्षणप्रसाराच्या कार्यास चांगली मदत केली आहे. तसेंच इतर बऱ्याच संस्थांस त्यांनीं देणग्या देऊन योग्य मदत केली आहे. यांशिवाय परदेशांत विशिष्ट ज्ञानसंपादनार्थ स्वज्ञातींतील विद्यार्थी पाठविण्यासाठीं त्यांनीं सुमारें तीन लक्ष रुपये निराळे काढून ठेवले आहेत.

**लोकमान्य**—श्रीमंत टोपीवाले हे अगदीं गरीब स्थितींत जन्मले असून, इतके धनाढ्य केवळ आपल्या उद्योगप्रियतेनें झाले. त्यांनीं कांहीं लक्ष रुपये धर्मार्थ खर्च केले आहेत, वगैरे माहिती त्यांच्या चरित्रा-वरून मिळते.

**मुंबई क्रॉनिकल**—"फेरीवाल्याचा लक्षाधीश—अद्भुत आयुर्यात्रेचा शेवट." रा. ब. टोपीवाले हे मुंबईतील दाक्षिणी व्यापाऱ्यांतील अग्रेसरां-पैकीं एक होते. शाळेंतील अपुऱ्या शिक्षणानें सज्ज होऊन कै. श्री. देसाई यांनीं आपल्या उपजीविकेस फेरीवाल्याच्या धंद्यापासून सुरुवात केली.

नंतर टोप्यांचें दुकान व कारखाना काढून, अविरत श्रमानें आणि तीव्र व्यावहारी दूरदृष्टीनें ते टोप्यांच्या व्यापाऱ्यांत एक मार्गदर्शक व अग्रगण्य व्यापारी बनले; व त्यांस मागाहून मिळालेल्या 'रावबहादुर' या पदवी-पेक्षां त्यांच्या आयुष्यांतील कार्य व कर्तृत्वशक्ति यांची जास्त निदर्शक अशी 'टोपीवाला' ही पदवी त्यांनीं स्वतःच्या कर्तबगारीनें कमाविली. जर्मन सिल्व्हर व ॲल्युमिनीम यांचे कारखाने काढण्यांत त्यांचा पुढारी-पणा असून त्या उद्योगांतील ते अग्रगण्य होते. सार्वजनिक कार्यांप्रीत्यर्थ दानधर्म करण्याच्या कामीं त्यांचा हात नेहमीं सढळ असे, व त्यांनीं असा दानधर्म सुमारें ७ लाख रुपयांपर्यंत केला आहे.

**मनोरंजन**—'टोपीवाले' या नांवानें महाराष्ट्रभर प्रख्यात असलेले मुंबईंतील सुप्रसिद्ध व्यापारी व दानशूर गृहस्थ रा. ब. अ. शि. देसाई हे एप्रील महिन्याच्या पंधराव्या तारखेस काळजाच्या विकारानें एकाएकीं कालवश झाले, हें कळविण्यास आम्हांस फार वाईट वाटतें. ते अत्यंत उद्योगी व धोरणी होते. यामुळें केलेल्या सर्व धंद्यांत त्यांना यश येत गेलें व लक्ष्मीची त्यांजवर कृपा झाली. अत्यंत गरीब दशेंत मुंबईस आलेल्या या पुरुषानें उद्योगाच्या बळावर लाखों रुपये मिळविले व मुंबईंतील इमा-रती व वाड्या यांचा तो धनी बनला. त्यांनीं आपल्या संपत्तीपैकीं ठळक अशा रकमांनीं केलेला दानधर्म सुमारें सात लक्ष रुपयांचा आहे. त्यांना स्वतःला जरी शिक्षणाचा लाभ झाला नाहीं, तथापि शिक्षणाची महति त्यांना कळत होती हें उघड होतें. त्यांची पत्नी सौ. नर्मदाबाई ह्या त्यांच्या आधीं एक वर्ष परलोकवासी झाल्या. त्या सुशिक्षित नव्हत्या, तथापि धर्म-निष्ठ, प्रेमळ, संसारदक्ष व पतीप्रमाणेंच उद्योगी होत्या; व ऐश्वर्यांत देखील त्यांच्या ह्या स्वभावांत फरक पडला नाहीं.

**चित्रमयजगत्**—महत्वाकांक्षा व दीर्घोद्योग या दोन गुणांच्या जोरा-वर त्यांनीं व्यापारांत यश मिळवून ते लक्षाधीश बनले. त्यांचा स्वभाव

सालस व उदार असून ते गरीबांचे कैवारी होते. त्यांनीं अनेक ठिकाणीं देणग्या देऊन आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. त्यांच्या मृत्यूनें अनेक संस्थांचा एक आस्थेवाईक पाठिराखा नाहींसा झाला आहे.

याशिवाय महाराष्ट्रांतील अनेक संस्थांकडून व त्यांच्या ज्ञातींतील संस्थांकडून दुखवट्याचे ठराव भाऊसाहेबांच्या चिरंजीवांकडे आले. मुंबई येथील त्यांच्या ज्ञातीची जाहीर सभा, ता. ८ मे १९२१ रोजीं कै. **पुरुषोत्तम पांडुरंग** ऊर्फ **बाबासाहेब वाघ** यांच्या अध्यक्षतेखालीं ठाकुरद्वारीं गौडब्राह्मणसभागृहांत भरून, दुःखप्रदर्शक ठराव करून, तो भाऊसाहेबांच्या चिरंजीवांकडे पाठविण्यांत आला. सदरहू सभेंत रा. रा. **बाळकृष्ण अनंत पाटील** यांनीं आपण रचलेलें "**अश्रुमुक्ताञ्जलि** अथवा **टोपीवाला–निधन–विलाप**" हें २१ श्लोकांचें शोकरसपूर्ण काव्य म्हणून दाखविलें. या काव्यांत भाऊसाहेबांच्या मृत्यूची बातमी ऐकून लोकांस विद्युत्पाताप्रमाणें धक्का कसा बसला त्याचें वर्णन करून, अशा लोकोत्तर पुरुषास अचानक नेल्याबद्दल कालास पुढीलप्रमाणें सवाल केला आहेः—

हें रत्न काला ! हरिलें कशाला ।
यत्कीर्ति नांदे जगतीं विशाला ॥
ख्याती तुझी जाणसि नीति धर्म ।
केलें तरी कां असलें कुकर्म ? ॥ ३ ॥

रत्नें आजवरी अशीं कितितरी या मृत्युभूमीवरी ।
ज्यांलागीं न सरी, तुवां निजकरीं बा लोटिलीं स्वोदरीं ॥
रत्नें काय वरीं अशीं यमपुरीं नाहीं तुझ्या मंदिरीं ।
यासाठींच वरी तुझी मति खरी ऐसी कृती तस्करी ? ॥ ४ ॥

यापुढें भाऊसाहेबांचें पूर्वोत्तर चरित्र व दातृत्वादि सद्गुण श्लोकाच्या अनेक वृत्तांत वर्णिले असून पुढील श्लोकांत काव्याची समाप्ति करण्यांत आली आहेः—

सारें शिशुत्व अति निर्धनतेंत गेलें ।
तारुण्य सर्वहि परिश्रमिं खर्च झालं ।।
वार्धक्यिं शांति-सुख तें उपभोगण्याला ।
वैकुंठ-लोक गमला बहु योग्य त्याला ! ।। १८ ।।

गेला सोडूनि गेला ! मृदुहृदय-सखा दीन दुःखी जनांचा ।
सच्छिष्य श्रीमठाचा, भजक निशिदिनीं देवनारायणाचा ।।
छात्रांचा साह्यकर्ता, द्युतियुत सुमणि ज्ञातिगंगोदरींचा ।
तारा अस्तासि गेला चमकुनि दृढधी-धैर्य-दीर्घोद्यमाचा ! ।। १९ ।।

हातीं ये न पुन्हा कदा शर सुटे हस्तांतुनी एकदा ।
जो प्राणी पडला कृतांत-करिं तो मागें फिरेना कदा ।।
ध्यानीं आणुनियां जगन्नियम हा शोकासि द्या टाकुनी ।
त्याचे सद्गुण आठवोनि उतरा नित्य स्वकृत्यांतुनी ।। २० ।।

आंच शोकभर दे हृदिं जो जळे ।
नेत्र-शुक्ति-पुटकां उघडी बळें ।।
अश्रु-मौक्तिक तयांतुनि सांडले ।
तेच अञ्जलि भरूनि समर्पिले ! ।। २१ ।।

# प्रकरण १७ वें.

## स्वभाव, वळण, वगैरे.

भाऊसाहेबांचें शिक्षण कोचरें येथील शाळेंत अकराच महिने झालें होतें, असें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. शाळा सुटल्यावर वडीलांच्या अकालिक निधनामुळें, उदरनिर्वाहाची सोई करण्याकरितां लहान वयांतच त्यांनां मुंबईची वाट धरावी लागली. पुढें ७–८ वर्षेपर्यंत पोटापाण्याच्या सोईकरितां धरलेल्या गिरणींतील नोकरीमुळें, व नंतर फेरीचे श्रम पडूं लागल्याकारणानें आपल्या तुटपुंज्या पुस्तकी शिक्षणांत भर घालण्याचें त्यांस साधलें नाहीं. त्या काळीं दिवसा इतर व्यवसायांत गुंतलेल्या इसमांस शिक्षण प्राप्त करून घेण्यास रात्रीच्या शाळांचें साधन हल्लींसारखें उपलब्ध नव्हतें. कारण शिक्षणाची महति त्यावेळीं आपल्या लोकांनीं पूर्णपणें जाणली नव्हती. इतर रोजगारांप्रमाणें शिक्षण हें चरितार्थाचें एक साधन आहे, इतकीच किंमत त्या कालीं लोकांनीं शिक्षणास दिली होती. परंतु हा समज आतां पालटला आहे. मनुष्यास जन्मास येऊन उदरंभरणापलीकडे कांहीं कर्तव्य आहे, व ह्या कर्तव्यांत आत्मोन्नति व देशोन्नति यांचा समावेश होतो, ही जाणीव आतां लोकांत उद्भवली आहे. ती सफल होण्यास सार्वत्रिक शिक्षण-प्रसार हाच एक मार्ग आहे. तथापि ‘ आधीं पोटोबा, मग विठोबा ’ ह्या संसारिक न्यायानें, सर्व दिवसभर खपणाऱ्या कामगार वर्गाच्या सोईक-रितां रात्रीच्या शाळा आतां, निदान मोठ्या शहरीं, कांहीं सद्‌गृहस्थांच्या उद्योगानें स्थापन झाल्या असून, त्यांचा लाभ पुष्कळ कामगार घेत आहेत. ही सोई त्या वेळेस असती तर, तिचा लाभ भाऊसाहेबांनीं घेतला असता

अशी आमची खात्री आहे. त्यांची जिज्ञासा व निरलसता त्यांस स्वस्थ राहूं देती ना. शिक्षणाची आवड त्यांस किती होती हें त्यांच्या शाळेंतल्या वर्तनक्रमावरून व संपादिलेल्या गुरुजींच्या कृपेवरून उघड दिसून येतें. गुरूजींनीं त्यांस अभ्यासी व हुशार मुलगा म्हणून निवडलें होतें. ते त्यांस आपल्या घरीं नेऊन शिक्षण देणार होते; पण दुर्दैवानें चुकामुक झाल्यामुळें तो बेत फसला, हें मागें सांगितलेंच आहे. शिक्षणाचें महत्व भाऊसाहेब पूर्णपणें ओळखून होते, म्हणूनच आपलें शिक्षण होऊं शकलें नाहीं, याबद्दल त्यांस राहून राहून खेद होत असे; व तो ते प्रदर्शितहि करीत. शिक्षणाच्या अभावीं आपला मार्ग कंटकमय झाला, तसें इतरांचें होऊं नये या सद्भावनेनें प्रेरित होऊन, त्यांनीं इतर गरीबीनें नाडलेल्या होतकरू मुलांस शिक्षणप्राप्तीचा मार्ग सुलभ करून ठेविला.

स्वतंत्र व्यवहार करूं लागल्यापासून ते गुजराथी व मराठी वाचावयास शिकले. इंग्रजी मात्र त्यांस येत नव्हतें. शिक्षणाची उणीव त्यांनीं अन्य दिशेनें भरून काढली होती. अवलोकन व जिज्ञासा सतत जागृत ठेऊन, प्रत्येक बाबत ते चौकस बुद्धीनें पाहत असत व त्यांतील खांचाखोंची स्वतःच्या स्मरणवहींत टिपून ठेऊन वेळेवर त्या ज्ञानाचा उपयोग करीत. यामुळें त्यांचे स्मरणशक्तीस चांगली कसरत मिळून ती मजबूत झाली होती. प्रत्येक कारभाराच्या हिशोबाचा अंदाज सतत त्यांच्या डोळ्यांपुढें असे, म्हणून वार्षिक आढाव्याचे वेळीं अथवा अन्य देवघेवीच्या हिशेबांत चूकभूल झाल्यास ते ती नेमकी दाखवून तिची दुरुस्ती करून घेत.

प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुभवापासून आपल्या कुशाग्र बुद्धीनें काढलेलें सार, हेंच त्यांचें ज्ञानभांडार. त्यांच्या बाबतींत तात्विक ज्ञानाची जागा व्यावहारिक ज्ञानानें भरून काढली होती. इतरांचा व्यवहार अथवा सल्ला स्वतःच्या बुद्धीस पटल्याखेरीज त्याचा उपयोग ते करीत नसत. दुसऱ्याच्या ओंजळीनें भाऊसाहेब कधींहि पाणी प्याले नाहींत. व्यापारी

बातम्या अथवा घडामोडी जरी वर्तमानपत्रांतून ते स्वतः वाचीत नसत, तरी इतरांकडून तसली माहिती ते करून घेत. तथापि इतर तज्ज्ञांनीं असल्या माहितीवरून बांधलेलें धोरण जाहीर केलें असलें तरी, स्वतः त्यावर विचार करून ग्राह्य ठरविल्याशिवाय तें भाऊसाहेब अंमलांत आणीत नसत. त्यांची नैसर्गिक सारासारविचारशक्ति प्रबळ असल्यामुळें त्यांचें धोरण सहसा चुकत नसे.

तात्विक शिक्षणाचे अभावीं प्रत्येक गोष्ट विचार करून तिची घडी नीट बसविण्यास भाऊसाहेबांस जास्त जास्त विलंब लागून विशेष कष्ट पडत असत. कारण उघड आहे. पुस्तकांतून दिलेल्या एखाद्या सिद्धांताच्या साहाय्यानें अनुमान चटकन् निघतें, तेंच सिद्धांताच्या मूळापासून काढीत बसल्यास वेळ जास्त लागून त्रासहि विशेष होतो.

भाऊसाहेबांचा धाडशी स्वभाव होता, हें वारंवार सांगण्यांत आलें आहेच. आरंभीं अपक्व दशेंत त्यांनीं खाणीच्या बाबतींत अविचारानें उडी घातली व ठोकर खाल्ली खरी; पण तिचा परिणाम पुढें त्यांस हितावहच झाला. तदनंतर अशी चूक पुनः त्यांच्या हातून झाली नाहीं. त्यांचें धाडस नेहमीं मर्यादित असे. मागचा पुढचा सावध चित्तानें विचार करून मग ते धाडसांत उतरत. अमुक एक गोष्ट आपल्या कार्यसिद्धयर्थ केलीच पाहिजे व ती आपल्या आटोक्यांतली आहे, असा एकदा त्यांचे मनाचा निश्चय झाला, कीं मग ती गोष्ट करण्यास त्यांनीं कधींहि माघार घेतली नाहीं. मार्गांत आलेल्या अडचणींचें हरयुक्तीनें व प्रयत्नानें ते निवारण करीत असत. त्यांचें प्रसंगावधान दांडगें होतें. आलेल्या संकटांनीं ते कधीं डगमगले नाहींत, कीं हताश झाले नाहींत; व त्यांस तन्निवारणार्थ नेमकी युक्तिहि वेळेवर सुचत असे. करारी बाणा अंगीं खिळलेला असल्यामुळें अपयश तर येऊं द्यावयाचें नाहीं; व तसें होऊं नये म्हणून आरंभींच अथपासून इतीपर्यंत लागणारी सर्व व्यवस्था ते करून

ठेवीत. आज कार्यास आरंभ तर करूंया, मग सर्व व्यवस्था बेतावेतानें करूं, असें धोरण त्यांचें कधींच नव्हतें. अमुक एक काम करण्याचें ठरवितांना त्यास लागणारा माल, पैसा, माणसें वगैरेंची आधींच तजवीज करण्याची त्यांस सवई असे. त्यामुळें ते तडफेनें प्रत्येक काम यशस्वीपणानें पार पाडीत. आजचें काम उद्यांवर ढकलणें त्यांस पसंत नसे; उलट पक्षीं उद्यांच्या कामाचा विचार व तयारी आजच करून ठेवण्याचा त्यांचा प्रघात असे. ह्या त्यांच्या पद्धतीचा आम्हांस प्रत्यक्ष अनुभव आला आहे. कांहीं इमारती पूर्वी त्यांनीं खातेवारी बांधल्या. त्या वेळेस त्यांनीं पाया खणण्यापूर्वी एकंदर इमारतीस पायाच्या दगडापासून तों छपराच्या कौलांपर्यंत लागणाऱ्या सामानाची तपशीलवार यादी तयार करून, तें सर्व सामान वेळेवर मिळविण्याची तजवीज केलेली असे. त्याचप्रमाणें कामास लागणारी रकमसुद्धां एका बाजूस काढून ठेवलेली असे. पुढें त्यांस एवढी दगदग होत नसे, म्हणून ते इमारती बांधण्याचें कंट्राक्ट देऊं लागले. कंट्राक्टर नेहमींच्या सरावाप्रमाणें जसजसें काम होत जाई तसतशी तात्पुरती सामानाची तजवीज करीत असत. ह्याबद्दल ते नेहमीं त्यांस दोष देत असत; व त्यांच्या अदूरदर्शी व्यापारी धोरणाची कींव करीत असत. त्यांचें म्हणणें असे कीं, हे कंट्राक्टर लोक काम घेते वेळेचा बाजारभाव पाहून, भाव अथवा रकम ठरवून काम घेतात; व पुढें अनिश्चित बाजारभावामुळें स्वतःस सर्वस्वीं परस्वाधीन करून घेतात. शिवाय वेळेवर माल न मिळाल्यामुळें माणसांचा पगार अंगावर पडतो तो वेगळाच. ह्या भाषणावरून त्यांच्या उपरिनिर्दिष्ट काम करण्याच्या पद्धतींत व्यापारी धोरण किती खिळलें होतें, हें उघड होईल. असो.

शील चांगल्या प्रकारें प्रस्थापित करून त्यास बळकटी आणण्यास अवश्य लागणारे उद्योगप्रियता, निरलसता, कार्यक्षमता, दृढनिश्चय व

धारिष्ट, व या सर्वांस सांवरून धरणारे आत्मविश्वास, स्वाभिमान व कुलाभिमान यांसारखे गुण भाऊसाहेबांत उपजतच होते, व ते पुढें वृद्धि पावले. आपली निकृष्ट स्थिति, व ती सुधारण्यास वडिलांचे चाललेले अटोकाट प्रयत्न, बाळपणांतच त्यांचे लक्षांत आले होते. त्यांचें त्या वेळचें बालवय असूनहि सवंगड्यांबरोबर खेळ खेळण्यांत ते गुंतले नाहींत. तर घरीं व दुकानीं वडिलांस एकसारखी मदत करून ते त्यांचा भार हलका करीत होते. शिवाजीपंतांनीं आपल्या या मुलाच्या उद्योगप्रियतेबरोबरच दुकानाच्या व्यवस्थेंत व गिऱ्हाइकी सांभाळण्यांत त्यानें दाखविलेलें व्यापारी वळण व चातुर्य ओळखून ठेविलें होतें. म्हणूनच त्यांनीं मृत्युसमयीं याच मुलास निवडून मुंबईस जाण्याचा उपदेश केला होता. शिवाजीपंतांप्रमाणें सर्व वडील आपल्या मुलांचे गुण व स्वाभाविक वळण ओळखून त्यांस कार्याची दिशा दाखवितील, तर कितीतरी मुलांचें कल्याण होईल.

भाऊसाहेबांचें मुंबईंतील प्रथमप्रवेशाचे वेळचें वय त्यांचे शीलास फारच विघातक होतें. ह्याच वयांत बाहेरच्या संगतीचा परिणाम मुलांच्या शीलावर विशेष होतो, व कुसंगतीमुळें झालेले दुष्परिणाम पुढें जाणत्या वयांत मानसिक बलाच्या जोरावर धुऊन टाकणारे दैववान प्राणी थोडकेच असतात. या वयांत इतरांचें अनुकरण करण्याकडे प्रवृत्ति विशेष असते. हा प्रकार शाळांतून विशेष पाहण्यांत येतो. एका मुलानें तिऱ्हाइताची खोडी किंवा गम्मत करण्याच्या उद्देशानें त्याच्या अंगावर पाठीमागून पाणी ओतलें, तर त्याचें अनुकरण करून दुसरा शाई ओतून पहिल्यावर ताण करितो. भर वर्गात एखादा मांजराप्रमाणें हळूच ओरडला, तर दुसरा मुलगा गाढवाप्रमाणें ओरडण्यास कमी करीत नाहीं. विड्या ओढणें, वाईट वस्तींतून भटकत फिरणें व तेथील अश्लील व नीतिबाह्य प्रकार प्रथम अवलोकन करून, नंतर पुढें कुमार्गाला लागणें व तशीच कुसंगत जडल्यास दारू पिणें, लहान-

सहान चोऱ्यामाऱ्या करणें वगैरेसारख्या अनीतिकारक सवयी लागण्यास हेंच वय अनुकूल असतें; व यासाठींच गृहशिक्षेची विशेष अवश्यकता असते ती ह्या वयांतच. ती तर भाऊसाहेबांच्या बाबतींत अगदींच अशक्य होती. ना कोणाची ओळख ना देख. अशा परिस्थितींत ते मुंबई-सारख्या बकाल शहरांत पोरवयांत आले व त्यांस प्रथम संगत मिळाली ती गिरणी कामगारांची. डोकीवर गृहशिक्षण देणाऱ्या व दाबांत ठेवणाऱ्या वडीलधाऱ्या माणसांचा अभाव व वरील प्रकारची परिस्थिती; मग शीलभ्रष्ट होण्यास दुसरें काय पाहिजे? पण नाहीं; अशा भयंकर परिस्थितीच्या सागरांतून निष्कलंकपणें भाऊसाहेब तरून गेले. याचें कारण त्यांचे मानसिक गुण तर खरेच, पण विशेषेंकरून त्यांची उद्योगप्रियताच होय. व्यसनें व वाईट खोड्या जडण्यास रिकामटेकडेपणासारखें दुसरें सुपीक क्षेत्र नाहीं. भाऊसाहेबांस रिकामपण कुठलें? त्यांचें सर्व चित्त आपली महत्वाकांक्षा पुरी पाडण्यांत व्यग्र होतें. म्हणून सुटीच्या व इतर फावल्या वेळीं उन्नतीप्रीत्यर्थ आपल्या ज्ञानांत सारखी भर घालण्यांत ते मग्न असत. म्हणूनच ते या वयांत कुसंगतीच्या संसर्गानें अवश्य जडणाऱ्या अनेक व्याधींपासून मुक्त राहिले. भाऊसाहेबांचें शील उत्तम प्रकारचें होतें. व्यवहारांत नेकी, सचोटी, पत, स्वाभिमान वगैरे राखून त्यांनीं तें बलवत्तर केलें होतें. आपणांस त्यांनीं कोणत्याहि प्रकारचें व्यसन जडूं दिलें नाहीं. चारचौघांत प्रतिष्ठित मानलेल्या विडीच्या व्यसनापासूनहि ते अलिप्त राहिले. अलीकडे त्यांस डाक्टरांनीं दम्याच्या विकाराच्या शमनार्थ औषधी विड्या दिल्या होत्या, त्या मात्र त्यांस ओढाव्या लागल्या.

भाऊसाहेबांच्या स्वभावांतील आणखी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे त्यांची शिस्त व वक्तशीरपणा. कामांतच काय पण आचरणांत सुद्धां शिस्त, टापटीप व नियमितपणा असावा असा त्यांचा नेहमीं कटाक्ष असे. एकदा आंखून दिलेल्या मार्गानें सर्व काम नीट,

व्यवस्थितपणें व वेळेवर स्वतः करण्याची व इतरांकडून करून घेण्याची ते खबरदारी घेत असत. त्यांचें नेहमीं म्हणणें असे कीं, धन्यानें नेमस्तपणा राखला नाहीं तर घरच्या मंडळींत व नोकराचाकरांत त्याची अपेक्षा करणें व्यर्थ होय. नुसती वाचाळता व उपदेश कामास येत नाहींत. आपल्या स्वतःच्या कृतीनेंच आपण इतरांस मार्गदर्शक झालें पाहिजे. हें भाऊसाहेबांचें वचन आपणास पुढारी म्हणविणाऱ्यांनीं प्रामाणिकपणें पाळल्यास समाजाची सामाजिक, नैतिक व राजकीयहि सुधारणा होण्यास विलंब लागणार नाहीं. यासाठींच भाऊसाहेबांची दिनचर्या अगदीं ठराविक पद्धतीची असे. पहांटेस तारुण्यावस्थेंत तीन वाजतां व अलीकडे उतारवयांत प्रकृति विकृत झाल्यामुळें पांच वाजतां उठल्यावर, प्रातःकाळचीं नित्यकृत्यें, स्नान, संध्या, पूजा, अर्चा व अल्प उपाहार आटोपल्यावर एकाग्रचित्तानें ते कामाकाजाचा विचार करीत बसत. मनानें त्या दिवशीं करावयाचीं कामें ठरवून, बरोबर साडेआठ वाजतां दुकानावर ते जात. तेथें दहा वाजेपर्यंत सर्व व्यवस्था लावून घरीं परत येत, व ताबडतोब भोजन उरकीत. कोणी पाहुणा घरीं आल्यास, तो नवीन असल्यास पूर्वींच घरच्या माणसांकडून त्यास आपल्या नियमित पद्धतीची समजूत द्यावयास लावीत. जर इतकें करूनहि जेवणाचे ठराविक वेळीं पाहुणेमहाराज हजर नसले, तर त्यांचा अपमान होईल ह्या भीडेनें त्यांची वाट बघत बसून आपल्या क्रमांत बिघाड होऊं देत नसत; व स्वतःचें जेवण ठरल्या वेळीं उरकून घेत. नंतर कांहीं वेळ आपल्या व्यवहाराच्या उहापोहांत चिरंजीव, मुनीम अथवा कामानिमित्त आलेला किंवा मुद्दाम बोलाविलेला मनुष्य यांजबरोबर ते घालवीत. मग थोडी वामकुक्षी झाल्यावर तास दीड तास ते सवडीनें घालवीत असत. त्यांच्या स्वतःच्या कामाबाहेरच्या बाबतींत कोणास त्यांची भेट घेणें असल्यास, त्यासाठीं हीच वेळ ठरलेली असे. त्या वेळीं कोणीहि आल्यास त्याची

भेट ते आनंदानें घेत. नंतर बरोबर तीन वाजतां बाहेर पडून कारखान्यांत जात असत, व तेथील तपासणी व व्यवस्था आटोपून मग दुकानावर जात. दुकानावर सहा वाजेपर्यंत काम करून ते परभारें गाडींतून हवा खाण्यास बाहेर पडत. घरीं परत आल्यावर आठ वाजतां रात्रीचें जेवण होत असे. साडेनऊ वाजेपर्यंतचा वेळ ते घरच्या मंडळीशीं अथवा पाहुणे-मित्रमंडळीशीं सवडीच्या गप्पागोष्टी अगदीं मोकळ्या मनानें करण्यांत घालवीत. याच अवधींत ते सबंध दिवसभर कामांत व्यग्र असलेल्या आपल्या मनाचा थकवा घालविण्याकरितां, करमणूकीच्या गप्पागोष्टींत त्यास आराम घेण्यास मोकळें सोडीत. या वेळेखेरीज इतर कामाकाजाच्या वेळीं कोणी भेटावयास आल्यास, त्यांची सवडीनें भेट होणें अशक्यच असे. असल्यावेळीं कोणी अघळपघळ गप्पा मारण्यास आल्यास त्याच्याशीं बोलत बसणें त्यांचे स्वभावास पटत नसे. त्यामुळें त्यांचे वागणूकींत असंभावितपणाची छटा दिसत असे. तोच त्यांच्या सवडीच्या वेळीं आल्यास त्याच्याशीं ते मोठ्या आनंदानें बोलत बसत. अशा वेळीं त्यांच्या भाषणांत सौजन्य व कधीं कधीं मार्मिक विनोदहि दिसून येत असे. योग्य वेळीं भेटण्यास आलेल्या इसमांत श्रीमंत, गरीब, वयस्क, तरूण, असले पंक्तिप्रपंच ते कधींहि ठेवीत नसत. स्वतः वयस्क असूनहि तरुणांससुद्धां उत्थापन देऊन त्यांचा ते सत्कार करीत असत. परंतु ठराविक वेळेची इशारत घड्याळानें दिली, कीं मग अधीर होऊन भाषण आटोपतें घेत असत. प्रसंगीं भेटीस येणाऱ्या मनुष्यानें न उमगल्यास नाइलाजास्तव स्वतःच उठून त्यास रजा घेण्यास भाग पाडीत. वेळेच्या महत्वाचा पूर्ण पगडा त्यांच्या मनावर बसल्यामुळें, त्यांच्या भेटीचा अनुभव एकास एक प्रकारचा तर दुसऱ्यास दुसऱ्या प्रकारचा येई; किंवा एकाच व्यक्तीस निरनिराळ्या प्रसंगीं विरुद्ध अनुभव येत असत. असें होण्याचें कारण लक्षांत न आल्यामुळें, भाऊसाहेब तबियतखोर आहेत

असा कांहीं जणांचा गैरसमजहि होण्याचा संभव असे. वरीलप्रमाणें त्यांची दिनचर्या, सर्व कामांची घडी व्यवस्थेशीर बसल्यावर व पदरीं खात्रीच्या, व स्वतःच्या तालमींत तयार होऊन अनुभवशीर बनलेल्या मदतगारांचा भरणा झाल्यानंतर—अलीकडील १०–१५ वर्षें—सारखी चालू असे. त्यांत बिलकूल खंड पडावयाचा नाहीं. सण असो, सुटी असो, त्यांचा नियमित कार्यक्रम अव्याहत चालूच असावयाचा. दुकान व कारखाना बंद असेल त्या दिवशीं भाऊसाहेब सुटी म्हणून सकाळीं दोन तास जास्त पलंगावर ताणलेले सांपडावयाचे नाहींत, कीं शॉर्ट कोट घालून व पंचा नेसून येथून तेथें फिरत, चहाचे पेले उडवीत व मित्रांशीं गप्पा-गोष्टी करित बसलेले दिसावयाचे नाहींत. अशा दिवशीं सकाळचा व्यवहार नित्याप्रमाणें आटोपून, गोरेगांवास जाऊन तेथील बगीचा व शेती यांची देखरेख करण्यांत गुंतलेले असत. रोजच्या दगदगीच्या ऐवजीं असें आल्हादकारक काम करण्यांतच त्यांस आराम वाटत असे, व त्यांतच त्यांची करमणूक होत असे. सारांश कोणत्या ना कोणत्या तरी कामांत त्यांचें मन सदोदित गुंतलेलें असे.

भाऊसाहेब याप्रमाणें स्वतःचें आचरण पद्धतशीर ठेऊन आपल्या मुलाबाळांत, व आपल्याशीं कामकाजाच्या संबंधीं येणाऱ्या इतर माणसात सुद्धां, त्याची अपेक्षा करीत असत. कोणत्याहि कामांत अव्यवस्था व हलगर्जीपणा त्यांस बिलकूल खपत नसे. तसें दिसून आल्यास त्या माणसावर ते प्रथम आवेशांत बेसुमार रागावत असत. आपण अव्याहत परिश्रम करून, केवळ स्वतःच्या हिंमतीवर उभारलेला डोलारा सुरक्षित राहावा, एतदर्थ त्यांस कडक शिस्त अंमलांत आणावी लागत असे. याचा परिणाम त्यांचे स्वभावावर घडून तो तापट बनला, व हा तापटपणा पुढें इतका वाढला कीं, त्यांच्या मर्जीविरुद्ध एखादी गोष्ट घडल्यास किंचित् वेळ वायूच्या झटक्यासारखा त्यांचा चित्तक्षोभ होत असे, व

तसल्या विकृत आवेशांत त्यांच्या तोंडून भलतीच भाषा बाहेर पडे, व त्यांचें आचरणहि अमर्याद दिसे. परंतु हा झटका लवकरच ओसरल्यावर भानावर येऊन, ते पुनः त्याच विषयावर शांतपणें विचार करून बोलत असत. त्यांच्या परिचयाच्या मंडळीस ह्या विकाराची माहिती होती, सबब तिजकडे त्यांचें दुर्लक्ष असे. तिऱ्हाइतांनीं मात्र, त्यांच्या संबंधांत असा प्रकार घडल्यास, श्रीमंतीचा मद चढून त्यांचा स्वभाव बेमुरवतखोर बनला आहे, असा अर्थ केला होता. बाकी नेकीनें काम करणाऱ्यांचा अथवा व्यवहार ठेवणाऱ्यांचा ते कसा परामर्ष घेत असत, तसेंच त्यांच्या अंगीं गुणग्राहकता व कृतज्ञता वगैरे गुण कसे वास करीत होते, याबद्दल उल्लेख मागें आलाच आहे.

"साधी राहणी व उच्च विचारसरणी" ह्या म्हणीप्रमाणें भाऊसाहेबांची राहणी व वर्तन असे. कितीहि धनाढ्य मनुष्य असला तरी त्यास, चैनी-खातर म्हणा अथवा पोकळ डामडौलाकरितां म्हणा, उधळपट्टीची सवई जडल्यास कुबेराची संपत्तिहि पुरी पडावयाची नाहीं. आरंभींच भाऊ-साहेबांस परिस्थितीनें मितव्ययी बनविलें होतें. महत्वाकांक्षा फलद्रूप कर-ण्यासाठीं हात आवरून खर्च करण्याची त्यांस सवई लागली होती, व तीच पुढें दृढमूल झाली. त्यांची जसजशी सांपत्तिक स्थिति वाढत चालली तसतसा त्यांचा खासगी खर्चहि वाढत गेला; व तो खर्च भाऊसाहेब प्राप्त-योग्यतेस साजेसाच करीत असत. त्यांत त्यांनीं कृपणपणा अंगिकारिला नाहीं. गाडी-घोडा, नोकर-चाकर वगैरे यथायोग्य इतमाम ते पदरीं बाळगून होते. तथापि त्यांची एकंदर राहणी बाळबोध व साध्या वळणाची असे. त्यांत फाजील ऐट व दिखाऊ बडेजाव अथवा थाट-माट बिलकूल नसे. त्यांचा पेहराव सुद्धां नेमका व साध्या पद्धतीचा असे. त्यांत भपकेबाज ऐट किंवा सुधारलेला नटवेपणा नव्हता. घरांतसुद्धां नव्या पद्धतीप्रमाणें मारे खुर्च्या, कोचें, मेजें, आरशाचीं कपाटें व

आलमिरे यांची रेलचेल करून गर्दी करून सोडलेली नव्हती. बेताचेंच, उपयोगी व टिकाऊ सामान असून तें नीट टापटिपीनें मांडलेलें असे. स्वच्छतेकडे त्यांचें विशेष लक्ष असे. त्यांस ईश्वरकृपेनें त्यांच्याच तबियतीची पत्नी लाभल्यामुळें, साध्या राहणींत मदत झाली होती. सौ. नर्मदाबाईस श्रीमंती चोचले सुचले नाहींत. त्या कधींहि हिरे, माणकें व सोनें यांच्या भाराखालीं दडपून माईसाहेब–बाईसाहेब बनल्या नाहींत, किंवा आडवा भांग पाडून, तंग पोलक्याच्या चोळींत, पायघोळ व लांब झुलता पदर सोडलेल्या तलम पातळांत, मिरविल्या नाहींत. सारांश, या वैभवाप्रत पोंचलेल्या दांपत्याची राहणी उच्च दर्ज्याच्या बाळबोध वळणाची मूर्तिमंत दिसे; व तेंच वळण त्यांच्या मुलांमुलींत उतरलें आहे.

ज्याप्रमाणें भाऊसाहेबांची राहणी बाळबोध वळणाची, त्याचप्रमाणें त्यांचे आचार-विचारहि जुन्या मताचे होते. रोजचीं स्नान–संध्या–पूजा-अर्चादि आन्हिक कृत्यें व सबंध वर्षांत ब्राम्हणी गृहस्थाश्रमांतील सर्व धार्मिक कृत्यें व कुळाचार ते नेमानें करीत असत. शिवाय गणपत्युत्सव, कथा–पुराणें, सत्यनारायणपूजा, मंत्रजागरणें वगैरे सर्व कांहीं ते यथायोग्य थाटानें करीत असत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, वैदिक धर्मानें आंखून दिलेल्या सर्व क्रियाकर्मांवर त्यांची पूर्ण श्रद्धा असे. ज्योतिष-शास्त्रावरहि त्यांचा भरंवसा होता, म्हणून महत्वाचे कामास लागणारे शकुन, वेळ–अवेळ, मुहूर्त वगैरे ते ज्योतिष्याकडून पाहवीत असत. त्यामुळें विद्वान् शास्त्री, जोशी, भट–भिक्षुक ह्यांस त्यांचा चांगल आश्रय असे.

भाऊसाहेब पुराणमतवादी होते. प्रचलित धर्मरूढीबाह्य कर्म त्यांस संमत नव्हतें. त्यामुळें प्रौढविवाह, पुनर्विवाह मिश्रविवाह, वगैरे सारख्य आधुनिक सुधारकांनीं प्रस्थापित केलेल्या सामाजिक सुधारणा व ब्रम्हो-समाज, प्रार्थनासमाज, थिऑसफी यांसारखे नवे संप्रदाय त्यांस पसंत

नसत. स्त्रीशिक्षणासंबंधीं त्यांचे विचार मननीय आहेत. स्त्रियांस स्वयंपाक-घरांतील अज्ञानाच्या अंधकारांत कोंडून न ठेवतां त्यांस लिहिणें-वाचणें, शिवण-टिपण, कशिदा-भरतकाम वगैरे येत असून, त्या गृहकृत्यांत व मुलांच्या सांगोपनांत तरबेज होतील असें शिक्षण दिलें पाहिजे. नुसतें इंग्रजी वाक्पांडित्यांत प्रावीण्य मिळवून सभांतून पुरुषांबरोबर वावरल्यानें त्यांचें शिक्षण झालें असें होत नाहीं. अशानें त्यांचें संसाराकडे दुर्लक्ष होतें तें इष्ट नाहीं. थोडक्यांत त्यांचें मत सांगावयाचें म्हणजे संसारशकट हाकण्यांत स्त्रियांची पुरुषांस मदत होणें अवश्य असून, त्यांच्या वेळेचा विनियोग सदुद्योगांत व्हावा व त्यांस स्वतःची आत्मोन्नति करितां यावी, अशा धोरणाचें त्यांचें शिक्षण असावें. विधवाविवाहाचे पुरस्कर्ते, दुर्दैवानें प्राप्त झालेल्या स्थितींत विधवा निराधार बनतात व त्यामुळें त्यांचे हाल होतात ते टाळावे एतदर्थ पुनर्विवाह अवश्य आहे, असें एक कारण पुढें करित असतात. त्याविरुद्ध भाऊसाहेबांचें म्हणणें असे कीं, त्यास उपाय धर्मबाह्य पुनर्विवाह नव्हे. त्यापेक्षां विधवांस घरबसल्या होण्यासारखा कांहीं उद्योग शिकवून व त्यांस काम पुरवून, त्याचा मोबदला त्यांस पोंचता करणाऱ्या संस्था निर्माण केल्यास त्यांचे हाल टाळतां येण्यासारखे आहेत. त्यांच्या पत्नी सौ. नर्मदाबाई हें सत्कार्य आपल्या हयातींत सधवा व विधवा यांच्या मदतीखातर करीत होत्या, याचा उल्लेख मागें आलाच आहे. असल्या संस्थांस मदत मागितल्यास भाऊसाहेबांनीं सढळ हातानें ती दिली असती, अशी आमची खात्री आहे.

भाऊसाहेब उद्योगधंद्याच्या बाबतींत प्रागतिक होते, हें त्यांच्या चरित्रावरून उघड दिसून आलेंच आहे. एखादें काम बापजादे करीत होते त्या प्रकारांत, फायदा होण्यासारखा असूनहि, काडीभर फरक न करितां जुन्या परंपरेसच खिळून राहणाऱ्या इसमांस ते दोष देत. हातानें काम करण्यापेक्षां यंत्रकलेच्या साहाय्यानें ज्या कामांत जास्त

फायदा होतो, अथवा शेतीबागायतींत नव्या धरती स्वीकारिल्यानें पीक वाढत असलें तर, तसें करण्यास ते सर्वांस उपदेश करीत असत. अशा उद्योगधंद्यांत सुधारणा अंमलांत आणणाऱ्या प्रागतिक वृत्तीच्या गृहस्थानें सामाजिक बाबतींत सुधारणेच्या विरुद्ध कां असावें, हा एक प्रश्न आहे. असें होण्याचें कारण आम्हांस वाटतें कीं, धर्माच्या नांवाखालीं खपणाऱ्या रूढीसंबंधीं त्यांची अंधश्रद्धा हेंच होय. हीच अंधश्रद्धा घालविण्यास धर्माचें अस्सल ज्ञान व रूढींत कालमानपरत्वें पडणाऱ्या फेरफाराच्या इतिहासाचें अवलोकन, सद्यःकालीन परिस्थितीचा विचार व इतर देशांतील रूढ चालीरीतींची माहिती वगैरे उपाय आहेत. भाऊसाहेब मनोभावेंकरून उद्योगधंद्याच्या पाठीमागें जन्मभर लागले असल्यानें, विचार करून त्यांत प्रगति करूं शकले, परंतु सामाजिक बाबतींत त्यांस तसें करितां आलें नाहीं, म्हणून प्रचलित रूढीबाहेर त्यांचें पाऊल पुढें पडं शकलें नाही.

एथपर्यंत भाऊसाहेबांचा स्वभाव, आचार, विचार यांचें वर्णन देऊन त्यांचें विवरण आम्ही केलें आहे. आतां त्यांचें समाजाशीं दळणवळण कोणत्या प्रकारचें होतें ह्यासंबंधी दोन शब्द लिहूं.

भाऊसाहेबांनीं सभांस जाण्याचा प्रघात ठेविला नव्हता, किंवा अलीकडे सुसंपन्न लोकांत पडलेल्या परिपाठानुसार ते एखाद्या क्लबाचे किंवा संस्थेचे सभासद होऊन मंडळींत मिसळलेले नाहींत. यावरून ते मनुष्यघ्राणे होते, असा कांहीं जणांचा समज झाला आहे; तर इतरांनीं त्यांची गणना गर्विष्ठांत केली आहे. परंतु वस्तुस्थिति वेगळीच होती. मुंबईस आल्यावर त्यांनीं दोन वेळ पोटापाण्याची सोई कशी होते या विवंचनेपासून आपल्या जीवनयात्रेस आरंभ केला, हें आपण पाहिलेंच आहे. नंतर असाधारण कष्टानें ते एकेक मजल मारीत पुढें गेले. टप्प्याटप्प्याला जसजसें त्यांस यश मिळत गेलें, तसतसा त्यांचा हुरूप वाढत गेला,

व त्याच प्रमाणानें त्यांची जबाबदारीहि वाढली. पदरांत पडलेलें यश कायम करण्याच्या व पुढील टप्पा गांठण्याच्या योजनेंत ते नेहमीं चूर असत. त्यांच्या व्यवहारांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे प्रत्येक व्यवहारास चिरस्थाई रूप देणें ही होय. कारण ह्याकडे आपल्या लोकांचें लक्ष असावें तसें नसतें. बहुतेकांची नजर कोती असते. इतिहास पाहिला तरी त्यांत हेंच दिसून येईल. शिवाजीमहाराजांनंतर पेशव्यांच्या कारकीर्दींत काय व मुसलमानी किंवा मोंगल राज्यांत काय, हेंच दिसून येईल. एका मागून एक स्वाऱ्या करून किल्ले किंवा प्रांत सर करावे व त्यांचा बंदोबस्त नीट न लावल्यामुळें, तेथून त्यांची पाठ फिरली कीं त्यांच्या शत्रूंनीं पुनः ते सर्व परत घ्यावे. भाऊसाहेब जो उद्योग करीत तो सर्व कायम राहावा अशाच बंदोबस्तानें उभारून त्याची व्यवस्था लावीत. हा सर्व खटाटोप एकट्याच्या हिंमतीवर करावयाचा असल्यामुळें त्यांस, मागें सांगितल्याप्रमाणें, विशेष आयास पडत असत व इतर बाबींकडे लक्ष पुरविण्यास पहिल्यानें त्यांस अवसरच नसे. किंबहुना त्यांकडे त्यांचें लक्षच जात नसे. ही स्थिति मात्र अलीकडे दहा बारा वर्षांत बदलली होती, व त्यांस इकडेतिकडे पाहण्यास सवड मिळूं लागली होती. या अवधींत त्यांस सभांतून, क्लबांतून अथवा संस्थांतून फिरकतां आलें असतें खरें, पण तसें न घडण्यास एक दुसरें नाजूक कारण होतें, तें आम्हांस त्यांच्याशीं वरचेवर घडलेल्या संभाषणप्रसंगीं दिसून आलें. तें कारण दुसरें तिसरें कांहीं नसून भाऊसाहेबांच्या मनास वाटत असलेला संकोच हें होय. त्यांस हा अवसर त्यांच्या उतारवयांत मिळूं लागला होता. त्या सुमारास ते उच्चप्रतीच्या व्यापाऱ्यांत मोडत होते, व त्यांचा दर्जा व मानमरातब पुष्कळच वाढला होता. यापूर्वीं त्यांचें कोठेंहि येणेंजाणें उपरिनिर्दिष्ट कारणांवरून न झाल्यामुळें, त्यांस सभांतून बोलण्याचालण्याचा सराव झाला नव्हता. सभेस जाऊन

आपला कांहीं उपयोग व्हावा, नाहींतर उगाच प्रतिष्ठेकरितांच मुखस्तंभा-प्रमाणें सभेंत बसण्यानें वेळेचा अपव्यय होतो, असें त्यांस वाटत असे. सभेंत कारभार व भाषण करण्यास एक प्रकारची तालीम लागते. कित्येक मोठमोठे हुद्देदार, परंतु सभेच्या कामांत अनभ्यस्त असे महाविद्वान् एखाद्या सभेस हजर राहिले असतां, त्यांस दोन शब्द बोलण्याची विनंति झाल्यावरून ते बोलावयास उठतात. त्या वेळेस त्यांची उडालेली तारांबळ व त्यांच्या हातरुमालाची उडालेली दुर्दशा आम्ही स्वतः पाहिली आहे. तेव्हां भाऊसाहेबांसारख्या, लब्धप्रतिष्ठेची आवड नसणाऱ्या गृहस्थांनीं आधींच संकोचवृत्ति धारण करून सभेस जाण्याचें टाळलें, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. एरव्हीं आपल्या परिचयाच्या मंडळींत सभांतून चालू असलेला एखादा विषय चर्चेस निघाला तर, भाऊसाहेब त्यांत आपणास कांहींच समजत नाहीं असें म्हणून स्वस्थ बसत नसत. अशा वेळीं त्यांनीं प्रगट केलेल्या विचारांत ते जरी ग्लॅडस्टन किंवा मेकाले यांचे आधार देऊं शकले नाहींत, तरी आपल्या सारासारविचारशक्तीच्या व व्यवहार-ज्ञानाच्या आधारानें त्यांनीं दिलेल्या मतांत, खुल्या दिलानें ऐकणाऱ्यास बराच तथ्यांश सांपडत असे. हेच विचार मात्र त्यांस सभाधीटपणाच्या अभावामुळें, व भाषण करण्याचा अभ्यास नसल्यानें, सभेंत जाऊन प्रगट करितां येत नसत.

भाऊसाहेब क्लबांत सामील न होण्याचें कारण थोडें वेगळ्या प्रकारचें आहे, व त्याचा दोष आम्हीं आपल्या अर्वाचीन समाजघटनेवर लादूं शकतों. प्राचीन काळीं सर्व प्रकारच्या ज्ञानाचा दर्जा सारखाच मानण्यांत येत असे. पुस्तकी विद्येस जितका मान राजदरबारीं व जनसमूहांत असे, तितकाच तो कला-हुन्नर-व्यापार-उद्योगास असे. असें मानण्यास केवळ श्रुतिस्मृति व पुराणें यांतच नव्हे, तर इतिहासांतसुद्धां वाटेल तितके आधार मिळतील. ही स्थिति मात्र इंग्रजी अंमलांत हिंदुस्थानांत बदलली. इंग्रजी

वाङ्मयाच्या ज्ञानाची मान-प्रतिष्ठा बेसुमार वाढली व त्याच्या खालोखाल दोन चार इंग्रजी पुस्तकें शिकून "यस, नो" करणारे खरडेघांसे यांचा दर्जा लागला; व हुन्नर, कला, व्यापार, उदीम यांत प्राविण्य मिळविलेल्यांचा अथवा शास्त्री, पंडित यांचा भाव अगदींच उतरला. "यथा राजा तथा प्रजा." राज्यकर्त्यांचें धोरण, स्वतःची गरज पुरविण्यास नोकर हवे होते म्हणून व आपल्या व्यापाराची वृद्धि व्हावी म्हणून, त्यांनीं असे दर्जे लाविले व प्रजाजनांनींहि तेच स्वीकारिले. खुद्द विश्वविद्यालयांतसुद्धां उद्योगधंद्यास स्थान मिळालें नाहीं. शेतकी व व्यापार यांचा, अलीकडे जेव्हां समाज थोडा जागा होऊं लागला तेव्हां, शिरकाव झाला. थोडेंसें इंग्रजी शिकून ऑफिसांत खर्डेघांसी करण्यांत लोकांस इतकी धन्यता वाटूं लागली कीं, मनाचा कल असूनहि यंत्रकलाभिज्ञ अथवा शिल्पकार बनण्यांत पांढरपेशा मंडळीस कमीपणा वाटूं लागला. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजींत "यस्, फेस्" करतां येणें हेंच ज्ञान व हीच विद्या, व याखेरीज बाकी सर्व अज्ञान, असा समाजाचा ग्रह बनला. याचें एक ढळढळीत उदाहरण कांहीं वर्षांमागें आमच्या पाहण्यांत आलें.

आमच्याकडे विमा कंपन्यांनीं सर्व गिरण्या तपासून, आगीच्या प्रतिकारास्तव ठरविलेले उपाय किती अंमलांत आणले आहेत तें तपासून गिरण्यांची प्रतवारी करण्याचें काम सोंपविलें होतें. त्याप्रमाणें मुंबईंतील एक गिरणी तपासीत असतां, धोकासूचक घंटा व्यवस्थित आहे कीं नाहीं हें आम्हीं प्रयोगरूपानें तपासीत होतों. त्या गिरणींत कैक वर्षें इंजिन चालविणारा जुना, अनुभवी, वाकबगार व सर्टिफिकेट मिळविलेला परंतु इंग्रजी भाषा न जाणणारा, हुशार इंजिनीयर होता. गिरणीची व्यवस्था नुक्तीच एका तरतरीत इंग्रजी पदवीधराकडे आली होती. त्यानें त्या बिचाऱ्यास इंग्रजी येत नाहीं सबब अडाणी व नालायक ठरविला, व

त्याच्या डोक्यावर दुसरा इंग्रजी भाषा जाणणारा पण अननुभवी इंजिनीयर आणून ठेविला. त्यानें आम्हांस घंटा वाजवून तर दाखविली व भराभर सर्व गिरणींतील कामगार बाहेर पडले. येथपर्यंत सर्व ठीक झालें. पुढें आम्हीं त्या इंजिनीयरास घंटा बंद करण्यास सांगितलें व तो त्या प्रयत्नास लागला, परंतु घंटा बंद होईना; व कोठें काय बिघडलें हें त्यास उमगेना. जवळ असलेल्या एका इसमानें त्या जुन्या इंजिनीयरास बोलावण्यास सुचविलें. तेव्हां त नवे इंजिनीयर आम्हांस रागानें म्हणाले कीं, त्यास तर इंग्रजी एक अक्षरहि येत नाहीं, मला बंद होत नाहीं ती घंटा तो काय बंद करणार ? तथापि आम्ही त्या जुन्या इंजिनीयरास त्याची परीक्षा पाहण्यास बोलाविलें. त्या बिचाऱ्यानें मुकाट्यानें तपासून, कोठें पाण्याचा जास्त दाब झाला होता तो काढून, घंटा बंद केली व आमच्या सांगण्यावरून पुनः वाजवून बंद केली. यावरून नवा इंग्रजी अभ्यासक्रम शिकून तयार झालेला कुचकामाचा असतो, असें आमचें म्हणणें नाहीं. तोहि पुढें अनुभवांतीं जुन्यापेक्षां कदाचित् कांकणभर जास्त सरस होईल. परंतु या झालेल्या नेमणूकीवरून व नव्या इंजिनीयराच्या उद्गारांवरून इंग्रजी लुटुफुटूची किंमत कशी होते व त्याच विषयांत पारंगत असलेल्या, परंतु इंग्रजी न जाणणाऱ्या, आपल्या व्यवसायबंधूकडे तो किती तुच्छतेनें पाहत असतो, याची कल्पना सहज होईल. शिवाय हेंच उदाहरण इंग्रजी शिकणारी पांढरपेशी मंडळी कलमबहादुरीशिवाय सर्व व्यवसाय कमी दर्जाचे लेखीत असतात हें पटवील. असो.

तेव्हां क्लबांत सामील होऊन तेथील 'यस्, फेस्' करणाऱ्या मंडळींनें भाऊसाहेबांसारख्या बाजार हालविणाऱ्या व्यापारकलाभिज्ञाकडे तुच्छतेनें पाहावें, किंवा एखाद्यानें माहीत असूनहि मुद्दाम हिणविण्यासाठीं त्यांच्याशीं इंग्रजींत बोलावें व त्यांना उत्तर देतां न येऊन खालीं पाहण्याचा प्रसंग यावा, हें त्यांच्या सारख्या मानी स्वभावास खपण्यासारखें

नव्हतें. त्यांस कोणाची कांस धरून पदव्या किंवा प्रतिष्ठा मिळवावयाची नव्हती. ह्या सर्व कारणांवरून ते क्लबा-बिबांत दाखल होण्याच्या भरीस पडले नाहींत. तथापि सत्कार्यास वाहिलेल्या संस्थांस त्यांनीं यथाशक्ति मदत करण्यास माघार घेतली नाहीं.

भाऊसाहेबांचा स्वभाव जात्याच आनंदी, विनोदी व आशावादी असे. आपणास इंग्रजी येत नाहीं, याबद्दल त्यांस वरचेवर खेद होत असे; व इंग्रजी शिक्षणानें आपल्या ज्ञानांत भर पडून, आपल्या हातून जास्त जोमाचीं व उपयुक्त अशीं कामें झालीं असतीं, हें ते जाणून होते. परंतु तसें आपल्या नशिबीं नसल्यामुळें "नारायणाची मर्जी!" असें म्हणून ते सुस्कारे टाकीत असत.

आपला उत्कर्ष पाहण्यास वडील व मातोश्री हीं राहिलीं नाहींत, याबद्दल त्यांस वरचेवर खेद होत असे. लहानपणीं आपण व आपल्या वडीलांनीं काढलेले कष्ट नेहमीं त्यांचे डोळ्यांसमोर असत. एखादा होतकरू मनुष्य उद्योगाप्रीत्यर्थ मुंबईस येऊन कांहीं आधार न मिळाल्यामुळें कंटाळून जर का त्यास हात हालवीत आपल्या गांवीं परत जावें लागलें, तर अशा रीतीनें उत्साहभंग झाल्यामुळें उमेद खचून त्यास आपल्या गांवाच्या चतुःसीमेंत कष्टप्रद आयुष्य कंठावें लागतें; उलटपक्षीं, कोणाचा तरी आधार मिळाल्यास तोच मनुष्य मुंबईसारख्या शहरांत स्वतःच्या कर्तबगारीनें आपलें नशीब कसें काढूं शकतो, हें भाऊसाहेबांना स्वानुभवावरून ठाऊक असल्यामुळें, व त्यांचा स्वभाव उपकारी असल्यामुळें, आपल्याकडे आलेल्या प्रत्येक माणसाची सदय अंतःकरणानें ते विचारपूस करीत व सढळ हातानें त्याला मदत करीत. केव्हां केव्हां नोकर ठेवण्याची कांहीं जरूर नसतांहि आपलें नांव घेऊन आपल्या आश्रयास आलेल्या माणसास विन्मुख परत पाठवून त्याचा मनोभंग करूं नये, इतक्याचसाठीं ते त्याला आपल्या दुकानांत ठेवून घेत असत; व अशा रीतीनें मुंबईत राहण्याची एकदा सोय झाल्या-

वर मागाहून फुरसतीनें दुसरीकडे प्रयत्न करून, आपल्या नाशिबाची परीक्षा पाहणें पुष्कळांस सोपें जात असे. भाऊसाहेबांच्या दुकानांतील निरनिराळ्या खात्यांत लहानापासून थोरापर्यंत व अशिक्षितापासून सुशिक्षितापर्यंत सर्व प्रकारच्या माणसांची सोय होण्यासारखी होती.

हल्लीं बाहेरगांवाहून मुंबईंत येणाऱ्याची येथें कांहींतरी सोय होण्यास विशेष अडचण पडत नाहीं. पण २५।३० वर्षांपूर्वीं भाऊसाहेबांकडून मिळणाऱ्या या साहाय्याचें फार महत्त्व होतें. भाऊसाहेबांचे दुकानीं पहिल्यानें टोप्यांच्या शिलाईचें व विक्रीचें काम शिकून नंतर ज्यांनीं स्वतंत्र धंदा केला व त्यांत चांगली बरकत मिळविली, असे आज पुष्कळ गृहस्थ आहेत. मोतीबाजारांत व त्याचे आसपास जे आज कित्येक टोप्यांचे दक्षिणी व्यापारी दिसत आहेत, त्यांतील बहुतेक पहिल्यानें भाऊसाहेबांकडे नोकर म्हणून राहून, त्यांचे तालमींत तयार होऊन, पुढें स्वतंत्र धंदा करून, आज हजारों रुपये मिळवून बसले आहेत.

हे पुढें बनलेले व्यापारी भाऊसाहेबांशीं तंटाभांडण करून निघाले नाहींत. उलट पक्षीं त्यांची अक्कलहुशारी व त्यांचा स्वतंत्र धंदा करण्याचा हुरूप पाहून भाऊसाहेबांनीं त्यांस प्रोत्साहन देऊन राजीखुषीनें रजा दिली होती; व या नव्या व्यापाऱ्यांस, त्यांची आपल्या व्यापारास होणारी स्पर्धा टाळण्यासाठीं, चिरडून टाकण्याचा उद्योग त्यांनीं कधींच केला नाहीं. देशांत जसजसे जास्त लोक उद्योगधंद्यांत पडतील, तसतसें आपल्या लोकांचें, व पर्यायेंकरून देशाचेंहि, कल्याण जास्त होईल असें त्यांचें म्हणणें असे. सारांश, स्वतः व्यापारी बनून कैक इतर लोकांस त्यांनीं व्यापारी बनविलें, स्वतः कारखाना काढून देशाच्या उद्योगांत भर घातली व शेंकडों स्वदेशीयांस पोटापाण्यास लाविलें, हें सर्व त्यांचें औदार्य व स्वदेशप्रीति यांचें द्योतक आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

भाऊसाहेब गुणग्राही होते. प्रथम मुंबईंत दुकान थाटल्यावर धंद्यास स्वतंत्रपणें सुरुवात करतांना भाऊसाहेबांनीं जे चार पांच नोकर ठेवले म्हणून पूर्वी सांगितलें आहे, त्यांत वालावल गांवचे रा. रा. **विष्णु जगन्नाथ प्रभु देसाई** ऊर्फ '**काका मेथाजी**' व नंतर आलेले भाऊसाहेबांच्या पत्नीचे बंधु रा. रा. **गंगाधर यशवंत महाजन** हे दोघे होते; व ते अद्याप त्यांच्या दुकानांत काम करीत आहेत. त्यांनीं आजपर्यंत इमानेंइतबारें बजावलेली नोकरी लक्षांत घेऊन शेवटपर्यंत भाऊसाहेबांनीं त्यांस प्रेमानें वागविलें व त्यांचें कल्याण केलें. ह्या दोघांशिवाय, सतत तीस चाळीस वर्षें काम करीत आलेलीं कित्येक माणसें आजमितीस त्यांच्या आश्रयास असून, त्यांस आपलें कल्याण केल्याबद्दल दुवा देत आहेत.

असा अलौकिक व असाधारण बुद्धिसामर्थ्याचा, उदात्त विचारांचा, शिस्तवार साध्या वळणाचा, धार्मिक वृत्तीचा, प्रेमळ स्वभावाचा, उदार बुद्धीचा, अढळ निश्चयाचा, शीलवंत, उद्योगप्रिय, स्वतंत्र योजक, कल्पक, व स्वावलंबी हिंमतबहाद्दर मोहरा हरपल्यामुळें देशाचें अपरिमित नुकसान झालें आहे.

ईश्वर भाऊसाहेबांच्या आत्म्यास सद्गति देवो !

ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

पडलेल्या गृहस्थांत पुष्कळ व्यापारी व भौतिकशास्त्रप्रवीणाहि आहेत. त्यांनीं आपलें बुद्धिवैभव व सामर्थ्य अशा कामीं खर्ची घातल्यास, देशाच्या उद्योगधंद्यांची वाढ हेंहि राजकारणांतीलच एक अंग असल्यामुळें, त्यांस राजकारणांत पडल्याचेंच श्रेय घडेल व देशाचें कल्याण होईल.

मार्गदर्शक अशा सुसंघटित मंडळांच्या अभावीं कितीतरी होतकरू उमेदवारांस उद्योगधंद्यापासून पराङ्मुख व्हावें लागलें आहे, व इतर दिशांनीं आपला चरितार्थ कसातरी चालविणें भाग पडलें आहे. या उमेदवारांत परदेशांतून कलाहुन्नर शिकून आलेल्यांचाहि बराचसा भरणा आहे, हें मोठ्या खेदानें येथें नमूद करणें भाग पडत आहे. त्यांनीं परदेशांत जाऊन शिकण्यास खर्च केलेला पैसा व शक्ति—म्हणजे राष्ट्राचीच संपत्ति व शक्ति—फुकटच गेली, असें म्हणावें लागतें. अशाप्रकारें राष्ट्रशक्ति व संपत्ति यांचा ऱ्हास होऊं नये म्हणूनच आम्ही म्हणतों कीं, व्यापार, उद्योगधंदे व भौतिकशास्त्रें यांतील निष्णात व अनुभविक अशा गृहस्थांचीं प्रांतिक मंडळें स्थापून, त्यांनीं येथील लायक उमेदवारांस शिक्षण मिळेल असे कारखाने काढणें व त्यांतून तयार झालेल्यांस, तसेंच परदेशांतून शिकून आलेल्यांस,सवलतीच्या कर्जाच्या रूपानें भांडवल पुरवून मार्ग दर्शविणें इष्ट आहे. कदाचित् कांहीं अडथळे येऊन प्रयत्न फुकट जातील व तेणेंकरून अशा प्रयत्नांत फारच मोठ्या प्रमाणांत गुंतविलेल्या राष्ट्रसंपत्तीचा अपव्यय होईल अशी शंका वाटत असेल तर, तिचें समाधान करण्यास सर टाटांचें "जमशेदपूर" व लोकमान्य टिळकांचें "तळेगांव" यांसारखे दाखले आहेतच. कांहीं झालें तरी, घूस पुढें बिळें पाडील म्हणून घरच बांधावयाचें नाहीं, हा भ्याडपणा काय म्हणून ? व्यापारांत व उद्योगधंद्यांत पडून डळमळीत स्थितींत असलेल्यांस किंवा हताश व हतवीर्य झालेल्यांस, आणि त्यांत पडूं पाहणाऱ्या होतकरूंस, भाऊसाहेबांच्या जीवनचरित्रांतून

पुष्कळच गोष्टी उचलण्यासारख्या आहेत. त्यांपैकीं आमच्या मतें प्रामुख्यानें व ठोळक मानानें नमुद करण्यासारख्या येथें देतों.

कोणत्याहि धंद्यांत पडावयाचें झाल्यास स्वतःच्या मनाचा कल व आवड त्या दिशेस असावयास पाहिजे. उगाच पोटासाठीं कांहीं-तरी करावयाचें म्हणून त्यांत पडल्यानें म्हणण्यासारखी प्रगति व प्राप्ति होण्याचा संभव नाहीं; उलट, भलत्याच मार्गांत पडल्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी यावयाची. सतत उद्योग करण्याची तयारी असून, अंगीं चिकाटी असावयास पाहिजे. तसेंच कोणतेंहि काम करण्याचें एकदा ठरविल्यानंतर तें करण्याचा दृढनिश्चय केला पाहिजे; व कितीहि परिश्रम करावे लागले तरी त्यांची पर्वा न करितां तो कायम टिकविला पाहिजे. मागचें पुढचें धोरण पाहूनच करावयाचा कोणता तरी एक धंदा ठरविला पाहिजे. आज एक, उद्यां दुसरा, अशानें कधींहि निभाव लागावयाचा नाहीं. तसेंच एक धंदा करीत असतां त्याची उभारणी व मांडणी भक्कम पायावर झाली असून, त्यास चिरस्थायी रूप आल्याशिवाय आणखी दुसरा धंदा हातीं घेणें सोईस्कर व हितकर व्हावयाचें नाहीं. एक तरी धड असल्याशिवाय माराभर चिंध्या गोळा करण्यांत अर्थ नाहीं. धाडसांत उतरण्याची थोडीबहुत तयारी पाहिजेच आहे. परंतु या बाबतींत सारासारविचाराची पूर्ण अवश्यकता आहे. धाडस कधींहि अमर्याद व शक्तिबाह्य होऊं देतां कामा नये. प. वा. चुनिलालसरय्या यांच्यासारखे बुद्धिमान् व निष्णात सावकार राक्षसी महत्वाकांक्षेस बळी पडून जगाची चांदी अडकविण्याचा प्रयत्न करावयास गेले, व त्यांत त्यांनीं स्वतः उभारलेल्या नवीन इंग्रजी धरतीच्या सराफी पेढी ( बँक ) चीं आहुती दिली. पतकरलेल्या धंद्याची इत्थंभूत माहिती करून घेतली पाहिजे व तपशीलावर विशेष ध्यान ठेविलें पाहिजे; कारण प्रत्येक वस्तु तिच्या भागाच्या समुदायानें बनलेली असते, व एखादा

भाग लंगडा पडला तर संबंध वस्तु लंगडावयास लागते. वेगवेगळ्या समाजांची आवडनिवड व ऐपत यांचें ज्ञान व्यापार व उद्योगधंदा यांस फार उपयोगी होतें. याप्रमाणें उद्योगधंदा करितांना स्वतःची तयारी असावी लागते.

व्यापाराची किंवा धंद्याची मांडणी व व्यवस्था करितांना फार बुद्धि वापरावी लागते. जुनी पद्धत स्वस्त व सोपी असते खरी, प अनेक आधुनिक देशी व परदेशी संस्थांशीं चढाओढ करावयाची अ त्यामुळें, तींत अवश्य त्या सुधारणा केल्याच पाहिजेत. जुनें तेवढें स समजून त्यासच हट्टानें चिकटून बसून नुकसानींत येणें कधींहि शहा पणाचें होणार नाहीं. उलट पक्षीं केवळ सद्यःकालीन इंग्रजी पद्धतीच थाट आणून भांडवलाचा अपव्यय करण्यांत हांशील नाहीं. कामाशीं गांठ ठेऊन जुन्या पद्धतीनें जेवढा कार्यभाग निर्दोषपणें होण्यासारखा असेल तेवढ्यापुरती ती पद्धत ठेवावी, व त्यांत जरूर तेवढ्या आधुनिक नव्या पद्धतीच्या सुधारणांचा समावेश करण्यास मागेंपुढें करूं नये. त्याच-प्रमाणें तयार मालांतसुद्धां नव्या नव्या तऱ्हांचा भरणा करीत राहावें. कामावर माणसांची योजना गुणदोष पाहून करीत जावें, व वेगवेगळ्या खात्यांचे जबाबदार वेगळे असून त्यांच्या कामाचा व हिशेबाचा पडताळा मिळेल अशी योजना केलेली असावी. नोकरांच्या जरूर तितक्या संख्येंत कसर करतां कामा नये; कारण मनुष्याची शक्ति मर्यादित आहे. सर्वांवर स्वतःची नजर राखून, शिस्त व नेमस्तपणा यांवर कटाक्ष ठेवावा, व त्यांच्या सुखसोईकडे लक्ष देऊन, व स्वतः आपलें त्यांच्याशीं विशिष्ट तऱ्हेचें वर्तन ठेऊन, त्यांच्यांत आपलेपणा व कळकळ उत्पन्न करावी.

आर्थिक बाब म्हणजे व्यापार व उद्योगधंदा यांचें जीवनसर्वस्व. यांत काडीभर सुद्धां हलगर्जीपणा चालावयाचा नाहीं. बिनचूक हिशेब,

होतां होई तों रोकडीचा व्यवहार, वक्तशीर उग्राणी, वगैरे बाबतींत फार सावध राहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें वेळचे वेळेवर देणें देऊन पत सांभाळली पाहिजे, व साधल्यास, मुख्य उद्योगास अडथळा न येतां भांडवलांत अथवा गंगाजळींत भर घालतील असे इतर व्यवसाय केल्यास ठीक होईल, व स्वतःचा मगदूरहि वाढेल. माल सुबक व टिकाऊ बनवून व प्र.क्य तितक्या कमी किंमतीस देऊन गिऱ्हाईकांस संतुष्ट राखलें पाहिजे ता. त्यांचें मन आपल्या मालाकडे ओढलें जाईल असे प्रयत्न केले पाहिजेत. राहणी दर्जा सांभाळून बेताची ठेवावी. उधळपट्टी व खोटा डामडौल यांचे भरीस पडूं नये. व्यापारांत काय किंवा उद्योगधंद्यांत काय नेकी, सचोटी व नीतिमत्ता यांची कांस सोडतां कामा नये.

वरील सर्व कलमें भाऊसाहेबांच्या जीवनचरित्रांतील धोरणावरून सारांश रूपानें आम्हीं दिलीं आहेत. हीं सर्व सांभाळून हुशार मनुष्य व्यापारांत किंवा उद्योगधंद्यांत उतरल्यास त्यास यश आलेंच पाहिजे; तें न आलें तर मात्र त्याचा दोष त्याच्या दुर्दैवाच्या माथीं मारणें भाग आहे.

देशास सुसंपन्नावस्था येण्यास सर्व प्रकारच्या उद्योगधंद्यांचा लहानमोठ्या प्रमाणावर फैलाव झाला पाहिजे. आजच्या काळांत एकट्यानेंच उद्योगधंदा करणें सर्वांस शक्य होत नाहीं. कांहीं धंदे भागीनें अथवा इंग्रजी पद्धतीच्या भाग ( शेअर ) विक्रीच्या सहकारी तत्वावर उभारणें इष्ट व हितकर होतें. या पद्धतीचे प्रयत्न हल्लीं जागोजागीं चालू आहेत. परंतु आमच्या देशाचें दुर्दैव कीं, असले प्रयत्न फारसे समाधानकारक स्थितींत नाहींत. याचें कारण कांहीं ठिकाणीं नीतिमत्तेचा अभाव, तर इतर ठिकाणीं जुटीनें काम करण्यांत आमच्या लोकांची अपात्रता. उद्योगधंद्यांत स्वार्थ तर असतोच, परंतु त्याबरोबरच देशहितहि साधावयाचें असतें, ही जाणीव आमच्या लोकांत अजून पूर्णपणें विकास पावलेली

*

नाहीं. म्हणून स्वार्थासाठीं उद्योगधंद्यास लाथाडण्यापर्यंत पुष्कळांची मजल गेलेली असते. उद्योगधंद्यांत उद्योगासाठींच पडावयाचें, अशी भावना धरून जो उद्योगांत पडेल त्याच्या घरीं संपत्ति, मानमरातब, वगैरे आपण होऊन कायमच्या वस्तीसाठीं चालत येतील, व त्याच्या पदरांत देशहिताच्या पुण्याचा सांठाहि पडेल.

भाऊसाहेब व्यापार व उद्योगधंदा उद्योगप्रियतेच्या भावनेनें करीत गेले; केवळ द्रव्यार्जन हेंच ध्येय दृष्टीसमोर ठेऊन नव्हे. कारण तसें असतें तर, शेवटच्या तीनचार वर्षांत त्यांची प्रकृति अगदीं अस्वस्थ झाल्यावर, पदरीं दहा पिढ्यांपर्यंत पुरेल इतका धनसंचय झालेला असल्यामुळें, ते "हरि हरि" करीत स्वस्थ बसले असते. परंतु त्यांचा अंत झाला त्या दिवशीं सकाळींसुद्धां ते कामाकाजाची भानगड पडल्या पडल्या करीतच होते, यावरून त्यांची उद्योगप्रियता किती दांडगी होती, हें दिसून येतें. भागीदारीच्या संबंधानें भाऊसाहेबांच्या चरित्रांतून एक अमोलिक धडा घेण्यासारखा आहे. तो हा कीं, बहुतेक धंद्यांत भागीदारांत बेबनाव होऊन भागी मोडण्याचा प्रसंग केव्हां ना केव्हां तरी यावयाचाच. अशा वेळीं कोर्टदरबार करून भागीदारांनीं आपल्या संपत्तीचा अपव्यय करावा व कज्जेदलाल वकील व बॅरिस्टर यांची धन करावी, त्यांपेक्षां आपसांत समजुतीनें तडजोड करून राजीखुषीनें भागी मोडावी, व आपसांतील स्नेहसंबंध कायम राखावा हा उत्तम पक्ष होय.

आमच्या धर्मतत्वांप्रमाणें आम्हां हिंदूंस पुनर्जन्म हा मान्य आहे. (आम्ही थिऑसफिस्ट तर त्यास विशेष मान्यता देतों). भाऊसाहेब व्यापार व उद्योगधंदा यांत जन्मसिद्ध कुशल होते; व हें कौशल्य त्यांनीं आपल्या आयुष्यांत पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांस शिक्षणाची उणीव

फार जाणवत होती, व त्याविषयीं त्यांस फार हळहळाहि वाटे. ही शिक्षण-प्राप्तीबद्दलची त्यांची इच्छा अपुरी राहिली आहे. त्यांच्या आत्म्यास आतां सद्गति मिळावी अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहेच; तथापि त्या जगन्नायकाजवळ आमचें मनोभावें करून असेंहि मागणें आहे कीं, भाऊसाहेबांची सदरहू इच्छा अपुरी राहिल्यामुळें "**जन्म घेणें लागे वासनेच्या अंगें**" या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणें त्यांस जन्मास घालावयाचेंच असेल तर, पुढच्या जन्मीं उच्च प्रतीचें शिक्षण व विपूल भांडवल मिळेल अशा परिस्थितींत आमच्या देशांतच जन्मास घालावें, म्हणजे त्यांच्या हातून या जन्मीं झालें त्याच्या सहस्रपटीनें पुढच्या जन्मीं देशाचें हित होईल.

REFBK-0002249

ॐ तत्सत् ।

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२४८